**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी** : राज्यात नदीजोड प्रकल्पाची अंमलबजावणी करणे

**मु.शी** : राज्यात नदीजोड प्रकल्पाची अंमलबजावणी करणे या विषयावर सर्वश्री धोंडीराम राठोड, सुरेशदादा देशमुख, चंद्रकांत रघुवंशी व श्रीमती सुधा जोशी यांचा प्रस्ताव.

श्री.धोंडीराम राठोड ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी, आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो-

"राज्याची भौगोलिक परिस्थिती व भूगर्भातील खोल जाणारी पाण्याची पातळी विचारात घेता दुष्काळी व तुटीच्या प्रदेशाला आवश्यक तेवढे पाणी पिण्यासाठी आणि शेतीच्या दोन पिकांसाठी पाणी उपलब्ध करुन देणे गरजेचे असून राज्यातील वाया जाणारे पाणी आणि राज्यातील ज्या प्रदेशात अधिक पाणी उपलब्ध आहे, तेथून तुटीच्या प्रदेशात लिफ्ट, बोगदे, कालवे करुन पाणी उपलब्ध करुन देणे, तसेच कोकणातून वाया जाणारे पाणी वैनगंगा व इंद्रावती नदीला जादा पाणी वळविणे गरजेचे आहे. यासाठी राज्यातील नदी जोड प्रकल्पाला चालना मिळणे आवश्यक असणे, राज्याअंतर्गत आंतर खोरे, पाणी परिवहनाच्या योजना महाराष्ट्र पाणी परिषदेने राज्य शासनाला व केंद्र शासनाला सादर केलेल्या असणे त्यासाठी महाराष्ट्र पाणी परिषदेने त्यांच्या अंमलबजावणीसाठी वेळोवेळी पाठपुरावा करणे, तसेच सदर प्रस्तावांचे सर्वेक्षण व अन्वेषण करण्यासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा करुन देखील अद्याप कोणतीच कार्यवाही न होणे, राज्यातील दुष्काळग्रस्त आणि पाणी टंचाईच्या प्रदेशांना पाणी परिवहनाने पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी योजनांच्या प्रस्तावांचे तातडीने सर्वेक्षण व आर्थिक तरतूद करुन एक समयबध्द कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे, याबाबत राज्य शासनाने तातडीने कार्यवाही करुन दुष्काळग्रस्त व तुटीच्या खोऱ्यातील लोकांना दिलासा देण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची भूमिका व शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी"

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धोंडीराम राठोड..........

सभापती महोदय, अत्यंत महत्वाचा प्रश्न मी नियम 260 अन्वये मांडत आहे. सध्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न आणि शेतीला पाणी देण्याचा प्रश्न असे दोन ज्वलंत प्रश्न आज आपल्यासमोर यक्ष म्हणून उभे ठाकले आहेत. यापुढे ज्या लढाया होतील त्या पाण्यासाठी होतील. पिण्याचे पाणी उपलब्ध होत नाही त्यावरुन भांडण, शेतीला भरपूर पाणी उपलब्ध होत नाही त्यावरुन भांडण, बंधारे बांधले त्यावरुन भांडण, शेवटी पाणी हा भांडणाचा मुख्य केंद्रबिंदू असून

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.अजित.... 09:50

श्री.धोंडीराम राठोड...

म्हणून हा प्रश्न अतिशय गंभीर स्वरुपाचा असल्यामुळे शासनाने या गोष्टीकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. हा प्रश्न नजिकच्या भविष्यकाळात सोडविण्याच्या दृष्टीने शासनाने काही महत्वाच्या उपाययोजना करावयास पाहिजेत.निसर्गाच्या लहरीवर अवलंबून असलेले पर्जन्यमान आणि भूगर्भातील पाण्याची पातळी सतत खोलखोल जात आहे. यालाच हायड्रॉलॉजिकल सायकल म्हणतात. पाऊस पडल्यानंतर जमिनीत पाणी मुरते, त्या पाण्याचा उपसा होतो, परत पाऊस पडतो आणि परत पाण्याचा उपसा होतो. परंतु आता मोठया प्रमाणात पाऊस पडत नसल्यामुळे उपसण्याएवढे पाणी जमिनीत मुरत नाही, ही प्रक्रिया वर्षानुवर्षे सुरु असून त्यामुळे पाण्याची पातळी खालीखाली जात आहे. पर्जन्यमानाच्या बाबतीत तीन प्रकारचे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. 1) अतिपर्जन्याचा असलेला विभाग. कोकण हा अतिपर्जन्य असलेला विभाग आहे. त्याठिकाणी 200-300 मिलीमीटर पाऊस पडतो. 2) अवर्षणप्रवण विभाग. मराठवाडा हा अवर्षणप्रवण विभाग आहे. एकूण 87 तालुके जे अवर्षणप्रवण आहेत त्यापैकी 76 तालुके मराठवाडयातील आहेत. म्हणजे आम्ही मराठवाडयातील लोक सगळयाच बाबतीत कसे उपेक्षित आहोत, याचे हे ज्वलंत उदाहरणच आहे. आम्ही याठिकाणी बऱ्याच वर्षापासून ओरडतो की, मराठवाडा मागासलेला आहे, आमच्या मराठवाडयाचा विकास झालेला नाही. पाण्याच्या संदर्भात 87 तालुक्यांपैकी 76 टंचाईग्रस्त तालुके मराठवाडयातील आहेत. 3) शास्वत पर्जन्यमानाचा विभाग. विदर्भ हा शास्वत पर्जन्यमानाचा भाग आहे. असे तीन प्रकारचे वर्गीकरण आपण याठिकाणी केलेले आहे. दर सात वर्षानंतर भू-जल मूल्यांकन होत असते. राज्यात 1505 पाणलोट क्षेत्र तयार केलेले आहेत. त्यापैकी 76 पाणलोट क्षेत्र अविकसित आहेत. म्हणजे 100 टक्केपेक्षा जास्त त्याठिकाणी पाण्याचा उपसा केला जातो. 20 पाणलोट क्षेत्र असे आहेत की, त्याठिकाणी 90 टक्के ते 100 टक्के पाण्याचा उपसा केला जातो. अशाप्रकारे 76 + 20 = 96 पाणलोट क्षेत्र 14 जिल्हयांत आहेत. हे सर्व मोठे जिल्हे आहेत. त्यामध्ये नाशिक, अहमदनगर, पुणे, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, अमरावती, भंडारा, वर्धा,औरंगाबाद, लातूर व इतर तीन जिल्हे असे मिळून 14 जिल्हे विकसित आणि अतिविकसित क्षेत्र आहे. त्यामुळे पाणी उपसा आणि वापरावर नियंत्रण आणणे आवश्यक असून त्यासाठी कायदा करावा लागला तरी तो आपण करावा, अशी विनंती मी माननीय सभापती

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ SBT/ MAP/ 09:50

श्री.धोंडीराम राठोड...

महोदयांच्या वतीने शासनास करीत आहे. यामध्ये असे होते की, इलेक्ट्रीक मोटारीने किंवा इतर मार्गाने पिण्याचे पाणी भरपूर प्रमाणात उपसण्यात येते व त्यामुळे सर्वसामान्य माणसाला पिण्यासाठीही पाणी मिळत नाही. आज प्रत्येक ठिकाणी विहिरीतून, कालवातून मोटारीने विनापरवाना पाणी उपसले जात आहे. विहिरीतून पाणी काढण्याच्या संदर्भात निर्बंध आहेत, परंतु त्या निर्बंधांचे पालन केले जात नाही. आज एका विहिरीच्या बाजूला दुसरी विहीर, एक विंधण विहीरीच्या बाजूला दूसरी विंधण विहिर घेऊन त्याठिकाणी जमिनीची चाळणी करुन पाणी उपसण्याचे काम मोठया प्रमाणात चालू आहे. दोन विहिरींमध्ये किती अंतर असले पाहिजे याबाबत स्पष्ट नियम आहेत परंतु त्या नियमाचे पालन केले जात नाही. यामुळे पाणी तर भरपूर वेस्ट होतेच, परंतु अशापध्दतीने सतत पाण्याचा उपसा होत आहे. आपल्याला लागणारे पाणी आपण काटकसरीने वापरले पाहिजे. पिण्यासाठी किंवा शेतीसाठी पाणी वापरले तर त्यामुळे फारसा फरक पडत नाही, परंतु आवश्यकतेपेक्षा जास्त पाणी वापरण्याची, आवश्यकतेपेक्षा जास्त वीज वापरण्याची आपल्याला सवयच झालेली आहे. त्यामुळेच आज आपल्याला विजेचा व पिण्याच्या पाण्याचा तुटवडा जाणवत आहे. याबाबतीत अतिवापर झाल्यामुळेच हा प्रश्न निर्माण होत आहे, असे माझे मत आहे.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ MAP/ SBT/ प्रथम श्री.पुरी...... 09:55

श्री.धोंडीराम राठोड........

सभापती महोदय, या निमित्ताने आपल्या माध्यमातून शासनाला मला एक सूचना करावयाची आहे. पीक पद्धतीमध्ये बदल करण्याचा शासनाचा मनोदय आहे. शासनाने अनेक वेळा सांगितले आहे की, पीक पद्धती बदलली पाहिजे. जास्तीचे पाणी लागणारी पीकेच जर घेतली तर जमिनीचा पोत बिघडतो आणि ही पीके घेण्यासाठी पाणीही जास्तीचे लागते, म्हणून प्रचलित पीक पद्धती बदलली पाहिजे, असे आपण नेहमीच बोलत असतो. परंतु, प्रत्यक्षात यासंदर्भातील अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. काही ठिकाणी तर द्राक्षे, ऊस, केळी, मोसंबी, संत्री अशी जास्तीचे पाणी लागणारी पीके घेतल्यामुळे पाण्याचा तुटवडा जाणवतो. त्यामुळे हा विषय शासनाने गांभीर्याने घेऊन ही पीक पद्धती तातडीने बदलण्याची कार्यवाही करावी, असे मला या निमित्ताने सूचवावेसे वाटते. त्यासाठी दांडयाव्दारे पाणी देण्याची जी जुनी पद्धत आहे ती बदलून ठिबक किंवा तुषार सिंचन पद्धतीचा वापर मोठया प्रमाणावर सुरु करावा, जेणेकरुन कमी पाण्यामध्ये अधिक पिके घेता येऊ शकतात, पाण्याची गरज कमी होते व पाणी वाया जात नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आजच्या चर्चेचा प्रस्ताव सत्तारुढ पक्षाकडून दिलेला आहे. चर्चेचा प्रस्ताव विरोधी पक्षाकडून दिलेला आहे की सत्तारुढ पक्षाकडून दिलेला आहे, हा विषय वेगळा. एकदा सभागृहात विषय उपस्थित झाल्यानंतर तो सभागृहाचा विषय होतो. काल मी जाणीवपूर्वक आठवण करुन दिली होती की, उद्याची चर्चा सत्तारुढ पक्षाकडून दिलेली असल्यामुळे कोरम ठेवण्याची जबाबदारी सत्तारुढ पक्षाने घ्यावी. दुर्देवाने ही चर्चा आता सुरु असतांना सभागृहात केवळ चारच सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत. कोरमअभावी आपण चर्चा सुरु ठेवली, त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही, तो आपला निर्णय आहे. या चर्चेचा प्रस्ताव ज्या सन्माननीय सदस्यांनी दिला असे सन्माननीय सदस्य, श्री.धोंडीराम राठोड व सन्माननीय सदस्य, श्री.चंद्रकांत रघुवंशी वगळता सन्माननीय सदस्य, श्री.सुरेशदादा देशमुख व सन्माननीय सदस्या, श्रीमती सुधा जोशी या देखील सभागृहात उपस्थित नाहीत. कोरमचा विषय सभागृहात वारंवार चर्चिला जातो. प्रत्येक वेळी आम्हाला हेच रडगाणे गावे लागणे आवडत नाही. अशा वेळी आमच्या ज्येष्ठतेचा मुद्दा उपस्थित केला जातो व वेळ मारुन नेली जाते. प्रत्येकवेळी माननीय सभापतींना अडचणीत आणणे देखील आम्हाला आवडत नाही. मागील अधिवेशनात कामकाजाचे तास वाचत असतांना गेल्या पन्नास वर्षात जे घडले नाही ते माननीय

..2........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

सभापतींना जाहीर करावे लागले. कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे अमूक अमूक एवढा सभागृहाचा वेळ वाया गेला, असे त्यांना जाहीर करावे लागले. ही बाब सत्तारुढ पक्षाला भूषणावह आहे काय ? अधिवेशनाचे दिवस कमी असतात, अनेक विषयांवर चर्चा करावयाची असते, वेळ कमी पडतो, या सर्व बाबी असल्या तरी कोरमअभावी ही चर्चा सुरु आहे, एवढेच मी निदर्शनास आणतो.

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने आणखी एक मुद्दा मला शासनाच्या निदर्शनास आणावयाचा आहे. आता लोकांनी स्वत:वर काही बंधने घालून घेण्याची गरज आहे. अनेक विभागांनी, गावांनी सामुहिक निर्बंध घालून घेतल्याचे आपण ऐकतो. दारुबंदी, वृक्षतोड बंदी, अनावश्यक पाणी वापरावरील बंदी, जादा वीज वापरावरील बंदी अनेक गावांनी स्वत:वर घालून घेतली आहे व अशी अनेक आदर्श गावे महाराष्ट्रात आहेत. सामुदायिक निर्बंध, स्वत:वर, स्वत:नेच घालून घेतलेले निर्बंध याबाबत जनजागरण करण्याची गरज आहे. अशाप्रकारचा अवेअरनेस महाराष्ट्रातील खेडया-पाडयात, गावात, शहरात आला पाहिजे, यासाठी देखील शासनाने प्रयत्न करण्याची गरज आहे. स्वयंनियमनाची सवय लागण्यासाठी काही गोष्टी लोकांमध्ये वारंवार सांगितल्या गेल्या पाहिजे, जनमानसावर बिंबविल्या गेल्या पाहिजेत आणि त्यासाठी या गोष्टींचा प्रसार व प्रचार केला गेला पाहिजे. कुटुंब नियोजनाच्या बाबतीत, हरितक्रांतीमध्ये बी-बियाण्यांच्या व खतांच्या बाबतीत अशा प्रकारचा प्रयोग झाला व त्यामुळे लोकमानसावर त्याचा योग्य परिणाम झाला व त्याची फळे आज आपण चाखतो आहोत. त्यामुळे यासंदर्भातही शासनाने विचार करावा, असे मी या निमित्ताने सूचवू इच्छितो.

सभापती महोदय, मे, 2007 मध्ये शासनाने राज्यातील पाणी पातळी तपासली होती. त्यानुसार राज्यातील 313 तालुक्यांपैकी 243 तालुक्यांमध्ये पाण्याच्या पातळीत घट आल्याचे निदर्शनास आले आहे. 92 तालुक्यांमध्ये ही घट 0 ते 1 टक्के एवढी आहे, 13 तालुक्यांमध्ये ती 1 ते 2 टक्क्यांपर्यन्त आहे, 4 तालुक्यांमध्ये ती 2 ते 3 टक्क्यांपर्यन्त आहे व 2 तालुक्यांमध्ये ही घट 3 टक्क्यांपेक्षा जास्त आहे, असे आढळून आले आहे.

यानंतर श्री.बोरले..........

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ SBT/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ......... 10:00

श्री.धोंडीराम राठोड ..........

ती घट अशीच कमी-कमी होत गेली तर निश्चितपणे उद्या पाण्यासाठी भांडणे होतील. हा मुद्दा वारंवार एवढयासाठीच सांगितला जातो की, आपण वेळीच यावर निर्बंध घातले नाहीत, पाण्याचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला नाही तर उद्या पाण्यासाठी भांडणे होतील. अनेक वर्षापासून शासन पिण्याच्या पाण्यासाठी करोडो रुपये खर्च करीत आहे. विहिरी खोदण्यासाठी, विंधन विहिरी खोदण्यासाठी, टँकरने पाणी पुरवठा करण्यासाठी शासन करोडो रुपये खर्च करते. परंतु त्यासाठी देखील भांडणे होतात. विंधन विहीर खोदायची असेल तर ती माझ्या वस्तीत खोदायची की तुझ्या वस्तीत खोदायची, माझ्या वाडीत खोदायची की तुझ्या वाडीत खोदायची, यावरुन भांडणे होतात. म्हणजे पाण्यासाठी भांडणे सुरु झालेली आहेत. सर्वांना पिण्याचे पाणी मिळवण्यासाठी शासनाला उपाययोजना कराव्या लागतील, असे मला सूचवावेसे वाटते.

सभापती महोदय, आपण मागच्या वर्षीचे पर्जन्यमान बघितले तर आपल्या असे लक्षात येईल की, राज्यातील 35 तालुक्यांमध्ये 10 टक्क्यापेक्षा कमी, 36 तालुक्यांमध्ये 10 ते 20 टक्क्यापेक्षा कमी, 29 तालुक्यांमध्ये 20 ते 30 टक्क्यापेक्षा कमी पर्जन्यमान झालेले आहे आणि फक्त भंडारा जिल्हयातील लाखनी तालुका असा आहे की त्या ठिकाणी 50 टक्क्यापेक्षा कमी पर्जन्यमान झालेले आहे. यासंदर्भात शासनाने जो अहवाल तयार केलेला आहे त्यामध्ये आपल्याला हे बघावयास मिळेल. आपण निसर्गावर अवलंबून आहोत. पाऊस पडतो, परंतु ते पाणी वाहून जाते. पावसाचे पाणी पाहिजे तसे जमिनीमध्ये मुरत नाही. म्हणून पाण्याची पातळी खोल जात आहे. त्यासाठी तातडीने उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. जेथे कमी पाऊस पडला त्यासंदर्भातील ही आकडेवारी आहे.

सभापती महोदय, मागच्या वर्षी राज्यातील 252 तालुक्यांमध्ये 200 ते 300 टक्के पाऊस झ ाला. काही ठिकाणी 50 टक्क्यापेक्षा कमी पाऊस तर काही ठिकाणी 200 टक्क्यापेक्षा जास्त पाऊस पडतो, अशा प्रकारे निसर्ग आपल्याला छळतो आहे. शेतकरी आभाळाकडे डोळे लाऊन बघतात की पाऊस केव्हा पडेल, पेरण्या केव्हा होतील, पाऊस पडला नाही तर आमचे आलेले पीक हातातून तर जाणार नाही ना. शासनाने पिण्याचे पाणी आणि पिकांसाठी किमान दोन पाणी

..2...

GRB/ SBT/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ......... 10:00

श्री.धोंडीराम राठोड ..........

शेतक-यांना उपलब्ध करुन दिले पाहिजे, यासाठी शासनाला उपाययोजना करावी लागेल. आणखी एक गोष्ट सांगितली पाहिजे की, आघाडी शासनाने काही क्रांतिकारक निर्णय घेतलेले आहेत. गावतळे, शेततळे, पाझर तलाव, विहीर, पुनर्भरण असेल, मातीबांध असेल, सिमेंट बांध असेल, लघु पाटबंधारे प्रकल्प असतील किंवा मध्यम प्रकल्प असतील या सर्व योजना जलसंपादा विभाग आणि जलसंधारण विभागाच्यावतीने राबविण्याचा निर्णय आघाडी शासनाने घेतल्यानंतर सुध्दा अजून पाण्याच्या पातळीमध्ये पाहिजे तशी वाढ झालेली नाही. पिण्यासाठी आणि शेतीसाठी मुबलक प्रमाणात पाणी मिळत नाही, हे आपल्याला कबूल करावे लागेल. पिण्यासाठी आणि शेतीसाठी मुबलक प्रमाणात पाणी मिळण्यासाठी काही गोष्टी करणे गरजेचे आहे. माझ्या प्रस्तावामध्ये मी असे नमूद केलेले आहे की,"...राज्यातील वाया जाणारे पाणी आणि राज्यातील ज्या प्रदेशात अधिक पाणी उपलब्ध आहे, तेथून तुटीच्या प्रदेशात लिफ्ट, बोगदे, कालवे करुन पाणी उपलब्ध करुन दिले पाहिजे." माझ्या प्रस्तावामध्ये मी दुसरा मुद्दा नदी जोड प्रकल्पाच्या बाबतीत सांगितला आहे. वर्षानुवर्षे नदी जोड प्रकल्पावर चर्चा होते. राज्यात काही ठिकाणी महापूर येतात तर काही ठिकाणी दुष्काळ पडतो. काही नद्यांच्या काठावरील गावे वाहून जातात तर दुसरीकडे पिण्यासाठी पाणी मिळत नाही, अशा प्रकारची अवस्था असतांना ज्या नदी जोड प्रकल्पाबाबत आपण चर्चा करतो त्याला चालना मिळाली पाहिजे.

यानंतर श्री.गागरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धोंडीराम राठोड.....

शासनाने गांभीर्याने घेतले पाहिजे. नदीजोड प्रकल्प पूर्ण केले तर महापूर येणार नाही. महापूरामुळे शेतीचे व घराचे नुकसान होणार नाही. पूर आला तर शासनाकडून प्रत्येक वेळी मदत करण्याची आवश्यकता राहणार नाही तसेच दुष्काळामध्येही मदत देण्याचे काम पडणार नाही. याचे योग्य नियोजन झाले तर शासनावर वेळोवेळी आर्थिक बोजा पडणार नाही. सर्व दृष्टीने विचार केला तर नदीजोड प्रकल्प हा अत्यंत महत्वाचा आहे. या प्रकल्पाबाबत वेळोवेळी खूप चर्चा होते. हा प्रकल्प पूर्ण करता आला तर आपले खूप प्रश्न सुटणार आहेत असे मला वाटते.

आंतरखोरे प्रकल्प विकसित करताना शासनाने वेगवेगळी खोरी निर्माण केलेली असून त्यामध्ये तापी खोरे, गोदावरी खोरे, कृष्णा खोरे इत्यादींचा समावेश आहे. अशा प्रकारे विविध खोऱ्यातून पाणी उपलब्ध करुन देऊ शकतो. या खोऱ्यामध्ये अनेक बंधारे तयार करुन देऊ शकतो. शासनाकडून त्या त्या खोऱ्यात पडणाऱ्या पावसाचे व पाणी अडविण्याचे नियोजन केले जाते. वाया जाणारे पाणी अडविण्यासाठी व आवश्यक त्या ठिकाणी पुरविण्यासाठी महाराष्ट्र पाणी परिषदेने राज्य शासन व केंद्र शासनाकडे योजना सादर केलेली आहे. या योजनेचे नाव पाणी परिवहन योजना असे आहे. यामध्ये पाणी वाहून नेण्याची योजना, कालव्याच्या माध्यमातून लिफ्टच्या माध्यमातून, बोगद्याच्या माध्यमातून तयार केलेली आहे. महाराष्ट्र पाणी परिषदेने राज्य शासन व केंद्र शासनाकडे सादर केलेला प्रस्ताव मंजूर करण्यासाठी पाठपुरावा झाला पाहीजे. हा प्रस्ताव मंजूर करुन घेण्याच्या दृष्टीने शासनाने प्रयत्न केला पाहिजे. येथून तेथे पाणी वाहून नेल्याशिवाय पिण्यासाठी, शेतीसाठी मुबलक पाणी उपलब्ध होणार नाही. जलतज्ञ व जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांचेही असेच मत आहे. पाणी येथून तेथे नेल्याशिवाय व लिफ्ट केल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. जमीन व माणसाला पाणी मिळणे अत्यंत आवश्यक आहे म्हणून त्यावर उपाययोजना करण्यासाठी पाणी परिषदेने दिलेला प्रस्ताव शासनाने पाठपुरावा करुन मंजूर करुन घेतला पाहिजे. पाणी परिवहन योजनेची अत्यंत तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने धोरण ठरविले पाहिजे. अपूर्ण असलेल्या 1246 सिंचन प्रकल्पासाठी शासनाने आर्थिक तरतूद उपलब्ध करुन दिली पाहिजे. राज्यातील दुष्काळग्रस्त भागात पाणी परिवहन योजनेद्वारे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी

PNG/ MAP/ SBT/

श्री.धोंडीराम राठोड .....

प्रथम सर्वेक्षण करावे लागणार आहे. परंतु अजून सर्वेक्षण सुरु झालेले नाही. जोपर्यंत सर्वेक्षण होणार नाही, तोपर्यंत या प्रकल्पांसाठी आर्थिक तरतूद उपलब्ध होणार नाही. मागील वेळी सिंचनाच्या अनुशेषाबाबत चर्चा झाली तेव्हा मी सांगितले होते की, अनेक प्रकल्प सर्वेक्षणाअभावी पडून आहेत. तसेच अनेक प्रकल्प मंजूर झालेले असून त्यासाठी आर्थिक तरतूद उपलब्ध नसल्यामुळे अपूर्ण अवस्थेत आहेत. यावर मी वेळोवेळी बोललो आहे. जोपर्यंत सर्वेक्षण होणार नाही, तोपर्यंत या योजनेची पुढे काहीच प्रगती होणार नाही. तांत्रिक दृष्टीने हे प्रकल्प योग्य आहेत की अयोग्य आहेत, त्या ठिकाणी भूजल आहे की नाही ? याचे जोपर्यंत सर्वेक्षण होणार नाही तोपर्यंत शासनाला कोणताही निर्णय घेता येणार नाही म्हणून सर्वेक्षणाचे काम सुरु झाले पाहिजे. त्यासाठी योग्य ती तरतूद शासनाने उपलब्ध करुन दिली पाहिजे. सर्व बाबींची पूर्तता झाली तर ही योजना अंमलात आणता येईल. दुष्काळग्रस्त खोऱ्यांसाठी योजना राबविण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रमाची आखणी करावी. पाणी परिवहन योजना शासन तातडीने राबविणार आहे की नाही ? हे स्पष्ट करावे. मी माननीय मंत्री महोदय डॉ.सुनील देशमुख यांना सांगू इच्छितो की, राज्यामध्ये 1246 सिंचन प्रकल्प अपूर्ण आहेत. या प्रकल्पांना तातडीने आर्थिक तरतूद उपलब्ध करुन द्यावी.

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ SBT/ MAP/ श्री. गागरे नंतर --- 10:10

श्री. राठोड .....

जोपर्यंत हे 1246 अपूर्ण प्रकल्प पूर्ण होणार नाहीत तोपर्यंत त्यांच्यावर केलेला सारा खर्च वाया गेलेला आहे असे खेदाने म्हणावे लागते. या प्रकल्पांचे जवळपास 60, 70-75 टक्के काम झालेले आहे, काही कामे तर 80 टक्क्यांच्यावर झालेली आहेत आणि ते सारे प्रकल्प केवळ पैशांमुळे पूर्ण होऊ शकलेले नाहीत. म्हणून या 1246 अपूर्ण प्रकल्पांसाठी आर्थिक तरतूद उपलब्ध करून दिल्याशिवाय ते प्रकल्प पूर्ण होणार नाहीत. सभापती महोदय, मी मागील वेळेस सिंचन प्रकल्पासंबंधीच्या ठरावावर बोलत असताना सांगितले होते की, कोकणातील 4 मध्यम आणि 33 लघु प्रकल्प अपूर्ण आहेत. विदर्भातील 8 हजार कोटींचे प्रकल्प केवळ सर्वेक्षणामुळे पडून आहेत. मराठवाड्यातील 9 मोठे, 20 मध्यम आणि 300 लघू प्रकल्प आर्थिक तरतुदीमुळे पूर्ण होऊ शकत नाहीत. त्यावेळी आपण आम्हाला आश्वासन दिले होते की, यासाठी लवकरात लवकर पुरेशी आर्थिक तरतूद उपलब्ध करून दिली जाईल. सभापती महोदय, मला एक गोष्ट या ठिकाणी परत सांगाविशी वाटते की, ज्या सिंचन प्रकल्पांवर 60-70 टक्क्यांपेक्षा अधिक खर्च केलेला आहे तो सारा खर्च आज तरी वाया गेल्याच्या स्थितीत आहे. कारण आज त्या प्रकल्पांचा आपण उपयोग करून घेऊ शकत नाही. परिणामी त्या परिसरातील जनतेलाही त्याचा उपयोग होऊ शकत नाही. हे दुहेरी नुकसान टाळण्यासाठी प्रथमत: हे अपूर्ण प्रकल्प पूर्ण झाले पाहिजेत. त्यासाठी भरीव आर्थिक तरतूद उपलब्ध आपण करून द्यावी अशी मी या निमित्ताने आग्रहाची विनंती करतो.

सभापती महोदय, अवर्षण प्रवण तालुक्यांची यादी आपण जाहीर केली त्यातून काही तालुके वगळले आहेत. मी मागेही या विषयावर बोललो आहे की, याबाबतीत परत एकदा अभ्यास झाला पाहिजे आणि जे निकषपात्र तालुके असतील त्यांचा परत त्या यादीमध्ये समावेश झाला पाहिजे. हे तालुके या अगोदर अवर्षण प्रवण तालुक्यांच्या यादीमध्ये होते पण नंतर केलेल्या यादीतून ते वगळले गेले. त्या तालुक्यांच्या बाबतीत आपले कोणते निकष पूर्ण होत नाहीत, काय म्हणून ते तालुके या यादीतून वगळले आहेत याचा कोठेही मेळ लागत नाही. या संबंधात जलसंपदा विभागामध्ये विचारले असता त्याचा कोणीही योग्य असा खुलासा करू शकला नाही. जे तालुके आपल्या अगोदरच्या अवर्षण प्रवण तालुक्यांच्या यादीत होते ते तालुके आपल्या नव्या यादीत येत नसतील तर मग आपले त्याबाबतचे काही निकष बदला. जर त्या भागातील लोकांना न्याय आपल्याला द्यावयाचा असेल तर त्याबाबत पुन्हा एकदा अभ्यास झाला पाहिजे असे मला वाटते.

....... एफ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राठोड .....

तेव्हा या दृष्टीने अभ्यास करण्याबाबत शासन फेरविचार करणार आहे काय हेही माननीय मंत्री महोदयांनी येथे आपल्या उत्तराच्या भाषणात सांगावे.

सभापती महोदय, मानव विकास निर्देशांक सातत्याने खालावत चालल्याबद्दल देखील अनेक वेळा येथे चर्चा करण्यात येते. याची अनेक कारणे दिलेली आहेत. त्यात शिक्षण, सिंचन, वीज इत्यादी आपल्या जीवनाशी निगडित असलेले सगळेच प्रश्न मानव विकास निर्देशांक ठरविताना विचारात घेतले जातात. तेव्हा हा निर्देशांक वाढवावयाचा असेल तर ज्या जिल्ह्यांमध्ये हा निर्देशांक फार कमी झालेला आहे त्या जिल्ह्यांमध्ये अधिकचे सिंचन प्रकल्प घेऊन त्या ठिकाणच्या शेतकऱ्यांना अधिकचे उत्पन्न कसे मिळेल आणि त्याद्वारा हा निर्देशांक कसा वाढेल हे आपण पाहिले पाहिजे. त्यातील महत्त्वाचे कारण म्हणजे आपण शेतीप्रधान देशामध्ये राहतो, आपल्या राज्यामध्ये देखील 80 टक्के लोक शेती व्यवसाय करणारे आहेत, शेतीवर अवलंबून असलेले आहेत. त्यामुळे शेतकरी सुखी झाला तरच हा मानव विकास निर्देशांक वाढणार आहे हे आपण लक्षात घ्यावे. त्यासाठी शासनाने जेथे जेथे हा निर्देशांक कमी आहे त्या ठिकाणी विशेष असे सिंचन प्रकल्प जास्तीचे देवून तेथील लोकांना इतरांच्या बरोबरीने आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे, तसा प्रयत्न आपण करणार आहात का ? हाही महत्त्वाचा प्रश्न आहे आणि त्याचे उत्तर आपल्याला येथे दिले पाहिजे. सभापती महोदय, या मानव विकास निर्देशांकाबाबतची आकडेवारी देण्याची गरज मला वाटत नाही, कारण ती सगळी आकडेवारी आपल्याकडे उपलब्ध आहे. . ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री. सरफरे .... जी 1 ...

श्री. धोंडीराम राठोड...

दुर्दैवाने या ठिकाणी एक गोष्ट सांगावीशी वाटते की, मराठवाडयातील औरंगाबाद जिल्हा वगळता बाकीचे सर्व जिल्हे मानव विकास निर्देशांकामध्ये अत्यंत खालच्या पातळीवर आहेत. आणि माझा जालना जिल्हा हा त्यातही सर्वात शेवटचा जिल्हा आहे, खालून पहिल्या क्रमांकावरील जिल्हा आहे. मराठवाडयामध्ये आम्ही खालून पहिल्या नंबरवर आहोत याचे आम्हाला भूषण वाटते. आणि म्हणून या जिल्हयांचा मानव विकास निर्देशांक वाढवून तो इतर जिल्हयांबरोबर आणणे गरजेचे आहे. त्या ठिकाणी विशेष प्रकल्प राबविण्याची आवश्यकता आहे. त्यामध्ये शिक्षणाच्या माध्यमातून मदत करण्याची आवश्यकता आहे, सिंचनाच्या माध्यमातून मदत करण्याची आवश्यकता आहे, उद्योगधंद्यांच्या माध्यमातून मदत करण्याची आवश्यकता आहे. वेगवेगळया क्षेत्रामध्ये ज्या ज्या गोष्टी आपल्याला प्राधान्याने देता येतील त्या देऊन या लोकांचा मानव विकास निर्देशांक वाढविण्याचा प्रयत्न करावा असे मला सुचवावेसे वाटते.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मी दोन-तीन महत्वाच्या गोष्टी विचारलेल्या आहेत त्याबाबत मंत्रिमहोदयांकडून मला स्पष्टपणे उत्तर मिळाले पाहिजे. आणि या योजना करुन घेण्याकरिता देखील समयबध्द, कालबध्द असा कार्यक्रम आपण जाहीर केला पाहिजे. नाही तर असे होते की, आपण दिलेले उत्तर ऐकून आमचे समाधान होते. परंतु त्याबाबत नंतर अंमलबजावणी होत नाही. म्हणून आपण घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी झाली पाहिजे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. चंद्रकांत रघुवंशी (धुळे तथा नंदूरबार स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, एका अत्यंत महत्वाच्या विषयावर या सभागृहामध्ये चर्चा करीत आहोत. मी ज्या जिल्हयामधून आलो आहे त्या धुळे, नंदूरबार या जिल्हयांचा अवर्षण प्रवण क्षेत्रामध्ये समावेश होतो. महाराष्ट्रामध्ये पिण्याच्या पाण्याचे किंवा श्ेतीच्या पाण्याचे नियोजन चुकले आहे. पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात शेतीच्या पाण्याच्या संदर्भात व तापी खोऱ्यातील पाण्याच्या संदर्भात शासनाने अत्यंत महत्वाचे निर्णय घेतले. उशिरा कां होईना खानदेशाला, तापीला न्याय देण्याची भूमिका माननीय राज्यपालांच्या निर्देशानंतर या राज्याने स्वीकारली. आणि गेल्या 50 वर्षापासून ज्या भागाचा विकास झाला नाही, किंवा असलेल्या पाण्याचे नियोजन झाले नाही त्या भागामध्ये पाण्याचे नियोजन झाल्यामुळे आज त्या जिल्हयामध्ये पाणी थांबत आहे. गेल्या 40 वर्षापासून तापी खोऱ्यातील संपूर्ण पाणी गुजरात राज्याला जाऊन मिळते. उकाई धरणाच्या माध्यमातून गुजरात सुजलाम सुफलाम झाल्याचे आपण बघितले आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी (पुढे सुरू...

आम्ही आमच्या हिश्शाचे पाणी सुध्दा अडवू शकलेलो नाही, हे खऱ्याअर्थाने आमचे दुर्देव आहे. म्हणून ज्या तापी खोरे प्रकल्पाची कामे सुरू आहेत, ती सर्व कामे पूर्ण करणे गरजेचे आहे. मानव विकास निर्देशांकाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.धोंडीराम राठोड यांनी आपली भूमिका मांडली.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

सभापती महोदय, महाराष्ट्रातील सर्वात शेवटचा नंदूरबार जिल्हा आहे. तापी खोरे प्रकल्पाअंतर्गत नंदूरबार, धुळे, जळगाव हे जिल्हे येतात. तापी खोरे प्रकल्पा अंतर्गत बॅरेजेस बांधलेली आहेत. त्या ठिकाणी आपण 100 टक्के पाणी अडविणार आहोत. परंतु तापी खोऱ्याचा भूभाग खोल असल्यामुळे प्रकल्पाचे पाणी कधीही कॅनॉलच्या माध्यमातून जात नाही.. खऱ्या अर्थाने बॅरेजेसच्या माध्यमातून तापी प्रकल्पांतर्गत अडविलेले पाणी सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या शेतीसाठी द्यायचे असेल तर, त्याबाबतचे आपल्याला नियोजन करावे लागेल. आम्ही खानदेशचे लोकप्रतिनिधी सातत्याने मागणी करतो आहोत की, ज्या काही लिफ्ट आहेत....त्या लिफ्ट कोणी बंद केल्या, याची चौकशी झाली पाहिजे हे आम्ही नाकारीत नाही. ज्यांनी कोणी हे पाप केले असेल त्याला शिक्षा झाली पाहिजे या मताचा मी आहे. ज्या काही सहकारी माध्यमातून लिफ्ट योजना केलेल्या आहेत त्या काही अडचणीमुळे बंद पडलेल्या आहेत. आज शेतकऱ्यांच्या सातबाराच्या उताऱ्यावर बोजा लिहिण्यासाठी जागा नाही. या सर्व लिफ्ट तापी खोरे महामंडळाच्या माध्यमातून ताब्यात घेण्याबाबतचा प्रस्ताव खानदेशच्या लोकप्रतिनिधींनी दिलेला आहे. आज धुळे आणि जळगाव या जिल्हा मध्यवर्ती बँका एनपीएमध्ये गेलेल्या आहेत. खऱ्याअर्थाने पश्चिम महाराष्ट्रामध्ये या योजना होऊ शकल्या. माझी विनंती आहे की, असलेले पाणी गरीब शेतकऱ्यांच्या शेतामध्ये गेले तर त्या गरीब शेतकऱ्याला सुखाचे दिवस येतील. म्हणून आम्ही सातत्याने मागणी करत आहोत, परंतु राज्य सरकारने या संदर्भाने ठोस निर्णय घेतलेला नाही. मी मंत्री महोदयांना आपल्यामार्फत विनंती करेन की, जलसंपदा मंत्री महोदयांच्या दालनामध्ये लोकप्रतिनिधींची बैठक झाली. त्यावेळी धुळे जिल्हामध्यवर्ती बँक आणि जळगाव जिल्हा सहकारी बँक रोखे घेण्यास तयार आहेत. बँकेच्या संचालक मडळाने तशी तयारी दाखविलेली आहे. आज या बँका एनपीएवर गेलेल्या आहेत. त्या बँका एनपीएच्या

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी (पुढे सुरू...

बाहेर येतील. आपण तापीचे पाणी अडविणार आहोत ते लिफ्ट करून सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पाणी पोहोचवावे लागणार आहे. मी याबाबत उदाहरण देतो की, सारंगखेडा बॅरेजवरून चाळीसगावची योजना केलेली आहे. सहकाराच्या माध्यमातून लिफ्ट इरिगेशन योजना घेतलेल्या आहेत. आता ज्या काही सहकाराच्या माध्यमातून लिफ्ट इरिगेशन योजना केलेल्या आहेत, त्या सध्या पाणी नसल्यामुळे बंद आहे, काही आर्थिक अडचणीमुळे बंद आहेत, काही योजना तापी नदीमध्ये पाणी रहात नसल्यामुळे बंद आहेत, काही विजेची बिले थकल्यामुळे बंद आहेत. आता आपण तापी प्रकल्पाच्या माध्यमातून पाणी अडविणार आहोत. अशा परिस्थितीमध्ये त्या ठिकाणच्या 100 टक्के लिफ्ट योजना ताब्यात घेऊन सुरू कराव्या लागतील. या संबंधाने धोरणात्मक निर्णय घ्यावा अशी विनंती आहे. ज्या काही थोड्याफार लिफ्ट योजना दुरुस्त कराव्या लागतील त्या कराव्यात, कारण पुढच्या वर्षी आपण पाणी अडविणार आहोत, त्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पाणी जाईल. आमच्या माहितीप्रमाणे केंद्र सरकारकडे वॉटर अकाऊंट गेले नाही म्हणून काही प्रस्ताव केंद्र सरकारकडे पडून आहेत. माझी विनंती आहे की, राज्य सरकारचे कर्मचारी दिल्लीमध्ये आहेत. राज्य सरकारचे जे काही अशाप्रकारचे प्रस्ताव केंद्राकडे गेलेले असतात त्यांचा पाठपुरावा त्यांनी केला पाहिजे. परंतु महाराष्ट्राचे अधिकारी केंद्र सरकारच्या स्तरावर पाठपुरावा करत नाहीत. म्हणून केंद्र सरकारचा निधी आपल्याला कमी मिळतो. माझी विनंती आहे की, तापीचा वॉटर अकाऊंट केंद्रकडे गेलेला नाही, म्हणून जल आयोगाकडून आपल्याला पैसे मिळत नाहीत. केंद्र सरकारकडे अजूनही काही प्रस्ताव प्रलंबित आहेत. या माध्यमातून सरकारला विनंती आहे की, वॉटर अकाऊंटच्या संदर्भाने केंद्राकडे पाठपुरावा करावा. तापी प्रकल्पामध्ये असलेले पाणी सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये देण्याची भूमिका सरकारने स्वीकारावी. आम्ही सर्व लोकप्रतिनिधी माननीय राज्यपाल महोदयांचे आभार मानतो की, त्यांनी निर्देश दिले म्हणून तापी, गोदावरी, विदर्भ सिंचन महामंडळाला काही पैसा मिळाला.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी .....

आणि आमचे प्रकल्प आज आम्हाला पूर्ण होत असताना दिसत आहेत. सर्व लोकप्रतिनिधी एकत्र होतो म्हणून आम्ही काही तरी पदरात पाडू शकलो. परंतु आम्ही पाहिलेले स्वप्न खऱ्या अर्थाने साकार करावयाचे असेल तर असलेले पाणी शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पोहोचविणे हे आपले कर्तव्य आहे आणि त्या अनुषंगाने राज्य सरकारने आम्हाला मदत करावी अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, यामध्ये अडचणी असंख्य आहेत. पाण्याच्या संदर्भात नियोजन करीत असताना पाणी उपलब्ध आहे परंतु विजेमुळे पाणीटंचाई असलेली गावे सुध्दा आमच्या भागामध्ये भरपूर आहेत. आम्ही राज्याच्या एका कोपऱ्यात आहोत. मध्यप्रदेश आणि गुजरात राज्याच्या बॉर्डरवर असलेल्या जिल्ह्याचा मी लोकप्रतिनिधी आहे. विजेचा प्रवाह सर्वात शेवटी आम्हाला मिळतो. आम्हाला पूर्ण व्होल्टेजने वीज मिळत नाही. शेतकऱ्यांना 12-12 तास लोडशेडींगला सामोरे जावे लागते. शेवटी शेतकऱ्यांना असे सांगावे लागते की, काही अंशी तरी वीज आम्हाला द्या. आज त्यांच्यासमोर पाणी आहे परंतु विजेअभावी त्यांच्या शेतीमध्ये पाणी गेले नाही त्यामुळे त्या गरीब माणसांची शेती पिकत नाही. विजेच्या टंचाईमुळे सुध्दा दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असे चित्र आम्ही पाहिलेले आहे. म्हणून या सर्व गोष्टींचे नियोजन करीत असताना सर्वसामान्य माणसाला दिलासा देण्यासाठी सरकारने योग्य ती भूमिका तात्काळ स्वीकारावी अशी या प्रस्तावाच्या माध्यमातून मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, सर्वच मुद्दे सन्माननीय सदस्य श्री. राठोड साहेबांनी मांडलेले आहे. मी मुद्यांची पुनरावृत्ती करणार नाही. लोकप्रतिनिधी या नात्याने आमचे जे जे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहेत त्या सर्व प्रस्तावांना शासनाने मान्यता दिली पाहिजे. राज्यावर 1 लाख 40 हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे असे आपण वाचतो. आपण अशी भूमिका स्वीकारली की, एकदाच का होईना सिंचनाचे जेवढे प्रकल्प आहेत ते पूर्ण करण्यासाठी 20 हजार कोटी रुपयांचे कर्ज घ्यावे लागले तरी ते घेतले पाहिजे. कारण परत लोकप्रतिनिधींवर आपसात भांडण्याची वेळ यावयास नको. वेगवेगळ्या भागामध्ये परत वाद निर्माण व्हावयास नको म्हणून एकदाच सर्व प्रकल्प पूर्ण करण्यासाठी जे काही करावयाचे आहे ते सरकारने करावे. परंतु आमचे सर्व प्रकल्प पूर्ण करावेत.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

श्री. चंद्रकांत रघुवंशी .....

तापीचे अडविलेले पाणी शेतकऱ्यांच्या शेतामध्ये घेऊन जाण्यासाठी आमच्या 64 उपसा सिंचन योजना तापी महामंडळाच्या ताब्यामध्ये घेण्याचा कॅबिनेटने सुध्दा ठराव केलेला आहे आणि आमच्या जिल्हा मध्यवर्ती बँकेने सुध्दा संमती दिलेली आहे. त्याचा जो प्रस्ताव अंतिम टप्प्यामध्ये आहे त्याला तात्काळ मान्यता द्यावी. त्या लिफ्ट योजना त्वरित तापी महामंडळाने ताब्यात घ्याव्यात, त्यांची दुरुस्ती करावी आणि पुढच्या वर्षी अडविले जाणारे पाणी शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये जाईल यासाठी शासनाने मदत करावी अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. धोंडीराम राठोड साहेब यांनी हा जो प्रस्ताव या सभागृहात मांडलेला आहे त्याला मनापासून पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

माननीय श्री. राठोड साहेब, आपण एका अतिशय ज्वलंत विषयाला हात घातलेला आहे. अलीकडेच मी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी उभे असलेले उमेदवार श्री. अल गोर यांची "ग्लोबल वॉर्मिन्ग" ही सी.डी. पाहिली. त्यामध्ये जगातील तपमान कसे बदलत चालले आहे, हवामान कसे बदलत चालले आहे, बर्फ कसा वितळत चालला आहे आणि कालांतराने त्याचे काय दुष्परिणाम होणार आहेत त्याबद्दल अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष पदासाठी उभ्या असलेल्या एका उमेदवाराने ती सी.डी. बनविलेली होती. ते स्वत: प्राध्यापक किंवा शास्त्रज्ञ असावेत. त्यांनी ते अतिशय सुंदरपणे दाखविलेले होते. सन्माननीय सदस्य श्री. राठोड साहेबांचा प्रस्ताव मी वाचत असताना काल आमच्या सहकाऱ्यांना म्हणालो की, मला या प्रस्तावावर बोलावयाचे आहे. पाण्याच्या प्रश्नाच्या संदर्भात मला एक कविता आठवते.

" संथ वाहते कृष्णामाई,
तिरावरल्या सुखदु:खाची
जाणीव तिजला नाही "

यामध्ये पुढच्या ओळी महत्वाच्या आहेत.

" सतत वाहते उदंड पाणी
कोणी न वळवूनी नेई रानी
आळशास ती व्हावी कैसी
गंगा फलदायी "

नेमके हेच आपल्याकडे होते. पाणी सतत वाहणारी ठिकाणे सुध्दा आहेत आणि जरा सुध्दा पाणी नसलेली काही गावे आहेत. मी कोकणाबद्दल बोलेन.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 10:30

(श्री. अरविंद सांवत...)

सिंधुदुर्ग जिल्ह्यामधील माझ्या स्वत:च्या गावामध्ये 50 वर्षापासून एप्रिल, मे महिना आला की पिण्याच्या पाण्याच्या दुर्भिक्षाला तोंड द्यावे लागते. माझ्या गावातील भगिनी एप्रिल-मे महिन्यामध्ये डोक्यावर हंडा, कळशी घेऊन मैलोनमैल पाण्यासाठी वणवण करीत असतात. तेथे एप्रिल-मे महिन्यामध्ये आजही टँकर लागतात. या ठिकाणी नद्या जोडण्यासंबंधीचा प्रस्ताव माननीय सदस्यांनी मांडलेला आहे. आमच्या चिपळूण मधील वशिष्ठी नदी, महाड मधील सावित्री नदी, ह्या नद्या वर्षाच्या 12 महिने वाहातात. आपण ज्याला उपसा सिंचन म्हणतो त्या उपसा सिंचनासंबंधीचा प्रस्ताव गेल्या कित्येक वर्षापासून या सदनामध्ये अनेक ज्येष्ठ सदस्यांनी मांडलेला आहे. परंतु त्याबाबतीत सरकार त्याची व्हायबिलिटी किती, त्याचा खर्च किती या गोष्टीं विचारत असते. म्हणून याबाबतीत एकदा निश्चित असे निकष ठरविले पाहिजे. कोयनेचे पाणी सतत 12 महिने वाहत असते. नंतर पुढे ते समुद्राला जाऊन मिळते. त्या पाण्याचा काहीच उपयोग करता येत नाही. पूर्वी कोयनेचे पाणी विजेसाठी वापरलेले असल्यामुळे, त्या पाण्यातून वीज गेलेली असल्यामुळे त्या पाण्याचा शेतीसाठी वापर करणे योग्य नाही असा लोकांमध्ये गैरसमज होता म्हणून ते पाणी सिंचनासाठी वापरले जात नव्हते.

सभापती महोदय, मध्यंतरी सदनामध्ये जमिनीच्या क्षमतेच्या संदर्भात माहिती देण्यात आली. जमिनीची उत्पादन क्षमता, जमिनीचा पोत या संदर्भातील सर्व रिपोर्ट शेतक-यांना कळविण्यासंबंधी निर्णय घेण्यात आला. सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी मला विचारले की, अशा प्रकारचा रिपोर्ट आपल्या गावामध्ये कसा काय आला नाही ? कोकणातील बेसिक सॉईल विचारात घेणे आवश्यक आहे. कोकणामध्ये खूप पाऊस पडतो. चार तास जोरदार पाऊस पडला की पाणी कोठे वाहून जाते ते कळत नाही. गेल्या 40-50 वर्षाच्या काळामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये एकही प्रकल्प पूर्ण झालेला नाही. कोकणातील महमदवाडी धरण अजून पूर्ण झालेले नाही. त्या धरणाचे कालवे काढून टाकले आहेत. कालवे नसतील तर धरणातील पाण्याचे काय करणार ? हे धरणातील पाणी काय नदीच्या पात्रातून सोडणार ? एक तर तुम्ही कालवे काढत नाहीत किंवा पाईप लाईन सुध्दा टाकत नाहीत. मग धरणातील पाण्याचा उपयोग कसा करणार हा प्रश्न आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याचा बराचसा भाग हा डोंगराळ आहे. दुस-या बाजूला

...2..

(श्री. अरविंद सावंत...)

समुद्रसपाटीचा भाग आहे. बराचसा भाग डोंगराळ असल्यामुळे पाय-यांप्रमाणे जमिनी आहेत. तेथील जमीन समपातळीत नाहीत. अशा जमिनीमध्ये शेती करताना प्रचंड त्रास होतो. तेव्हा यासाठी आज साधारणपणे 1153 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी यांना मी धन्यवाद देतो. कोकणाच्या संदर्भामध्ये मी बोलत असताना माझा महत्वाचा मुद्दा हा आहे की, कोकणामध्ये केवळ धरणेच करणार आहात काय ? कालवे करणार नाही काय ? मी मघाशी महमदवाडी धरणाचा उल्लेख केला. करंडी, भिलवडे, कुंभवडे या पंचक्रोशीतील ग्रामस्थ एप्रिल-मे महिन्यामध्ये पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहातात. जोपर्यन्त पाऊस पडत नाही तोपर्यन्त त्यांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, त्यांनी आमच्या गावामध्ये येऊन एकदा पाहणी करावी. आमच्या गावातील शाळा डोंगराळ भागात आहे.तेथील विद्यार्थ्यांना पिण्यासाठी पाणी मिळत नव्हते. त्या ठिकाणी जेव्हा युतीचे सरकार सत्तेवर आले त्यावेळी पहिल्यांदा 40-45 लाख रुपये खर्च करुन नळ पाणीपुरवठा योजना आणली तरी देखील पाणी पुरत नाही. सभापती महोदय, आम्ही लघुपाटबंधारे बांधण्याचा प्रस्ताव शासनाकडे दिला. त्यावेळी आम्हाला असे सांगण्यात आले की, 250 हेक्टर जमीन सिंचनाखाली येत नसल्यामुळे हा प्रकल्प करता येणार नाही. तेव्हा माझी या निमित्ताने अशी मागणी आहे की, कोकणामध्ये पाटबंधारे प्रकल्प बांधण्यासाठी मूळ निकषामध्ये बदल करणे आवश्यक आहे. हे निकष बदलले नाहीत तर कोकणातील पाणी असेच वाया जाईल.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत......

नद्या जोडणे तर दूरच राहिले परंतु आहे ते पाणी साठविण्यासाठी आपण त्याला कालवे, बंधारे, धरणे बांधावयाला तयार नाही, पाझर तलाव बांधावयाला तयार नाही. माझी आपल्याला या निमित्ताने विनंती आहे की, या प्रस्तावाच्या माध्यमातून निदान कोकणातील सिंधुदूर्ग जिल्हयाला नंदुरबार जिल्हयासारखे तसेच आदिवासी विभागाला जे निकष लावले आहेत, ते लावावेत आणि कोकणातील सिंचनाचे अनेक प्रकल्प, धरणे, कालवे, बंधारे, पाझर तलाव, नळ-पाणी पुरवठा योजना पूर्ण कराव्यात, ही माझी प्रमुख मागणी आहे. तसेच त्यापूर्वीचे कोकणातील जे प्रकल्प अपूर्ण आहेत ते प्रकल्प आपण लवकरात लवकर पूर्ण करावेत. त्यासाठी जी 1153 कोटी रुपयांची आवश्यकता आहे तेवढा निधी लवकरात लवकर देण्यात यावा. कोकणातील 1 मोठा, 4 मध्यम, 33 लघुसिंचन प्रकल्प असे अनेक प्रकल्प अपूरे आहेत, त्यापैकी एकही प्रकल्प आतापर्यंत पूर्ण झालेला नाही आणि ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्नही करण्यात येत नाहीत. यासंदर्भात असे सांगितले जाते की, मोहम्मदवाडी धरणाचे काम 80 टक्के पूर्ण झालेले आहे. कोकणामध्ये पाणी साठविण्याच्या उद्देशाने निर्माण करण्यात आलेले कालवे होते, तेही बंद केले. मुंबईमध्ये कसे आपण काही ठिकाणी पाईपलाईनने पाण्याचा पुरवठा करतो, त्याचप्रमाणे कोकणामध्ये जेथे पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे तेथे पाईपलाईनने पाणी पुरविण्यात यावे. पाणी वाफेने किंवा उष्णतेने वाया जाऊ नये म्हणून मुंबईमध्ये पाईपलाईनने पाण्याचा पुरवठा करण्यात येतो. माझी या निमित्ताने या ठिकाणी अशी विनंती आहे की, नाशिक जिल्हयातील इगतपूरी या तालुक्यात एकूण चार धरणे आहेत जेथून आपल्या मुंबईला पाणीपुरवठा होतो. परंतु इगतपूरीमध्येच पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे, म्हणजे " दिव्याखाली अंधार "अशी या ठिकाणी अवस्था आहे. इगतपूरीमधील शेतक-यांना, सामान्य जनतेला सिंचनासाठी किंवा पिण्याच्या पाण्यासाठी इतर ठिकाणाहून येणा-या पाण्यावर अवलंबून राहावे लागते. नाशिक येथे भिलवडी गावाच्या अलिकडे एक गाव आहे या गावचे नाव मला आता स्मरत नाही. पण हे गाव आपल्याला मुंबईहून नाशिकला रेल्वेमार्गाने जातांना दिसते. तेथे आपल्याला असे आढळून येईल की, तेथील स्त्रिया डोक्यावर हंडा व कळशी घेऊन हाय - वे क्रॉस करुन नदीच्या पलीकडे सुमारे 9 ते 10 किलोमीटर रोज पायी जाऊन पाणी आणतात. सदर प्रस्ताव अत्यंत महत्वाचा व जिव्हाळयाचा असून या विषयावर दूरगामी परिणाम

K 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत......

करणारा हा विषय आहे. आपण पाण्याला जीवन मानतो. आणि या अनुषंगाने मी या प्रस्तावाला मनापासून पाठिंबा देत असतांना जे दोन प्रश्न मांडले त्यानुसार कोकणामधील सिंचनव्यवस्थेबाबत निकष बदलावेत व कोकणातील अपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्यात यावेत, आणि त्यासाठी लागणारा निधी लवकरात लवकर द्यावा, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





JPK/ MAP/ SBT प्रथम श्री.शिगम एम. ............... 10:35

श्री.भास्कर जाधव ( रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी एक छोटीशी विनंती करतो, मी काही भाषण करणार नाही.

श्री.दिवाकर रावते : कोकणाची वाट लावलेली आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांना माझी या निमित्ताने एकच विनंती आहे की, महाराष्ट्र राज्याचे पाटबंधारे माजी सचिव श्री.पेंडसे आणि कोकण कृषि विद्यापीठाचे कुलगूरु श्री.श्रीरंग कद्रेकर यांच्या अध्यक्षतेखाली कोकणच्या पाण्याच्या व्यवस्थापनासंदर्भात एक अहवाल तयार करण्यात आलेला आहे. महाराष्ट्रामध्ये एकूण पडणा-या पावसापैकी सुमारे 40 टक्के पाणी कोकणात पडत असते परंतु वाहून जाणारे पाणी सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी उल्लेख केल्याप्रमाणे कोकणामधील टेल वॉटर या सर्व पाण्याची साठवणूक कशी करता येईल ? या पाण्याचा वापर वीजनिर्मितीकरिता कसा करता येईल ? कोकणामध्ये पावसाळयात धो - धो पाणी पडते परंतु ते डोंगरावरुन येणा-या पाण्याचा वापर विद्यूत निर्मितीमध्ये नागालँडमध्ये कसा केला ? या धर्तीवर कशा पध्दतीने कोकणातील डोंगरावरुन वाहत येणा-या पाण्याचा वापर कसा करता येईल ? असा सर्वसमावेशक अहवाल राज्यशासनाकडे चार ते सहा महिन्यापूर्वी पेंडसे समितीच्या माध्यमातून देण्यात आलेला आहे सदर अहवाल वाचून झाला का ? नसेल झाला तर त्याचे वाचन पूर्ण करुन तो अहवाल शासन विधानपरिषदेच्या पटलावर विचारार्थ ठेवला जाईल का ? किंबहुना ठेवण्यात यावा अशा पध्दतीची या ठिकाणी माझी मागणी आहे.

------

यानंतर श्री.कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ SBT/ 10:40

श्री. दिवाकर रावते ( विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. धोंडिराम राठोड यांनी मराठवाडयातील पाणी प्रश्नासंबंधी जो प्रस्ताव सदनात मांडला आहे त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. या प्रश्नाला एक चांगले वळण देण्याचा प्रयत्न श्री. राठोड यांनी केल्याबद्दल त्यांचे अभिनंदनही करतो. मागील वेळी सुध्दा मराठवाडयाच्या पाणी प्रश्नावर चर्चा झाली होती. त्यावेळी मी त्याविषयावर 10 टक्के सुध्दा बोलू शकलो नव्हतो. मराठवाडयाचा पाणी प्रश्न ज्या ज्या वेळी सभागृहात उपस्थित केला त्या त्या वेळी तो थोडया थोडया चर्चेने म्हणजे तुकडया-तुकडयाने पूर्ण झाला. सलग प्रस्ताव मांडून त्यावर चर्चा होऊ शकली नाही. परंतु आज माननीय सदस्य श्री. राठोड यांनी हा प्रस्ताव याठिकाणी मांडला आहे. माझा माझ्या सहकारी सदस्यांवर टीका करण्याचा उद्देश नाही. परंतु या सदनामध्ये अशी एक पध्दत आणि परिस्थिती आहे की विधानसभेतील आमदारांना त्यांच्या मतदारसंघातीलच समस्या मांडण्यासाठी वेळ मिळत नाही आणि विधानपरिषदेच्या विविध भागातून आलेल्या आमदारांना असे प्रश्न मांडण्यासाठी भरपूर वेळ उपलब्ध असतो. दोन-अडीच तासांची चर्चा पाच तास चालविण्यासाठी देखील पीठासीन अधिकारी वेळ देतात.

सभापती महोदय, आजचा प्रस्ताव हा मूलभूत स्वरुपाचा आहे. विधानपरिषदेमध्ये चर्चेला येण्याच्या योग्यतेचा आहे. महाराष्ट्रातील पाणी टंचाईवर मग ती पिण्याच्या पाण्याची असो अथवा सिंचनाची असो किंवा उद्योगाची असो आज चर्चा होत आहे. भविष्यात काय परिस्थिती निर्माण होईल याचा विचार करायला लावणारी ही चर्चा आहे. या प्रस्तावामध्ये बऱ्याच गोष्टी अंतर्भूत असल्या तरी राज्यातील दुष्काळग्रस्त आणि पाणीटंचाईच्या प्रदेशांना पाणी परिवहनाने पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी योजनांच्या प्रस्तावांचे तातडीने सर्वेक्षण व आर्थिक तरतूद करुन एक समयबध्द कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी करणे असा जो विषय नमूद केलेला आहे तो या प्रस्तावाचा गाभा आहे. माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपण सभागृहात जे मुद्दे उपस्थित करीत आहोत ते सर्व चर्चिले गेले आहेत. परंतु रेकॉर्डवर काही गोष्टी येण्यासाठी मी बोलणार आहे. मला खेदाने नमूद करावेसे वाटते की, आजच्या महाराष्ट्र टाईम्समध्ये माननीय उपमुख्यमंत्र्यांनी एक घोषणा केली आहे. आबांना जास्त बोलण्याची सवय असल्यामुळे ते खूप बोलतात. आबांच्या प्रामाणिकपणाबद्दल कोणीही शंका घेऊ शकत नाही. ते स्वत:ही घेऊ शकत नाहीत. दुधात पाणी मिसळले नाही तर सरकार चालणार नाही. आबा काही तरी बोलून बसतात. आम्ही आबांना...

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ SBT/ 10:40

श्री. दिवाकर रावते ...

अडचणीत आणू अशा अनेक उदाहरणे आहेत. परंतु त्यांच्या प्रामाणिकपणाची बूज राखली पाहिजे म्हणून असे करणार नाही. बारबाला हा विषय काही सामान्य माणसांचा नव्हता. तो विषय त्यांनी डोक्यावर घेतला. गरिबांची मुले त्याठिकाणी येत नव्हती. आजच्या महाराष्ट्र टाईम्समध्ये पुन्हा एकदा उपमुख्यमंत्र्यांनी घोषणा केल्याचे वाचनात आले. " कृष्णेच्या पाण्यासाठी प्रसंगी केंद्राशीही संघर्ष " "उपमुख्यमंत्र्यांची दुष्काळग्रस्तांना ग्वाही." कृष्णेचे पाणी दुष्काळी भागाला देण्यासाठी वेळ आलीच तर केंद्र सरकारशीही संघर्ष करु असे आश्वासन उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी दिले. मला वाटते आबांना कृष्णा खोऱ्याच्या संदर्भातील पूर्ण माहिती दिली नसावी कारण ते सध्या गृहमंत्री आहेत. थोडयाच दिवसांनी ते विरोधी पक्षात जाणार आहेत त्याची तयारी करता यावी म्हणून ते असे करीत आहेत. महाराष्ट्र टाईम्समध्ये काही दिवसांपूर्वी आलेल्या अग्रलेखाचा मी याठिकाणी उल्लेख करु इच्छितो. सरकार लोकांची फसवणूक करीत आहे. शेतकऱ्यांची फसवणूक करीत आहे. तुमच्याकडून ही अपेक्षा नाही. महाराष्ट्र टाईम्सच्या 20.2.2006 रोजीच्या अग्रलेखामध्ये असे म्हटले होते की, "1976 साली महाराष्ट्राल कृष्णेच्या 585 टीएमसी पाण्याचा वापराचा अधिकार दिला.

नंतर श्री. भोगले

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

मात्र हे पाणी 30 मे, 2000 पर्यंत अडवावे अशी अटही घातली. मराठी जनतेचे दुर्दैव असे की, हे सरकार 480 टीएमसी पाणी क्षमतेची धरणे बांधू शकले. परिणामी 80 टीएमसी पाण्याचे फेरवाटप करावे अशी मागणी आंध्र आणि कर्नाटक राज्याने केली आहे. हा निकाल महाराष्ट्राच्या विरोधात गेल्यास अवर्षणप्रवण दक्षिण महाराष्ट्राला कधीही पाण्याची आशा उरणार नाही. कृष्णेच्या पाण्याचा प्रश्न राज्यासमोर गेली 35 वर्षे आ वासून उभा ठाकला आहे. 1976 साली निवाडा आला. तेव्हा महाराष्ट्रात काँग्रेसचे सरकार होते. त्यानंतर श्री.शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली पुलोदची 18 महिन्यांची कारकीर्द वगळता 1995 पर्यंत काँग्रेसनेच राज्य कारभार चालविला. 20 वर्षात कृष्णेचे पाणी अडविण्यासाठी काहीही ठोस पावले उचलली गेली नाहीत. 1995 मध्ये श्री.मनोहर जोशी यांचे सरकार आले आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ झाले. धरणे, कालवे बांधण्याचे काम सुरु झाले. त्यासाठी सरकारने बॉण्डही विकले." त्यापुढे काय झाले? आमचे सरकार गेले. त्यापुढील परिस्थिती या अग्रलेखामध्ये लिहिली आहे. त्याचा मी उल्लेख करतो. तुम्ही गेल्या 7 वर्षात काय करुन ठेवले हे 2006 साली अग्रलेखात लिहून ठेवले आहे. "पुढे श्री.विलासराव देशमुख आणि श्री.सुशीलकुमार शिंदे यांचे सरकार आले. राजकारण्यांचे, अधिकाऱ्यांचे आणि कॉन्ट्रॅक्टरचे खिसे ओले होत असताना शेती कोरडीच राहिली. बॉण्ड योजना फसली आणि सरकार कर्जबाजारी झाले. इतके करुनही पाणी अडविण्यास अपयश आले. कृष्णेचे पाणी अडविण्यासाठी आंध्र 40 हजार कोटी रुपयांची योजना आखत असताना महाराष्ट्राने या कामासाठी फक्त 160 कोटी रुपये ठेवले. यावरुन सरकार किती उदासीन आहे हे स्पष्ट होते." 2006 सालच्या अग्रलेखात हे लिहिले आहे. उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील हे राणा भीमदेवीच्या थाटात कशाला गर्जना करतात? आपल्या पायाखालची वाळू कोण खेचून नेत आहे हे तपासा, एवढीच परिस्थिती मी सुरुवातीला मांडतो.

सभापती महोदय, सिंचनाचा अनुशेष हाच खरा गाभा आहे. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी म्हणाले की, 20 हजार कोटी रुपये आणा आणि हे प्रकल्प पूर्ण करा. तशी परिस्थिती नाही. तुम्ही समजून घ्या. एक तर प्रकल्पांना मान्यता असली पाहिजे. तुम्हाला 20 हजार कोटी नव्हे तर 50 हजार कोटी रुपये दिले तरी ते वापरायचे कुठे हा खरा प्रश्न आहे. जूने प्रकल्प वर्षानुवर्षे रखडले आहेत. मराठवाड्यात रखडले आहेत. सगळ्या महाराष्ट्रात प्रकल्प रखडले

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MAP/ 10:45

श्री.दिवाकर रावते........

आहेत. विदर्भाचे आम्ही समजू शकतो. तेथे अनेक अडचणी आहेत. सन्माननीय सदस्य श्री.गांधी यांना विदर्भाची माहिती आहे. झुडपी जंगलांचा प्रश्न, वन खात्याच्या अडचणींमुळे अनेक प्रकल्प रखडले आहेत. त्यासाठी केंद्र सरकारकडे जाऊन झगडले पाहिजे अशी परिस्थिती आहे. सन्माननीय श्री.सुरेश प्रभू हे केंद्रीय वनमंत्री होते त्यावेळी त्यांनी झुडपी जंगलांच्या संदर्भात ठोस निर्णय घेऊन विदर्भातील प्रकल्प कसे मार्गी लागतील याबाबत भूमिका घेतली होती. त्यानंतर त्यांच्याकडील वन खाते बदलले. मुळात हा पाठपुराव्याचा प्रश्न आहे. त्याशिवाय विदर्भाला गती येणार नाही ही वस्तुस्थिती आहे. अशा अडचणी मराठवाड्यात नाहीत. तरी प्रकल्प रखडले आहेत. मराठवाड्यात 30 वर्षापासून, 20 वर्षापासून व 10 वर्षापासून किती प्रकल्प रखडले आहेत आणि यासाठी किती निधी लागेल याची माहिती मागील वेळी मी पटलावर ठेवली होती. एकूण 16 हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे. या सदनाचे वैशिष्ट्य आहे, त्याचा आपल्याला अभिमान वाटला पाहिजे. अनुशेषाची कोंडी करण्याचे सामर्थ्य या सभागृहाने दाखविले. अनुशेषाच्या कोंडीतून मार्ग काढताना खिशात हात घालून सिंचनाचा लाभ मिळविण्याचे सामर्थ्य याच सदनाने दाखविले.

सभापती महोदय, या सगळ्या परिस्थितीला कंटाळून मला खेदाने याठिकाणी नमूद करावेसे वाटते, ते अधिकृतरित्या रेकॉर्डवर आलेले आहे. ज्यावेळी या संदर्भात तुंबळ युध्द आम्ही उभे केले. ॲडव्होकेट जनरल यांनी शासनाच्या राज्यपाल महोदयांचे आदेश पायदळी तुडविले.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

या सरकारने घटनेविरुध्द काम केलेले आहे अशा प्रकारचा आक्षेप आम्ही सप्रमाण देऊन केला होता. विदर्भ आणि मराठवाडयाच्या अनुशेषा प्रमाणे पैसे मिळाले पाहिजे अशी आम्ही मागणी केली होती. मराठवाडा आणि विदर्भाला शासनाने झुकते माप दिले पाहिजे असे आम्ही त्यावेळी ठणकावून सांगितले होते. परंतु या राज्यसरकारने मराठवाडा आणि विदर्भाला झुकते माप न देता पश्चिम महाराष्ट्राला झुकते माप दिलेले आहे. या शासनाने कृष्णाखो-याकडे पैसा वळविण्याचा हेका धरला होता. ज्या भागाचा अनुशेष आहे त्यांना त्या प्रमाणात पैसे दिले पाहिजेत अशी आमची मागणी होती त्यासंदर्भात ॲडव्होकेट जनरलचे मत सुध्दा घेण्यात आले होते. विदर्भ, मराठवाडा, कोकण, खान्देशचा बॅकलॉग भरुन काढण्याच्या संदर्भात माननीय राज्यपाल महोदयांनी निर्देश सुध्दा दिले होते परंतु ॲडव्होकेट जनरल कदम यांनी राज्यपाल महोदयांचे निदेश पायदळी तुडवत, घटनेची पायमल्ली करत बेकायदेशीर मत सरकारच्या बाजूने मांडले. बेकायदेशीर मत कायदा तज्ञाने दिल्यामुळे मराठवाडा, विदर्भ, कोकण आणि खानदेश विभागाला फार वेदना झाल्या. कायदा तज्ञाने बेकायदेशीर मत दिल्यामुळे या सभागृहाला सुध्दा फार वेदना झाल्या. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी यांनी आमच्या भागाचा सिंचनाचा बॅकलॉग दूर करण्यासाठी 20 हजार कोटी रुपये शासनाने द्यावे अशी मागणी केलेली आहे परंतु अशा प्रकारची मागणी केल्यामुळे त्याचा काही उपयोग होऊ शकेल असे वाटत नाही. या शासनाने पाणी आणि पैसे पश्चिम महाराष्ट्राकडेच वळविले आहे. त्यामुळे पाणी आणि पैशावरुन या शासनाला धडा शिकवावा हाच त्यावरील मार्ग आहे. सिंचनाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी 16 हजार कोटी रुपये उपलब्ध व्हावे यासाठी माननीय राज्यपाल महोदयांकडे अर्थखात्याने एक प्रस्ताव पाठविला होता व माननीय राज्यपाल महोदयांनी हा प्रस्ताव मान्यही केला होता. सिंचनासाठी हे पैसे खर्च करण्यासाठी आमची कोणत्याही प्रकारे हरकत नाही परंतु ज्या भागात सिंचनाचा अनुशेष आहे त्या भागात टक्केवारी प्रमाणे पैसे दिले गेले पाहिजे अशी आमची मागणी आहे. मराठवाडा आणि विदर्भात सिंचनाचा जो अनुशेष आहे त्या प्रमाणे या भागाला पैसे मिळालेच पाहिजे. त्यानंतर कृष्णा खोरे प्रकल्पाचे काम पूर्ण व्हावे यासाठी पश्चिम महाराष्ट्रातून मागणी झाली. कृष्णा खो-याचे काम पूर्ण झाले पाहिजे याबाबत कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. कृष्णा खो-याचे काम पूर्ण होण्यासाठी 60 हजार

....2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

कोटी रुपयांची आवश्यकता असल्यामुळे त्यासाठी शासनाला 20 हजार कोटी रुपये काढावयाचे आहेत. परंतु 20 हजार कोटी रुपये मिळाल्यानंतर सिंचनाचा जो काही अनुशेष आहे त्या अनुशेषाच्या टक्क्याप्रमाणे विदर्भ, मराठवाडा, खानदेश आणि कोकणाला वाटा मिळाला पाहिजे. माननीय राज्यपाल महोदयांनी 15 डिसेंबर, 2001 च्या सूत्रानुसार सन 2005 ते 2010 पर्यंत उपलब्ध सिंचन 9920 कोटी रुपयांचे वाटप पुढील प्रमाणे केलेले आहे. या वाटपामध्ये विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी 50 टक्के अनुशेषा प्रमाणे, 25 टक्के लोकसंख्ये प्रमाणे आणि 25 टक्के लागवडीच्या क्षेत्राप्रमाणे देण्यात यावेत असे विभागणीचे सूत्र दिले होते. या सूत्रानुसार विदर्भाला 2480 कोटी, 25 टक्के लोकसंख्येप्रमाणे 595.20 आणि 25 टक्के लागवडी खालील क्षेत्रानुसार 694.40 कोटी रुपये असे एकूण 3779.60 कोटी रुपये मिळणे आवश्यक आहे. मराठवाडयासाठी 50 टक्के अनुशेषाप्रमाणे 2450 कोटी, 25 टक्के लोकसंख्येप्रमाणे 458.55 कोटी व 25 टक्के लागवडी खालील क्षेत्रानसार 620 कोटी असे एकूण 3558 .80 कोटी रुपये मिळाले पाहिजे. मुंबई सोडून उर्वरित महाराष्ट्राचा अनुशेष शून्य असला तरी मुंबई सोडून 51 टक्के लोकसंख्या लक्षात घेता 14.26 कोटी रुपये अनुदान दिलेले आहे. सिंचनाचया अनुशेषाबाबत कोकण आणि खानदेश हे अजूनही वंचित राहिलेले आहेत.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

संपूर्ण महाराष्ट्राची लोकसंख्या त्यांच्या वाट्याला आल्यामुळे त्यांना 200 कोटी रुपये मिळाले आहेत. लोकसंख्येच्या बळावर त्यांना 1426 कोटी रुपये मिळाले. लागवडीखालील 47 टक्के क्षेत्राबाबत 1165 कोटी रुपये मिळाले. असे एकूण 2591.60 कोटी रुपये मिळाले.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या नवीन निकषाप्रमाणे विदर्भाला 4452 कोटी रुपये, उर्वरित महाराष्ट्राकरिता 3178 कोटी रुपये दिले. परंतु मला शासनास विचारावयाचे आहे की, या निधीचे 2010 पर्यंत कशाप्रकारे नियोजन करणार आहात ? पैशाचे वाटप कशाप्रकारे करणार आहात ? माननीय मंत्रिमहोदयांनी मान्य केलेले आहे की, आम्हाला निधी मिळतो, परंतु प्रकल्पांना मान्यता मिळालेली नसल्यामुळे तो परत जातो. ही परिस्थिती निर्माण झाली असताना मागास भागातील प्रतिनिधींनी फोडा-झोडा नीती वापरली. महाराष्ट्रात फूट पाडण्याचा प्रयत्न झाला. धुळे, नंदूरबार, उर्वरित महाराष्ट्र याठिकाणी प्रचंड बॅकलॉग वाढला. या भागांत 1994 साली 91 हजार 171 हेक्टर क्षेत्राचा बॅकलॉग होता तो 2005 मध्ये 2 लाख 1440 हेक्टर क्षेत्रावर गेलेला आहे. मधल्या चार वर्षाच्या काळात युतीचे सरकार होते. त्या काळात थोडा बॅकलॉग राहिला असला तरी अन्य कालावधीत आपलेच सरकार होते. याचा विचार आपण केला पाहिजे.

सभापती महोदय, मागील तीन वर्षाच्या काळात कृष्णा-खोरे प्रकल्पासाठी सन 2002-03 मध्ये 1193.64 कोटी रुपये, 2003-04 मध्ये 1272.73, 2004-05 मध्ये 1285 कोटी रुपये असे एकूण 3712 कोटी रुपये मिळाले. यातील 10 टक्के निधी देखील खानदेशाला देण्यात आलेला नाही ही परिस्थिती आहे. पाण्याची हेराफेरी चालू आहे. नद्याजोड प्रकल्प हा विषय संपलेला आहे. तो फक्त पश्चिम महाराष्ट्रात चालू आहे. कृष्णा-भीमा उर्ध्वीकरणाद्वारे बोगद्यातून पाणी आणण्याचा प्रकल्प सुरु आहे. जवळपास 1200 कोटी रुपयांचा हा प्रकल्प आहे. परंतु हे पाणी कोठे जाणार आहे याचा देखील विचार झाला पाहिजे. सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील केंद्र सरकारशी संघर्ष करण्याचा उल्लेख करतात. मी त्यांना सांगू इच्छितो की, त्यांना संघर्ष करायचा असेल तर त्यांच्या सरकारशी करावा. त्यांच्यात हिम्मत असेल तर त्यांनी अजितदादांशी संघर्ष करुन दाखवावा. कशाला संघर्षाचे तारे तोडत आहात ? कृष्णा खोऱ्यातील 13 दुष्काळग्रस्त

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

तालुक्यांतील शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी संघटना, पाणी संघर्ष चळवळ यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या पाणी परिषदेत त्यांनी केंद्राशी संघर्ष करण्याची भूमिका मांडली.

कृष्णा-भीमा उर्ध्वीकरण प्रकल्पाद्वारे टनेलमधून पाणी आणले जाणार आहे. हे पाणी लिफ्टकरुन आणले असते तर सांगली जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांना ते पाणी मिळाले असते पण असे केल्यास उजनी धरणामध्ये पाणी कमी येईल मग बारामतीची भरभराट कशी होईल? 80 कि.मी.वेगाने या टनेलमधून पाणी आणले जाणार आहे. मराठवाड्यामध्ये गोदावरी, पूर्णा, मांजरा, दुधणा इत्यादी प्रमुख नद्या आहेत.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.अजित.... 11:00

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये जे पाणी वाटप आहे ते पुढीलप्रमाणे आहे. मराठवाडयाकरिता 274 अब्ज घनफूट मीटर, विदर्भाकरिता 774 अब्ज घनफूट मीटर आणि उर्वरित महाराष्ट्राकरिता 141 अब्ज घनफूट मीटर असे पाण्याचे वाटप आहे. म्हणजे, मराठवाडयाकरिता 25 टक्के, विदर्भाकरिता 62 टक्के आणि उर्वरित महाराष्ट्राकरिता 13 टक्के अशाप्रकारे एकूण 1089 अब्ज घनफूट मीटर पाण्याचे वाटप झालेले आहे. शेतीच्या बाबतीत वर्षातून 2 पिके घेतली जातात, त्यासाठी किमान गरज 3 हजार किलोमीटर प्रति मीटर एवढी असते. मराठवाडयातील 51 लाख हेक्टर लागवड क्षेत्रात अंदाजे 540 अब्ज घनफूट मीटर पाण्याची आवश्यकता आहे. त्यामध्ये अजून 200-250 घनफूट पाण्याची आवश्यकता आहे. मराठवाडयाची गरज गोदावरी खोऱ्यातील अतिरिक्त पाण्यातून, पूर्व विभागाकडून व कृष्णा खोऱ्यातील अतिरिक्त पाण्यातून भागविली जाऊ शकते. म्हणून त्यासाठी प्रथम आंतरखोरे पाण्याचे परिवहन करावे लागणार आहे. आंतर नद्याजोड प्रकल्पाच्या संदर्भातील हा विषय आहे. आपल्याला ते करावे लागणार आहे. त्यामुळे याबाबतीतील शासनाचा मनोदय समजला पाहिजे. महाराष्ट्र शासनाच्या नियोजनाप्रमाणे गोदावरी खोऱ्यामध्ये 1089 अब्ज घनफूट मीटर पाणी उपलब्ध करुन पाण्याचे नियोजन केले पाहिजे. त्यामुळे याबाबतीत नियोजन पाहण्याची आवश्यकता आहे. मी मघाशी म्हणालो की, आपल्याला पैसे दिले तरी त्याचे आपण करणार काय ? कारण ते आलेले पैसे वापरण्यासाठी आपल्याकडे प्रकल्पच नसतील तर त्याचे करणार काय ? गोदावरी खो-यामध्ये 1089 अब्ज घनफूट मीटर पाणी असताना आपण फक्त 995 अब्ज घनफूट मीटर, म्हणजे 91 टक्के पाणी वाटपाचे नियोजन केले आहे, कृष्णा खोऱ्यामध्ये 594 अब्ज घनफुट पाणी उपलब्ध असताना पाणी वाटपाचे नियोजन मात्र 797 अब्ज घनफूट मीटर, म्हणजे 134 टक्क्यांचे केलेले आहे, ही त्या लोकांची दूरदृष्टी आहे. नियोजन चांगले आहे. यामध्ये सव्वापट जास्तीची उपलब्धी निर्माण करणे, ही चांगली बाब आहे. परंतु याबाबतीत आपल्याला सोयीस्करपणे विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्राचाच कसा काय विसर पडतो ? याबाबतीत मराठवाडयातील व विदर्भातील लोकप्रतिनिधी त्यांच्याशी टक्कर देण्यामध्ये कुठेतरी कमी पडत आहोत, हे आपण समजून घेतले पाहिजे. ते आपल्याला धोबीपछाड करीत आहेत. परंतु अशाप्रकारची नियोजनाची पध्दती ही अतिशय गंभीर पध्दती आहे. पैसे आले तर ते वापरण्याची व्यवस्थाच त्यांनी निर्माण करुन ठेवलेली

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.अजित.... 11:00

श्री.दिवाकर रावते.....

आहे. सभापती महोदय, जायकवाडीतील वरच्या आणि खालच्या पाणी वापराच्या संदर्भात मी मागे बोललो आहे, त्यामुळे त्यावर मी बोलून वेळ घेणार नाही. परंतु मराठवाडयात पाण्याची उपलब्धी थोडी तरी म्हणजे कपभर, बशीभर तरी वाढली पाहिजे, अशी आमची इच्छा आहे. खरे म्हणजे, मराठवाडयातील माणसे अल्पसंतुष्ठ आहेत. आहे त्यातच सुखाने राहू व नंतर स्मशानात जाऊ अशी आपली प्रवृत्ती आहे. विदर्भातील लोकांची प्रवृत्ती, "खाईन तर तुपाशी नाही तर तुला मारेन उपाशी," अशी आहे. त्यांची पूर्वीची प्रवृत्ती "खाईन तर तुपाशी नाहीतर राहीन उपाशी" अशी होती, परंतु त्यात आता आक्रमकपणा आलेला असून त्यांची प्रवृत्ती आता अशी झालेली आहे की, "खाईन तर तुपाशी नाही तर तुला मारेन उपाशी." मराठवाडा विभाग पाण्याच्या बाबतीत 32 टक्क्यांनी मागे आहे, ही सन 2000 पर्यंतची आकडेवारी माझ्याकडे आहे. अजून त्यामध्ये भर पडलेली आहे. दिवसेंदिवस मराठवाडा पाण्याच्या बाबतीत मागेच जात आहे.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

अशी सर्व परिस्थिती निर्माण होत आहे. मराठवाडयामध्ये 150 अ.घ.फु.अधिक पाण्याची गरज आहे. मराठवाडयाची 600 अ.घ.फु.पाण्याची गरज भागविण्यासाठी 450 अ.घ.फु.पाणी खो-यात उपलब्ध आहे. हे पाणी अडवता की नाही, साठवता की नाही, हा भाग वेगळा. पण जी बॅरेजेस व्हावयाची होती, ती बॅरेजेसही झालेली नाहीत, आपण फक्त बाभळीमध्ये अडकलो आहेत, कोर्ट-कचे-या सुरु आहेत. प्लॅन्स, एस्टिमेट तयार आहेत पण बाभळीच्या बाबतीत कोर्टामध्ये पाचर बसली त्यामुळे एका बाभळीतच आपण अडकलो आहोत. 11 बॅरेजेसपैकी 7 बॅरेजस अडकले आहेत. एक अडकल्यामुळे बाकीच्यांना फटका बसतो आहे. 150 द.ल.घ.फु.पाण्याचे कृष्णा, वैनगंगा खो-यातून परिवहन करण्याचा विचारा करावा लागेल. संभाजीनगरमध्ये दिनांक 31/1/2000 व दिनांक 1/2/2000 रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत पाटबंधारे विभागाने सिंचनाचे निर्णय जाहीर केले. अनेक संकल्पना जाहीर केल्या. प्रेसमध्ये येऊन मराठवाडयाकरिता अमूक, अमूक करु, असे जाहीर केले. मराठवाडयातील पूर्वीचे 5 मोठे, 16 मध्यम आणि 28 लघुपाटबंधारे प्रकल्प पुढील पाच वर्षात पूर्ण करण्यात येतील, असे सन 2000 मध्ये सांगितले आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीचा अधिकृत अहवाल माझ्याकडे आहे. सरकारची ही कमिटमेंट आहे. याशिवाय उर्ध्व पैनगंगा, सापळी धरण सोडून, व लेंडी हे दोन मोठे प्रकल्प, एक मध्यम प्रकल्प व 54 लघु पाटबंधारे योजना यांचा समावेश कालबध्द कार्यक्रमात करण्यात आला आहे, असेही त्यात म्हटले आहे. निम्न मांजरा धरणाची उंची वाढविण्याबाबत अभ्यास करुन निर्णय घेण्यात येईल. मराठवाडयातील कृष्णा खो-यामध्ये येणा-या योजना कृष्णा खोरे महामंडळाच्या माध्यमातून अग्रक्रमाने पूर्ण करण्यात येतील, असे जाहीर केले होते. त्याला आता चूना लावून झाला आहे, आता परत एकदा यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी खुलासा केला तर बरे होईल. पाणी कृष्णामध्ये येईल म्हणजे आत्याबाईला मिशा असत्या तर......असा तर्क आहे. तोपर्यन्त आम्ही जय हरी विठ्ठल, जय हरी विठ्ठल करीत बसतो. त्यावेळी असेही जाहीर करण्यात आले होते की, पाटबंधा-याचा कालबध्द कार्यक्रम, कृष्णा खो-यातील भाग धरुन, पाच वर्षात पूर्ण करण्यात येईल व त्यासाठी 1600 कोटी रुपयांची तरतूद पुढीलप्रमाणे उपलब्ध करण्यात येईल. वर्ष 2000-2001 मध्ये 300 कोटी, वर्ष 2001-2002 मध्ये 300 कोटी रुपये, वर्ष 2002-2003 मध्ये 300 कोटी

..2.........

श्री.दिवाकर रावते..........

रुपये, वर्ष 2003-2004 मध्ये 350 कोटी रुपये, वर्ष 2004-2005 मध्ये 350 कोटी रुपये असे उपलब्ध करुन देण्यात येणार होते. मंत्री महोदयांना मला विचारावयाचे आहे की, हा निधी आपण दिला का ? दिला असेल तर त्याची काय विल्हेवाट लागली ? हा निधी केवळ कर्मचा-यांचा पगार वाटण्यासाठी खर्च झाला का ? यामधून प्रकल्प उभे राहिले का ? माझ्या माहितीप्रमाणे तेथील कार्यालयांना उद्‌बत्ती लावून बसण्याची पाळी आली आहे, त्यांच्याकडे कोणतेही काम नाही. मी एकदा मराठवाडा सिंचन महामंडळाच्या कार्यालयात गेलो होतो तेंव्हा सर्व कर्मचारी हातावर हात ठेवून, उद्‌बत्ती लावून बसले होते. त्यांना मी विचारले तेंव्हा त्यांनी असे सांगितले की, आम्हाला कोणतेही काम नाही, आम्ही येथे येऊन बसतो, किमान पगार तरी मिळावा म्हणून उद्‌बत्ती लावून आम्ही बसलो आहोत. या कर्मचा-यांचा पेन फक्त सहीसाठी वापरात येतो, त्यांना कोणतेही काम नाही. परंतु, यामध्ये त्यांचा दोष नाही.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ..........

ते म्हणतात साहेब आम्हाला काम द्या, आम्हाला काम करावयाचे आहे. पगारावर पैसे वाटून शेतक-यांच्या जमिनी उजाड करण्याचे नियोजन सरकार करणार असेल तर आम्ही काय करायचे ? आम्ही कोणाकडे बघायचे ? मला बोलतांना दु:ख होते. सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागाचा सप्टेंबर, 2001 चा अहवाल माझ्याकडे आहे. त्या अहवालाच्या पहिल्या पृष्ठावर असे म्हटलेले आहे की, "पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी/ तापी खो-यात वळविण्याबाबत समन्वय समितीचा अहवाल सप्टेंबर, 2001." हा संपूर्ण अहवाल मी वाचून दाखवित नाही. अहवालाच्या शेवटी ॲनॅक्सचरमध्ये जी माहिती दिलेली आहे, ती माहिती मी वाचून दाखवितो. या अहवालातील पृष्ठ क्र.32 वरील तक्त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "DIVERSION SCHEMES FROM WEST FLOWING RIVERS INTO GODAVARI & TAPI BASINS, Recapitulation sheet मध्ये असे म्हटलेले आहे की, Preliminary & Survey 81.00, जमिनीचा खर्च 10716.45 कोटी रुपये दिलेला आहे. फॉरेस्टसाठी किती खर्च येईल, याची सविस्तर माहिती यामध्ये दिलेली आहे, ती सर्व माहिती मी वाचून दाखवित नाही. पृष्ठ क्र.34 वरील जो तक्ता आहे तो फार महत्वाचा आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "DIVERSION SCHEMES FROM WEST FLOWING RIVERS INTO GODAVARI & TAPI BASINS ABSTRACT, Particular (A) Cost of small Diversion Scheme by Gravity 143.44." हा आजच्या चर्चेचा सर्वात महत्वाचा भाग आहे. शासन यासंदर्भात काय करणार आहे ते माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरामध्ये सांगितले पाहिजे. (A) Cost of small Diversion Scheme by Gravity Rs 143.44 crores . Cost of the High Level Dams (Above RL 500m) is Rs. 454.94 crores and cost of the Low Level Dams Below RL 500m) is : 2087.12 Cost of the tunnel/link cut for reservation all these things are given here. It is Rs.125.09 crores. The cost of Lift Irrigation Scheme is Rs.2523.32 crores. मला असे वाटते की, माननीय श्री.पतंगराव कदम यांच्या भागातील टेंभू प्रकल्पापेक्षा सुध्दा ही कॉस्ट कमी आहे, हे मी मुद्दाम सांगतो.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .........

बुलढाण्याला खडकपूर्णाची 6 लिफ्टची स्किम दिलेली आहे. पाणी उचलण्यासाठी येणारा विजेचा खर्च शेतक-यांना परवडणारा आहे किंवा नाही, हा नंतरचा विषय आहे. " Cost of lift irrigation Scheme is Rs. 2523.32 croes. The cost of Lift for the Local Area is Rs. 29.00 crores.The cost of the modification of the existing Dams is Rs 298.33 crores. The cost of the Punegaon high level canal to Kolhi Medium Project amount is Rs. 280.37 crores. ii) Main canal and branches cost is of Rs. 1093.59, III) The cost of Distributery is Rs.361.32 crores and Cost of supply of Electricity (@ Rsd.1.00 crore per MW is Rs.704 crores. Thus the total come to Rs.8100.52 crores. ." म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.धोंडीराम राठोड यांनी मांडलेल्या एकूण योजनेला 8,100 कोटी रुपये खर्च येणार आहे. एवढा मोठा खर्च येणार असतांना 20 हजाराचे, 16 हजारांचे बॉंड काढले जातात. हा अहवाल तुमच्याकडे आहे. परंतु यानंतरचा अहवाल तुमच्याकडे आहे किंवा नाही, हे मला माहीत नाही. या अहवालातील पृष्ठ क्र.43 वरील तक्त्यामध्ये "Provision for pump house and booster" करीता किती खर्च येणार आहे, "Supply of electric motor of various capacities" करीता किती खर्च येणार आहे, "Cost of rising main with Steel plate" हे सर्व टेक्निकल डिटेल्स यामध्ये दिलेले आहेत आणि त्याची कॉस्ट किती असणार आहे हे सुध्दा दिलेले आहे.

यानंतर श्री.गागरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

Utilization of water म्हणजे पाण्याचा वापर कसा होणार आहे त्याची माहिती यामध्ये दिलेली आहे. सिंचनाकरिता 317.82 अब्ज घ.मीटर पाणी उपलब्ध आहे. यापैकी water for irrigation हे 29 हजार हेक्टर करिता व 13305 हेक्टरकरिता वापरता येईल. तसेच Water for drinking व Industrial use हे उद्देशही आहेत. Total benefit in lakhs. लाखो स्थानिक लोकांचा लाभ होणार आहे. तापी, गोदावरी, पैनगंगा खोऱ्यांमध्ये किती लाभ होणार आहे याबाबतच्या सिस्टीमचा तक्ता माझ्याकडे आहे. या तक्त्यामध्ये सर्व Technical details आहेत. परंतु आता आपण सर्वसाधारणपणे चर्चा करीत आहोत की प्रत्येकाला किती पाणी मिळणार आहे ? सप्टेंबर 2001 च्या अहवालानुसार पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी व तापी खोऱ्यामध्ये वळविण्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने कोणती भूमिका घेतली आहे ? या पाण्याचा किती वापर झाला आहे ? मला माहिती आहे की, नदी इकडून तिकडे नेण्याकरिता स्थानिक राज्यकर्त्यांचा विरोध झालेला आहे, तो फार गंभीर आहे. महाराष्ट्रात तुटीच्या खोऱ्यात अधिक पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली होती. त्या समितीने नियोजन पुस्तिका सादर केली होती. त्या महाराष्ट्र पाणी परिषदेचे अध्यक्ष श्री.गणपतराव देशमुख होते व कार्याध्यक्ष श्री.बाळासाहेब विखे पाटील हे होते. ही सर्व मोठी माणसे आहेत. यामध्ये सदस्य म्हणून श्री.भुजंगराव कुलकर्णी, डॉ.एस.बी.वराडे, श्री.जे.टी.जंगले, श्री.आर.व्ही.चव्हाण, श्री.डी.वाय.नळगीरकर, श्री.वाय.आर.जाधव, श्री.बी.जी.भांगरे यांनी काम केले होते. यापैकी एक सदस्य श्री.अभंगे वारले आहे. हा सर्व अहवाल मी वाचत नाही. परंतु काही महत्वाच्या शिफारशी वाचतो. विपूल पाणी असलेल्या भागासाठी महाराष्ट्र राज्य जलसिंचन आयोगाच्या आंतरखोरे पाणी परिवहनाच्या शिफारशी आहेत. महाराष्ट्र पाणी परिषदेने महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने, तुटीच्या खोऱ्यात अधिक पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी काही आंतरखोरे पाणी परिवहन योजनांचा मानचित्रांच्या सहाय्याने प्राथमिक अभ्यास केला असून त्याबाबत सविस्तर अन्वेषण व सर्वेक्षण करण्यासाठी 13 प्रस्ताव तयार केले आहेत. विपुल पाणी असलेल्या प्रदेशातून कमी पाणी असलेल्या भागात पाणी परिवहन करुन नेणे आवश्यक आहे, शिफारस क्र.17 नुसार पुढील पाणी परिवहन योजनाचा अभ्यास झाला पाहिजे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ KGS/ MAP/

श्री.दिवाकर रावते.....

वैतरणा- दारणा, ऊर्ध्व कृष्णा-उर्वरित भीमा, दमणगंगा-ऊर्ध्व गोदावरी, पार-गिरणा/ऊर्ध्व गोदावरी, मध्य वैनगंगा-गोदावरी निम्न स्त्रोत या योजनांची शिफारस केली होती, या पैकी एक शिफारस मान्य करुन ऊर्ध्व कृष्णेचा 1200 कोटी रुपयाच्या प्रकल्पाचे काम सुरु झालेले आहे. बाकीच्या प्रकल्पाचे काय झाले आहे ? कधी करणार ? हे माहिती नाही. आज ठराव चर्चेला घेतला असल्यामुळे त्याची माहिती देण्यात यावी. शिफारस क्र.18 नुसार निम्न पेनगंगा प्रकल्प तातडीने पूर्ण करुन अनुमतीप्राप्त पाणी वापरुन घ्यावे. शिफारस क्र.19 नुसार इंचमपल्ली, भोपाळपट्टनम्, खारियागुटी घाट हे आंतरराज्यीय प्रकल्प लवकर कार्यान्वित करावेत. अशा प्रकारच्या महत्वाच्या शिफारशी आहेत.

महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाच्या दिनांक 31.1.2000 रोजी औरंगाबाद येथील झालेल्या बैठकीत कोकणातील खोऱ्यातून पाणी आणून गोदावरी खोऱ्यात पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी अभ्यास करावा असा निर्णय घेतला होता. त्यावर अजूनही कार्यवाही झालेली नाही. याबाबत मंत्री महोदयांनी योग्य तो खुलासा करावा. सभापती महोदय, जानेवारी 204 मध्ये वैनगंगा, काटोपूर्णा, मांजरा, वॉटर टँक स्कीमचा अहवाल तयार झाला आहे.

यानंतर श्री.सुंबरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

वैनगंगा, काटेपूर्णा, पैठण, मांजरा वॉटर ट्रान्स्फर स्कीमचा अहवाल तयार आहे. हा अहवाल मला` मराठीतून वाचावयाची इच्छा असली तरी तो इंग्रजीमध्ये असल्याने आणि त्याचा मराठीतून अनुवाद करण्यास वेळ नसल्याने मी त्यातील काही भाग इंग्रजीतूनच वाचून दाखविणार आहे. या अहवालातील 7 व्या क्रमांकाच्या शिफारशीमध्ये शेवटी असे म्हटले आहे की, "...It is therefore, proposed that about 200 TMC of water should be transferred to the western water deficit part of Godavari basin comprising of Wardha, Yavatmal, Amravati, Akola districts and Manjra and main Godavari basin in Marathwada are."...... केवढा महत्त्वाचा प्रकल्प आहे आणि या एका प्रकल्पासाठी, तुम्ही तिकडे 1200 कोटी रूपये खर्च केले 1700 कोटी यासाठी खर्च केला. त्यामुळे एवढा विदर्भापासूनचा पट्टा आणि 80 टीएमसी पाणी गोदावरीमध्ये येऊन पडते. याबाबतचा अहवाल तयार आहे. सभापती महोदय, यामध्ये वैनगंगा, काटेपूर्णा, पैठण, मांजरा वॉटर ट्रान्स्फर स्कीम जी आहे"An indicative route plan of the scheme is enclosed. The scheme consists of seven water transfer links as under: Wainganga-Bembli-Katepurna Link, Gosikhurd Lower Wardha Link, Bhadrawati Lower Penganga Link, Lower Penganga Isapur Link, Isapur Yeldari Link, Yeldari-Paithan Link, Yeldari-Vishnupuri Manjra Link अशा या महत्त्वाच्या 7 लिंक स्कीम्स आहेत. या सात लिंक स्किम्ससाठी खर्च किती आहे ती माहिती देखील त्यांनी यात दिलेली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, "....The cost of the civil works of the project roughly works out to Rs. 9000 Cr. ...." ही किंमत कमी आहे ना ? नाही तरी आपण 20 हजार कोटीचे कर्ज वगैरेच्या गोष्टी करतो त्यापेक्षा ही किंमत फारच कमी आहे. असो. पुढे असे म्हटले आहे की, .... and the cost of generation of about 1020 Mw of electricity required for lifting the water will be about Rs.6630 Cr. Thus the total cost of the scheme will be Rs. 15630 Cr...." सभापती महोदय, असा हा अहवाल आहे आणि तो अतिशय चांगला अहवाल आहे. त्यात या लिंक स्किम्सची पूर्ण माहिती, त्यात बेसिन कसे जोडणार आहे वगैरे माहिती, अगदी नकाशासह दिलेली आहे. सभापती महोदय, हे एवढे सारे अहवाल आहेत. ते सारे

....... टी 2 ...



श्री. रावते .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

काही मी वाचणार नाही. पण सन्माननीय सदस्य श्री.राठोड यांना या निमित्ताने सांगू इच्छितो की, आपला जो मूळ ठराव आहे त्या संदर्भातील ढोबळ गोष्टी मी मांडल्या आहेत. ज्या तुमच्याकडून येथे मांडल्या गेल्या नाहीत. त्या आपण मांडल्या असत्या तर मी आज या विषयावर बोलणारच नव्हतो. पण त्या गोष्टी येथे येणे आवश्यक आहे म्हणून मग मी त्या येथे मांडल्या आहेत. मराठवाडा, विदर्भ आणि कोकणातील कोठले पाणी कोठे जाणार आहे हा यामध्ये मूळ प्रश्न आहे. नद्याजोड प्रकल्पाच्या माध्यमातून कोणत्या खोऱ्यामध्ये किती पाण्याची उपलब्धी आहे, किती अतिरिक्त आहे आणि अतिरिक्त असेल तर ती येथे आली पाहिजे, कमी आहे ती भरली गेली पाहिजे आणि सुजलाम सुफलाम महाराष्ट्र निर्माण केला गेला पाहिजे याचा सारा अभ्यास झालेला आहे. सभापती महोदय, आपण गेली सात वर्षे शासनामध्ये आहात. पण साडेचार वर्षाच्या शिवशाहीने कोणाला आवडो की न आवडो, योग्य की अयोग्य हे न पाहता कृष्णा खोऱ्यात प्रचंड काम केले. त्यामुळे मराठवाडा-विदर्भातील काही मंडळींचा रोष आहे आणि तो मी समजू शकतो. त्यांचे म्हणणे असे की, त्यामुळे आमचा अनुशेष वाढला. पण योगायोग असा आहे की, विदर्भाचे नेते अनेक वर्षे येथे राज्यकर्ते म्हणून राहिले पण तरीही त्यांच्याकडे अनुशेष राहिला. या संदर्भात मी आपल्याला मघाशी महाराष्ट्र टाईम्स मधील अग्रलेख वाचून दाखविला आहे. तुम्हाला जे जमले नाही ते आम्ही साडेचार वर्षात करून दाखविले. कृष्णा खोऱ्यात 70 टक्के काम झाल्यानंतर आपण गेल्या सात वर्षामध्ये कृष्णा खोऱ्यात एकूण किती निधी नेला ? किती प्रत्यक्ष वापरला आणि किती काम तेथील पुढे सरकवले हे आपण आम्हाला या निमित्ताने सांगा. कारण आम्ही आमच्या काळात तेथे 70 टक्के काम केल्यानंतर आजही पश्चिम महाराष्ट्रात पाण्यासाठी असंतोष आहे. पाणी अडले आहे पण ते मिळत नाही, पाणी अडले आहे पण ते आम्हाला सापडत नाही. आमचा ऊस वाळतो आहे, आमच्याकडे दुष्काळी भाग आहे असे आज देखील त्यांना, त्यांच्या नेहमीच्या आक्रमकतेने, स्वभाव गुणांनी सांगावे लागते आहे आणि पाण्यासाठी आम्हाला संघर्ष करावा लागेल अशी एका उपमुख्यमंत्र्यांची भूमिका जेव्हा महाराष्ट्राच्या पटलावर येते तेव्हा या महाराष्ट्र सरकारचे या प्रश्नामध्ये आलेले अपयश आहे आणि ते झ ाकण्यासाठी आपल्याला काहीही मार्ग राहिलेला नाही. तुम्ही कितीही कर्जाचा बोजा दिला तरी तो सहन करता येतो, पण जनसामान्यांच्या तोंडचे पाणी पळविणारा बोजा येणाऱ्या सरकारवर दिलात तर त्या सरकारच्याही नाकीनव येतील आणि तरीही

...... टी 3 ....



श्री. रावते .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या सरकारला पुढे जावे लागेल हे आम्ही उघड्या डोळ्यांनी पाहतो आहोत. उद्या जर आम्हाला तुमच्या जागी बसायचे झाले तर आमच्या जाणीवा आम्हाला समजताहेत, आमच्या जबाबदाऱ्या तुम्ही आम्हाला आज सांगता आहात. पण तुमच्या नाकर्तेपणाच्या जबाबदाऱ्या घेऊनच पुढे येणाऱ्या सरकारला पुढे जावे लागणार आहे अशी परिस्थिती तुम्ही निर्माण केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.राठोड यांना मी या निमित्ताने मनापासून धन्यवाद देतो की, त्यांनी अतिशय सुंदर असा प्रस्ताव येथे आणला आहे, खरे तर यावर आणखी 4-5 तास चर्चा व्हावी, तात्त्विक चर्चा व्हावी अशी माझी इच्छा आहे. ....

( यानंतर श्री. सरफरे ...... यू 1 ...

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

परंतु वेळेच्या अभावी बाकीच्या सर्व गोष्टी मांडता आल्या नाहीत तरी सुध्दा आपण मांडलेल्या प्रस्तावाला सन्मानित करण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी केला आहे. तो कमी असेल परंतु तो साध्य होणार आहे, आणि तो व्हावा अशी माझी अपेक्षा आहे. त्या भागामध्ये आपण मंत्रिमंडळाची बैठक घेऊन दोन दिवसांचे जेवण घेता. गाडयांचा ताफाच्या ताफा फिरवून वातावरण निर्माण करता, आणि लोकांची बघण्याची इच्छा नसतांना सुध्दा प्रचंड आकाराचे होर्डींग्ज लावून मंत्रिमंडळ आले म्हणून वाखारे पिटायचे. आणि मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयापैकी आम्हाला काहीही मिळणार नसेल तर माननीय श्री. राठोड साहेब आपल्या पक्षाच्या लोकांना सुध्दा ऊसाच्या काडया घेऊन उभे रहावे लागेल. पाण्याचा प्रश्न हा केवळ राजकारणाचा विषय नाही. राजकारणामध्ये तुम्ही-आम्ही प्रत्येक जनता आहे. प्रत्येकाची शेती आहे, साखर कारखाने त्यांचेच आहेत. त्यामध्ये कुणाचा ऊस घ्यावयाचा कुणाचा नाही याचे पाप हे नंतर फेडतील. परंतु महाराष्ट्रातील प्रत्येक नागरीक समृध्द व्हावयाचा असेल किंवा तिसऱ्या पिढीसाठी आपल्याला समृध्दीकडे वाटचाल करावयाची असेल तर ती जबाबदारी आपल्या पाठीवर आहे. ते काम आपण केले पाहिजे. नाही तर जनता आपल्याला माफ करणार नाही. आणि तो करंटेपणा तुम्हा-आम्हाला परवडणार नाही. आम्ही काय आणि तुम्ही काय आपणा सर्वांचे हे प्रश्न आहेत. तुमचा आणि आमचा सर्वांचा हा व्यावहारिक प्रश्न आहे. आणि तो म्हणजे राज्यातील शेतकऱ्याला आपण चांगला, समृध्द करणार आहात की नाही? तो करावा अशी माझी कळकळीची विनंती आहे. माननीय सदस्य श्री. धोंडीराम राठोड यांनी चांगला प्रस्ताव आणल्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. सभापती महोदय, आपण मला संधी दिल्याबद्दल आपणास धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेशदादा देशमुख (परभणी तथा हिंगोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मराठवाडयातील भौगोलिक परिस्थितीचा विचार करुन माननीय सदस्य सर्वश्री धोंडीराम राठोड व दिवाकर रावते साहेबांनी विचार व्यक्त करीत असतांना बरेच महत्वाचे मुद्दे मांडले आहेत. माननीय सदस्य श्री.रावते साहेब यांचे वास्तव्य मुंबईमध्ये असले तरी ते मूळचे परभणीचे आहेत. त्यामुळे त्यांचे मराठवाडयाशी असलेले नाते किती जवळचे आहे हे आपल्या लक्षात येते. माननीय सदस्य श्री. राठोड साहेबांनी मराठवाडयातील पाण्याच्या प्रश्नासंबंधी प्रस्ताव मांडल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. कै. शंकरराव चव्हाण साहेबांनी मराठवाडयामध्ये जायकवाडी प्रकल्प निर्माण केल्यामुळे मराठवाडयामध्ये आपल्याला पाणी बघावयास मिळाले. परंतु हा प्रकल्प निर्माण केल्यानंतर त्यामध्ये असलेल्या त्रुटींमुळे आज सुध्दा त्यामधील पाणी टेलपर्यंत जात नाही. बऱ्याचशा चाऱ्या शासनाच्या रेकॉर्डवर आहेत, परंतु त्यांच्या दुरुस्तीची कामे होत नाहीत. त्या चाऱ्यांमुळे आम्हाला पाणी मिळू शकते परंतु ते देण्याचे काम आपण करीत नाही. चाऱ्यांच्या दुरुस्तीच्या कामाकडे आपण लक्ष देत नाही ही आमची खंत आहे. आज सिध्देश्वर धरणामधून मिळणाऱ्या पाण्यापैकी बरेचसे पाणी वाया जाते. तेथील भू गर्भामध्ये आज पाण्याचा साठा नाही. लातूर आणि उस्मानाबाद जिल्हयामध्ये 1200 फूटापर्यंत खोल गेले तरी पाणी लागत नाही. परभणी जिल्हयामध्ये 200 ते 300 फूट खोल पाणी गेले आहे अशी परिस्थिती आहे. त्यामुळे आमच्या जिल्हयातील बऱ्याच भागामध्ये पाणी मिळत नाही.

सभापती महोदय, कोकणामध्ये होल्डींगची जमीन फार कमी आहे, परंतु आमच्या मराठवाडयामध्ये प्रत्येक कुटुंबाकडे 100 ते 200 एकर जमिनीचे होल्डींग आहे. कोकणामध्ये आणि पश्चिम महाराष्ट्रामध्ये काम करणाऱ्या माणसांपेक्षा मराठवाडयातील मंडळी काम करण्यामध्ये थोडीशी आळशी आहेत. पश्चिम महाराष्ट्रामध्ये हुशार लोक आहेत ही वस्तुस्थिती आहे. आमच्यातील सर्वात महत्वाचा गुण असा आहे की, पश्चिम महाराष्ट्र समाधानी असेल तर त्यामध्ये आम्हाला समाधान वाटते, विदर्भाला समाधान मिळाले तर आम्हाला समाधान वाटते. कोकणाला समाधान मिळाले तर आम्ही आणखी समाधानी होतो. आम्ही निझामाच्या रावजटीमध्ये वाढलो आहोत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेशदादा देशमुख (पुढे सुरू...

आम्ही निजामच्या काळातील आहोत. महाराष्ट्रातील इतर भागापेक्षा आम्ही तीन वर्षांनी स्वतंत्र झालो. तेव्हा त्या अगोदरपासून आम्ही बॅकलॉगमध्ये आहोत. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी मराठवाड्यामध्ये येऊन लोकप्रतिनिधींबरोबर बैठक घ्यावी आणि वस्तुनिष्ठ माहिती घेऊन ज्या काही गोष्टी हातामध्ये आहेत..त्या कमी प्रयत्नाने, कमी खर्चामध्ये देऊ शकतो काय, याचा अभ्यास करावा आणि मराठवाडयातील जनतेला... मराठवाड्यातील कोणत्याही जिल्ह्यासाठी मदत करता आली तर ती करावी. सभापती महोदय, आताच प्रकल्प चालू झाल्याचे सांगण्यात आले. परंतु आमच्या विभागातील परिस्थिती वेगळी नाही. माननीय मुख्यमंत्री मराठवाड्यातील आहेत तरी देखील आमची परिस्थिती तशीच आहे. माननीय देशमुख साहेब, आपले आणि आमचे घराणे एकच आहे. आपल्या आणि आमच्यामध्ये फरक आहे. आपल्याकडे पावर आहे, आमच्याकडे पावर कमी आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय, मराठवाड्यातील असले तरी पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, कोकण भागामध्येही त्यांना लक्ष द्यावे लागते. मराठवाड्यातील तीन मुख्यमंत्री झाले, सध्याचे मुख्यमंत्री हे माननीय श्री.विलासराव देशमुख हे मराठवाड्यातील आहेत, त्यांच्यामुळे गोदावरी खोऱ्यामध्ये बॅन्चेंस झालेल्या आहेत. त्यामुळे 200 कि.मी.पर्यन्त पाणी थांबणार आहे. पर्यायाने परभणी जिल्ह्यामधील शेतीसाठी बारमाही उपयोग होणार आहे.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

शासनाचा मी मनापासून आभारी आहे की, रखडलेल्या प्रकल्पांसाठी शासनाने पैसे उपलब्ध करून दिले. लोअर दुधना प्रकल्पाचे काम 12 वर्षापासून चालू आहे. आता ते काम शेवटच्या टप्प्यावर आहे. एखादे वेळेस निधीअभावी काम थांबणे शक्य आहे, ते थांबवू नये अशी विनंती आहे. या प्रकल्पापासून सिंचन क्षेत्र भरपूर वाढणार आहे. हिंगोली जिल्हा नव्याने झालेला आहे. या प्रकल्पाचे नियोजन व्यवस्थितरित्या करावे लागेल. तीन तालुके नव्याने झालेले आहेत. म्हणजे एकूण सहा तालुक्याच्या क्षेत्रामध्ये या पाण्याचे नियोजन व्यवस्थित केले जाईल,या याकडे लक्ष द्यावे. मराठवाड्याच्या विकासाच्या संदर्भात औरंगाबाद येथे मंत्रीमंडळाची बैठक झाली. त्यानंतर दुधना प्रकल्पासाठी शासनाने पैसे उपलब्ध करून दिले, याबद्दल शासनाचे मन:पूर्वक आभारी आहे. नांदेड जिल्ह्यातील आंध्र प्रदेशच्या युध्दामुळे बाभळी प्रकल्पाचे काम थांबलेले आहे. यासाठी जे जे काही प्रयत्न करावयाचे आहेत, त्याबाबत सभागृह त्यांच्या सोबत आहे. परंतु त्यामध्ये तोडगा काढून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.सुरेशदादा देशमुख (पुढे सुरू.....

अधिक गतीने काम करून मराठवाड्याला पाण्याची उपलब्धता होणार आहे. माननीय सदस्य श्री.धोंडीराम राठोड आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब यांनी मराठवाड्यातील पाणी प्रश्नाच्या समस्येबद्दल विषय मांडला, त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार. माननीय मंत्री महोदयांना मी विनंती करतो की, मराठवाड्यामध्ये काही राहिलेले जुने प्रकल्प आहेत, त्या प्रकल्पांना निधी उपलब्ध करून देऊन कामाला गती देण्याचे प्रयत्न करावेत. मानीय मुख्यमंत्री महोदय मराठवाड्यातील आहेत, त्यांनीही मदत करावी, एवढीच मी विनंती करतो आणि माझे भाषण थांबवितो.

---

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : मला थोडे बोलायचे आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.धोंडीराम राठोड यांनी महत्वाची चर्चा उपस्थित केली. या चर्चेच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. जनजीवनाशी निगडित असलेला हा प्रश्न आहे, याची मला कल्पना आहे. शासन देखील या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन योग्य त्या उपाययोजना करेल,अशी अपेक्षा आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी कोकणातील समस्या मांडली.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ......

मला अत्यंत महत्वाच्या बैठकीला जावयाचे आहे म्हणून एक बाब आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. चासकमान प्रकल्प हा अत्यंत महत्वाकांक्षी प्रकल्प आहे आणि त्या प्रकल्पाचे जवळपास सर्वच काम पूर्ण झालेले होते. त्या विभागामध्ये शून्य किलोमीटर ते 72 किलोमीटर कालव्याच्या अस्तरीकरणाचे काम वेगाने चालू होते. ते काम पूर्ण झाल्यानंतर त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे पाणी वाया न जाता ते शेतकऱ्यांना शेवटच्या टोकापर्यंत मिळणार आहे. पुणे जिल्ह्याचे आदरणीय पालकमंत्री आणि माननीय जलसंपदा मंत्री श्री. अजित पवार यांनी यासंदर्भात लक्ष घालून हे अस्तरीकरणाचे काम चालू केले. मधल्या काळातील अनुभव असा आहे की, अस्तरीकरण न झ ााल्यामुळे कालव्याचे पाणी पुढे जात नव्हते. कारण लिकेजमुळे ते पाणी इतरत्र वाया जात होते. सदरचे काम पूर्ण व्हावे म्हणून मी माननीय मंत्रिमहोदय श्री. देशमुख साहेब, आपल्याकडे वेळोवेळी पत्रव्यवहार केलेला आहे. आपणही त्याला अत्यंत चांगला प्रतिसाद दिलेला आहे. मध्ये मी आदरणीय मंत्रिमहोदय श्री. जयंत पाटील तसेच माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांचीही भेट घेतली. माझी एकच विनंती आहे की, यासंदर्भात शासनाने जे आदेश दिलेले आहेत त्याची आपल्याला कल्पना आहे. हे काम ताबडतोबीने मार्गी लागावे. सर्व प्रकल्प उभा आहे परंतु शेवटच्या टोकापर्यंत पाणी जात नसेल आणि केवळ अल्प रकमेकरिता ते काम अडले असेल तर तातडीने अशा प्रकारची रक्कम उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने संबंधित विभागाला आदेश निर्गमित केले आहेत त्याची अंमलबजावणी करण्याबाबत आपल्याकडून निश्चित काय कार्यवाही होणार आहे यासंदर्भात आज या उपस्थित झालेल्या चर्चेमध्ये आपण तपशीलवार खुलासा केला तर मी आपला आभारी राहीन.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रामनाथ मोते )**

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख ( जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री धोंडीराम राठोड, सुरेशदादा देशमुख, चंद्रकांत रघुवंशी, श्रीमती सुधाताई जोशी यांनी नियम 260 अन्वये अत्यंत महत्वाच्या विषयावर जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर सन्माननीय सदस्य सर्वश्री धोंडीराम राठोड, चंद्रकांत रघुवंशी, अरविंद सावंत, दिवाकर रावते, सुरेशदादा देशमुख आणि माननीय उपसभापती श्री. डावखरेसाहेब यांनी आपले मत या ठिकाणी मांडलेले आहे.

हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे येणाऱ्या काळात जर तिसरे महायुध्द झाले तर ते पाण्यासाठी होईल एवढा हा विषय आजच्या घडीला महाराष्ट्रासाठी महत्वाचा आहे. राज्यात पावसाचे उपलब्ध होणारे पाणी विशिष्ट ठिकाणी जमिनीत मुरण्याच्या प्रमाणानुसार भूगर्भामध्ये पाण्याचे साठे निर्माण होतात. महाराष्ट्रातील पर्जन्यमानाची विविधता लक्षात घेता पश्चिम घाट क्षेत्र आणि कोकण हा जसा जास्त पर्जन्यमानाचा प्रदेश आहे तसेच जवळजवळ एकतृतियांश क्षेत्र अवर्षणप्रवण आहे. महाराष्ट्राच्या 35 जिल्ह्यांपैकी 2 नागरी जिल्हे सोडले तर जे उर्वरित 33 जिल्हे आहेत त्यातील 353 तालुक्यांमध्ये आपण 1505 वॉटरशेड्स निर्माण केलेले आहेत. हे जे पाणलोट क्षेत्र आहेत त्याची आपण विभागणी केली तर आपल्या लक्षात येईल की, ज्याला आपण ओव्हर एक्स्प्लॉयटेड म्हणतो, त्या पाणलोट क्षेत्रात एकूण जे पाणी उपलब्ध आहे त्या उपलब्ध पाण्यापैकी किती उपसा झाला त्याचे प्रमाण 100 टक्के पेक्षा जास्त येत असेल तर त्या पाणलोट क्षेत्राला आपण ओव्हर एक्स्प्लॉयटेड पाणलोट क्षेत्र म्हणतो. या 1505 पाणलोट क्षेत्रांमध्ये 76 पाणलोट क्षेत्र हे ओव्हर एक्स्प्लॉयटेड कॅटेगरीमध्ये मोडतात. राहिलेल्यामध्ये जी वेगवेगळी विभागणी केलेली आहे

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. सुनील देशमुख....)

त्यामध्ये क्रिटीकल अशा 20 वॉटरशेडस् आहेत, सेमी क्रिटीकल वॉटरशेडस् 163 आणि सेफ वॉटरशेडस् 1242 आहेत. अशा प्रकारे वॉटरशेडस् आहेत. काही वॉटरशेडस अनक्लासिफाईड आहेत. ज्या ठिकाणी पाण्याची क्वॉलिटी चांगली नसेल ती ठिकाणे अनक्लासिफाईड कॅटेगरीमध्ये मोडतात. अशा प्रकारे 1505 वॉटरशेडस् डिव्हाइड केलेल्या आहेत. ओव्हर एक्स्प्लायटेड वॉटरशेडस् 76 आहेत. या वॉटरशेडस् डीपीएपी एरियामध्ये दिसून येतात. ओव्हर एक्स्प्लॉयटेड वॉटरशेडस 76 आणि क्रिटीकल वॉटरशेडस् 20 अशा 96 वॉटरशेडस् आहेत. ज्या वॉटरशेडस्मधील भूगर्भातील पाण्याची पातळी खूप खाली गेलेली आहे त्यांचे पुढे आणखी वर्गीकरण केलेले आहे. परंतु त्याच्या डिटेलमध्ये मी जात नाही.

सन्माननीय सदस्य श्री. धोंडीराम राठोड यांनी अतिशय चांगल्या पध्दतीने या ठिकाणी विषय मांडत असताना याबाबतीत कोणकोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत हे सांगितले. ही गोष्ट खरी आहे की, भूगर्भातील पाण्याचा सतत उपसा होत राहिला आणि भूगर्भामध्ये पाण्याचे पुनर्भरण झाले नाही तर भूगर्भामध्ये इम्बॅलन्स निर्माण होतो आणि त्यामुळे ओव्हर एक्स्प्लॉयटेड वॉटरशेडस निर्माण होतात. भूगर्भातील पाण्याची पातळी समतोल न राखल्यामुळे महाराष्ट्रामध्ये ठिकठिकाणी ओव्हर एक्स्प्लॉयटेड वॉटरशेड निर्माण झालेल्या आहेत. तेव्हा भूगर्भामध्ये पाण्याचे पुनर्भरण चांगल्या प्रकारे व्हावे यासाठी महाराष्ट्र शासनाने येणा-या काळामध्ये विविध उपायायेजना केलेल्या आहेत. आपण रोजगार हमी योजनेअंतर्गत जी कामे घेतो त्यातील 80 टक्के कामे ही जलसंधारणाची असावीत अशा प्रकारचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. यामुळे जिल्हा, तालुके, गावे, खेडी या ठिकाणी भूगर्भामध्ये पाण्याचे पुनर्भरण होईल. पाणलोट क्षेत्रामध्ये देखील महाराष्ट्र शासनाने विविध उपाययोजना राबविलेल्या आहेत. हरियाली योजना, शिवकालीन पाणी साठवण योजना, महात्मा फुले जल संधारण अभियान या सारख्या योजना शासनाने हाती घेतलेल्या आहेत. भूगर्भातील पाण्याचा जेवढा उपसा केला जातो त्याच्या काही प्रमाणात तरी भूगर्भामध्ये पाण्याचे पुनर्भरण व्हावे यासाठी या योजना राबविण्यात येत आहेत. ह्या सर्व उपाययोजना आपण करीत असताना एक अत्यंत महत्वाची गोष्ट आपण केली पाहिजे आणि ती म्हणजे सेल्फ रेग्युलेशन,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. सुनील देशमुख....)

स्व-नियमन ही होय. सर्वच गोष्टी ह्या कायद्याने करता येत नाहीत. खरे म्हणजे पाण्याच्या संदर्भात अत्यंत कठोर अशा कायद्याची अंमलबजावणी करण्याची गरज आहे. परंतु त्याबाबतीत लोकांचाच विरोध असल्याने हे कायदे आपल्याला कठोरपणे अंमलात आणता येत नाहीत. म्हणून पाण्याच्या वापराच्या बाबतीत आपण स्व-नियमन करुन भूगर्भातील पाण्याच्या उपश्यावर नियंत्रण ठेवले तर भूगर्भातील पाण्याची पातळी समतोल राखण्यासाठी मदत होईल. आपणास हे माहीतच आहे की, आपण जी धरणे बांधतो त्या धरणातील पाण्याचा अमर्यादपणे वापर आपणाकडून केला जातो. काही ठिकाणी तर कालवे तोडून शेतात पाणी घेतले जाते. असे प्रकार होऊ नयेत धरणातील पाणी वापरावर नियंत्रण असावे यासाठी आपण पाणी वाटप संस्था तयार केल्या. आता जेवढे जुने प्रकल्प झालेले आहेत आणि जे नवीन प्रकल्प होत आहेत त्या प्रकल्पांवर पाणी वाटप संस्था निर्माण करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. जे प्रकल्प सुस्थितीत नाहीत, त्यांना सुस्थितीत आणण्यासाठी जागतिक बँकेकडून 1600 कोटी रु. उपलब्ध झालेले आहेत. या निधीमधून जुने प्रकल्प सुस्थितीत आणण्याचे प्रयत्न आम्ही करणार आहोत. आता असाही निर्णय शासनाने घेतलेला आहे की, ज्या प्रकल्पावर शंभर टक्के पाणी वाटप संस्था निर्माण होतील असेच प्रकल्प हाती घेण्यात येतील. पाणी वाटप संस्था निर्माण झाल्या की, जे जे शेतकरी त्या धरणाचे पाणी वापरतात त्या शेतक-यांना त्या संदर्भातील सर्व जबाबदारी पार पाडावी लागते.

...कु. खर्चे...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख......

तसेच,आपण सेल्फ रेग्युलेशन व सामुहिक नियमन,भूजल अधिनियमन या सर्वांच्या माध्यमातून नियंत्रण केलेले आहे. सिंचन पध्दतीत बदल करण्याची आवश्यकता आपणच प्रतिपादिली आहे. ड्रीप इरिगेशन पध्दतीने म्हणजेच ठिबक सिंचन पध्दतीने जर पाणी वापरले तर पाण्याचा अपव्यय होणार नाही म्हणजे पाणी वेस्ट जाणार नाही. या सगळया गोष्टी करण्याची आवश्यकता आहे तसेच, पीक पध्दतीत देखील आपण बदल केला पाहिजे. ज्यावेळी एखादा नवीन प्रकल्प तयार केला जातो, त्यावेळी त्या भागामध्ये कोणती पीक पध्दती अवलंबविण्यात यावी, याचा एक आराखडा तयार करण्यात यावा. पीक पध्दतीप्रमाणे आपण पाण्याचे वाटप करतो किंवा ज्या ठिकाणी जी सिंचन क्षमता आहे त्याप्रमाणे आपण पीक पध्दती ठरवितो पण होते काय की, एक वेळा प्रकल्प सुरु झाला आणि प्रकल्प सुरु झाल्यानंतर ती पीक पध्दती शेतकरीच मोडीत काढतात आणि जेथे ज्वारी,बाजरी असे पीक घ्यावयाचे असते, तेथे ऊसाचे पीक घेतल्यामुळे जास्त पाणी त्या पिकाला लागते आणि साहजिकच आपण प्रकल्पाच्या दृष्टीकोनातून जो आराखडा तयार करतो त्या आराखडयाप्रमाणे पीक न घेतल्यामुळे कमी सिंचन क्षमता निर्माण होते आणि मग त्या ठिकाणी पाण्याची पातळी खोल जाते या सगळया गोष्टींचा आपण जर विचार केला तर त्यासाठी पीक पध्तीमध्ये बदल करणे आणि ठिबक सिंचन पध्दतीला प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक आहे. जादा पाणी लागणारे पीक कमी करुन कमी पाणी लागणारे पीक घेणे. पीक घेतांना केळी,संत्री,द्राक्षे,ऊस ही पीक पध्दती न राबविता बाजरी,ज्वारी या पध्दतीची पिके घेणे आवश्यक आहे.

सन्माननीय सदस्य श्री.धोंडीराम राठोड यांनी पाणी परिवहन योजनेबद्दल उल्लेख केलेला आहे. मी या सिंचनाकडे राष्ट्रीय पातळीवर देशातील आंतरराज्य व राज्यांतर्गत नदीजोड यांचा अभ्यास व सर्व्हेक्षण राष्ट्रीय जलविकास अभिकरण,नवी दिल्ली यांचेकडील मुख्य अभियंता राष्ट्रीय जलविकास अभिकरण, हैद्राबाद यांचेकडून करण्यात येत आहे.

राज्याच्या हिताचे असणारे सहा नदीजोड प्रस्ताव माननीय मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांच्या स्तरावरुन केंद्रशासनास राष्ट्रीय नदीजोड योजनेमध्ये समाविष्ट करण्यासाठी पाठविण्यात आले आहेत,त्याची माहिती पुढीलप्रमाणे आहे. 1) उर्ध्व कृष्णा -कृष्णेचे उपखोरे भीमेचे उपखोरे अ) कुंभ - कासारी ब) कासारी - कडवी / वारणा क ) वारणा - कृष्णा ड ) कृष्णा - नीरा ई )नीरा - भीमा फ ) पंचगंगा - कृष्णा 2) नर्मदा - तापी जोड योजना. 3)गोदावरी खो-यातील वर्धा उप खोरे

Y - 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख......

प्राणहिता ( वैनगंगा - वर्धा जोड ) 4)कोयना अवजल पाणी मुंबई शहर पाणी पुरवठयासाठी वळविणे 5)खारीया फुटी जवाया जोड योजना 6) इंचमपल्ली नागार्जून सागर जोड योजनेतून जलाशयात येणा-या जादा पाण्यातील काही पाणी, पोचमपाड धरणात शिल्लक राहणारे पाणी उपसाद्वारे गोदावरीद्वारे मांजरा व पूर्णा उपखो-यात सोडणे.

वरील शासन स्तरावरुन सादर झालेल्या प्रस्तावांखेरीज महाराष्ट्र पाणी परिषदेने पुढील नदीजोड प्रस्तावित केले,त्यांचा व्यवहार्यता अभ्यास राष्ट्रीय जल विकास अभिकरण यांनी केला आहे.

1) 10 अब्ज घनफुट पाणी घाट माथ्यावरुन गोदावरील खो-यात वळविणे.
2) 5 अब्ज घनफुट पाणी उर्ध्व वैतरणा गोदावरी खो-यात वळविणे.
3) 100 अब्ज घनफुट पाणी उत्तर कोकणातून गोदावरी खो-यात 400 मीटर उपसा करुन वळविणे.
4) 40 अब्ज घन फुट पाणी वैनगंगा खो-यातून पश्चिम विदर्भ गोदावरी खो-यात 150 मीटर उपसाद्वारे वळविणे.
5) 40 अब्ज घन फुट पाणी वैनगंगा खो-यातून मांजरा खो-यात 300 मीटर उपसाद्वारे वळविणे.
6) 15 अब्ज घन फुट पाणी मध्य कोकणातून भीमा खो-यात वळविणे.
7) 25 अब्ज घन फुट पाणी कोयनेतून निरा नदीत बोगद्याने वळविणे.
8) 25 अब्ज घन फुट पाणी मुळशी खो-यातून भीमा नदीत वळविणे.
9) 40 अब्ज घनफुट पाणी सावित्री नदीतून भीमा नदीत वळविणे.
10) 25 अब्ज घनफुट पाणी कोल्हापूर क्षेत्रातून सांगली / सांगोला क्षेत्राकडे वळविणे.

यानंतर श्री.कानडे......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ SBT/ 11:50

डॉ.सुनिल देशमुख ....

एकूण 10 प्रस्ताव आहेत. उपरोक्त 10 प्रस्तावांपैकी 1,3,4,7 आणि 10 हे प्रस्ताव राज्याने सादर केलेल्याप्रस्तावात विचाराधीन असून अन्य पाच प्रस्ताव तपासणीखाली असल्याचे राष्ट्रीय जलविकास अभिकरण यांनी पत्रान्वये कळविले आहे. राज्य शासनाने राष्ट्रीय जलविकास अभिकरण यांना दिनांक 28.6.07 च्या पत्रान्वये विदर्भातील नदीजोड प्रस्ताव आणि कृष्णा भीमा स्थिरीकरण या प्रकल्पांचा सर्वेक्षणाचा प्राधान्यक्रम कळविला आहे. 1246 प्रकल्प जे अपूर्ण अवस्थेत आहेत ते पूर्ण करण्यासाठी जवळजवळ 41 हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे . मागील भाषणात मी सांगितले होते की 16 हजार कोटींचा प्रस्ताव केंद्र सरकारने मंजूर केला होता त्याला राज्यपालांनी नुकतीच मान्यता दिलेली आहे आणि येत्या तीन वर्षात जे प्रकल्प अंतिम टप्प्यात आहेत ते पूर्ण करण्यासाठी या निधीचा वापर केला जाईल. अवर्षण प्रवण तालुक्यांच्या यादीचा पुन्हा अभ्यास करावा असे सुचविण्यात आले. यासंदर्भातील अहवाल देण्यासाठी माजी मुख्य सचिव श्री. रंगनाथन साहेब यांची समिती नेमलेली आहे. पहिल्या प्रथम अवर्षण प्रवण तालुक्यांची संख्या 148 होती त्यानंतर ही संख्या 156 असावी अशी मागणी सर्व विभागातील आमदार आणि लोकप्रतिनिधींकडून सतत होत असल्यामुळे 148 तालुक्यांमध्ये भर घालून 156 तालुक्यांचा अभ्यास करण्यासाठी रंगनाथन समितीची स्थापना केलेली आहे. अवर्षण प्रवण क्षेत्राबाबत रंगनाथन समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याअनुषंगाने दोन्ही सदनामध्ये सरकारने वेळोवेळी याबाबत जी घोषणा केलेली आहे त्याअनुषंगाने दुष्काळी महामंडळ स्थापन करण्यासाठी कारवाई सुरु करणार आहोत. रंगनाथन समितीचा अहवाल 2/3 महिन्यात प्राप्त होईल अशी शासनाची अपेक्षा आहे. मानव विकास निर्देशांकांच्या बाबतीत मागील दोन अर्थसंकल्पात उल्लेख करण्यात आला होता. याबाबतीत शासनाने गंभीर दखल घेऊन पहिल्यांदाच त्याचा अंतर्भाव करण्यात आला. एवढेच नाही तर त्यासाठी आवश्यक ती तरतूद सुध्दा अर्थसंकल्पात केलेली आहे. या जिल्हयातील हयूमन डेव्हलपमेंट इंडेक्स वाढावा म्हणून शासनाने अत्यंत कठोर परिश्रम घेण्यास सुरुवात केलेली आहे. नंदुरबार हा शेवटचा जिल्हा म्हणून या योजनेमध्ये त्याचा समावेश करण्यात आला असून अर्थसंकल्पात तरतूद केलेली आहे. माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी यांनी बॅरेजच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला. खानदेश पॅकेजमध्ये 385 कोटी रुपयांची जी तरतूद केली आहे त्यातून प्रलंबित बॅरेज पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच तारी खोऱ्यातील लिफ्ट एरिगेशनचा मुद्दा

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनिल देशमुख ....

देखील त्यांनी मांडला. यासंदर्भातील संपूर्ण राज्यासाठीचे धोरण ठरवावे लागेल. एका खोऱ्याबाबत धोरण राबविल्यानंतर बाकी खोऱ्यातील लिफ्ट एरिगेशनसाठी तेच धोरण राबवावे लागेल. तसेच असे धोरण राबविताना शासनावर किती आर्थिक बोजा पडेल याचादेखील विचार करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने शासन ही बाब तपासून पाहून योग्य तो निर्णय घेईल.

माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी ग्लोबल वॉर्मिंगसंबंधी विषय उपस्थित केला.

नंतर श्री. जुन्नरे

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख ...

सभापती महोदय, मला असे वाटते की, ग्लोबल वॉर्मिंगच्या संदर्भात अमेरिकेने आपल्याला ज्ञान पाजावे हे काही योग्य नाही. खरे म्हणजे ग्लोबल वॉर्निंगचा धोका विकसित देशानेच तयार केलेला आहे. या विकसित देशांनीच खरे म्हणजे ओझोन लेअर खराब केलेला आहे. आपण आता कोठे विकसनशील होत आहोत थोडक्यात सांगावयाचे झाले तर " सौ चूहे खा के बिल्ली हज को चली" असे म्हणावे लागेल. आता रेफ्रिजरेटरमध्ये कोणता गॅस भरावा हे आता अमेरिका आपल्याला सांगत आहे. जेव्हा त्यांनी विकास केला त्यावेळेस त्यांनी यासंदर्भात काहीच विचार केला नव्हता परंतु आता ते आपल्याला डोस पाजत आहेत.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मी एवढाच संदर्भ दिला होता की, ग्लोबल वॉर्मिंगमुळे वातावरणात मोठया प्रमाणात बदल होत आहेत. ग्लोबल वॉर्मिंगचा दुष्परिणाम पाण्यावर सुध्दा होतो आहे. पाणी कसे वाया जात आहे यासंदर्भात मी सन्माननीय सदस्य श्री. राठोड साहेबांच्या प्रस्तावाला रेफरन्स दिला होता. जसे ग्लोबल वॉर्निंग आहे तसेच वॉटर वॉर्मिंग सुध्दा आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, ग्लोबल वॉर्मिंगच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, अमरावती जिल्हयात सरासरी 600 ते 800 मि.मी. पाऊस पडत असतो परंतु मधील काळात अमरावती जिल्हयात दोनच दिवसात 400 मि.मी. पाऊस पडला. वर्षभरात जेवढा पाऊस पडावयास पाहिजे होता तेवढा पाऊस दोन दिवसात पडल्यामुळे अमरावती जिल्हयातील 400 लोक पुरात वाहून गेले होते. परंतु अमरावती जिल्याच्या जवळ असलेल्या बुलढाणा, अकोला या जिल्हयात एक थेंब सुध्दा पाऊस पडलेला नाही ही वस्तुस्थिती आहे. हा जो काही प्रकार आता होत आहे तो ग्लोबल वॉर्मिंगमुळेच होत आहे याबाबत कोणाचेही दुमत नाही.

सभापती महोदय, सिंचनासाठी आता 16 हजार कोटी रुपये मिळणार आहेत त्यामध्ये कोकणाचा सुध्दा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. कोकणामध्ये अगोदर जी काही सिंचन क्षमता तयार करण्यात आली होती त्या सिंचन क्षमतेचा अगोदर उपयोग केला जात नव्हता परंतु आता कोकणामध्ये सिंचनाचे प्रमाण वाढलेले आहे, पाण्याचा वापर वाढलेला आहे. मागील काही काळात कोकणातील सिंचनासाठी अधिक तरतूद करता आली नव्हती परंतु आता कोकणातील जे अर्धवट



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख.......

प्रकल्प आहेत, जे प्रकल्प रेंगाळत पडले होते, 50 टक्क्यापेक्षा ज्या प्रकल्पांचे काम जास्त झालेले आहे असे कोकणातील प्रकल्प या 16 हजार कोटी रुपयातून पूर्ण केले जाणार आहेत.

सभापती महोदय, सिंचनाच्या संदर्भात कोकणाचे निकष बदलावे अशी सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी जी मागणी केलेली आहे ती अत्यंत योग्य आहे परंतु यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, विदर्भामध्ये कोल्हापूरी बंधारे बांधले आहेत परंतु त्यातील एक सुध्दा बंधारा सद्या सुस्थितीत नाहीत अशी परिस्थिती आहे. विदर्भामध्ये काळी माती असल्यामुळे कोल्हापूरी बंधारे व्यवस्थित राहत नाहीत हे त्याचे मुख्य कारण आहे. कोकणामध्ये जो पॅटर्न चालतो तो पॅटर्न सगळीकडेच चालेल असे काही नाही किंवा विदर्भामध्ये जो पॅटर्न चालतो तो पॅटर्न सगळयाच भागात चालेल असे काही नाही. कारण प्रत्येक भागाचा भुपृष्ठ वेगवेगळा आहे. त्यामुळे आता खारपानपट्टयासाठी आम्ही नवीन नॉर्म्स तयार करीत आहोत. बुलढाणा, अमरावती अकोला या ठिकाणी कोल्हापूरी बंधारे बांधले तर ते यशस्वी होत नाहीत. तसेच निकष खारपानपट्टयासाठी राहणार आहेत. यासंदर्भात आपल्या सभागृहातील आणि विधानसभेच्या लोकप्रतिनिधींनी आग्रह धरलेला आहे त्याप्रमाणे आपल्याला काम करावे लागणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी कोकणातील निकष बदलण्याच्या संदर्भात जी सूचना केलेली आहे ती तपासून घेण्यात येईल व त्यासंदर्भात योग्य तो निर्णय घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी कोकणामध्ये पाईपलाईनने पाणी देण्याच्या संदर्भात मागणी केलेली आहे परंतु आपल्याला माहिती आहे की, कोकण हा डोंगराळ भाग असल्यामुळे त्या ठिकाणची जमीन वर-खाली असल्यामुळे आपण त्या ठिकाणी पाईपलाईनने पाणी देऊ शकत नाही.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, हा प्रयोग करण्यात आलेला आहे. पाणी गुरुत्वाकर्षणाने खाली आणले जात आहे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, पेंडसे समितीमध्ये ही बाब तपासून घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जे मुद्दे मांडले त्याबाबत मी थोडासा संभ्रमात आहे. एकीकडे ते कृष्णा-खोरे प्रकल्पाची कामे पूर्ण होत नाहीत म्हणून सरकारला झोडपत आहेत तर दुसरीकडे कृष्णा-खोरे प्रकल्पासाठी जादा निधी देण्यात येतो म्हणून झोडपत आहेत. त्यांनी दोन्ही पध्दतीने मते व्यक्त केलेली आहेत. ते याठिकाणी उपस्थित नाहीत.

सभापती महोदय, सन 2001 पासून माननीय राज्यपालांच्या निर्देशाचे पालन हे सरकार करीत आहे. आपला अर्थसंकल्पाचा मसुदा असून त्याप्रमाणे पाटबंधारे विभागासाठी चार-साडेचार हजार कोटी रुपये मिळतात. या मिळालेल्या पैशातून माननीय राज्यपालांच्या निर्देशाप्रमाणे त्या त्या विभागांना निधीचे वाटप करण्यात येते. मधल्या काळात कृष्णा-खोरे प्रकल्पासाठी कमी निधी प्राप्त झाला त्यामुळे कृष्णा-खोरे प्रकल्पाची कामे पूर्ण झाली नाहीत. आता आम्ही 16 हजार कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार केलेला आहे. त्यामध्ये कृष्णा-खोरे प्रकल्पातील कामांचा समावेश केलेला आहे त्यामुळे ही कामे लवकर पूर्ण होतील.

सभापती महोदय, लोअर मानार प्रकल्पाची उंची एक मीटरने वाढविण्याचे काम पूर्ण झालेले आहे. मागील दोन वर्षापासून त्याठिकाणी 28 द.ल.घ.मी. पाण्याचा साठा झालेला आहे. त्याठिकाणी एक मीटर उंचीचे गोडबोले पध्दतीचे गेट बसविले आहेत.

सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी महमदवाडी मध्यम प्रकल्पावर सिंचनासाठी कालव्याऐवजी कोल्हापूर बंधारे बांधण्याबाबत प्रस्तावित केलेले आहे. तसेच निकष बदलण्याबाबत सूचना केली आहे. याबाबत सांगू इच्छितो की, याबाबत योग्य पध्दतीने विचार करण्यात येऊन कार्यवाही करण्यात येईल.

सन्माननीय सदस्य श्री. सुरेशदादा देशमुखांनी लोअर दुधना प्रकल्पाचा उल्लेख केला. लोअर दुधना प्रकल्प एआयबीपीमध्ये मंजूर झालेला आहे. या प्रकल्पास केंद्र सरकारकडून साह्य मिळणार आहे. त्यामुळे निधीची कमतरता पडणार नाही. येणाऱ्या काळात हा प्रकल्प लवकर पूर्ण होईल याबद्दल माझ्या मनात संशय नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख...........

माननीय उपसभापती यांनी चासकमानचा उल्लेख केला. 0.72 कि.मी. अस्तरीकरणाचे काम चालू होते. त्यासाठी 40 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. माननीय मुख्यमंत्री व अर्थमंत्री यांच्या निदेशाप्रमाणे अस्तरीकरणाची कामे प्रलंबित राहू नयेत अशाप्रकारच्या सूचना विभागाच्या सचिवांना देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळात ही कामे पूर्ण होतील याबद्दल माझ्या मनात संभ्रम नाही.

सन्माननीय सदस्य श्री.धोंडीराम राठोड यांनी अत्यंत महत्वाचा विषय याठिकाणी उपस्थित केलेला आहे. पाण्याच्या प्रश्नाबाबत सरकारची कोणती भूमिका आहे, नदीजोड प्रकल्पाबाबत सरकारची कोणती भूमिका आहे, भूगर्भातील पाण्याची पातळी समतोल राखण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे इत्यादी महत्वाचे मुद्दे अनेक सन्माननीय सदस्यांनी मांडले. मी माझ्यापरीने या विषयाला न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. या चर्चेत ज्या सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला त्यांचे मी मनापासून आभार मानतो आणि माझे उत्तराचे भाषण पूर्ण करतो.

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी विस्तृत असे उत्तर दिलेले आहे. त्यांनी उत्तराच्या भाषणात जी आश्वासने दिलेली आहेत, ती पूर्ण करावीत अशी अपेक्षा आहे. मानव विकास निर्देशांक वाढविण्यासाठी नवीन सिंचन प्रकल्प त्या-त्या भागामध्ये घेणार आहात काय ? असा मी उल्लेख केला होता. अनेक प्रकल्पांचे सर्वेक्षण झालेले आहे परंतु ते प्रकल्प निकषात बसत नसल्यामुळे सुरु करता आलेले नाहीत. तेव्हा निकष बदलून आणि अधिकचे नवीन प्रकल्प सुरु करण्याबाबत शासन विचार करणार आहे काय ?

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, याबाबतीत प्रकल्पवाईज तपासणी करुन निर्णय घेण्यात येईल.

**तालिका सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे. आता सभागृहाची विशेष बैठक स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.30 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.05 ते 12.30 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

-----------

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी : माननीय सभापती)**

**नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावासंबंधी**

**सभापती** : महाराष्ट्र विधानपरिषद नियम 289 अन्वये एक सूचना माझ्याकडे आली आहे. सन्माननीय सदस्य, सर्वश्री श्री.दिवाकर रावते, अरविंद सावंत, डॉ.दीपक सावंत यांनी "रायगड जिल्हयात रिलायन्सच्या सेझ प्रकल्पाला तेथील शेतक-यांचा विरोध असणे याकरिता दिनांक 27 जुलै, 2007 रोजी नवी मुंबईतील कोकण भवनावर मोर्चा काढणे, शासनाने शेतक-यांच्या जमिनी बळजबरीने ताब्यात घेणे, राज्य शासनाने महसूल कोडच्या कलम 6 (1) च्या शेतक-यांना नोटीसा पाठविणे, याबाबत सेझ कृती समितीने संघर्ष करण्याचा दिलेला इशारा" यासंबंधी विधानपरिषद नियम 289 अन्वये सूचना दिली आहे. सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी थोडया वेळात आपले म्हणणे मांडावे.

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय, खास करुन मुंबईच्या बाजूला असलेल्या विभागाचा अत्यंत महत्वाचा असा हा विषय आहे. महाराष्ट्राचे भीष्माचार्य, अत्यंत बलदंड असे नेते, प्रा.एन.डी.पाटील यांच्या नेतृत्वाखाली तेथे आंदोलन सुरु आहे. पावसाळी अधिवेशन सुरु असतांना कोकण भवनावर मोर्चा नेऊन, होऊ घातलेल्या सेझ विरोधात, 42 गावातील सर्व शेतक-यांनी, आपल्या घराला टाळे-कुलुपे लावून 'सेझ' रद्द करावा, अशी मागणी केली. त्यानंतर लोकांमध्ये संताप उसळला, अनेक गाडयांची तोडफोड झाली व लोकांचा राग अनावर झाला. संघर्ष आणखी तीव्र होईल, सिंधुदुर्गपेक्षाही परिस्थिती जास्त भडकेल म्हणून आम्ही विधानपरिषद नियम 289 अन्वये सूचना दिली आहे. मुंबईच्या जवळ असलेला ग्रीन 1 व ग्रीन 2 असा एकमेव पट्टा शिल्लक राहिलेला आहे. अशाप्रकारचा विकास झाला तर मुंबईवर कोणते परिणाम होतील, याचे अद्याप सर्वेक्षण झालेले नाही.

यानंतर श्री.बोरले........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .........

सभापती महोदय, डेव्हलपमेंट कन्ट्रोल रेग्युलेशन फॉर मुंबई मेट्रोपोलिटन हा सन 1999 चा कायदा आहे. त्या कायद्यामध्ये असे स्पष्ट म्हटलेले आहे की, No industrialist shall be permitted except in the industrial zone, अशी या कायद्यामध्ये तरतूद असतांना आणि हा कायदा पुढील 10 वर्षे कोणतीही ॲथॉरिटी बदलू शकत नसतांना कोणाचा तरी व्हेस्टेड इंटरेस्ट असल्यामुळे हे घडते आहे आणि सर्व बेकायदेशीर सुरु झालेले आहे. ज्यावेळी एम.आय.डी.सी.च्या अधिका-यांना विचारले त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, तेथे काय होणार आहे आणि काय सुरु आहे याबाबत आम्हाला काही कल्पना नाही. ज्यावेळी एम.एम.आर.डी.ए.च्या अधिका-यांना विचारले त्यावेळी त्यांनी सांगितले की, आम्हाला सुध्दा याबाबत काही कल्पना नाही. माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनामध्ये बैठक झाली. त्या बैठकीमध्ये डेमॉस्ट्रेशन दाखविण्यात आले. तेथल्या तेथे मुख्यमंत्र्यांनी जाहीर करुन टाकले की, मी हे करतो आणि त्याप्रमाणे नोटिफिकेशन निघाले. दुर्दैवाने आता शासन दलालीचे काम करणार आहे. हे अधिकृत, कागदोपत्री आहे. किती दलाली मिळणार आहे, किती टक्के मिळणार आहेत, 7 टक्के कसे मिळणार आहेत आणि कोणाला कसे देणार, हे सर्व कागदोपत्री आहे. अत्यंत गंभीर परिस्थिती आहे. बागायती, जिरायती जमिनीचा सर्व्हे झालेला नाही. शासनाच्यावतीने सांगण्यात येते की, बागायती जमीन घेतली जाणार नाही. परंतु आता सरसकट सर्वांना 6(1) ची नोटीस देण्याचे काम सुरु झालेले आहे. लोकांमध्ये अत्यंत तीव्र असा संताप आहे. मुंबईच्या बाजूला आगडोंब ऊसळेल आणि सिंधुदुर्ग पेक्षाही गंभीर परिस्थिती निर्माण होईल. प्रा.एन.डी.पाटील त्या मोर्चाचे नेतृत्व करीत आहेत. म्हणजे मी सभागृहाला अजून काही सांगावे अशातला भाग नाही. म्हणून बेकायदेशीररित्या, कायद्याच्या बाहेर जाऊन, कोणताही अधिकार नसतांना शासन जर अशा प्रकारे त्या शेतक-यांना उद्ध्वस्त करण्याचे काम करणार असेल तर त्या संतापाचा या सभागृहामध्ये परामर्श घेतला गेला पाहिजे. याबाबत सभागृहामध्ये चर्चा होऊन शासनाने त्यासंदर्भातील निर्णय कोणत्या परिस्थितीत घेतला, का घेतला ? आणि तो निर्णय बेकायदेशीर असेल तर तो तात्काळ रद्द झाला पाहिजे. अधिवेशन सुरु असतांना त्या गावक-यांना कोणत्याही परिस्थितीत दिलासा मिळाला पाहिजे. सभापती महोदय, हा विषय मी सभागृहासमोर मांडलेला आहे. प्रश्नोत्तराच्या तासाचा वेळ आपण देता, त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो.

..2...

GRB/ MAP/ SBT/     प्रथम श्री.रोझेकर .......     12:35

श्री.दिवाकर रावते ........

माझी आपल्याला विनंती आहे की, या विषयावरील चर्चा आज सभागृहामध्ये होणे अत्यंत आवश्यक आहे. तेथील शेतक-यांना शासनाकडून अपेक्षित उत्तर मिळणे फार गरजेचे आहे, तेव्हा आपण ही चर्चा मान्य करावी, अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, दिनांक 27 जुलै रोजी मी पुण्याला निघालो होतो. पुण्याला जात असतांना त्या रस्त्याने एस.ई.झेड.च्या विरोधातील मोर्चेकरी मोठया प्रमाणात येत होते. पामबीचच्या रस्त्यावरुन जेव्हा आम्ही आतल्या बाजूला वळलो तेव्हा पोलिसांनी माझी गाडी अडविली आणि सांगितले की, येथे मोर्चा येणार आहे. कोणाचा मोर्चा आहे ? कशासाठी आहे ? याची मला काही कल्पना नव्हती. पण मोर्चा येतो म्हणून मी रस्ता बदलला. पुन्हा पुढच्या रस्त्यावर आल्यानंतर बघितले की, प्रचंड ट्रॅफिक जाम झाले होते आणि छोटासा अपघात सुध्दा झालेला होता. दरम्यानच्या काळात सर्व मोर्चेकरी रस्त्यावर उतरायला लागले. मोर्चेकरी संतप्त झालेले होते, गाडयांची मोडतोड झालेली होती. त्यावेळी मी स्वत: माननीय उपमुख्यमंत्र्यांचा मोबाईल लावण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांचा फोन लागत नव्हता. त्यानंतर मी वर्षा बंगल्यावर फोन केला, तेथे सुध्दा फोन लागला नाही. त्यानंतर मला खालच्या सभागृहाचे सदस्य श्री.विवेक पाटील भेटले, त्यांच्याकडून मला माहिती मिळाली. मी मोर्चातील कार्यकर्त्यांशी बोललो. त्या मोर्चातील लोकांच्या भावना संतप्त होत्या. त्यांचे असे म्हणणे होते की, सरकार आमचे जीवन उद्ध्वस्त करावयास निघाले आहे. म्हणून आम्ही हा मोर्चा काढलेला आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय सभागृहामध्ये आश्वासन देतात, सक्तीने जमीन संपादित करणार नाही, असे सांगतात. परंतु तेथे मात्र प्रत्यक्ष 6(1) च्या नोटीसमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये प्रचंड भिती निर्माण झालेली आहे. सभापती महोदय, मी आपल्याला विनंती करतो की, या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रश्नोत्तराचा तास बाजूला ठेऊन या विषयावर चर्चा करावी. आंदोलन टोकाला गेले तर अधिवेशनानंतर काय होईल, हे सांगता येणार नाही. त्या ठिकाणी परवा अशा घोषणा देण्यात आल्या की, तेथील कोकण भवन सुध्दा आम्ही तोडून टाकू. शासनाने यासंदर्भात आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी माझी विनंती आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे तो प्रस्ताव मान्य करुन त्यावर चर्चा घडवून आणावी, अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री.गागरे .......

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, 289 अन्वये सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. रिलायन्सच्या बाबतीत काल देखील मी 93 ची एक सूचना सभागृहात मांडली होती. परंतु दुर्दैवाने ती दालनात फेटाळली गेली. रायगड परीसरातमध्ये रिलायन्स कंपनी शेतकऱ्यांवर अत्याचार करीत आहे. माझे या बाबतीत म्हणणे आहे की, शेतकऱ्यांना भूमिहीन करण्याचे धोरण राज्य सरकारने अवलंबिले आहे आणि केंद्र सरकारचे वेगळे धोरण आहे. शेतकरी आपले बलिदान देण्यासाठी तयार आहेत. परंतु सरकार शेतकऱ्यांच्या जीवावर उठलेले आहेत. सरकारतर्फे याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. या विषयावर ताबडतोब चर्चा करावी. चर्चा करणे शक्य आहे की नाही हे ठरविण्याचा माननीय सभापतींना अधिकार आहे. म्हणून या विषयाचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा व चर्चेस परवानगी द्यावी अशी मी नम्र विनंती करतो.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, पावसाळी अधिवेशन सुरु होण्याच्या पहिल्या दिवशी 289 अन्वये मी सभागृहात एस.ई.झेड. बाबत चर्चा उपस्थित करण्याची विनंती केली होती. विविध प्रकल्पासाठी रायगड जिल्हयामध्ये जमीन संपादन करण्याचे काम शासनाच्या वतीने चालू आहे. या चर्चेस परवानगी देण्याचे आपण कबूल केले होते. सिंचनाखाली जी जमीन आहे, ती वगळावी म्हणून शेतकरी उपोषणासाठी बसले होते म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात आश्वासन दिले. परंतु जमीन संपादनाची कार्यवाही थांबविण्याबाबत शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना अद्यापपर्यंत कळविलेले नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी अद्यापही कारवाई चालू ठेवलेली आहे. प्रकल्पग्रस्तांचे नेते श्री.एन.डी.पाटील व श्री.मोहन पाटील यांनी येथे येऊन माननीय पुनवर्सन मंत्री डॉ.पतंगराव कदम यांची भेट घेतली आहे.

श्री सय्यद कमरुझ जामा :सभापति महोदय, सम्माननीय सदस्य श्री रावते जी ने यहां सदन में विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) के संबंध में चर्चा करने के लिए जो प्रस्ताव दिया है, उसके बारे में मुझे यह कहना है कि इस विषय पर चर्चा होनी चाहिए. विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ ) के संबंध में विसंगत स्टेटमेंट आ रहे हैं. इसलिए सरकार की तरफ से इस संबंध में स्पष्ट भूमिका रखी जानी चाहिए.केन्द्रीय सरकार ने विशेष आर्थिक क्षेत्र के लिए लैंड एक्वीजिशन प्रोसेस बंद रखी है. इस

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MAP/ SBT

श्री सय्यद कमरुझ जामा.....

संबंध में केन्द्रीय सरकार ने कहा है कि विशेष आर्थिक क्षेत्र के लिए लैंड एक्वीजिशन से संबंधी कार्यवाही उद्योगपति स्वयं जमीन के मालिक से चर्चा करके पूरी करें. राज्य सरकार ने भी अपनी भूमिका स्पष्ट की है लेकिन किसान उससे संतुष्ट नहीं है. इसकी वजह से नागपुर में दो महीनों से किसान आंदोलन कर रहे हैं. नागपुर में एयरपोर्ट के पास शिवणगांव में लैंड एक्वीजिशन की कार्यवाही रोकी नहीं गई है. इसलिए वहां के लोगों में असंतोष है. अत: शासन से अनुरोध है कि विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ ) के बारे में अपनी भूमिका स्पष्ट करें. यहां पर माननीय मुख्यमंत्री जी ने जो आश्वासन दिया था कि, किसानों की इच्छा के विरुध्द उनकी जमीन नहीं ली जाएगी, इस संबंध में शासकीय आदेश यहां से कलेक्टर के पास पहुंचा नहीं है. लैंड एक्वीजिशन का काम अभी भी चालू है. मानसून में लैंड एक्वीजिशन का काम रोका जाना चाहिए क्योंकि मानसून में पुनर्वास में दिक्कत आती है. इस संबंध में शासन अपनी भूमिका स्पष्ट करें, इतना ही मुझे कहना है.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी 289 अन्वये उपस्थित केलेल्या प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. सभागृहात या विषयावर अनेक वेळा चर्चा झालेली आहे. गेल्या अनेक दिवसापासून तेथे शेतकऱ्यांची प्रचंड आंदोलने चालू आहेत. मुंबईच्या पलीकडील ठाणे व रायगड जिल्हयामधील शेतकरी संभ्रमात आहे. याबाबत शासनाची भूमिका काय आहे ? शेतकऱ्यांच्या पोटावर पाय ठेऊन कोणत्याही प्रकारचा विकास साधला जाणार नाही. पर्यायी जमीन दिली जाईल अशा प्रकारची भूमिका शासनाने सांगितली होती. जे शेतकरी ऐच्छिकपणे जमीन देतील त्यांच्याकडूनच जमीन घेतली जाईल असे आश्वासन दिले होते. सध्या सुरु असलेल्या आंदोलनामध्ये शेतकरी व भूमिपूत्र संताप व्यक्त करीत आहेत. येथे प्रचंड स्फोट होण्याची शक्यता असून दुसरे नंदीग्राम होते की काय अशा प्रकारची भिती या भागात निर्माण झालेली आहे. त्यामुळे या ज्वलंत आणि स्फोटक विषयावर चर्चा व्हावी अशी मी आपणास विनंती करतो.

यानंतर श्री.सुंबरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, या सभागृहामध्ये सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी 289 अन्वये आणलेल्या प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, एसइझेड म्हणजे नेमके काय आहे हेच या राज्यातील सर्वसामान्य शेतकऱ्याला समजलेले नाही. आपल्या जमिनी कोण घेत आहे, कशासाठी घेतल्या जात आहेत, एसइझेड म्हणजे काय या साऱ्या संभ्रमावस्थेत संपूर्ण महाराष्ट्रात, केवळ रायगड जिल्ह्यातच नाही तर जेथे जेथे एसइझेड येणार आहेत तेथील शेतकरी आहे. त्यामुळे एसइझेड झाले आणि त्यात आमच्या जमिनी घेतल्या गेल्या तर आमचे काय होणार आहे ? आमच्या पोराबाळांचे काय होणार आहे ? इत्यादी प्रश्न त्याच्या मनात गर्दी करून राहिले आहेत. शेवटी माणसाचे नाते त्याच्या जमिनीशी आणि भाषेशी असते आणि त्याची तीच नाळ तुटली तर महाराष्ट्रात सांस्कृतिक ऱ्हास होणार आहे. हे एसइझेड झाल्याने आम्हाला आमचे अधिकार मिळणार आहेत की नाही ? असा प्रश्न येथील भूमिपुत्राला, निवासी जनतेला पडलेला आहे. तेव्हा याबाबत शासनाची सुस्पष्ट भूमिका समोर येणे अत्यावश्यक आहे. केंद्रातील युपीए सरकारने देखील या एसइझेडसाठी कोठलीही जमीन जोर-जबरदस्तीने घेऊ नये, घेतली जाणार नाही असे सांगितले आहे आणि तसे त्यांनी सर्व राज्य सरकारांना देखील सांगितले आहे. असे असतानाही नेमके तेच होत असेल तर नेमके सरकारचे याबाबतचे धोरण काय आहे हे महाराष्ट्रातील आम जनतेला समजावे म्हणून तरी अत्यंत निकडीने, तातडीने हा प्रश्न आपण चर्चेला घ्यावा आणि त्वरित याबाबत शासनाची भूमिका जनतेसमोर येऊ द्यावी यासाठी नियम 289 खाली मांडलेल्या या प्रस्तावाला मी पाठिंबा देतो.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपण डिसेंबर 2006 पासून एसइझेडच्या संबंधात या विधीमंडळामध्ये चर्चा करीत आहोत. शासनाने या संबंधात वेगवेगळी आश्वासने देखील दिलेली आहेत. पण दुर्दैवाने ही आश्वासने केवळ कागदावर पांढऱ्याचे काळे ठरणार किंवा काय असा प्रश्न निर्माण झालेला आहे. आज म्हणूनच ही चर्चा घडविली गेली पाहिजे. त्याचबरोबर माननीय महसूल मंत्र्यांनी या सभागृहामध्ये आश्वासन दिले आहे की, 6(1) च्या नोटीशीपर्यंतच कारवाई थांबविण्यात येईल. मात्र त्यांनी ती रद्द केलेली नाही. त्यामुळे या विषयी चर्चा होऊन शासनाची या बाबतची निश्चित भूमिका शासनाने जाहीर केली पाहिजे. या करिता सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे तो आपण स्वीकारावा आणि या अत्यंत ज्वलंत प्रश्नावर चर्चा घडवून याबाबत निर्णायक विचार शासनाकडून घ्यावा अशी मी आपल्याला विनंती करते.

....... जीजी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे आणि त्यांनी त्याबाबत आपली भूमिका येथे मांडलेली आहे. त्यांनी दिलेला प्रस्ताव एसइझेड विषयी असून रायगड जिल्ह्यात परवाच्या दिवशी एसइझेड विरोधात जो मोर्चा काढला गेला होता त्यासंबंधात आहे आणि या प्रस्तावान्वये त्यांनी आजचा प्रश्नोत्तराचा तास तहकूब करून तातडीने चर्चा घेण्याची मागणी केलेली आहे. तरी याबाबत शासनाचे काय म्हणणे आहे ते संसदीय कार्य मंत्र्यांनी सांगावे.

श्री.हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, या बाबतीत सरकारची केव्हाही चर्चेला तयारी आहे. मात्र याचा कार्यक्रम आपणच ठरवावा. यापूर्वीही आपण बऱ्याच चर्चा मान्य केलेल्या आहेत. तेव्हा चर्चेला सरकारची केव्हाही तयारी आहे हे मी सांगू इच्छितो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, श्री.अरविंद सावंत, डॉ.दीपक सावंत, तसेच दोन्ही बाजूंच्या सन्माननीय सदस्यांनी रायगड जिल्ह्यात येऊ घातलेल्या रिलायन्सच्या एसइझेडच्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या त्या विषयीच्या तीव्र भावना लक्षात घेऊन नियम 289 अन्वये प्रस्ताव देऊन आजचा प्रश्नोत्तराचा तास तहकूब करून तातडीने चर्चा घ्यावी म्हणून सांगितले आहे. आपल्या प्रचलित नियमानुसार आजच्या कार्यक्रम पत्रिकेवर हा विषय नसल्यामुळे मी आपल्याला सांगू इच्छितो की, आज हा विषय मी चर्चेला घेऊ शकणार नाही. मात्र दोन्ही बाजूंच्या सन्माननीय सदस्यांच्या या विषयीच्या तीव्र भावना विचारात घेता व हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न असल्याने शासनाने या बाबत सविस्तर निवेदन करावे अशी सूचना मी शासनाला करतो. तसेच येत्या तीन दिवसात हे अधिवेशन संपत असल्याने आपल्यासमोर असलेले एकंदरीत काम पाहून आज नाही तरी उद्या किमान एक दीड तासाची चर्चा आपल्या या विषयावर करता येईल काय हे मी पाहीन आणि त्याबाबत आपल्याला जरूर कळवीन.

श्री. दिवाकर रावते : धन्यवाद.

...... जीजी 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



KBS/KGS/SBT/MAP. श्री. गागरे नंतर --- 12:45

**<u>माननीय सदस्य श्री.उल्हास पवार आणि मा.राज्यमंत्री श्री.रणजित कांबळे</u>**

**<u>यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्ता शुभेच्छा देण्याबाबत ...</u>**

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, आज सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.उल्हास पवार यांचा वाढदिवस आहे. तरी आपण त्यांचे अभिष्टचिंतन करून शुभेच्छा द्याव्यात.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, आज माननीय राज्यमंत्री श्री.रणजित कांबळे यांचाही वाढदिवस आहे. ...

**सभापती** : मी वैयक्तिक तसेच आपणा सर्वांतर्फे माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.उल्हास पवार तसेच माननीय राज्यमंत्री श्री.रणजित कांबळे यांचे त्यांच्या वाढदिवशी अभिष्टचिंतन करून त्यांना शुभेच्छा देतो. आता यानंतर प्रश्नोत्तराचा तास घेण्यात येईल.

( यानंतर श्री. सरफरे ..... एचएच 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे**

**मुंबई, ठाणे, रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांसाठी**

**क्लोरीन गोळ्यांचे वाटप उशीरा केल्याबाबत**

**(१) * २९२८७ श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री.सय्यद जामा , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे , श्री. चंद्रकांत रघुवंशी , मेजर सुधीर सावंत :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे, रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांसाठी १.१३ कोटी रुपये खर्चून क्लोरीन गोळ्यांची खरेदी आरोग्य खात्याने केली पण प्रत्यक्षात पुरानंतर १५ ते ८८ दिवसांनी या गोळ्यांचे वाटप नागरिकांना करण्यात आले त्यामुळे पुराचे संकट असताना जनतेला पाणी स्वच्छ करण्याऱ्या साधनापासून वंचित ठेवण्यात आले असा महालेखापरिक्षकांनी दिनांक २२ एप्रिल, २००७ रोजी वा त्यासुमारास अहवालात दिले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोटी रुपयांची औषधे खरेदी करुन ती वितरीत करण्यास विलंब का करण्यात आला याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. रणजित कांबळे, डॉ.विमल मुंदडा यांच्याकरिता** : (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) महालेखापालांचा आक्षेप आरोग्य सेवा संचालनालयास प्राप्त झाला असून कार्यवाही सुरु आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मला नम्रपणे आपल्या निदर्शनास आणावयाचे आहे की, महाराष्ट्राच्या महालेखापालांनी सन 2005-06 मध्ये राज्यातील पूर परिस्थितीबाबत आपत्कालीन योजना आणि आपत्ती निवारणाबाबत विशेष स्वतंत्र असा सी.ए.जी. अहवाल दि.17 एप्रिल 2007 रोजी विधीमंडळाला सादर केला. माझ्या माहितीप्रमाणे अशाप्रकारचा अहवाल विधीमंडळाला पहिल्यांदा सादर झाला आहे. त्यामध्ये स्पेसिफिक असे आहे की, Specific Performance Audit of Flood in the State of Maharashtra and Preparedness and Response
या संदर्भात आहे. हा पूर आल्यानंतर प्युरिफिकेशनकरिता नागरिकांना क्लोरिनच्या गोळया वाटण्यात आल्या . दिनांक 17 एप्रिल 2007 रोजी अहवाल सादर झाल्यानंतर जून महिन्यापासून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

ता.प्र.क्र. 29287...

श्री. संजय दत्त...

पावसाळा सुरु झाला. मागील वर्षीप्रमाणे या वर्षी सुध्दा दिनांक 29 व 30 जून रोजी मुंबईला पावसाचा तडाखा बसला. हा विषय गंभीरपणे घेऊन शासनाने वेळीच कारवाई कां केली नाही? याबाबतीत उशीर होण्याचे कारण काय? गोळयांचे वाटप पावसाळा संपल्यानंतर करणार काय?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, महालेखापालांच्या अहवालामध्ये घेण्यात आलेल्या आक्षेपांच्या संदर्भात संचालनालय स्तरावर छाननीचे काम सुरु आहे. प्रश्न असा आहे की, 26 जुलै रोजी शहरामध्ये जी पूरपरिस्थिती निर्माण झाली त्यावेळी त्या परिस्थितीचा आपल्याला नव्याने अनुभव होता. त्यावेळी आपल्याला 55 लाख गोळयांचा 30 दिवसांच्या आत तात्काळ पुरवठा झाला. केंद्र सरकारकडून दि.31.7.2005 रोजी आपल्याला पुरवठा मिळाला होता. त्यामुळे पूर परिस्थिती असतांना गोळयांचे वाटप करण्याच्या बाबतीत आपणाकडून विलंब झालेला नाही. उपचारात्मक व प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्याकरिता पूर्व सूचना देण्यात आल्या होत्या. त्यामुळे साथीच्या रोगांवर आपण नियंत्रण ठेवू शकलो.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये कोटयावधी रुपयांची औषधे खरेदी करण्यात आल्याचे मान्य करण्यात आले आहे. परंतु ही औषधे केव्हा खरेदी करण्यात आली आणि त्यांचा किती वापर झाला या गोष्टीचे कुठेही स्पष्टीकरण करण्यात आले नाही. या बाबतीत लेखापालांनी नोंदविलेले आक्षेप आपल्याला मान्य आहेत काय? कोटयावधी रुपयांची औषधांची खरेदी अनावश्यक होती किंवा ती वेळेनंतर खरेदी करण्यात आली. याबाबतीत आपण काय उपाय योजना केली आहे?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, या गोळयांची पूर्ण खरेदी 1 कोटी 13 लाखांची आहे. सन 2005 मध्ये मुंबई, ठाणे, रायगड या भागामध्ये मोठया प्रमाणात पूर आला होता. त्यावेळी मोठया प्रमाणामध्ये साथ पसरली होती. म्हणून गोळयांची पहिली ऑर्डर दि.29.7.2005 रोजी देण्यात आली, त्यानंतर दुसरी ऑर्डर दि.18.8.2005 रोजी देण्यात आली, आणि त्यानंतर दि.7.10.2005 रोजी तिसरी ऑर्डर देण्यात आली. मुंबईमध्ये पूर आल्यानंतर रेड क्रॉस, महानगरपालिका यांनी देखील स्वत:ची यंत्रणा वापरुन मदतीचे काम केले आहे. तसेच, ठाणे, रायगड व रत्नागिरी जिल्हयामध्ये आरोग्य विभागाने मदतीचे काम केले आहे. त्याचप्रमाणे सातारा व सोलापूर जिल्हयामध्ये सुध्दा पूर आला होता.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

ता.प्र.क्र. 29287...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रश्न अतिशय स्पष्ट विचारण्यात आला आहे. शासनाने उशिरा औषधे खरेदी केल्याबद्दल महालेखापालांनी आक्षेप नोंदविला आहे. त्याबाबत शासनाचे मत काय आहे?

श्री. रणजित कांबळे : महालेखापालांनी घेतलेल्या आक्षेपाबाबत मी स्पष्टीकरण करीत आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.सरफरे.. 12:55

ता.प्र.क्र.29287......

श्री.रणजित कांबळे (पुढे सुरू...

आक्षेप घेतलेला आहे, त्याचे स्पष्टीकरण करत आहे. या प्रश्नामध्ये फक्त ठाणे आणि रत्नागिरीचा उल्लेख केलेला आहे. जी गोळ्यांची खरेदी झाली, त्यांचा वापर वर्षभरामध्ये केलेला आहे. तसेच विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये देखील पूर आलेला होता, त्यामुळे त्या ठिकाणीही वेगवेगळ्या तारखांना गोळ्यांची खरेदी केलेली होती. त्याचा वापर केला गेलेला आहे.

**सभापती** : याबाबतीत अकौंटंट जनरलनी जो आक्षेप घेतलेला होता, तो आक्षेप मान्य आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : आक्षेप मान्य नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या नियंत्रणाखाली येथील महालेखापरीक्षक काम करतात. आपल्याला त्यांनी स्पष्ट कळविले की, पुराच्यावेळी शुध्दीकरणाच्या गोळ्यांचा संग्रह उपलब्ध नव्हता. तो आपत्तीनंतर 15 ते 88 दिवसांनी मिळविला आणि नंतर त्याचा पुरवठा केला. सभापती महोदय, हा रिपोर्ट जरी एप्रिल 2007 रोजी सभागृहाला सादर झालेला असला तरी महालेखापालांचे हे पॅरेग्राफ डिपार्टमेंटकडे एक-दीड वर्षे अगोदर येतात. त्यावर काय कारवाई करायची,, कंप्लायन्स काय करायचे, हे ठरवून ते कंप्लायन्स महालेखापालांकडे द्यावे लागतात. कंप्लायन्स दिल्यानंतर त्याबाबत महालेखापालांचे समाधान झाले की नाही, हे हे पाहिले जाते, नंतर आपल्या सार्वजनिक उपक्रम समिती विषय येतो. नंतर समिती आपला अहवाल सभागृहाला सादर होतो. ब्लॅकेटस्, दोर, ब्लिचिंग पावडर, कॉलरा, टायफाईड, सर्पदंश यावरील लसी, पाणी शुध्दीकरणाच्या गोळ्या याबाबतीमधे ऑर्डर दिली जाते. अहवाल मान्य करायचा की नाही तो आपला अधिकार आहे. पण ज्याबाबतीत कोणाचे दुमत असू शकत नाही अशा शिफारशींची ताबडतोब अंमलबजावणी केली पाहिजे. उत्तर असे दिलेले आहे की, महालेखापालांचा आक्षेप आरोग्य सेवा संचालनालयाला प्राप्त झाला असून, कार्यवाही सुरू आहे. या संबंधाने काय कारवाई केली, याची माहिती येथे द्यायला पाहिजे होती. महालेखापालांच्या अहवालाचे अशा रितीने विभागाकडून पालन केले नाही हे चांगले नाही. चौथ्या उपप्रश्नाला उत्तर दिलेले आहे ते दुरुस्त करावे, असे आपल्याला वाटत नाही काय ?

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

डॉ.विमल मुंदडा : लेखापरीक्षणाचा जो अहवाल आलेला आहे, त्याबाबतची कार्यवाही करण्यासाठी आरोग्य संचालकांकडे तो पाठविलेला आहे, हे अगोदरच नमूद केलेले आहे. या संबंधाने संचालकांच्या स्तरावर जी काही कारवाई झाली, त्याची माहिती संबंधित ज्येष्ठ सदस्यांना दिली जाईल. पूर परिस्थितीच्याबाबतीत पाणी शुध्दीकरणाच्या गोळ्यांसाठी ऑर्डर दिलेली होती. त्याची माहिती दिलेली आहे. त्यानंतर रेडक्रॉससारख्या संघटना आहेत, त्यांना टॅब्लेटचा पुरवठा करून पूर परिस्थितीच्या साथीवर नियंत्रण केलेले आहे. परंतु पुरवठा आदेश 27-07-05 आणि 3-08-05 रोजी निर्गर्मित केले होते. सप्टेंबर 2005 ते ऑक्टोबर 2005 च्या कालावधीमध्ये पुरवठा असलेल्या वेळेमध्ये गोळ्यांचा पुरवठा केला गेलेला आहे. केंद्र सरकारकडून आलेल्या गोळयांमार्फत पूरपरिस्थितीत साथीच्या रोगावर नियंत्रण केलेले आहे. त्यामुळे यामध्ये कोणतीही संदिग्धता नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : शासनाने महालेखापालांना कळविले की,"सप्टेंबर 2006मध्ये अशाप्रकारया पूर परिस्थितीची आम्ही कल्पना केलेली नव्हती". येथपर्यन्त ठीक आहे. पण त्यानंतरसुध्दा कार्यवाही काय केली ? सभागृहात पहिल्या क्रमांकावर प्रश्न चर्चेला आलेला असताना त्याची माहिती दिली नाही, त्याचे कारण काय ?

**सभापती** : मंत्री महोदय, या अनुषंगाने अकौंटंट जनरल किंवा अन्य यंत्रणेने आपल्याकडे दोष रिपोर्ट पाठविला. तो दोष रिपोट आम्ही आरोग्य संचालकांकडे कार्यवाहीसाठी पाठविला आहे, असे उत्तर न देता आतापर्यन्त याबाबतीत त्यांना कोणकोणत्या सूचना दिल्या, कोणती कारवाई केली, हे उत्तरामध्ये सांगितले असते तर ते उचित झाले असते, असे सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांचे आणि सदनाचे मत आहे.

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय सप्टेंबर 2005 आणि ऑक्टोबर 2005 या कालावधीमध्ये वेळेवर गोळ्यांचा पुरवठा केला गेलेला आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 29287 ...

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या पूरग्रस्तांना किंवा रुग्णांना मदत करण्यासाठी जे व्हेंटिलेटर्स खरेदी करण्यात आले ते किती खरेदी करण्यात आले आणि त्याची किंमत किती आहे ? ज्या क्लोरीनच्या गोळ्या खरेदी करण्यात आल्या त्याची रक्कम किती आहे ? ठाणे येथील रुग्णालयामध्ये ज्या गोळ्या आणि व्हेंटिलेटर्स पाठविले त्याचा कोणत्या तारखेला पुरवठा केला ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, यासाठी सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारला तर बरे होईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, प्रश्न काय विचारलेला आहे आणि उत्तर काय दिलेले आहे हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. प्रश्न अतिशय स्पष्ट शब्दात विचारलेला आहे आणि उत्तर देत असताना प्रश्न क्रमांक 2, 3 व 4 च्या बाबतीत एका ओळीमध्ये उत्तर दिलेले आहे. महालेखापरीक्षकांचा अहवाल आल्यानंतर त्याचा अभ्यास करुन त्यात काही त्रुटी असतील तर शासनाने त्यांच्याबरोबर बसून त्यांचे समाधान करावयाचे असते. त्यांचे समाधान झाले नाही तर तो विषय लोकलेखा समितीकडे येतो अशी पध्दत आहे. असे असताना ते न करता शासनाने ज्या पध्दतीने या ठिकाणी उत्तर दिले आहे तसेच आता सदनामध्ये सन्माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, आम्हाला अहवाल मान्य नाही, आपण हे मान्य करावे किंवा करु नये हा आपला अधिकार असला तरी त्यांनी उपस्थित केलेले जे प्रश्न आहेत त्याचे समाधानकारक उत्तर देणे ही शासनाची जबाबदारी आहे. कारण ती घटनात्मक ॲथॉरिटी आहे. त्या घटनात्मक ॲथॉरिटीला आपण असे उत्तर देऊ शकत नाही. जी घटनात्मक जबाबदारी आहे ती शासनाने पार पाडली नाही तर आपल्या विधिमंडळाच्या ज्या समित्या आहेत त्यांच्यासमोर तो प्रश्न येतो आणि त्या ठिकाणी परत छाननी होते. आपणच असे म्हणत आहात की, हा जुना अहवाल आहे. आतापर्यंत त्याबाबत काय प्रगती झ
ाली, जे व्हेंटिलेटर्स आणि क्लोरीनच्या गोळ्या खरेदी केल्या त्या वेळेवर का उपलब्ध नव्हत्या ?

श्री. रणजित कांबळे : आपण महालेखापरीक्षकांचा अहवाल वाचला तर त्यामध्ये असे लिहिले आहे की, 25 ते 27 तारखेला जो पूर आला आणि आपण जी खरेदी केली त्यामध्ये क्लोरीनच्या गोळ्या 15 दिवसानंतर लोकांना मिळाल्या. मी पुन्हा सांगू इच्छितो की, 26 जुलैला

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS

ता. प्र. क्र. 29287 ...... श्री. रणजित कांबळे ....

3 तासामध्ये जवळपास 900 मिलीमीटर पाऊस मुंबई भागामध्ये पडला. त्यावेळी एवढ्या माठ्या प्रमाणात पूर येणार आहे असे कोणी अपेक्षित केले नव्हते. हे झाल्यानंतर जो काही स्टॉक आमच्याकडे उपलब्ध होता त्याचे वाटप केले. तरी आम्हाला जास्तीच्या क्लोरीनच्या गोळ्या घेण्याची गरज भासली. काही दिवसामध्ये कोयना धरण भरल्यानंतर पाणी सोडावे लागले. कोल्हापूरमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली. आपण 1 कोटी 13 लाख रुपयांची जी ऑर्डर दिली ती वर्षभराची होती. मुंबई, ठाणे, रत्नागिरी मध्ये पूर परिस्थिती होती. आमच्याकडे जो स्टॉक केंद्र शासनाने ताब्यात दिला होता तो आम्ही वापरला. त्यानंतर पाऊस सतत चालू होता त्यामुळे पुणे, कोल्हापूर, सातारा अशा अनेक ठिकाणी गरज भासली. एकूण जी खरेदी केलेली आहे ती वर्षभराची आहे.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS

## राज्यातील वीज टंचाई दूर करण्यासाठी धोपवे येथे कोळशाच्या आणि उरण येथे गॅसवरील वीज प्रकल्पाला मान्यता दिल्याबाबत

**(२) * ३१९८०  श्री. वसंतराव चव्हाण , श्री. जितेंद्र आव्हाड :** सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वीजेच्या टंचाईचा विचार करता धोपावे येथे कोळशाच्या १६०० मेगावॅटच्या आणि उरणच्या गॅसवरील १०४० मेगावॅटच्या प्रकल्पाला मान्यता दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे पाटील** : (१) होय, हे खरे आहे.

(२) धोपावे येथील प्रकल्पासाठी जागा शोधण्यात आली असून, प्रकल्पाकरिता आवश्यक असणाऱ्या विविध मान्यता व जमीन, पाणी यांची निश्चिती करण्याकरिता महानिर्मिती कंपनीची कार्यवाही सुरु केलेली आहे. महानिर्मिती कंपनीने प्रकल्प विकासकाची निवड करण्यासाठी स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया सुरु केली आहे.

उरण येथील प्रकल्पासाठी जागा व पाणी उपलब्ध आहे. प्रकल्पासाठी आवश्यक असणारे महाराष्ट्र प्रदूषण मंडळ, पर्यावरण मंडळ व विमान पत्तन प्राधिकरण यांचेही नाहरकत प्रमाणपत्र परवाने उपलब्ध झालेले आहेत. सदर प्रकल्पास आवश्यक असणारा नैसर्गिक वायूचा पुरवठा करण्याबाबत मे.रिलायन्स यांच्याशी पत्रव्यवहार सुरु आहे. तसेच याकरिता खुल्या निविदा लवकर काढण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे पॉवर फायनान्स कॉरपोरेशनकडे कर्ज देण्यासाठी विचारणा केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. वसंतराव पवार : सभापती महोदय, उत्तरामध्ये सांगितल्याप्रमाणे उरण व धोपावे येथील प्रकल्प चालू करण्याच्या संदर्भात कार्यवाही केलेली आहे पण उरण व धोपावे प्रकल्प किती दिवसात चालू होतील याची काही कालमर्यादा निश्चित केलेली आहे काय ?

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 31980....

श्री. दिलीप वळसे-पाटील : धोपावे येथील प्रकल्प हा केस-2 बिडिंग पध्दतीचा प्रकल्प आहे. केस-2 बिडिंगमध्ये केन्द्र सरकारने 4000 मेगावॅटचे अल्ट्रा मेगा प्रोजेक्ट निर्माण करण्याची भूमिका घेतलेली आहे. अशाच प्रकारे हा 1600 मेगावॅटचा प्रकल्प महाविरण कंपनीच्या माध्यमातून लॅण्ड वगैरे आयडेण्टीफाय करुन, कॉम्पिटिटिव्ह बिडिंग करुन आणि त्या बिडिंगच्या माध्यमातून, आलेल्या कंपन्यांच्या माध्यमातून या प्रकल्पाची उभारणी करायची असा हा प्रस्ताव आहे. यामधील बहुतांश तयारी पूर्ण झालेली आहे. सायनिंग ऑफ ॲग्रीमेंट 6 जुलै 2008 पर्यन्त करण्यात येईल आणि याची वीज 5 जुलै 2012 ला मिळणे अभिप्रेत आहे. उरणच्या दुस-या प्रकल्पाबाबत सांगायचे म्हणजे आता उरणला सध्या अस्तित्वात असलेल्या प्रकल्पाच्या माध्यमातून 740 मेगावॅट आणि 300 मेगावॅटचा एक्स्पान्शन प्रोजेक्टचा विचार आपण केलेला आहे. त्याचीही तयारी जवळपास पूर्ण झालेली आहे. याबाबतीत एलओआय इश्यू करण्याच्या संदर्भात जानेवारी 2008 ही तारीख ठरविण्यात आलेली आहे. या प्रकल्पाच्या ब्लॉक 1 चे 740 मेगावॅटचे सिंन्क्रोनायझेशन 2010 आणि ब्लॉक 2 चे 300 मेगावॅटचे सिंक्रोनायझेशन ऑगस्ट 2010 असे ठरविण्यात आलेले आहे. आधीचा धोपावेचा प्रकल्प आहे हा इम्पोर्टेड कोलबेस प्रोजेक्ट आहे. आणि दुसरा जो प्रोजेक्ट आहे तो गॅसबेस प्रोजेक्ट आहे. त्या प्रकल्पासाठी गॅस उपलब्ध करण्यासाठी देखील केन्द्र सरकार आणि संबंधित कंपन्यांबरोबर चर्चा करुन त्याबाबतीत कार्यवाही करण्यात येत आहे.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्यासाठी मिळालेला निधी**

**(3) * 29292 डॉ. दीपक सावंत , श्री. मधुकर सरपोतदार , श्री. दिवाकर रावते , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. अनिल परब , श्री.परशुराम उपरकर , श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री. सुरेश जेथलिया , श्री. अरविंद सावंत , श्री.सय्यद जामा , श्री. संजय दत्त , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे , श्री. गोविंदराव आदिक , श्री. चंद्रकांत रघुवंशी** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशनच्या कार्यक्रमासाठी केंद्र शासनाकडून महाराष्ट्र राज्याला 600 कोटी रुपयांचा निधी मंजुर झाला आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर योजनेअंतर्गत आतापर्यंत वैद्यकीय सुविधांसाठी 20 % निधी खर्च झाला नाही, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, सदर निधी खर्च न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(4) असल्यास, राष्ट्रीय ग्रामीण मिशनकडून प्राप्त झालेला निधी राज्यातील जनतेच्या आरोग्य सेवेवर खर्च करण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. रणजित कांबळे, डॉ.विमल मुंदडा यांच्याकरिता** : (1) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशनच्या कार्यक्रमा अंतर्गत सन 2007-2008 साठी केंद्र शासनाकडून रु.671.14 कोटी रुपयांचा नियतव्यय तत्वत: मंजूर करण्यात आला आहे.
(2) व (3) राज्याच्या प्रकल्प अंमलबजावणी आराखड्याला मंजूरी मिळाल्यानंतर हा निधी राज्याला उपलब्ध होणार आहे.
(4) केंद्र शासनाकडून निधीच्या वापरासाठी वेळोवेळी देण्यात आलेल्या निदेशानुसार जिल्हा आरोग्य समिती, रुग्ण कल्याण समिती, ग्राम आरोग्य पोषण व स्वच्छता समितीची स्थापना करण्याचे आदेश देण्यात आले आहे. तालुका आरोग्य अधिकारी "आशा" इत्यादीच्या नियुक्तीचे आदेश देण्यात आले आहे. आरोग्य केंद्राच्या बांधकामासाठी जिल्हास्तरावर पायाभूत सुविधा कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. जिल्हा स्तरापासून शासन स्तरापर्यंत कार्यक्रमाचा नियमित आढावा घेण्यात येत आहे.

डॉ. दीपक सावंत : माननीय मंत्री महोदयांना उत्तरामध्ये काही सुधारणा करावयाची आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : नाही.

डॉ. दीपक सावंत : प्रश्न भाग 1 च्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, रु. 671.14 कोटी रुपयाचा नियतव्यय तत्वत: मंजूर करण्यात आला आहे. माझा दुसरा प्रश्न, आतापर्यन्त वैद्यकीय सुविधांसाठी 20 टक्के निधी खर्च झाला नाही, हे खरे आहे काय, असा होता. त्या प्रश्नाला उत्तर देण्यात आलेले नाही. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती चंद्रा अय्यंगार यांनी केन्द्र सरकारच्या आरोग्य मिशनसाठी असलेला 20 टक्के निधी नोकरशहांच्या

...3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

बेदरकारपणामुळे खर्च झालेला नाही असे सांगितलेले आहे. तेव्हा या वर्षी हा जो 20 टक्के निधी खर्च झालेला आहे तो कोणकोणत्या हेडखाली आणि कोणकोणत्या कामांवर खर्च झालेला आहे ? प्रश्न भाग 4मध्ये असे म्हटलेले आहे की, जिल्हा आरोग्य समिती, ग्राम समिती, रुग्ण कल्याण समिती अशा प्रकारच्या अनेक उपक्रमांसाठी हा निधी खर्च करण्यात येणार आहे. 671 कोटी रु.चा निधी हा टप्प्या टप्प्याने येणार असला तरी हा निधी या समित्यांवर खर्च करण्यात येणार आहे की, मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी उदा. बांधकामासाठी, मेडिकल इक्विपमेण्टसाठी खर्च करण्यात येणार आहे ? या निधीचे डिस्ट्रिब्युशन कसे करण्यात येणार आहे ?

श्री. रणजित कांबळे : आता पर्यन्तची एकूण रक्कम 600कोटी इतकी आहे. एनआरएचएमचे फॉर्मेशन 2006मध्ये झाले आणि डिसेंबर अखेरीस पहिला टप्पा आला. दुसरा टप्पा देखील डिसेंबरमध्ये देण्यात आला. त्यांचे स्वत:चे नॉर्म्स पूर्णपणे ठरलेले नाहीत. ते बदलत राहातात. सन्माननीय सदस्यांनी कोणकोणत्या हेडखाली या निधीचे वाटप करणार आहात असा प्रश्न विचारला. तर त्यामध्ये आरसीएच-2 आहे. यामध्ये जननी सुरक्षा योजना आहे, फॅमिलि वेल्फेअरचे कॉम्पोझिशनचा कॉम्पोनण्ट आहे, चाईल्ड हेल्थ, मदर हेल्थ, फॅमिलि प्लॅनिंग, ट्रायबल हेल्थ, व्हल्नरेबल ग्रुप ट्रेनिंग, आयएससी, इत्यादी काम्पोनण्ट आरसीएच मध्ये आहेत.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

JPK/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम. .......... 13:10

ता.प्र.क्र.29292..........

श्री.रणजित कांबळे............

याकरिता आतापर्यंत पहिल्या वर्षामध्ये 158 कोटी रुपये केंद्रसरकारकडून आले होते,दुस-या वर्षामध्ये 144 कोटी रुपये आले आणि आता यावर्षी 10 कोटी रुपये आतापर्यंत आलेले आहेत. जर आपल्याला पाहिजे असतील तर यासंदर्भात मी पूर्ण डिटेल्स देतो. त्यानंतर दुस-या कंपोनंटमध्ये एक ॲडिशनल कंपोनंट होते, ते म्हणजे एन.आर.एच.एम.मध्ये रुग्ण कल्याण समितीच्या फॉर्मेशनसाठी सबस्टेशनचे स्ट्रेंग्थनिंग ,अनटाईड फंड , ॲन्यूअल मेंटेनंन्स ऑफ पब्लिक हेल्थ सेंटर,इंडियन पब्लिक हेल्थ स्टॅण्डर्ड,"आशाचे"कंपोनंट देखील याच्यामध्ये आहे तसेच, "आशा " संस्थेकरिता मोबाईल मेडीकल इक्विपमेंट देणे वगैरे एन.आर.एच.एम.च्या दुस-या टप्प्यामध्ये पहिल्या वर्षी दोन कोटी रुपये आले, त्यानंतर 158 करोड रुपये आले,नंतरच्या वर्षी 10 कोटी रुपये आले होते. पल्स पोलिओ आणि रेग्यूलर इम्यूनायजेशनचे देखील त्यामध्ये एक कंपोनंट आहे. नॅशनल डिसीज कंट्रोल प्रोग्रॅम असलेल्या कंपोनंटमध्येच वुमेन ॲण्ड चाईल्ड डेव्हलपमेंट डिपार्टमेंटचे कन्व्हर्जन करुन को - ऑर्डिनेशन राखले जाते.

श्री.विक्रम काळे : या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, केंद्रशासनाकडून हा जो निधी मिळणार आहे, त्या निधीमधून तालुका आरोग्य अधिकारी, "आशा" यांच्या नियुक्तीचे आदेश देण्यात आलेले आहेत असे म्हटलेले आहे परंतु या नेमणूका किती दिवसांमध्ये होणार आहेत ? "आशा" या शब्दाचा अर्थ काय आहे ?

डॉ.विमल मुंदडा : "ॲक्रीडेटेड सोशल हेल्थ ॲक्टिव्हिस्ट", "आशा" म्हणजे "आरोग्य सखी"असा त्याचा अर्थ होतो. त्यासंदर्भात आवश्यक अधिकारी व कर्मचा-यांच्या नेमणूका आपण लवकरच करणार आहोत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा प्रश्न अत्यंत सरळ आणि साधा आहे. केंद्रशासनाकडून एकंदर किती रक्कम आजपर्यंत आलेली आहे. माननीय मंत्रिमहोदय एकदा 158 कोटी रुपये सांगतात आणि एकदा 10 कोटी रुपये सांगतात,एकदा 2 कोटी रुपये सांगतात.

श्री.रणजित कांबळे : सदर रकमा त्या वर्षाप्रमाणे जशा प्रकारे प्राप्त झाल्या होत्या, त्याप्रमाणे मी सांगितले होते.

LL इ 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29292..........

डॉ.दीपक सावंत : केंद्रसरकारकडून आतापर्यंत एकूण निधीच्या 20 टक्के निधी आलेला आहे, ही गोष्ट खरी आहे का ? असे विचारल्यावर आपण त्याचे उत्तरच यादीमध्ये दिलेले नाही. केंद्राकडून आजापर्यंत किती निधी आला आणि त्याचे प्रपोर्शन कसे राहणार आहे ? पी.एच.सी.उभे करण्यासाठी किती फण्ड देणार आहात ? बाकीच्या समितींसाठी काम करणा-या अधिका-यांना व कर्मचा-यांचे पगार व इन्सेंटिव्ह देण्यासाठी किती फण्ड देणार आहात ? याचे काही प्रपोर्शन वगैरे ठरलेले आहे का ?

श्री.रणजित कांबळे : सदर प्रोग्रॅम संपूर्णत: सुमारे 600 कोटी रुपयांचा आहे आणि आतापर्यंत केंद्राकडून आपल्याकडे 600 कोटी रुपये आलेले आहेत.

डॉ.दीपक सावंत :केंद्राकडून आतापर्यंत एकूण 600 कोटी रुपये जमा झालेले आहेत का ?

श्री.रणजित कांबळे : होय, सदर प्रश्नाचे उत्तर मी तीन तीन वेळा सांगत आहे तरीदेखील सन्माननीय सदस्य मला पुन्हा पुन्हा तोच प्रश्न विचारीत आहेत. आतापर्यंत केंद्राकडून 600 कोटी रुपये आलेले आहेत आणि त्यापैकी 20 टक्के निधी खर्च झालेला आहे. त्याचे अपग्रेडेशन जे आहे म्हणजे सबसेंटरचे स्ट्रेंगथनिंग करण्याकरिता प्रत्येक सब सेंटरला 10,000 रुपयांचे मागच्या वर्षी वितरण झालेले होते. यामध्ये सरपंच आणि ए.एन.ए.यांचे जॉईंट अकाऊंट असते, त्याच्यामधून दुरुस्तीचा खर्च,इमर्जन्सी डिलीव्हरी साठी ट्रान्सपोर्टेशनची गरज भासली तर आणि फ्लेक्सीपूलचा खर्च अशा कामांसाठी लागणारे पैसे जॉईंट अकाऊंट मधून ते खर्च करु शकतात. प्रत्येक स्तरावर एक जिल्हा समिती नेमलेली आहे. पंचायत समितीसाठी पी.एच.सी.साठी 40,000 रुपये, सबसेंटरसाठी 25 हजार रुपये असे करुन रुग्ण कल्याण समिती आहे, त्याच्यामध्ये पूर्ण पैसे जमा झालेले आहेत. यामध्ये सी.ई.ओ.,डी.एच.ओ.हे जिकडे जिकडे त्यांना योग्य वाटेल तिकडे ते यामधील पैसे खर्च करु शकतात आणि त्याच्यासाठी कुठेही राज्यशासन किंवा इतर कोणी अधिका-यांची परवानगी घेण्याची गरज नाही, तो निर्णय त्यांच्या स्तरावर घेतला तरी चालेल.

यानंतर श्री.कानडे.....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ 13:15

ता.प्र.क्र. 29292 पुढे सुरु ....

श्री. धनाजी साठे : सभापती महोदय, उत्तराच्या चौथ्या भागात तालुका आरोग्य अधिकारी नियुक्तीचे आदेश देण्यात आले आहेत असे म्हटले आहे. माझा प्रश्न असा आहे की, तालुका अधिकाऱ्यांची नवीन पदे शासन निर्माण करणार आहे किंवा सध्याच्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांना अतिरिक्त कार्यभार देऊन काम सुरु करणार आहे ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, तालुका आरोग्य अधिकारी म्हणून वेगळी पदे निर्माण करणार नाही. तालुका स्तरावर जे सर्वात वरिष्ठ डॉक्टर आहेत त्यांची या पदावर नेमणूक केली जाणार आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आरोग्य विभागाचे आर्थिक नियोजन योग्य पध्दतीने होत नाही म्हणून आरोग्य संचालनालयाची फेररचना केलेली आहे हे खरे आहे काय ? आरोग्य संचालनालयाची फेररचना केव्हा करण्यात आली ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, फाऊंडेशन नीटपणाने व्हावयाला पाहिजे म्हणून विभागामध्ये रिऑर्गनायझेशन केलेले आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आरोग्य खात्याच्या अनेक समस्या आहेत. सुदैवाने केंद्र शासनाने 600 कोटी रुपये या राज्याला आरोग्यासाठी दिलेले आहेत आणि ते प्राप्तही झालेले आहेत. राज्यात कुपोषणामुळे बालमृत्यू होत आहेत त्याचप्रमाणे आरोग्यसेवेअभावी देखील मृत्यू होत आहेत. मूळ प्रश्न विचारण्यात आले होते त्याला जी उत्तरे दिलेली आहेत ती मूळ प्रश्न विचारात घेऊन देण्यात आलेली नाहीत. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की केंद्र शासनाकडून निधीच्या वापरासाठी वेळोवेळी देण्यात आलेल्या निदेशानुसार जिल्हा आरोग्य समिती, रुग्ण कल्याण समिती, ग्राम आरोग्य पोषण व स्वच्छता समितीची स्थापना करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. राज्याची स्थापना होऊन इतकी वर्षे झाली तरी आरोग्य केंद्रे उभी राहिलेली नाहीत. सन्माननीय सदस्य डॉ. सावंत यांनी सुरुवातीलाच विचारले होते की उत्तरामध्ये काही दुरुस्ती करावयाची आहे काय त्यावेळी त्यात बदल करण्यात आला नाही. प्रश्न एक आहे आणि उत्तर मात्र वेगळे देण्यात आलेले आहे. म्हणून सगळया प्रश्नांचा एकत्रित विचार करुन आणि एकेक प्रश्न वाचून त्याप्रमाणे उत्तर देणार आहात काय ?

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ 13:15

ता.प्र.क्र. 29292....

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सर्व प्रश्नांना उत्तरे दिलेली आहेत. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन हे फार नवीन आहे. अखर्चित रक्कम कशी राहिली असा प्रश्न माननीय सदस्यांनी विचारला आहे. सभापती महोदय, प्रत्येक सबसेंटरमध्ये एक ऐवजी दोन अेएनएम ची नेमणुक करावयाची आहे. त्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे. देखभाल आणि दुरुस्तीसाठी जो पैसा दिलेला आहे तो सोसायटीमध्ये आहे. त्यांच्याकडून कंप्लायन्स आल्यावर तो खात्यात टाकला जाईल. मोठया प्रमाणावर दुरुस्ती आहे तेथे जिल्हा परिषदेकडे पैसा आल्यानंतर दुरुस्ती केली जाईल असे सांगितले आहे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29292........... श्री.रणजित कांबळे......

असे अनेक प्रश्न आहेत आणि ही कंटिन्यू प्रोसेस आहे. हा निधी लॅप्स होत नाही. तो कॅरिओव्हर होतो. हा निधी वेगळ्या खात्यामध्ये जमा केला जातो. या योजनेला आता गती येणार आहे. यासाठी आम्हाला स्टाफपासून अंमलबजावणी करावी लागेल.

श्री.मधुकर सरपोतदार : याचा अर्थ तुमच्याकडे इन्फ्रास्ट्रक्चर नाही हे मान्य करणार का?

श्री.रणजित कांबळे : जी उपकेंद्रे अस्तित्वात आहेत त्याठिकाणी एक ए.एन.एम.कार्यरत असून केंद्र शासनाच्या निकषाप्रमाणे दोन ए.एन.एम.नेमल्या पाहिजेत. आपण दुसरे पद कॉन्ट्रॅक्टवर नेमणार आहोत. जिल्हा परिषदेकडून आदेश दिल्यानंतर ही पदे भरली जातील. नियुक्ती करण्यासाठी काही कालावधी निश्चित लागेल. वर्षअखेरपर्यंत या योजनेला निश्चित गती प्राप्त होईल.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अमरावती विभागांतर्गत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण खात्याच्या**
**अनुशेष डावलून ३७ बोगस कर्मचाऱ्यांची भरती केल्याबाबत**

**(४) * ३०३९६ श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. रमेश निकोसे , श्री. धनाजी साठे :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण खात्याच्या अमरावती विभागांतर्गत अनुशेष डावलून ३७ बोगस कर्मचाऱ्यांची भरती केली असल्याचे आरोप अनुशेष निर्मूलन कृती समिती व मावळा संघटने दिनांक ६ मे, २००७ रोजी वा त्यादरम्यान केला असून याप्रकरणी चौकशी करण्यात यावी अशी मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ३७ कर्मचाऱ्यांना वेतनापोटी गेल्या तीन वर्षापासून दरमहा लाखो रुपये दिले जात आहे, हे खरे आह काय,
(३) असल्यास, उपसंचालकांनी याबाबींना गंभीरतेने न घेतल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणीही संबंधीतांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.सुरेश शेट्टी, श्री.दिलीप वळसे पाटील यांच्याकरिता :** (१) होय.
(२) सदर ३७ कर्मचारी अद्याप शासन सेवेत कार्यरत असल्याने त्यांना दरमहा वेतन दिले जाते हे खरे आहे.
(३) होय.
(४), (५) व (६) सदर अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या तत्कालीन अधिकाऱ्यांची म.ना.से. (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या उपकलम ८ व १२ अन्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. व्यवसाय शिक्षण प्रादेशिक विभाग अमरावतीमध्ये सेवानिवृत्ती, पदोन्नती मुळे व नव्याने निर्माण होणाऱ्या पदांमधून वरील मागासवर्गीयांची अनुशेषाची पदे बिंदुनामावलीनुसार भरुन काढण्यात येणार आहेत.

----------

श्री.धनाजी साठे : सभापती महोदय, अमरावती विभागात व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण खात्यामध्ये 37 कर्मचाऱ्यांची नव्याने भरती करण्यात आली, ही भरती कोणत्या अधिकाऱ्याने केली व त्या अधिकाऱ्यावर काय कारवाई करण्यात आली आहे?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, ही भरती चुकीच्या मार्गाने करणारे श्री.एस.पी.ठाकरे, उपसंचालक, श्री.ए.टी.आक्रे, व्होकेशनल उपसंचालक व श्री.एस.व्ही.इंदूरकर हे तीन अधिकारी त्याठिकाणी कार्यरत होते. यापैकी श्री.एस.पी.ठाकरे यांचे निधन झाले असून श्री.एस.व्ही.इंदूरकर हे शासनाच्या सेवेत आहेत. त्यांची विभागीय चौकशी सुरु आहे.

..3..



SGB/ KGS/ MAP/ 13:20

ता.प्र.क्र.30396.........

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, 37 कर्मचा-यांची बोगस भरती करण्याचा हा प्रश्न आहे. ही बाब खोटी आहे. सा.प्र.विभागाचा शासन निर्णय दिनांक 8 मार्च, 1999 व दिनांक 19 मार्च, 1999 तसेच दिनांक 25 मे, 1999 लक्षात घ्यावा. दिनांक 8 मार्च, 1999 पूर्वी जे अस्थायी कर्मचारी होते त्या कर्मचाऱ्यांना नियमित करण्याचे हे आदेश आहेत. अमरावती विभागामध्ये 3661 कर्मचाऱ्यांची प्राप्त झालेली माहिती लक्षात घेता कर्मचाऱ्यांची सेवा एकवेळची बाब म्हणून खालील अटींच्या अधिनस्त राहून नियमित करण्यात यावी या अनुषंगाने या कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली. त्यामध्ये मागासवर्गीय व बिगर मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना नियमित करण्यात आले. माझा प्रश्न असा आहे की, या नियमाप्रमाणे सेवा नियमित करताना बिंदू नामावलीनुसार पदे भरली नसतील त्याठिकाणचा अनुशेष भरण्यात येईल काय? अमरावती विभागाप्रमाणेच इतर सर्व विभागात अनुशेष आहे किंवा नाही याची पडताळणी करुन अनुशेष भरला जाईल काय?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, अमरावती विभागामध्ये मागासवर्गीय पदे होती त्या पदांवर खुल्या प्रवर्गातील लोकांची भरती करण्यात आली का असा प्रश्न आहे. ज्या लोकांना नियुक्त्या दिल्या ते खुल्या प्रवर्गातील होते. याठिकाणी जी.आर.चा उल्लेख करण्यात आला. त्या जी.आर.प्रमाणे सेवा नियमित झाली. जी रिक्त पदे होती ती राखीव पदे होती. त्या पदांचा बॅकलॉग पूर्ण होणार की नाही हा मूळ प्रश्न आहे. अमरावती विभागात 24 जागा रिक्त आहेत, त्या 24 जागांवर राखीव प्रवर्गातील लोकांची भरती केली जाणार आहे. अमरावती वगळता इतर विभागांमध्ये ज्या जागा आहेत, ज्या विभागामध्ये आपण नवीन आय.टी.आय.सुरु करणार आहोत.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MAP/ KGS/ प्रथम श्री. भोगले.. 13:25

**ता.प्र.क्र. : 30396** .........

श्री. सुरेश शेट्टी.....

तेथे जी नवीन पदे निर्माण केली जाणार आहेत त्या ठिकाणी फर्स्ट प्रेफरन्स रिझर्व्ह कॅटेगरीला दिला जाणार असून रिझर्व्ह कॅटेगरीचा बॅकलॉग पूर्ण झाल्यानंतर जनरल कॅटेगरीचा बॅकलॉग पूर्ण करण्यात येईल.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी पॉईंटेंड प्रश्न विचार असून प्रश्नाच्या संदर्भात काही सुध्दा बॅकग्राऊंड सांगणार नाही. या ठिकाणी करण्यात आलेल्या सर्व नेमणुका 1995 पूर्वीच्या आहेत काय? शेकडो नेमणुका असल्यामुळे वनटाईम ॲक्टीव्हीटी म्हणून या सर्व लोकांना रेग्युलराईज करा असा जीएडीने 8 मार्च, 1999 रोजी शासन निर्णय काढून शेकडो लोकांच्या नेमणुका नियमित केल्या ही खरी गोष्ट खरी आहे काय ? 19 मार्च, 1999 रोजी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने त्या अटीप्रमाणे शासन निर्णय काढून या लोकांच्या सेवा नियमित केल्या त्यांची संख्या फक्त 32 नसून 1061 आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आमच्या ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांनी जी फिगर सांगितलेली आहे ती बरोबर असून 1061 कर्मचा-यांच्या सेवा जी.आर. प्रमाणे रेग्युलराईज करण्यात आलेल्या आहेत.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी एक एक प्रश्न विचारला होता त्या प्रमाणे सन्माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तरे दिली पाहिजेत. पहिला प्रश्न असा आहे की, या सर्व नेमणुका 1999 च्या पूर्वीच्या आहेत ही गोष्ट खरी आहे काय?

श्री. सुरेश शेट्टी : होय.

प्रा. बी.टी.देशमुख : सामान्य प्रशासन विभागाने 8 मार्च, 1999 रोजी शासन निर्णय काढून अशा पध्दतीने शेकडो अस्थायी पध्दतीने भरती झालेल्या कर्मचा-यांच्या सेवा नियमित कराव्यात असा शासन निर्णय काढण्यात आला होता काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, जी.आर. प्रमाणे सर्वांना रेग्युलराईज करण्यात आलेले आहे.

प्रा. बी.टी. देशमुख : सभापती महोदय, ....

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 30396** .........

**सभापती** : दुस-याही सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी मिळाली पाहिजे सन्माननीय सदस्य प्रा. देशमुख साहेबांनी जे चार प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्याची माहिती मंत्रीमहोदयांनी पटलावर ठेवावी.

श्री. सुरेश शेट्टी : होय. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, 37 कर्मचारी बोगस आहे असे म्हटलेले आहे. आता उत्तरात असे म्हटलेले आहे की, जे बोगस कर्मचारी भरलेले आहेत त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. परंतु आता हे जे कर्मचारी कामावर आहेत त्यांना शासन घरी पाठविणार आहे काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी अगोदर सुध्दा सांगितले आहे की, या सर्व कर्मचा-यांची सर्व्हीस आपण रेग्युलराईज केलेली आहे. हे कर्मचारी कामावर असल्यामुळे त्यांना पगार सुध्दा दिला जात आहे.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, या प्रश्नाचा मुख्य विषय 37 लोकांची बोगस पध्दतीने भरती करणे हा आहे. हा विषय बाजूला ठेवून 99 साल, 94 सालाच्या संदर्भात या ठिकाणी चर्चा सुरु आहे परंतु अशा प्रकारे चर्चा करणे चुकीचे आहे. या ठिकाणी बोगस भरती झालेली असल्यामुळे या कर्मचा-यांना कामावरुन काढले जाणार आहे काय असा प्रश्न विचारला होता परंतु या प्रश्नाच्या संदर्भात लेखी उत्तरात काहीही माहिती देण्यात आलेली नाही. शासनाच्या जीआर प्रमाणे जर एखाद्या पदाच्या ठिकाणी अनुशेष डावलून भरती केली असेल तर त्याला परत पाठविण्याच्या संदर्भात शासनाचा नियम आहे. त्यामुळे शासनाच्या नियमांचे आपण पालन करणार आहात काय? या ठिकाणी ज्या 37 बोगस कर्मचा-यांची भरती करण्यात आलेली आहे त्यांना घरी पाठवून त्या ठिकाणी मागासवर्गीयांची भरती करणार काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, 1995 ते 1999 या काळात ही रिक्रुटमेंट झालेली असून या ठिकाणी चुकीच्या पध्दतीने भरती करण्यात आलेली आहे ही बाब सन 2003 मध्ये आपल्याला लक्षात आली. त्यामुळे यासंदर्भात चौकशी करण्यात आलेली असून या 37 लोकांना आपण रेग्युलराईज केलेले असल्यामुळे या कर्मचा-यांना आता

....3

**ता.प्र.क्र. : 30396** .........

श्री. सुरेश शेट्टी.....

कामावरुन काढण्याचा प्रश्न येत नाही. आता मूळ प्रश्न आपल्या समोर आहे की, एस.सी. एस.टी. आणि बाकीच्या रिझर्व्ह कॅटेगरीच्या पोस्ट होत्या त्या कशा भराव्यात. आता आपल्याकडे ज्या काही व्हॅकन्सीज आहेत त्या पोस्टवर सर्व बॅकलॉग पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30396...........

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनीच मान्य केलेले आहे की, शासन जी.आर.नुसार कार्यवाही झालेली आहे. प्रश्न क्रमांक 4,5 व 6 चे उत्तर देण्यात आलेले आहे की, "... अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या तत्कालीन अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात आली आहे." एका बाजूला मंत्रिमहोदय उत्तर देताना सांगत आहेत की, शासकीय आदेशाप्रमाणे सेवा नियमित करण्यात आलेली आहे तर दुसऱ्या बाजूला अनियमितता करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करीत आहे. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना स्पेसिफीक प्रश्न आहे की, नेमकी कोणती अनियमितता झालेली आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, 1992- 95 या काळात ही भरती करण्यात आली होती. ही भरती चुकीची होती हे देखील मी मान्य केलेले आहे. ज्या अधिकाऱ्यांनी ही चूक केली त्यांच्यावर कारवाई होणे जरुरीचे आहे आणि त्याप्रमाणे कार्यवाही करीत आहोत. ही भरती झाल्यानंतर शासनाने जी.आर.काढून त्यांना रेग्युलराईज केलेले आहे. ज्या अधिकाऱ्यांनी एस.सी., एस.टी. या सवंर्गातील उमेदवारांना डावलून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची भरती केली त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी अनुशेष भरण्याबाबत सांगितले तेव्हा त्यासंदर्भातील प्रश्न मी विचारत नाही. प्रश्नात "बोगस" शब्दाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. तसेच याठिकाणी प्रश्न विचारताना सन्माननीय सदस्यांनी देखील "बोगस" शब्दाचा उल्लेख केलेला आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक 8 मार्च 1999 च्या आदेशाप्रमाणे उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक 19 मार्च 1999 रोजी या कर्मचाऱ्यांच्या सेवा रेग्युलराईज करण्याचा जी.आर.काढला. सा.प्र.विभागाच्या जी.आर.मध्ये सहा अटी होत्या. या सहा अटींची पूर्तता करणाऱ्या कर्मचाऱ्यांना रेग्युलराईज करावे असा त्या जी.आर.मध्ये उल्लेख आहे. तेव्हा या सहा अटींची पूर्तता 37 कर्मचारी आणि 1061 कर्मचारी पूर्ण करीत होते काय ?

श्री.सुरेश शेट्टी : होय.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील आश्रमशाळातील विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय तपासणीसाठी आरोग्य पत्र उपचार पेटी पुरविण्याबाबत**

**(5) * 29307 श्री. धनाजी साठे , श्री. संजय दत्त , श्रीमती सुधा जोशी , श्री. सुधाकर गणगणे , श्री. गोविंदराव आदिक , श्री. रमेश निकोसे , श्री. चंद्रकांत रघुवंशी , श्री. सुरेशदादा देशमुख :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील आश्रमशाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांची वर्षातून चारवेळा वैद्यकीय तपासणी आरोग्य पत्र वितरण तसेच प्रत्येक शाळेला वैद्यकिय उपचार पेटी पुरविण्याची व्यवस्था अपेक्षित असतानाही 1999-2001 दरम्यान राज्यातील 38 शाळांना वैद्यकिय उपचार पेटी पुरविण्यात आली नाही तसेच 29 शाळांना आरोग्य पत्र वितरीत करण्यात आलेले नसल्याप्रकरणी महालेखापालांनी नोंदविलेल्या निरीक्षणानुसार तपासणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, तपासणीत काय आढळून आले व त्यानुसार राज्यातील 38 शाळांना वैद्यकिय उपचार पेटी पुरविण्याबाबत व 29 शाळांना आरोग्य पत्र वितरीत करण्याबाबत कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रणजित कांबळे, डॉ.विमल मुंदडा यांच्याकरिता** : (1) होय.

(2) व (3) महालेखापालांनी नोंदविलेल्या निरिक्षणानुसार चौकशी चालू आहे.

श्री.धनाजी साठे : सभापती महोदय, राज्यातील आश्रमशाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांची वर्षातून चार वेळा वैद्यकीय तपासणी, आरोग्य पत्र वितरण तसेच प्रत्येक शाळेला वैद्यकीय उपचार पेटी पुरविण्याची व्यवस्था अपेक्षित असताना राज्यातील 38 आश्रमशांळा वैद्यकीय उपचार पेटया पुरविण्यात आलेल्या नाहीत या प्रश्नाचे उत्तर "होय" असे दिलेले आहे. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, आश्रमशाळांना या वैद्यकीय पेट्या केव्हा पुरविण्यात येणार आहेत ? तसेच महालेखापालांनी जे आक्षेप नोंदविले आहेत त्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, हा प्रश्न सन 1999-2000 मधील आहे. त्या काळात आश्रमशाळांना वैद्यकीय पेट्या पुरविण्यात आल्या नव्हत्या म्हणून उत्तरात "होय" असा उल्लेख करण्यात आलेला आहे. परंतु त्यानंतर आश्रमशाळांना वैद्यकीय पेट्या पुरविण्यात आलेल्या आहेत.

यानंतर श्री.पुरी..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.अजित.... 13:35

ता.प्र.क्र.29307....

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मला याठिकाणी निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, हा प्रश्न मागच्यावेळी विधानसभेमध्ये दिनांक 12 एप्रिल रोजी विचारण्यात आला होता, त्यावेळी माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले होते की, निरिक्षणानुसार तपासणी सुरु आहे. आजच्या लेखी उत्तरातही असेच म्हटले आहे की, "महालेखापालांनी नोंदविलेल्या निरिक्षणानुसार चौकशी चालू आहे." एप्रिल महिन्यापासून आतापर्यंत तीन महिन्यांचा कालावधी गलेला आहे. याबाबतीत माझा स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, हा विषय आपण सिरिअसली घेऊन यासंदर्भातील चौकशी आपण निश्चित कालमर्यादेत करुन निकाल देणार का ? तसेच, यासंदर्भातील चौकशीच्या दिरंगाईची कारणे काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की, हा ऑडीट रिपोर्ट सन 2001 चा जूना आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी, उपचार पेटया दिलेल्या आहेत की नाही याबाबत प्रश्न उपस्थित केलेला आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, हा प्रश्न सन 2001 चा जरी असला तरी याबाबत महालेखापालांनी आक्षेप नोंदविलेले आहेत. ते आक्षेप त्यांनी कोणत्या तारखेला नोंदविले ? व सदरची चौकशी कधीपर्यंत पूर्ण होईल ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की, याबाबतीतील अहवालामध्ये जे आहे, ते सत्य आहे. मी याठिकाणी कबुल केले आहे की, किटस् त्यांना भेटलेल्या नाहीत.

**सभापती** : चौकशी आणि ऑडीट ऑब्जेक्शनचा कम्प्लायन्स कधीपर्यंत पूर्ण होईल ? असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न असून याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी याठिकाणी परत कबूल करतो की, किटस् दिलेल्या नाहीत, काही शाळांमध्ये त्या पोहचलेल्या नाहीत. तसेच ऑडीट पॅराबाबत आम्ही तीन महिन्यांच्या आत उत्तर देऊ.

----------

(....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे**
**अनुदान शेतकऱ्यांना मिळण्याबाबत**

**(६) * ३०७३० श्री. यशवंतराव गडाख , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजना उदा. कांदा चाळ, गांडूळ खत निर्मिती, शेतकरी टिबक सिंचन आदिंकरिता बऱ्याच शेतकऱ्यांच्या अनुदानाच्या रकमा मिळाल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) खरे असल्यास अहमदनगर जिल्ह्यातील तालुकावर तपशिल काय आहे,

(३) ज्यांना अद्यापपावेतो अनुदान मिळाले नाही त्यांना ते देण्याकरिता शासनाने कोणती कारवाई केली आहे ?

**श्री.विनय कोरे :** राष्ट्रीय फलोत्पादन अभियांनातर्गत गांडूळ कल्चर युनिट करिता अनुदान देण्यात येते. लक्षकांनुसार मंजूर गांडूळ कल्चर युनिट करीता पूर्ण अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजनेअंतर्गत ठिबक सिंचनाकरीता अनुदान देण्यात येते. सन २००६-२००७ मध्ये फलोत्पादन पिकाअंतर्गत लक्षकांनुसार मंजूर ठिबक सिंचनाच्या कामाकरीता पूर्ण अनुदान वितरीत करण्यात आले असून लक्षांकापेक्षा जास्त झालेल्या कामाचे अनुदान प्रलंबित राहिले आहे.

(२) अहमदनगर जिल्ह्यातील प्रलंबित अनुदानाचा तालुकावार तपशील सोबत सहपत्रित करण्यात येत आहे.

(३) राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत कांदाचाळीच्या प्रस्तावांना मान्यता देण्याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजना सन २००७-०८ मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील फलोत्पादन पिकांच्या प्रलंबित अनुदानाचा समावेश करुन वार्षिक कृती आराखडा केंद्र शासनास मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला असून केंद्र शासनाची मंजूरी मिळाल्यानंतर प्रलंबित अनुदान वितरीत करण्यात येईल.

**१) नाविण्यापूर्ण घटाकंतर्गत कांदाचाळ उभारणे**

**अहमदनगर जिल्ह्यातील प्रलंबित प्रस्तावांसाठी अनुदानाचा**
**तालुकानिहाय तपशील खालील प्रमाणे आहे.**

...3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे.....

| अ.क्र | तालुका | कांदाचाळिंची संख्या | प्रलंबित अनुदान रु. लाखात |
|---|---|---|---|
| १. | अहमदनगर | १६ | ४ |
| २. | पारनेर | १४९ | ३८.५५ |
| ३. | शेवगांव | १८७ | ४९.२ |
| ४. | श्रीरामपूर | ७ | ३ |
| ५. | नेवासा | ५७ | १८ |
| ६. | राहूरी | ३० | ७.५ |
| ७. | कोपरगांव | ११८ | ३२.३ |
| ८. | राहाता | २ | ०.५ |
| ९. | संगमनेर | १५७ | ४३ |
| १०. | अकोले | २ | ०.५ |
| ११. | कर्जत | ३९ | १० |
| १२. | जामखेड | ११ | २.४५ |
| १३. | श्रीगोंदा | ३९ | ७.३ |
| १४. | पाथर्डी | -- | -- |
| | **एकूण** | **८१४** | **२१६.३** |

**केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना**

**अहमदनगर जिल्ह्यातील अनुदानाचा तपशील**

....4....



SSP/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.अजित.... 13:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे.....

**( रुपये लाखात )**

| अ.क्र | तालुका | आर्थिक लक्ष्य | आर्थिक साध्य | प्रलंबित अनुदान |
|---|---|---|---|---|
| १. | अहमदनगर | ११.७५ | २१.१२ | ९.३७ |
| २. | पारनेर | १३.९१ | ३०.१२ | १६.२१ |
| ३. | पाथर्डी | ४.४६ | ६.५० | २.०४ |
| ४. | कर्जत | १०.१६ | २२.०० | ११.८४ |
| ५. | श्रीगोंदा | १६.७३ | ३९.३५ | २२.६२ |
| ६. | जामखेडा | १२.५६ | १२.५६ | ०.०० |
| ७. | श्रीरामपूर | ३२.१३ | ३५.३० | ३.१७ |
| ८. | राहूरी | ११.१६ | १६.०८ | ४.९२ |
| ९. | नेवासा | १८.४४ | १८.४४ | ०.०० |
| १०. | शेवगांव | ७.२१ | ८.७० | १.४९ |
| ११. | संगमनेर | ३६.१८ | ५६.१७ | १९.९९ |
| १२. | अकोले | १०.९६ | २१.६९ | १०.७३ |
| १३. | कोपरगांव | १८.९१ | ३२.६२ | १३.७१ |
| १४. | राहाता | ४८.१९ | ६६.२५ | १८.०६ |
| | **एकूण** | **२५२.७५** | **३८६.९०** | **१३४.१५** |

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, प्रलंबित अनुदानाचा समावेश करुन वार्षिक कृती आराखडा शासनाकडे मान्यतेसाठी केव्हा सादर करण्यात आला ? व त्याबाबतीत कोणत्या स्वरुपाचा पाठपुरावा करण्यात येत आहे ?

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, आपण वार्षिक कृती आराखडा दरवर्षी सादर करीत असतो, त्याप्रमाणे तो सादर करण्यात आलेला असून प्रलंबित अनुदान फक्त सूक्ष्म सिंचन योजनेचे प्रलंबित आहे, ते आपण दिनांक ३० ऑगस्टपर्यंत वितरित करणार आहोत.

------

...5...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील ग्रामीण रुग्णालयामध्ये खाटांचे असलेले अत्यल्प प्रमाण**

**(७) * २९३९५ प्रा. फौजीया खान , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. शरद रणपिसे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे , श्री. चंद्रकांत रघुवंशी , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण रुग्णालयांमध्ये प्रत्येकी एक हजार व्यक्तींसाठी केवळ एकच खाट उपलब्ध आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यात हे प्रमाण सर्वात कमी आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण भागातील लोकांना आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, या करिता खाटांचे प्रमाण वाढविण्याच्या अनुषंगाने काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. विमल मुंदडा** : (१) होय.

(२) नाही.

(३) ग्रामीण भागातील लोकांना आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी म्हणून आरोग्य संस्थांमधील खाटांची संख्या २००१ च्या लोकसंख्येनुसार वाढविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, आरोग्य सेवा मिलना नागरिक का मूलभूत अधिकार है, इस बात को देखते हुए प्रस्ताव केवल विचाराधीन नहीं होना चाहिए. क्या शासन इस संदर्भ में टाइम बाउंड आश्वासन देगा ? इस संदर्भ में वित्त मंत्रालय के साथ जो पत्र-व्यवहार हुआ है, उस प्रस्ताव का आज स्टेटस क्या है ?

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.29395 पुढे सुरु..........**

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, हा विभागीय असमतोलाबाबतचा प्रश्न आहे. यापूर्वीचे जे नॉर्म्स होते ते सन 1991 च्या जनगणनेनुसार होते. लेखी उत्तरात हे स्पष्टपणे नमूद केले आहे की, ठाणे जिल्हयाच्या बाबतीत खाटांचा अनुशेष शिल्लक नाही. आता सन 2001 च्या लोकसंख्येनुसार प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, जिल्हा रुग्णालय यासाठी नवीन आराखडा निश्चित केला आहे. या आराखडयास मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यात येणार आहे.

श्री.धोंडिराम राठोड : सभापती महोदय, ग्रामीण रुग्णालयामध्ये खाटा वाढविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे, सन्माननीय मंत्रीमहोदयांनी आताच सांगितले आहे. मंठा ग्रामीण रुग्णालयाला 50 खाटा मंजूर झाल्या आहेत, याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी मंठा येथील कार्यक्रमात जाहीर स्टेटमेंट केले आहे. याबाबत आम्ही दोन वर्षांपासून पाठपुरावा करीत आहोत. या निमित्ताने माझा असा प्रश्न आहे की, मंठा येथील ग्रामीण रुग्णालयाला मंजूर करण्यात आलेल्या 50 खाटांच्या बाबतीत कार्यवाही करण्यात येईल काय ?

श्री.रणजित कांबळे :सभापती महोदय, ही बाब तपासून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मैंने माननीय मंत्री महोदय से प्रश्न पूछा था कि वित्त मंत्रालय के साथ जो पत्र-व्यवहार हुआ है, उस प्रस्ताव के बारे में आज स्थिति क्या है ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, खाटांसंबंधीचे नॉर्म्स अगोदरच ठरविण्यात आले आहेत. आता नवीन आराखडा तयार करण्यात आला असून त्यास मंत्रिमंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. मंत्रिमंडळाच्या पुढील बैठकीत हा विषय येणार आहे. लवकरात लवकर मान्यता घेण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, केंद्र शासनाच्या 'राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन' या योजनेअंतर्गत खाटा वाढविण्यासाठी विशेष निधीची तरतूद केली आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, हा अनुशेषाबाबतचा प्रश्न आहे. यामध्ये अशाप्रकारची तरतूद केलेली नाही.

---------------

..२.........



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे**
**लातूर विभागीय मंडळातील इयत्ता १०वीचे पेपर पुन्हा तपासण्याबाबत**

**(८) * ३००८० श्री.सय्यद जामा , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे , श्री. चंद्रकांत रघुवंशी , श्री. रमेश निकोसे , मेजर सुधीर सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे लातूर विभागीय मंडळातील इयत्ता १० वीच्या इंग्रजी, गणित व इतर विषयाचे पेपर फुटल्याचे नांदेड जिल्हयातील एका बडया कस्टोडयनच्या ताब्यातील विविध विषयाच्या दोन हजार उत्तरपत्रिका पुन्हा तपासण्यात येतील व दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल अशी माहिती लातूर विभागीय मंडळाचे सचिव डॉ. एम.खतीब यांनी दिनांक १८ एप्रिल,२००७ रोजी किंवा त्यासुमारास दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय, वा त्यात त्यांना काय आढळून आले, व दोषी असणाऱ्या व्यक्तीवर शासनाने कोणती कारवाई केली आहे ,वा करण्यात येत आहे,

(३) राज्यात अशा घटना सतत घडत आहे तेव्हा अशा घटनांवर आळा घालण्यासाठी शासनाने कोणता ठोस निर्णय घेतला आहे, वा घेण्यात येत आहे,

(४) अद्याप, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वसंत पुरके** : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) अशा घटना घडलेल्या नाहीत . अशा घटना घडू नयेत म्हणून प्रचलीत उपाययोजना प्रभवीपणे कार्यरत ठेवण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय. मंत्री महोदय ने जो उत्तर दिया है, वह सही नहीं है. 2 हजार से ज्यादा उत्तर पत्रिकाएं वहां के कस्टोडियन के हाथ से बाहर गई हैं और वह 2 घंटे के लिए बच्चों के अभिभावकों को दी गई हैं. बाद में उत्तर पत्रिका उन्होंने वापस की हैं. इसलिए क्या मंत्री महोदय अपने उत्तर में संशोधन करेंगे ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, अशा प्रकारच्या घटना घडलेल्या नाहीत. सन्माननीय सदस्यांनी सभागृहात जी माहिती दिली आहे ती ग्राहय धरुन ही बाब तपासून घेतली जाईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, राज्यामध्ये एस.एस.सी.बोर्डाच्या माध्यमातून पेपरफुटीच्या व पेपर गहाळ होण्याच्या अनेक घटना घडलेल्या आहेत. परंतु, मंत्रिमहोदय या ठिकाणी असे उत्तर देत आहेत की, राज्यात अशा घटना घडलेल्या नाहीत. लातूर, परळी या ठिकाणी अशा घटना घडलेल्या आहेत, वर्तमानपत्रात देखील बातमी आली आहे. यामुळेच मागील

..3...........



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

काळात विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण द्यावे लागले आहेत. भविष्यकाळात यासंदर्भात शासन काही ठोस उपाययोजना करणार आहे काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, होय.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून जे प्रश्न विचारण्यात आले आहेत व या प्रश्नांना मंत्रिमहोदयांनी जे उत्तर दिले आहे ते उत्तर पूर्णपणे अशा घटना नाकारणारे आहे. सन्माननीय सदस्य, सर्वश्री सय्यद जामा व विक्रम काळे यांनी अशा प्रकारच्या घटना घडल्याचे स्वत: सभागृहात सांगितले आहे. हा विषय अतिशय गंभीर आहे. आपल्या माध्यमातून शासनाला मी विनंती करणार आहे की, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन एक महिन्याच्या आत अहवाल सादर करणार काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, होय.

---------------

..4..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.29425 बाबत**

डॉ.सुनील देशमुख (अर्थ व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, या प्रश्नाशी संबंधित असणारे ऊर्जा खात्याचे मंत्री, श्री.दिलीप वळसे-पाटील हे त्यांच्याशी संबंधित खात्याच्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा विधानसभेत सुरु असल्यामुळे या सभागृहात उपस्थित नाहीत.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MAP/ SBT/ प्रथम श्री.रोझेकर ........ 13:45

**ता.प्र.क्र.29425** .....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या प्रश्नाचे काय होणार आहे, हा प्रश्न नंतर घेतला जाईल काय ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, हा प्रश्न उद्या घेण्यात यावा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, तारांकित प्रश्नाच्या बाबतीत असे करता येते काय ?

**सभापती** : माननीय ऊर्जा मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील यांचा जसा आपल्या सभागृहामध्ये बिझनेस आहे तसाच खालच्या सभागृहामध्ये सुध्दा बिझनेस आहे. ऊर्जा खात्याला राज्यमंत्री नाही. याचा अर्थ माननीय ऊर्जा मंत्री महोदयांनी या सभागृहातील बिझनेस सोडून खालच्या सभागृहामध्ये जावे, असा होत नाही. हा प्रश्न मी प्रलंबित ठेवतो. दिनांक 2 ऑगस्ट, 2007 रोजी हा प्रश्न घेण्यात येईल.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, ही मंत्रिमंडळाची सामूहिक जबाबदारी आहे. एखाद्या खात्याला राज्यमंत्री नसेल तर मंत्रिमंडळातील अन्य मंत्री महोदयांनी प्रश्नाला उत्तर द्यावयास पाहिजे. सभापती महोदय, आपण दिलेला निर्णय अंतिम आहे. त्यासंदर्भात मी बोलत नाही. याची रेकॉर्डवर नोंद होऊ नये, म्हणून मी बोलत आहे. पुरवणी मागण्यांना अन्य मंत्री उत्तर देतात. मग या प्रश्नाला सुध्दा अन्य मंत्री महोदयांनी उत्तर द्यावयास पाहिजे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, ऊर्जा खात्याला राज्यमंत्री का नाही ?

**सभापती** : ऊर्जा विभागाला राज्यमंत्री नाही. संसदीय कार्य राज्यमंत्री श्री.सुनील देशमुख यांनी असे सांगितले की, ऊर्जा मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील खालच्या सभागृहात गेलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आपण म्हणालात की, इतर बाबतीत अन्य मंत्री उत्तर देऊ शकतात. त्याप्रमाणे ऊर्जा मंत्र्यांनी अन्य मंत्री महोदयांवर ही जबाबदारी सोपविण्यास काही हरकत नव्हती. मी हा प्रश्न प्रलंबित ठेवतो. दिनांक 2 ऑगस्ट, 2007 रोजी हा प्रश्न घेण्यात येईल.

--------

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>तारांकित प्रश्न क्र.31151.</u>**

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र जैन सभागृहामध्ये उपस्थित नाहीत आणि सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड हे देखील सभागृहामध्ये उपस्थित नाहीत.

**सभापती** : मी त्यांना माझ्या दालनात बोलावून घेईन.

--------

..3...

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,**
**नागपूर यांचे कार्यालयातील प्रलंबित समस्या**

**(११) * २९४३१ श्री. जी. एल. अैनापूरे , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख : तारांकित प्रश्न क्रमांक २५३९९ ला दिनांक २ एप्रिल, २००७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागातील एम.सी.व्ही.सी. व द्विलक्षी अभ्यास क्रमाकडील शिक्षक, निदेशक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या प्रलंबित समस्या अ) प्रलंबित वेतनवाढी अदा करणे, वैद्यकिय प्रतिपूर्ती उर्वरित ४४ प्रकरणे, सन २००२-२००३ पासून पुढील वर्षीच्या भविष्य निर्वाह निधीच्या हिशोब चिठ्ठया/पावत्या वितरित करणे, इत्यादी प्रकरणे निकाली काढण्यासाठी सहकार्य न करणाऱ्या संस्थेवर कार्यवाही करणे याबाबतच्या शासन कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(२) प्रकरणे निकाली काढली असल्यास, कोणती, व किती,

(३) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुरेश शेट्टी, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता :** (१) व (२) नागपूर विभागातील एस.सी.व्ही.सी. व द्विलक्षी अभ्यासक्रमाकडील शिक्षक, निर्देशक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या प्रलंबित वेतनवाढीबाबतच्या प्राप्त सर्व प्रकरणांवर कार्यवाही करण्यात आली आहे. वैद्यकीय प्रतिपूर्तीबाबतच्या ४४ प्रकरणांपैकी १३ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून ४ प्रकरणांवर संचालक, व्यवसाय शिक्षण यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे. उर्वरित २७ प्रकरणांबाबत संबंधित संस्थांकडून त्रुटीची पूर्तता करुन सुधारित प्रस्ताव अद्याप प्राप्त झालेले नाहीत.

सन २००२-२००३ मधील ९३३ कर्मचाऱ्यांच्या सुरुवातीपासूनच्या भविष्य निर्वाहनिधीच्या हिशोब चिठ्ठयांपैकी ८६८ चिठ्ठया निर्गमित करण्यात आल्या आहेत. उर्वरित ६५ कर्मचाऱ्यांच्या पावत्या तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सन २००३-२००४, २००४-२००५ व २००५-२००६ या वर्षाच्या अनुक्रमे ८५६,८५६ व ८२५ भविष्य निर्वाहनिधीच्या हिशोब चिठ्ठया निर्गमित करण्यात आल्या आहेत. प्रलंबित प्रकरणाबाबत विभागीय स्तरावरुन संबंधित संस्थाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) नागपूर विभागातील उपरोक्त संदर्भातील बहुतांशी प्रलंबित प्रकरणांवर कार्यवाही करण्यात आली आहे. तथापि, काही प्रकरणांच्या संदर्भात काही संस्थांकडून प्राप्त झालेल्या अभिलेख्यामध्ये त्रुटी असल्यामुळे प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात विलंब होत आहे.

श्री.जी.एल.अैनापूरे : सभापती महोदय, नागपूर विभागातील एम.सी.व्ही.सी. व द्विलक्षी अभ्यास क्रमाकडील शिक्षक, निदेशक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या समस्या ब-याच काळापासून प्रलंबित आहेत. लेखी उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "वैद्यकीय प्रतिपूर्तीबाबतच्या ४४ प्रकरणांपैकी १३ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून ४ प्रकरणांवर संचालक, व्यवसाय शिक्षण यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे. उर्वरित २७ प्रकरणांबाबत संबंधित संस्थांकडून त्रुटीची पुर्तता

..४...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. २९४३१.......

श्री.जी.एल.अैनापूरे .......

करुन सुधारित प्रस्ताव अद्याप प्राप्त झालेले नाहीत." माझा पहिला प्रश्न असा आहे की, ही प्रकरणे एका महिन्याच्या आत निकाली काढली जातील काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, याला जबाबदार असणा-या संस्थेवर शासन कारवाई करील काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जी.एल.अैनापुरे यांनी सांगितले की, २४ प्रकरणे प्रलंबित आहेत. संस्था चालकांनी शासनाकडे माहिती न पाठविल्यामुळे २४ प्रकरणे प्रलंबित आहेत. संस्था चालकांकडून माहिती मागवून घेण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. ती माहिती आल्यानंतर लवकरच ही २४ प्रकरणे क्लिअर केली जातील.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, पहिला प्रश्न वेतनवाढीच्या संदर्भात आहे. नोकरीला ४-५ वर्षे पूर्ण होऊन सुध्दा त्यांना वेतनवाढ देण्यात आलेली नाही. शासन असे म्हणते की, दोन वर्षे पूर्ण झाल्यानंतर नियमाप्रमाणे ते ॲटोमॅटीक कन्टीन्यू होतात. कन्टीन्यू होऊन सुध्दा त्यांना वेतनवाढ दिली जात नाही. संस्था चालक शासनाकडे जाणूनबुजून प्रकरणे पाठवित नाहीत. संस्थेला ताबडतोब पत्र पाठवून या सर्व प्रकरणांची माहिती घेऊन, त्या प्रकरणांची तपासणी करुन एक महिन्याच्या आत किंवा दोन महिन्यांच्या आत .....

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे आपल्याला प्रश्न विचारावयाचा नाही असे मी समजतो. आता प्रश्नोत्तराचा तास संपला.

यानंतर श्री.गागरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MAP/ MAP/ SBT/ SBT/ पूर्वी श्री.बोरले 13:50

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, मी उपप्रश्न विचारला आहे. त्या प्रश्नाचे मला उत्तर हवे आहे.

**सभापती** : दुपारी 12.59 ला प्रश्नोत्तराचा तास सुरु झाला होता. प्रश्नोत्तराचा तास संपल्याची मी नुकतीच घोषणा केलेली आहे. माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यांनी उपप्रश्न विचारला आहे परंतु प्रश्नोत्तराचा तास संपल्यामुळे मंत्री महोदयांनी उत्तर देण्याची आवश्यकता नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, काल मी 289 अन्वये प्रस्ताव चर्चेला घेण्याची विनंती केली होती. याबाबत शासनाने निवेदन करण्याचे आपण निदेश दिले होते, परंतु आजही निवेदन केलेले नाही. याबाबत मी विनंती करतो शासनाने लवकर निवेदन करावे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी जो प्रस्ताव मांडला होता, त्याबाबत शासनास निवेदन करण्यास सांगितले होते, त्याचे काय झाले ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, निवेदनाचे पत्र मी आपल्याकडे सादर केलेले आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: अतारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे.

विशेष कार्य अधिकारी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी व आठवी  यादी सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी व आठवी  यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी)

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....3

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

डॉ.सुनील देशमुख (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा (पुणे) सन 2005-2006 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचा (ठाणे) सन 2003-2004 व 2004-2005 च्या लेख्यावरील लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री.राणा जगजितसिंह पाटील (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सन 2003-2004 चे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----

डॉ.सुनील देशमुख (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महिला आर्थिक विकास महामंडळ मर्यादितचा सन 1992-93 चा अठरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

डॉ.सुनील देशमुख (अर्थ व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने 2006-2007 या वर्षात स्थायी पदांत रुपांतरित केलेल्या अस्थायी पदांसंबंधीचे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

-----

.....4





**विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगदीश गुप्ता (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा सहावा व सातवा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





**इतर मागासवर्गीय कल्याण समितीचा अनुपालन अहवाल सादर करणे**

श्री.केशवराव मानकर (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने इतर मागासवर्गीय कल्याण समितीचा तिसरा अनुपालन अहवाल सभागृहाला सादर करतो.

सभापती महोदय, राज्यातील महानगरपालिकेसंबंधीच्या पहिल्या अहवालातील शिफारशीवरील शासनाने केलेल्या कारवाईवरील समितीचा अनुपालन अहवाल सादर करीत आहे.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मानकर .....

सभापती महोदय, इतर मागासवर्ग कल्याण समिती स्थापन झाल्यानंतर समितीने सभागृहास पहिला अहवाल दिनांक 19 एप्रिल, 2006 रोजी सादर करून एका वर्षाच्या कालावधीत शासनाने या समितीच्या पहिल्या अहवालावरील अनेक महत्त्वाच्या शिफारशींवर कारवाई केली आहे. बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन (बेस्ट) व राज्यातील 19 महानगरपालिकांच्या प्रशासनाने व शासनाने या अहवालातील शिफारशींची दखल घेऊन इतर मागास प्रवर्गास या समितीच्या माध्यमातून समितीने न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.

इतर मागासवर्गीय प्रवर्गाच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या भरती, बढती, आरक्षण, पदोन्नती, बिंदूनामावली (रोस्टर), जातीच्या प्रमाणपत्रांची पडताळणी तसेच इतर मागासवर्गीयांसाठी शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांबाबतही समितीने या अनुपालन अहवालात उहापोह केलेला आहे. समितीने सादर केलेल्या या अनुपालन अहवालातील महत्त्वाच्या शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत ...

1) महानगरपालिकांच्या वर्ग 1 ते 4 यातील विविध संवर्गातील शासनाने मंजूर केलेल्या पदांमधील इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या रिक्त पदांचा अनुशेष तातडीने भरण्यात यावा.

2) राज्यातील अनेक महानगरपालिकांचा आस्थापना खर्च 35 टक्केपेक्षा कमी आणण्यासंबंधी उपाय योजना करून अनुशेषाची इतर मागासवर्गांची पदे भरताना 35 टक्के आस्थापना खर्चाची अट ही पदे भरताना शिथिल करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

3) वर्ग 1 ते 4 या संवर्गातील बिंदूनामावल्या (रोस्टर) अद्ययावत ठेवण्यात येऊन इतर मागासवर्ग कक्षाच्या सहाय्यक आयुक्तांकडून तपासणी करून घेण्यात याव्यात.

4) महानगरपालिकांमधील इतर मागासवर्गाचे अधिकारी/कर्मचारी तसेच नगरसेवक यांची जातीची प्रमाणपत्रे जात पडताळणी समितीकडून त्वरित झाली नाही त्यांना त्वरित पाठपुरावा करून पडताळणी करून घेण्यात यावी.

5) अनेक जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांच्या कार्यालयांमध्ये सादर केलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची जात पडताळणी करताना अनेक त्रुटी/अडचणी येतात व त्यामुळे अनेक वेळा विलंब होतो. यासंबंधी समितीने अशी शिफारस केली आहे की, प्रधान सचिव, सामाजिक न्याय, आदिवासी विकास, सामान्य प्रशासन, महानगरपालिकांचे अधिकारी, जातपडताळणी समितींचे अधिकारी, विशेष

....... यूयू 2 ...

श्री. मानकर ....

जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी एकत्र बसून जात प्रमाणपत्र पडताळणी प्रकरणे त्वरित निकाली काढण्याबाबतचे नियोजन करून त्वरित कारवाई करण्यात यावी.

6) एकाकी पदांबाबत (एकल पदे) समान अर्हता, समान वेतन, समान कामाचे स्वरूप असेल तर ती पदे एकाकी पदे न मानता त्या सर्व पदांना एकत्रित करून (club) त्यावर इतर मागासवर्गाच्या प्रवर्गाचा अनुशेष काढण्यात यावा.

7) मराठवाडा व विदर्भ या भागातील महानगरपालिकांमध्ये असणारी शिक्षण समिती ही शिक्षण मंडळामध्ये वर्ग करून महानगरपालिकांच्या आयुक्त व शिक्षण उपसंचालक यांच्या कार्यकक्षेत आणण्याबाबत शासनाने योग्य ती पावले उचलून संपूर्ण राज्यात एकसूत्रीपणा येण्याबाबत शिफारस केली आहे.

8) राज्यातील विविध महानगरपालिकांमध्ये सेवा प्रवेश नियमावलीमध्ये एकसूत्रीपणा नसल्याने महानगरपालिका व अधिकारी/कर्मचारी यांचे नुकसान होते. समितीने या सर्व बाबींवर विचार करून राज्यातील सर्व महानगरपालिकांमध्ये एकसूत्रीपणा आणण्याबाबत सेवा प्रवेश नियमावली तयार करण्यात येऊन त्याची राज्यात सर्व महानगरपालिकांमध्ये अमलबजावणी करण्यात यावी अशी शिफारस केली आहे.

**( सभापतीस्थानी - माननीय उपसभापती )**

**उपसभापती** : इतर मागासवर्ग कल्याण समितीचा तिसरा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

***

...... यूयू 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 अन्वये सूचना**

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर यांनी "नागपूर जिल्ह्यातील भिवापूर तालुक्यातील जवळपास 30 ग्रामपंचायतीची वीज बिलांच्या थकित रकमेमुळे नळ योजनेची पाईपलाईन कपात करण्यात आल्याने पावसाळ्यात बऱ्याच गावात लोकांना गढूळ पाणी प्यावे लागल्याने गॅस्ट्रो आणि साथीच्या रोगाची लागण होऊन प्राणहानी होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याबाबत" नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी याबाबत निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, संजय केळकर यांनी "दिनांक 1 नोव्हेंबर 2006 पासून महाराष्ट्र शासनाने कुठलाही कायदा न करता किंवा लेखी आदेश न काढता मुंबई महानगरपालिका, म्हाडा व कलेक्टरच्या जमिनींवरील एसआरए योजना स्वीकारणे बंद केल्याने लोकांचे मोफत घर मिळण्याचे स्वप्न भंग पडल्याबाबत.." या विषयी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी याबाबत निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते यांनी " शासनाने मुंबईतील तबेले वसई तालुक्यात हलविण्याबाबत निर्णय घेतल्याने तबेलांच्या सांडपाणी व मलमूत्र यामुळे वसई परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे व रोगराई पसरण्याचा धोका वाढल्याबाबत.." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. . तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी याबाबत निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर, श्री.जगदीश गुप्ता यांनी "..अंधेरी पूर्व मुंबई येथील चिनॉय कॉलेजमध्ये प्रवेशासंबंधी निर्माण झालेली समस्या सोडविण्यासाठी लक्ष्मी एज्युकेशन ट्रस्ट अपयशी ठरल्याबाबत.." या विषयी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. . तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी याबाबत निवेदन करावे.

( यानंतर श्री. सरफरे .... व्हीव्ही 1 ....

**उपसभापती**...

माननीय सदस्य सर्वश्री व्ही. यू. डायगव्हाणे, बी. टी. देशमुख, वसंतराव खोटरे, वि.प.स. यांनी "वर्धा जिल्हयात अंध, मूकबधिर, मतिमंद, अस्थिव्यंग विद्यार्थ्यांच्या शासनमान्य अनुदानित शाळांना पुरेसे विद्यार्थी उपलब्ध होत नसताना बनावट कागदपत्राच्या आधारे अपंग विद्यार्थ्यांच्या अकरा नवीन शाळांना शासनाने निकष डावलून परवानगी दिल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. सूचनेतील विषय नियम 93 अन्वये होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने यावर निवेदन करावे.

इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : वर्तकनगर (जि. ठाणे) येथील म्हाडाच्या धोकादायक इमारतीमधील रहिवाश्यांमध्ये पसरलेले भीतीचे वातावरण

मु.शी. : वर्तकनगर (जि. ठाणे) येथील म्हाडाच्या धोकादायक इमारतीमधील रहिवाश्यांमध्ये पसरलेले भीतीचे वातावरण याबाबत सर्वश्री जयंत प्र.पाटील, शरद पाटील वि.प.स. यां-नी दिलेली -नियम 93 अ-वये सूच-ना.

ॲड. प्रीतकुमार शेगावकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र. पाटील, शरद पाटील यां-नी "वर्तकनगर (जि. ठाणे) येथील म्हाडाच्या धोकादायक इमारतीमधील रहिवाश्यांमध्ये पसरलेले भीतीचे वातावरण".या विषयावर -नियम 93 अ-वये जी सूच-ना दिली होती, तिला अ-नुल□-न, आप□ -निदेश दिल्याप्रमा□ मला -निवेद-न □रावयाचे आहे. -निवेद-नाच्या प्रती सदस्यां-ना अ□दरच वितरीत □लेल्या असल्या-ने मी हे -निवेद-न सभा□ाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : -निवेद-न सभा□ाच्या पटलावर ठेव□यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे -निवेद-न छापावे.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, वर्तक नगर (जि. ठाणे) येथील म्हाडाच्या वसाहतीमधील 48 इमारतींपैकी 6 अतिधोकादयक असलेल्या इमारतीमधील रहिवाश्यांची इतरत्र सोय शासनाने केली आहे काय?

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, सर्व इमारतीमधील रहिवाश्यांची सोय केलेली नाही. परंतु जी धोकादायक इमारत आहे त्यामधील रहिवाश्यांची सोय केली आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, 48 पैकी 6 इमारती धोकादायक आहेत. त्या इमारती पडल्यानंतर व माणसे मेल्यानंतर आपण त्यांची सोय करणार काय?

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, इमारत क्रमांक 22 मधील रहिवाश्यांचे स्थलांतरण करण्यात आले आहे.बाकीच्या रहिवाश्यांची सोय केलेली नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, बाकीच्या 5 इमारतीमधील रहिवाश्यांचे स्थलांतरण करणार काय?

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, आवश्यकता भासल्यास स्थलांतर करण्यात येईल.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी आता एकच इमारत धोकादायक असल्याचे सांगितले. तेव्हा उर्वरित इमारती धोकादायक आहेत काय? त्या इमारतीमधील रहिवाश्यांचे आपण स्थलांतर करणार काय?

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, सहा इमारती धोकादायक असल्या तरी एका इमारतीमधील रहिवाश्यांचे स्थलांतरण करण्यात आले आहे. बाकीच्या रहिवाश्यांचे स्थलांतरण झ ालेले नाही.

**उपसभापती** : मंत्रिमहोदय, वर्तकनगर मधील म्हाडाच्या जेवढया इमारती आहेत त्यापैकी बऱ्याचशा इमारतीमधील रहिवाश्यांनी स्वत: सोसायटया स्थापन करुन इमारतीचा पुनर्विकास करण्याचा प्रस्ताव म्हाडाकडे सादर केला आहे. म्हाडाकडे त्या इमारतीच्या दुरुस्तीकरिता पैसे नाहीत ही वस्तुस्थिती आहे. अशाप्रकारे यापूर्वी देखील म्हाडाच्या इमारतीमधील रहिवाश्यांनी सोसायटया स्थापन करुन त्यांनी इमारतीच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर केल्यानंतर त्यांना म्हाडाकडून परवानगी देण्यात आलेली आहे. इतकेच नव्हेतर या म्हाडाच्या धोकादायक असलेल्या

DGS/

**उपसभापती**....

इमारतीमध्ये पोलीस खात्यातील कर्मचारी देखील रहात आहेत. त्या इमारतीच्या दुरुस्तीकरिता पोलीस खात्याकडे सुध्दा पैसे नाहीत. त्यामुळे त्यांनी देखील सोसायटया स्थापन करुन पुनर्विकासाचा प्रस्ताव म्हाडाकडे सादर केला आहे. तेथील रहिवाश्यांनी सोसायटी स्थापन करुन त्या इमारतीची म्हाडा जी किंमत ठरवून देईल ती म्हाडाला देऊन त्यांचा पुनर्विकास करण्यास आम्ही तयार आहोत अशाप्रकारचा प्रस्ताव दिला आहे. व त्याबाबत गेली दोन वर्षे सातत्याने या सभागृहामध्ये हा विषय उपस्थित केला जात आहे. वास्तविक पहातां तेथील सर्व नागरिकांची पुनर्विकासाची तयारी असल्यामुळे म्हाडाने त्यांना एन.ओ.सी. दिली पाहिजे ती अजूनपर्यंत दिली नाही. या धोकादायक इमारतींचा धोका आणखी वाढला, त्यामधील एक-दोन इमारती पडल्या व त्यामध्ये बरेच रहिवाशी मेल्यानंतर आपण जागे होणार कां? म्हणून या संदर्भात माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, संबंधित इमारतीमधील सोसायटयांचे पदाधिकारी आणि म्हाडाचे अधिकारी यांची एकत्र बैठक बोलावून याबाबतच्या सूचना देण्यात याव्यात. आणि यामधील कायदेशीर बाबींना अधीन राहून ज्यांनी ज्यांनी पुनर्विकास करण्याची परवानगी मागितली आहे त्यांना नियमामध्ये बसत असेल किंवा नसेल तरी देखील त्यांना ना हरकत प्रमाणपत्र देऊन त्या लोकांची होणारी जीवितहानी वाचवावी आणि त्यांना संरक्षण द्यावे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांकडे गृहनिर्माण विभागाचा चार्ज आहे. माननीय राज्यमंत्र्यांकडे मर्यादित अधिकार असल्यामुळे ते याबाबतीत निर्णय घेऊ शकत नाही. याठिकाणी 48 इमारतीमधील रहिवाश्यांनी मालकी हक्क मिळण्याकरिता अर्ज केल्यानंतर देखील त्यांना एन.ओ.सी. दिलेली नाही. त्या रहिवाश्यांचे जीवन धोक्यात आहे याची म्हाडाला फिकीर नाही. अशा परिस्थितीत माननीय मुख्यमंत्र्यांनी निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. तो त्यांनी घ्यावा अशी माझी विनंती आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर : आपण या संदर्भात एक बैठक बोलवावी.

**उपसभापती** : मी बैठक बोलावणार नाही. परंतु शासनाने बोलावली तर त्या बैठकीला मी उपस्थित राहीन.

मी मंत्री महोदयांना पुन्हा एकदा समजावून सांगतो. वर्तकनगर, ठाणे येथे वसाहत आहे. त्या ठिकाणच्या इमारती ह्या जवळपास 30-40 वर्षापूर्वीच्या जुन्या आहेत. या इमारती दुरूस्त करण्याच्या पलीकडे गेलेल्या आहेत, त्याची दुरुस्ती होऊ शकणार नाही. काही अटींवर आणि नियमानुसार या सगळ्या इमारतींचा पुनर्विकास करण्याच्या संदर्भातील कार्यवाही सुरू झालेली परंतु या सगळ्या लोकांनी पैसे भरून देखील म्हाडाने आवश्यक ती एनओसी न दिल्यामुळे पुढची प्रक्रिया थांबलेली आहे, त्यांना कायद्याने हक्क प्राप्त झालेला नाही. त्याबरोबर त्या ठिकाणी म्हाडाने पोलीस कर्मचाऱ्यांसाठी इमारती दिलेल्या आहेत. त्या ठिकाणी पोलीस कर्मचारी रहातात त्यांची देखील मागणी आहे. त्या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत. या संदर्भात बांधकाम विभागाने इमारतींची पहाणी करून पोलीस आयुक्तालयाला इमारती दुरुस्त करण्यासंबंधीचा अहवाल दिलेला आहे. दुरुस्तीसाठी 72 लाखाचा खर्च अपेक्षित केलेला आहे. तेवढा खर्च पोलीस आयुक्तालय करू शकत नाही. त्या ठिकाणी गरीब लोक रहातात. त्या ठिकाणच्या धोकादायक इमारती झालेल्या आहेत. माननीय मुख्यमंत्री महोदय, येथे उपस्थित नसले तरी त्यांच्या कानावर ही चर्चा जाईल. मंत्री महोदय, या सगळ्या लोकांची बैठक बोलावून एक महिन्या आत यासंबंधात निर्णय घ्यावा.

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : वस्तुस्थिती अशी आहे की, त्या ठिकाणच्या धोकादायक इमारती आहेत. त्याशिवाय त्या ठिकाणी पोलीस वसाहत आहे. त्यांनी कंन्ट्रक्शनचे पैसे भरलेले नसल्यामुळे त्या इमारती हस्तातरित झालेल्या नाहीत. 72 इमारती आणि 19 बैठ्या चाळींचे हस्तांतरण झालेले आहे. ज्या इमारतींचे हस्तातरण झालेले नाही, त्यांनी पैसे भरलेले नाहीत. पुनर्विकास करण्यासाठी दोन इमारतींचे प्रस्ताव आलेले आहेत, त्यामुळे एनओसी देण्याचा प्रश्न नाही. आमची इच्छा आहे की, त्या ठिकाणचा पुनर्विकास झाला पाहिजे. पण पोलिसांनी 20 लाख रुपये भरलेले नाहीत,त्याचबरोबर त्यांनी दुसरे 2 लाख 70 हजार रुपये भरलेले नाहीत, त्यामुळे त्यांच्या इमारतींचे हस्तांतरण झालेले नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/

**उपसभापती** : पोलिसांनी ही रक्कम भरायची नाही. पोलिसांच्या पगारातून घरभाडे कापले जाते. ते पैसे शासनाच्या गृह विभागाने आपल्या विभागाकडे वर्ग करायचे आहेत.

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : त्यांचे पैसे भरलेले नाहीत.

श्री.मधुकर चव्हाण : 20 लाख रुपये हे नगण्य आहेत, तेव्हा गृह विभाग हे पैसे भरण्याची कार्यवाही करेल काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : त्यांची मागणी आली तर निश्चितपणे पैसे देण्यात येतील.

**उपसभापती** : गृह राज्यमंत्री महोदय आपल्या विभागाकडे पोलिसांच्या मागणीचा प्रस्ताव येऊन जवळपास चार वर्षे झालेली आहेत व तो तसाच पडलेला आहे. माझी सूचना अशी की, पोलीस महासंचालक, पोलीस आयुक्त आणि पोलीस कर्मचारी सोसायटीचे पदाधिकारी यांची आपण संयुक्त बैठक बोलवावी.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ......

त्यामध्ये म्हाडाचे सी.ई.ओ. किंवा जे संबंधित असतील त्यांना बोलवावे. अशा प्रकारची बैठक येत्या 15 दिवसामध्ये बोलविणार काय ? त्यामध्ये डी.जी., पोलीस कमिशनर, म्हाडाचे सी.ई.ओ, गृह राज्यमंत्री आणि म्हाडाचे पदाधिकारी तसेच पोलीस संघटनेचे ठाण्याच्या सोसायटीचे पदाधिकारी यांची बैठक बोलविणार काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, होय.

श्री. दिवाकर रावते : हा म्हाडाचा प्रश्न आहे.....

**उपसभापती** : त्या ठिकाणी पोलिसांच्या सोसायट्या आहेत. त्यामुळे त्यांनी हिरवा कंदील दिला पाहिजे. माननीय मंत्रिमहोदय म्हणतात की, आम्ही तयार आहोत. याबाबत संयुक्त बैठक बोलवावी.

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, आपण सांगितल्याप्रमाणे संबंधितांची बैठक बोलविण्यात येईल. पुनर्विकासाच्या संदर्भात नियमानुसार कार्यवाही करु.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मराठवाड्यात अत्यंत कमी प्रमाणात पाऊस पडल्यामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होणे

**मु. शी.** : मराठवाड्यात अत्यंत कमी प्रमाणात पाऊस पडल्यामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होणे याबाबत सर्वश्री श्रीकांत जोशी, पाशा पटेल, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राणा जगजितसिंह पाटील ( कृषी राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, पाशा पटेल यांनी "मराठवाड्यात अत्यंत कमी प्रमाणात पाऊस पडल्यामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, मराठवाड्यामध्ये खरीपाची पेरणी झाल्यानंतर जवळपास 21 दिवसांपर्यंत पाऊस न पडल्यामुळे सोयाबीन, मूग आणि उडीद अशी अडीच ते तीन महिन्यांमध्ये येणारी जी पिके आहेत त्या पिकांच्या वाढीच्या काळातच पाऊस नसल्यामुळे पिकांची वाढ खुंटलेली आहे. त्याला 100 टक्के विमा मिळणार काय ?

श्री. राण जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, शासन जी मदत देत असते ती 50 टक्केपेक्षा जास्त नुकसान झाले तर देते. परंतु विम्याचा जो विषय आहे त्यामध्ये जे उंबरठा उत्पन्न आहे ते पाहून योग्य तो निर्णय होईल. यासाठी वेगळी कार्यवाही नाही.

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP

**पृ. शी.** : पनवेल तालुक्यातील ब्रिटीश कालीन मोरबे धरणाची देखभालीअभावी दुरावस्था होणे

**मु. शी.** : पनवेल तालुक्यातील ब्रिटीश कालीन मोरबे धरणाची देखभाली अभावी दुरावस्था होणे याबाबत श्री जयंत प्र. पाटील व प्रा. शरद पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ. सुनील देशमुख ( जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील, प्रा. शरद पाटील यांनी "पनवेल तालुक्यातील ब्रिटीश कालीन मोरबे धरणाची देखभालीअभावी दुरावस्था होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या धरणाच्या बांधकामात अल्प प्रमाणात गळती झालेली आहे याचे कारण काय ? अल्प प्रमाणात होणाऱ्या गळतीमुळे भविष्यात धरणाला धोका निर्माण होणार आहे काय ?

डॉ. सुनील देशमुख : हे जुने दगडी बांधकाम आहे. बाहेरच्या बाजूला दगडधोंडे निसटल्यामुळे अल्प प्रमाणात गळती होत आहे. जे दगड निघालले आहेत त्या ठिकाणी कॉन्क्रीटची दुरुस्ती करणे इत्यादी कामासाठी 10 लाख रुपये खर्च करुन धरण सुस्थितीत आणण्यात येईल.

-----

....6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पू. शी**. : राज्यातील आदिवासी कोळी समाजाला जातीचे दाखले न मिळणे

**मु. शी**. : राज्यातील आदिवासी कोळी समाजाला जातीचे दाखले न मिळणे याबाबत सर्वश्री मधुकर सरपोतदार, पांडुरंग फुंडकर, अरविंद सावंत, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ. विजयकुमार गावित ( मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार, पांडुरंग फुंडकर, अरविंद सावंत यांनी "राज्यातील आदिवासी कोळी समाजाला जातीचे दाखले न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...7 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, महादेव कोळी समाजाच्या संदर्भातील हा अतिशय गंभीर विषय आहे. हा प्रश्न गेली अनेक वर्षे प्रलंबित आहे. यासंदर्भामध्ये शासनाने एकदा निर्णय घेऊन या समाजाला रिलीफ द्यावा आणि त्यांचा प्रश्न एकदा मार्गी लावावा म्हणून ही नियम 93 ची सूचना दिलेली आहे. या ठिकाणी शासनाने जे निवेदन केलेले आहे त्यामध्ये शासनाने ते मान्य केलेले नाही. या ठिकाणी नेहमीप्रमाणे ठराविक ढाच्याचे उत्तर दिलेले आहे. इतर समाजाला सवलती देत असताना महादेव कोळी समाजाला त्यातून वगळण्याचे कारण काय ?

डॉ. विजयकुमार गावीत : सभापती महोदय, महादेव कोळी समाजाला जातीचा दाखला देण्यामधून वगळलेले नाही. जातीचा दाखल देण्याच्या बाबतीत जे काही निकष ठरवून दिलेले आहेत त्यामध्ये जे जे बसत असतील त्यांना आपण हे दाखले देत असतो.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. विजयकुमार गावित...

महादेव कोळी जातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी आतापर्यन्त 3242 अर्ज आलेले असून त्यामधील 1107 अर्ज पात्र ठरलेले असून 29 अपात्र ठरलेले आहेत. उर्वरित अर्ज प्रलंबित आहेत. या प्रमाणे जे निकषात बसतात त्यांना आपण दाखले देत आहोत.

श्री. पांडुरंग फुंडकर : जे निकषात बसतात त्यांना जातीचे दाखले देण्यात येत आहेत हे मान्य आहे. परंतु पूर्वी ज्यांना महादेव कोळी म्हणून जातीचे प्रमाणपत्र दिलेले आहे त्याची वैधता तपासण्यात येत आहे. मध्यंतरी शासनाने हे निकष बदलले. 1990 पासून महादेव कोळींना जातीचे दाखले देणे बंद केलेल होते. पूर्वी ज्यांना महादेव कोळी अशा प्रकारचे जातीचे प्रमाणपत्र दिलेले आहे त्यासंदर्भात निकष बदलण्याची कारणे काय आहेत ?

डॉ. विजयकुमार गावित : हे निकष प्रथम पासूनच ठरलेले असून ते बदललेले नाहीत. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी हे निकष बदलण्यात आल्याचे सांगितले. मी पुनश्च सांगतो की, हे निकष बदललेले नसून पूर्वीच्या निकषाप्रमाणेच जातीचे दाखले देण्यात येत आहेत. आतापर्यन्त 3242 अर्ज आलेले आहेत. त्यापैकी 1107 लोकांना जातीचे प्रमाणपत्र दिलेले आहेत.

मेजर सुधीर सावंत : ज्यांनी 30 वर्षे सेंट्रल बॅक, बॅंक ऑफ इंडिया, रेल्वे, पोस्ट यामध्ये नोकरी केलेली आहे आणि ज्यांना पूर्वी जातीची प्रमाणपत्रे दिलेली आहेत त्यांना आता नोकरीतून काढून टाकण्यात येत आहे. आता हे कर्मचारी जरी केन्द्र सरकरच्या उपक्रमातील असले तरी ते महाराष्ट्राचे रहिवाशी आहेत. सेंट्रल बॅंकेतील जवळ जवळ 4 हजार कर्मचा-यांचा अशा प्रकारचा प्रश्न निर्माण झालेला आहे. या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय केन्द्रीय अर्थमंत्र्यांना पत्र लिहिण्याचे मान्य केले होते. तेव्हा या आपल्या राज्यातील केन्द्र सरकारच्या कर्मचा-यांना संरक्षण देण्याच्या बाबतीत शासन काही कृती करील काय ?

डॉ. विजयकुमार गावित : माझ्या माहिती प्रमाणे एका बॅंकेतील केस सुप्रीम कोर्टामध्ये गेल्यानंतर सुप्रीम कोर्टाने, ते त्या विशिष्ट जमातीचे आहेत की नाहीत हे तपासण्यासाठी जे दाखले दिलेले आहेत ते सर्व तपासून घ्यावेत, अशा प्रकारचा निर्णय दिलेला आहे. त्यामुळे केन्द्र सरकारच्या कार्यालयातूनही जात पडताळणी सुरु झालेली आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सुप्रीम कोर्टाने महादेव कोळी याबाबतीत निर्णय दिलेला नाही. तो जनरल केसच्या संदर्भातील निर्णय आहे.

डॉ. विजयकुमार गावित : 15 जून 1995 पूर्वी जे नोकरीस लागले होते त्यांना आपण संरक्षण दिलेले होते. हे संरक्षण दिल्यानंतर एक कर्मचारी हायकोर्टामध्ये गेला. हायकोर्टाने त्याला कंटिन्यू करता येणार नाही असा निर्णय दिला. त्यानंतर तो कर्मचारी सुप्रीम कोर्टात गेला. सुप्रीम कोर्टाने असा निर्णय दिला की, या संदर्भात 2001मध्ये कायदा झालेला आहे. 15 जून 1995 च्या आधीच्या लोकांना आदेश काढून संरक्षण दिलेले आहे. प्रशासकीय नियमापेक्षा अधिनियमातील तरतुदी श्रेष्ठ आहेत. त्यामुळे त्याला नोकरीवर ठेवता येणार नाही.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी महादेव कोळी जातीच्या लोकांना जातीचे प्रमाणपत्र मिळत नसल्यासंबंधी नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. याप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये ठाकर नावाचा समाज हा एसटीमध्ये होता आणि त्या समाजाला एसटीच्या सर्व सायी-सुविधा उपलब्ध होत होत्या.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी........

मध्यंतरीच्या काळामध्ये ज्यावेळी या लोकांना एस.टी.या प्रवर्गामध्ये घेतलेले होते आणि नंतर त्यांना एन.टी.मध्ये घेतले गेले. त्यानंतर या लोकांनी आपल्याला एस.टी.मध्येच घ्यावयाला पाहिजे अशाप्रकारे शासनाच्या निर्णयाला हायकोर्टामध्ये आव्हान दिले. हायकोर्टाने त्या लोकांचे म्हणणे ग्राहय धरले आणि त्यांना एस.टी.मध्येच ठेवले पाहिजे, त्यांना एन.टी.मध्ये ठेवण्याचा जो निर्णय राज्यशासनाने घेतलेला होता, तो चुकीचा होता असा निर्णय हायकोर्टाने दिला. त्यानंतर शासनाने हायकोर्टाच्या निर्णयाविरुध्द सुप्रिम कोर्टामध्ये अपिल केल्यानंतर केंद्राने व सुप्रिम कोर्टाने हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाला ग्राहय धरले. एवढे होऊन सुध्दा शासन यासंदर्भात काहीही कारवाई करीत नाही. सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी सांगितले की,आज ही ठाकर समाजातील माणसे जी नोकरीला आहेत,शिक्षक आहेत,शासकीय नोकरीमध्ये आहेत,जातपडताळणीचे प्रमाणपत्र त्यांना आपण देत नाही आणि म्हणून या कारणासाठी त्यांना नोकरीमध्ये असतांना सुध्दा बाहेरचा रस्ता दाखविला जातो. सभापती महोदय, याबाबत आपणालाही माहिती आहे कारण यासंदर्भात आपल्या दालनामध्ये एक बैठक उपस्थित करण्यात आली होती. सदर बैठकीस मीही उपस्थित होतो. या बैठकीमध्ये मी व माननीय श्री.आर.आर.पाटील तत्कालीन ग्रामविकास मंत्री आम्ही दोघांनी दबाव आणला होता की, जातपडताळणी प्रमाणपत्र इश्यू करणारी जी समिती आहे, ती काही कोर्ट नाही ती एक क्वासी - ज्यूडिशियल ऑथॉरिटी आहे,त्यानंतर त्यांनी यासंदर्भामध्ये कोर्टामध्ये एक ॲफिडेव्हिट फाईल केले होते. सदर ॲफिडेव्हिटमध्ये असे म्हटलेले होते की, या राज्याचे तत्कालीन ग्रामविकास मंत्री म्हणजे आताचे माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील आणि या सदनाचे सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी आमच्यावर दबाव आणला होता.

माझा प्रश्न असा आहे की, ठाकर या समाजातील लोकांना जात पडताळणी सर्टिफिकेट इश्यू करण्याबाबत एखादी कमिटी नेमा म्हणजे ज्यांच्यावर अन्याय होत आहे,तो होणार नाही तसेच,यासंदर्भात अनेक आंदोलने देखील होत आहेत आणि त्याच्यावर कोणताही मार्ग निघत नाही. ज्यावेळी सभागृहामध्ये हा प्रश्न उपस्थित केला जातो, त्यावेळी एक विशिष्ट अशा प्रकारचे साचेबंद उत्तर माननीय मंत्रिमहोदयांकडून दिले जाते. यासंदर्भात आपण एक कमिटी नेमण्याबाबत विचार करणार का ?

ZZ - 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजयकुमार गावित : सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी सांगितले की, यासंदर्भात कमिटी नेमण्यात यावी या ठिकाणी सन्माननीय माजी मंत्री श्री.सुधीर जोशी यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमण्यात आली होती आणि अशा ब-याचशा कमिटया यासंदर्भात नेमण्यात आल्या होत्या आणि या सर्व कमिटयांच्या कामकाजातून जे निष्कर्ष निघालेले होते त्या निष्कर्षांवरच आजचे हे कामकाज चाललेले आहे. यासंदर्भात पुन्हा एखादी कमिटी नेमण्यात यावी, असे मला वाटत नाही.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अकोला महानगरपालिका क्षेत्रातील एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत चालविल्या जाणा-या अंगणवाडयांची देयके शासनाकडे प्रलंबित असण्याबाबत.

**मु.शी.**: अकोला महानगरपालिका क्षेत्रातील एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत चालविल्या जाणा-या अंगणवाडयांची देयके शासनाकडे प्रलंबित असण्याबाबत श्री.गोपिकिशन बाजोरिया व इतर वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हर्षवर्धन पाटील ( महिला व बालविकास मंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी सर्वश्री.गोपिकिशन बाजोरिया व इतर विधानपरिषद सदस्य यांनी अकोला महानगरपालिका क्षेत्रातील एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत चालविल्या जाणा-या 125 अंगणवाडयांना तेथील महिला बचत गट पोषण आहार पुरविण्याचे काम करत असून सदर पोषण आहाराची लाखो रुपयांची देयके ऑगस्ट,2006 पासून शासनाकडे प्रलंबित असणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती,तिला अनुलक्षून,आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या आसल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ZZ - 4

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सदर निवेदन क्रमांक 05 मध्ये सन्माननीय सदस्य श्री.गोपिकिशन बाजोरिया यांच्या व्यतिरिक्त इतर विधानपरिषद सदस्यांमध्ये आमचीही नावे आहेत.

**उपसभापती** : ठीक आहे. ज्या सन्माननीय सदस्यांची नावे यामध्ये आहेत, त्यांनी प्रश्न विचारावेत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय,काल टीव्हीवर देखील एक चित्रण दाखविण्यात आले होते की, महिला बचत गटांचे पैसे न दिल्यामुळे तेथे कुपोषित बालकांना आहार मिळत नाही. महिला बचत गटांचे 36 लाख रुपये शासनाने देणे बाकी आहे. महिला बचत गट सावकाराकडून पैसे घेऊन कुपोषित बालकांना आहार पुरविते.

श्री.पांडुरंग फुंडकर : यासंदर्भातील देयके शासनाकडे सादर करण्यात आली होती.

डॉ.दीपक सावंत : हे जे 36 लाख रुपयांचे देयक देणे बाकी आहे, ते किती दिवसांमध्ये शासनाकडून अदा केले जाईल ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय,सदर देयक येत्या 15 दिवसांमध्ये अदा करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सदर निवेदनामध्ये असे सांगितले आहे की, नोव्हेंबर,2006 पर्यंतचे आहाराचे देयक अदा करण्यात आलेले आहे परंतु डिसेंबर,2006 ते मार्च,2007 पर्यंतचे आहाराचे देयक बालविकास प्रकल्प अधिकारी,अकोला यांनी वेळेवर सादर न केल्यामुळे पाच कोटीचे देयक थकित राहिलेले आहे. अशाप्रकारे सहा - सहा महिने देयके सादर न करण्याची कारणे काय आहेत ? सदर देयके हेतुपुरस्सररीत्या सादर करण्यात येत नाही आहेत का ? देयके वेळेवर सादर न करणा-या अधिका-यांना आपण जाब विचारणार आहात का ?

यानंतर श्री.कानडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, श्री. आर.एल.खंडारे निवृत्त बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या कार्यकाळामध्ये ही सर्व बिले देण्यास विलंब झालेला आहे. त्यांनी सहा महिने ही सर्व बिले ठेऊन घेतली आणि त्यावर पुढील कारवाई केली नाही, म्हणून विलंब झालेला आहे. परंतु भविष्यकाळामध्ये निश्चितपणाने खबरदारी घेण्यात येईल आणि महिला बचत गटांमार्फत बिले दाखल झाल्यानंतर तात्काळ त्यासंदर्भातील पुढील कारवाई केली जाईल. तत्कालीन बालविकास प्रकल्प अधिकारी निवृत्त झाले नसते तर त्यांच्यावर निश्चित कारवाई केली असती.

--------

**नियम 93 अन्वयेच्या निवेदन क्रमांक सहाबाबत**

**उपसभापती** : निवेदन सहावे संबंधित खात्याचे मंत्री उपस्थित नसल्यामुळे नंतर घेण्यात येईल.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सिंधुदूर्ग जिल्हयातील कणकवली उपजिल्हा रुग्णालयात डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे रुग्णाचा झालेला मृत्यू.

**मु.शी.**: सिंधुदूर्ग जिल्हयातील कणकवली उपजिल्हा रुग्णालयात डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे रुग्णाचा झालेला मृत्यू याबाबत सर्वश्री परशुराम उपरकर, डॉ.दीपक सावंत,श्री.अरविंद सावंत,ॲड.अनिल परब,विप.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रणजित कांबळे (आरोग्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री परशुराम उपरकर, डॉ.दीपक सावंत, श्री. अरविंद सावंत, ॲड. अनिल परब यांनी सिंधुदूर्ग जिल्हयातील कणकवली उपजिल्हा रुग्णालयात डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे रुग्णाचा झालेला मृत्यू या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरीत केल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस :येथे सोबतचे निवेदन छापावे. )

-------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>निवेदनानंतर</u>**

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय,पूर्वी या रुग्णालयात रोज 350 केसेस येत होत्या आज जवळजवळ 1100/1200 केस येत आहेत. परंतु रुग्णालयात स्त्रीरोगतज्ज्ञ नाहीत, सर्जन नाहीत. ही पदे शासन केव्हा भरणार आहे ? मागील वेळी हाप्रश्न मी सभागृहात उपस्थित केला होता त्यावेळी मंत्रिमहोदयांनी सांगितले होते की, जे डॉक्टर्स रुग्णालयात हजर होणार नाहीत त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करु. परंतु केवळ निलंबनाची कारवाई करुन चालणार नाही. डॉक्टरांची नियुक्ती शासन करणार आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, डॉक्टरांची कमतरता आहे ही गोष्ट मी नाकारणार नाही. मागे मी सभागृहाला माहिती देताना सांगितले होते की, ज्याठिकाणी डॉक्टरांची कमतरता आहे तेथे बीएएमएस डॉक्टरांची भरती करण्यात येईल. ज्या रुग्णालयात स्पेशॅलिस्ट डॉक्टर्स नाहीत तेथे कॉन्ट्रॅक्ट पध्दतीवर केसेस देण्यात येतील. परंतु डॉक्टरांची कमतरता आहे ही गोष्ट नाकारुन चालणार नाही. पूर्ण देशामध्ये हा प्रश्न निर्माण झालेला आहे.

**उपसभापती** : याच पध्दतीची उत्तरे आरोग्य विभागाकडून अनेक वेळा मिळालेली आहेत. लोकांच्या आरोग्याचा हा प्रश्न आहे. पुढील वेळी अशी उत्तरे सभागृह ऐकणार नाही. एक महिन्यात शासनाने ही परिस्थिती सुधारावी. माननीय सदस्य श्री.उपरकर यांनी दर अधिवेशनामध्ये हा प्रश्न उपस्थित केलेला आहे.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, रुग्णालयांतून डॉक्टर्स उपलब्ध नाहीत ही वस्तुस्थिती आहे. देशामध्ये हा प्रश्न आहे असे मंत्रिमहोदय सांगत आहेत. परंतु त्यांनी राज्यापुरते बोलावे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, हा प्रश्न वारंवार येत आहे. यासाठी एखादी समिती गठीत करुन सन्माननीय सदस्यांचा सल्ला घेऊन डॉक्टरांची पदे कशी भरता येतील याबाबत मार्ग काढू. ग्रामीण भागामध्ये डॉक्टर्स जाण्यास तयार होत नाहीत. पीएचसी मध्ये बीएएमएस डॉक्टर्स भरती करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे.डॉक्टर उपलब्ध होत नाहीत. युतीचे शासन असताना देखील डॉक्टरांची कमतरता होती.

नंतर श्री. भोगले

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-7..............

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रीमहोदय म्हणाले की, डॉक्टर उपलब्ध होत नाहीत तर आम्ही काय करायचे?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्डवर राहू नये. डॉक्टरांची कमतरता आहे हे मी नाकारलेले नाही.

श्री.दिवाकर रावते : शासनाला या प्रश्नामध्ये लक्ष घालावे लागेल. आपण डॉक्टरांना पकडून आणू शकत नाही. परंतु राज्यात एवढी वैद्यकीय महाविद्यालये आहेत, तेथे हजारो डॉक्टर्स तयार होतात, ते जातात कुठे? का उपलब्ध होत नाहीत? महाराष्ट्राच्या मातीमध्ये राहून ते सर्व सुविधांचा लाभ घेतात आणि डिग्री मिळवून ते जातात कुठे? त्यांची किमान सेवा राज्याला उपलब्ध होणे महत्वाचे आहे. अशी हतबलता का निर्माण झाली? सभापती महोदय, या संदर्भात आपण स्वत: नेतृत्व केले तर हा प्रश्न सुटू शकतो. आपल्या नेतृत्वाखाली समिती केली तर सदनाला वस्तुस्थिती कळू शकेल.

श्री.रणजित कांबळे : त्यामुळेच मी सांगितले की, सन्माननीय सदस्यांची एक समिती गठित करु. त्या समितीमार्फत जे काही ऑप्शन्स आहेत त्याबद्दल विचार करता येईल. फक्त ताणून धरुन हा प्रश्न सुटणार नाही.

श्री.दिवाकर रावते : दरवर्षी 10 हजार डॉक्टर डिग्री घेऊन बाहेर पडतात.

श्री.रणजित कांबळे : त्यासाठीच प्रि-पी.जी. आपण एक वर्ष सक्तीची केली आहे.

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, सन्माननीय राज्यमंत्र्यांनी सभागृहाला वस्तुस्थिती सांगितली आहे. आपणही निर्देश दिले आहेत. आतापर्यंत क्लिअरकट व्हॅकेन्सीचा विचार केला गेला आहे. एमबीबीएस डॉक्टर्स उपलब्ध होत नाहीत, त्यामुळे प्रि पी.जी. एक वर्षासाठी सक्तीची केली असून सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना याची कल्पना आहे. पोस्ट पी.जी.सक्तीची करण्याचा विचार वैद्यकीय शिक्षण विभागाकडून सुरु आहे. त्यामुळे डॉक्टर्स उपलब्ध होतील. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनीच सांगितले आहे की, डॉक्टरना आपण पकडून आणून त्यांनी सेवा द्यावी असे म्हणू शकत नाही. परंतु पब्लिक प्राईव्हेट पार्टिसिपेशनमधून आपण प्रयत्न करीत आहोत. 31 जुलैपर्यंत सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जागा बीएएमएसमधून भरु. पदे रिक्त राहणार नाहीत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-7.............

डॉ.दीपक सावंत : मंत्रीमहोदयांनी सांगितले की, बीएएमएसमधून जागा भरु. सभापती महोदय, अश्विन पटेल आणि पुनम वर्मा ही केस सुप्रीम कोर्टात असताना प्रत्येकाने आपापल्या पॅथीप्रमाणे प्रॅक्टिस करावी असे सांगण्यात आले आहे. आयुर्वेद डॉक्टर असतील ते ॲलोपॅथीची प्रॅक्टिस कशी करणार? सरकार चुकीची प्रॅक्टिस करु देणार का? ज्याला एम.डी.ची ट्रिटमेंट हवी आहे त्याने वंचित रहायचे का?

**उपसभापती** : मंत्रीमहोदयांनी तातडीने डॉक्टर्स उपलब्ध करुन देण्याचे कबूल केले आहे. काही लोकांना ॲलोपॅथी उपचार चालतात तर काहींना आयुर्वेद उपचार चालतात, त्यामुळे पहिल्यांदा तातडीने डॉक्टर्स उपलब्ध होणे महत्वाचे आहे. ती सुधारणा पहिल्यांदा होऊ द्यावी. नंतर जे मुद्दे शिल्लक राहतील ते, जी समिती स्थापन केली जाणार आहे, त्या समितीपुढे उपस्थित करता येतील.

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, एका महिन्याच्या आत आपल्या अध्यक्षतेखाली समिती नेमू. आपण निर्णय द्यावा.

**उपसभापती** : कृपा करुन त्या समितीच्या अध्यक्षपदी माझी नेमणूक करु नये.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील एका सदस्याला डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाच्या सेवेत सामावून घेणे.

**मु. शी.** : प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील एका सदस्याला डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाच्या सेवेत सामावून घेणे याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राणा जगजितसिंह पाटील ( कृषि राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी "प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील एका सदस्याला डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाच्या सेवेत सामावून घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, दोन सूचना करण्यासाठी मी ही सूचना दिली होती. डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ 1969 साली स्थापन झाले. जवळपास 32000 हेक्टर जमीन या विद्यापीठासाठी संपादित करण्यात आली. 942 शेतकऱ्यांची जमीन घेण्यात आली. जमीन घेत असताना जे प्रकल्पग्रस्त शेतकरी ठरले त्यांच्या कुटुंबातील एका सदस्याला सेवेत सामावून घेण्यात येईल असे सांगितले होते.

(नंतर श्री.जुन्नरे....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय मंत्रीमहोदयांनी 421 पदांच्या संदर्भातील जी यादी दिलेली आहे ती बरोबर आहे काय?

श्री. राणा जगजितसिंग पाटील : सभापती महोदय, उप सचिव, कृषी यांना 26,27,28 मार्च, 2007 रोजी या कृषी विद्यापीठाकडून माहिती उपलब्ध करुन घेण्याच्या संदर्भात पाठविले होते. उप सचिवांनी यासंदर्भातील पूर्ण माहिती तपासलेली असून 1982 च्या आधीचे रेकॉर्ड त्यांना पहाण्यासाठी उपलब्ध झाले नाही परंतु त्यांनी 1982 च्या नंतरचे पूर्ण रेकॉर्ड तपासले असून त्यांच्या माहिती प्रमाणे 421 ही संख्या बरोबर आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या 93 च्या सूचनेमध्ये एकूण दोन प्रश्न निर्माण झालेले आहेत. या ठिकाणचे प्रकल्प ग्रस्त शेतकरी गेल्या 10-15 वर्षापासून रोजंदारी कामगार म्हणून काम करीत असून त्यांना प्रकल्पग्रस्त म्हणून कामावर घेतलेले नाही. विद्यापीठाने ज्या प्रकल्पबाधीत कुटुंबातील व्यक्तीस सेवेत सामावून घेतले आहेत अशा प्रकल्पबाधीत कुटुंबात मुळ भुसंपादन दाखल्याचे आधारे एकदाच व एकाच व्यक्तीस पुनर्वसन अधिकारी यांचे कार्यालयामार्फत निर्गमित करण्यात येत असलेला प्रकल्पग्रस्त असल्याबाबतचा दाखला विद्यापीठाने मागितलेला नसल्यामुळे व भुसंपादनाबाबतचे सर्व आवश्यक कागदपत्रे जमा करुन घेतल्यामुळे तसेच ज्या कुटुंबातील व्यक्तीस प्रकल्पग्रस्त या सदराखाली नोकरीत सामावून घेतलेले आहे त्यांचेबाबत ठोसपणे बाजू समोर मांडण्यासाठी प्रकल्पग्रस्तांबाबत व्यवस्थित व परिपूर्ण रेकॉर्ड व माहिती उपलब्ध होऊ शकलेली नाही. सभापती महोदय, ज्या शेतक-यांनी या कृषी विद्यापीठाला आपल्या जमिनी दिलेल्या आहेत ते गेल्या 10-15 वर्षापासून या विद्यापीठात रोजंदारीवर काम करीत आहेत. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, या विद्यापीठाची निर्मिती होऊन जवळपास 37 वर्षे झालेली आहेत. या कृषी विद्यापीठात जवळपास 600 ते 650 पदे सध्या रिक्त आहेत. मागच्या 5 वर्षात या विद्यापीठात जागा न भरल्यामुळे 18 कोटी रुपये परत गेलेले आहेत. त्यामुळे ज्या शेतक-यांनी या कृषी विद्यापीठासाठी जमिनी दिलेल्या आहेत त्या प्रकल्पग्रस्त शेतक-यांच्या मुलांना या विद्यापीठात किती दिवसात सामावून घेतले जाणार आहे? ज्या अधिका-यांनी यासंदर्भातील चुकीचा अहवाल दिलेला आहे त्या अधिका-यावर शासन काय कारवाई करणार आहे? सभापती

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर......

महोदय, या प्रकल्प ग्रस्त शेतक-यांच्या मुलांना बैलासारखे नांगराला जुंपले, परंतु अहवालात माहिती देण्यात आली आहे की, ते एक मानवचलित यंत्र असून हे यंत्र माणसाकडून चालविले जाते. बैलाकडून कोळपणी केली तर पिकाची नासाडी होते परंतु डवरे ओढल्यामुळे पिकांची नासाडी होत नाही त्यामुळे या मुलांकडून डवरे चालवून घेण्यात आलेले आहे. तसेच अहवालात म्हटले आहे की, हे डवरे मुले स्वेच्छेने ओढतात, त्यांच्यावर बळजबरी केली जात नाही. सभापती महोदय, आता सुध्दा माझ्या चेंबरमध्ये संबंधित 50 मुले बसलेली असून त्यांना नोकरी मिळत नसल्यामुळे मजबुरी म्हणून ते रोजंदारीवर हे काम करीत आहेत. या मुलांकडून बैलासारखे काम करवून घेतले जात आहे आणि या बाबीचे ज्या अधिका-याने समर्थन केले ते चुकीचे आहे. या ठिकाणी जो अहवाल सादर करण्यात आलेला आहे तो चुकीचा आहे. ज्या मुलांनी हे डवरे ओढले त्यांचे कोणत्याही प्रकारचे स्टेटमेंट घेतले गेले नव्हते. ज्या अधिका-याने या मुलांकडून बैलासारखे काम करवून घेतले त्यांच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात? या ठिकाणच्या प्रकल्पग्रस्त शेतक-यांच्या मुलांना किती दिवसात या विद्यापीठात सामावून घेतले जाणार आहे?

श्री. राणा जगजितसिंग पाटील : सभापती महोदय, निवेदनामध्ये नमूद करण्यात आले आहे की, तृतीय आणि चतुर्थ श्रेणीची 2,404 एकूण पदे असून नियमानुसार 5 टक्के प्रमाणे ...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, दिनांक 14 डिसेंबर, 1990 च्या जी.आर. मध्ये म्हटले आहे की, "प्रकल्प ग्रस्तांना सर्व प्राथाम्यक्रम देऊन किमान 5 टक्के पर्यंत नोक-या, वर्ग 3 व वर्ग 4 संवर्गात शासकीय आदेशाप्रमाणे द्यावयाच्या आहेत. मागासवर्गीयांच्या विविध घटक वर्गासाठी राखून ठेवलेल्या 34 टक्के जागा भरुन झाल्यावर हा प्राथम्यक्रम अंमलात आणावयाचा आहे. प्रकल्पग्रस्तांसाठी सर्वोच्च प्राथम्यक्रम किमान 5 टक्के आहे असे शासनाचे सर्वसाधारण आदेश आहेत व ते सर्व शासकीय कार्यालयांना लागू आहेत. परंतु ज्या योजनेसाठी प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी घेण्यात आल्या आहेत, त्या योजनेमध्ये (येथे पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला ), पदे भरतांना प्रकल्पग्रस्तांना फक्त किमान 5 टक्के सर्वोच्च प्राथम्यक्रम देणे अपेक्षित नाही. त्यामुळे आपल्या विद्यापीठात पदे भरतांना मागासवर्गीयांची आरक्षित पदे भरल्यानंतर उर्वरित जास्तीत जास्त पदे प्रकल्पग्रस्त व्यक्तींमधून भरली जाणे आवश्यक आहे."

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..........

सभापती महोदय, विद्यापीठात जागा रिक्त असूनही त्या भरल्या जात नाहीत. अनेक शेतकऱ्यांनी त्यांच्या जमिनी दिलेल्या आहेत. त्यांच्याकडे प्रकल्पग्रस्तांचे दाखले आहेत. तेव्हा 900 शेतकऱ्यांच्या मुलांना पंजाबराव कृषि विद्यापीठात केव्हा नोकरी देणार आहात ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, एकूण 942 पैकी 421 जणांना नोकरीवर ठेवण्यात आलेले आहे. उर्वरितांना मुलाखत होईल त्यावेळी त्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येईल.

**उपसभापती** : एकूण जागा किती रिक्त आहेत ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : ही आकडेवारी आता माझ्याजवळ उपलब्ध नाही.

**उपसभापती** : जेवढ्या जागा रिक्त आहेत तेवढ्यांना नोकरीत सामावून घ्यावे.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, काही नवीन नियम आहेत, त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**उपसभापती** : माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो जी.आर.वाचून दाखविला तो सुध्दा ॲप्लीकेबल आहे.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : ठीक आहे, मी पाहून घेतो.

----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र असलेल्या वह्यांवर केरळ शासनाने घातलेली बंदी

**मु. शी.** : छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र असलेल्या वह्यांवर केरळ शासनाने घातलेली बंदी याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे व श्री.अरविंद सावंत वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे व श्री.अरविंद सावंत यांनी "छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र असलेल्या वह्यांवर केरळ शासनाने घातलेली बंदी " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र असलेल्या वह्यावर केरळ सरकारने बंदी घातल्याने या कृतीचा निषेध करण्यासाठी शिवसैनिकांनी निदर्शन केली. महत्वाचा मुद्दा म्हणजे वेगवेगळ्या राज्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करण्यात येत आहे. कर्नाटकमध्ये बेळगावच्या महापौरांचा अवमान करण्यात आला. आता केरळ राज्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र असलेल्या वह्या वाटल्या म्हणून वह्या वाटणाऱ्याला आरोपी करण्यात आले. निवेदनात सुध्दा शिवप्रेमींचा "आरोपी" असा उल्लेख करण्यात आलेला आहे. शिवप्रेमींचा आरोपी म्हणून उल्लेख करणे योग्य नाही. केरळ मधील आरोपी असा उल्ल्ेख करावयास पाहिजे होता. माझ्ा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, राज्य सरकार केंद्रीय गृह मंत्री श्री.शिवराज पाटील यांच्यामार्फत श्री.सुरेश भट यांच्यावरील केस मागे घेण्याची विनंती केरळ सरकारला करणार आहे काय ? दुसरे म्हणजे शिवसैनिकांनी केलेल्या निदर्शनावर पोलिसांनी लाठीहल्ला केला. या लाठीहल्ल्यामध्ये श्रीमती किशोरी पेडणेकर यांच्यासह अनेकजण जखमी झालेले आहेत. तेव्हा या संदर्भातील माहिती मंत्रिमहोदय देतील काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, केरळ राज्यामध्ये ही घटना घडली. महाराष्ट्र शासनाकडून केंद्रीय गृहमंत्री श्री.शिवराज पाटील यांच्यामार्फत केरळ सरकारला त्या शिवप्रेमीं वरील केस काढण्याबाबत विनंती करण्यात येईल. वहीच्या मुखपृष्ठावर छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र होते. त्यावर "शिवाजी हिंदू राजे होते. मुस्लिमांची राजवट होती." अशी विधाने होती. त्यास ऑब्जेक्शन होते....

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, केरळ सरकारने एम.एफ.हुसैन यांना "राजा रविवर्मा" पुरस्कार दिला. राजा रविवर्मा यांनी हिंदू देवतांची सुंदर चित्रे काढलेली आहेत. एम.एफ.हुसैन यांनी हिंदू देवतांची विटंबना करणारी चित्रे काढली, त्याचा अवमान वाटत नाही काय ? केरळ राज्य स्वत:ला सेक्युलर समजते. केरळ राज्यातील कासरगोड जिल्ह्यात सनातन संस्थेचे श्री.सुरेश भट यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र असलेल्या वह्या वाटल्या म्हणून त्यांना 10 दिवस कोठडीत ठेवण्यात आले. मूलभूत प्रश्न असा की, या संदर्भात राज्य शासन आपल्या भावना व्यक्त करणार आहे की नाही ?

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

तसेच या वहया वाटपाबाबत बंदी घालता कामा नये, असे माननीय केंद्रीय गृहमंत्र्यांमार्फत केरळ सरकारला कळविण्यात येईल काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की, महाराष्ट्र शासन याबाबतीत केंद्र शासनाकडे आपल्या तीव्र भावना कळविल व भविष्यात अशा घटना घडणार नाहीत यासंबंधीही सांगण्यात येईल.

-----

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : इंटरनॅशनल इन्स्टिटयूट ऑफ पॉप्युलेशन स्टडी संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात मुंबईतील 40 टक्के बालके कुपोषित असल्याची माहिती उघडकीस येणे

**मु. शी.** : इंटरनॅशनल इन्स्टिटयूट ऑफ पॉप्युलेशन स्टडी संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात मुंबईतील 40 टक्के बालके कुपोषित असल्याची माहिती उघडकीस येणे याबाबत सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हर्षवर्धन पाटील ( महिला व बालकल्याण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "इंटरनॅशनल इन्स्टिटयूट ऑफ पॉप्युलेशन स्टडी संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात मुंबईतील 40 टक्के बालके कुपोषित असल्याची माहिती उघडकीस येणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, इंटरनॅशनल इन्स्टिटयूट ऑफ पॉप्युलेशन स्टडी संस्थेने केलेल्या राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षणानुसार मुंबईतील 40 टक्के बालके कुपोषित आहेत. त्यामुळे ही केंद्र शासनाची पाहणी आपल्याला मान्य आहे काय ? तसेच याठिकाणी आपण म्हटले आहे की, "आरोग्य केंद्राच्या कर्मचाऱ्यांमार्फत मुंबईतील झोपडपट्टी, गलिच्छ वस्ती व इतर ठिकाणी राहणारी मुले व महिला यांची घरोघरी भेट देऊन रोग सर्वेक्षण करण्यात येते." हे जे वाक्य आपण याठिकाणी दिलेले आहे, ते आपल्याला योग्य वाटते का ? आपण खरोखर, घरोघरी जाता काय ? आपल्याकडे तेवढा स्टाफ तरी आहे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, इंटरनॅशनल इन्स्टिटयूट ऑफ पॉप्युलेशन स्टडी या संस्थेने जी स्टडी केलेली आहे त्याचा अहवाल प्राप्त झालेला आहे. निश्चितपणाने मुंबईतील झ ाोपडपट्टी आणि गलिच्छ वस्तीमध्ये जे कुपोषणाचे प्रमाण आहे ते या अहवालात नमूद केलेले आहे. आता आम्ही नव्याने एक जी.आर. इश्यू केलेला आहे. त्यामुळे यासंदर्भाने आपण एक समिती गठित करु. तसेच याबाबतीत मुंबई महापालिका, आरोग्य विभाग, महिला व बालकल्याण विभाग व आयसीडीपी या सगळयांच्या माध्यमातून कुपोषणाचे उच्चाटन करण्यास टॉप प्रायॅारिटी दिली जाईल व निश्चित प्रकारे याबाबतीत कार्यवाही करण्यात येईल.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : एप्रिल ते जून महिन्यात उत्तर महाराष्ट्रात कुपोषणाचे थैमान सुरु होऊन बालकांचा झालेला मृत्यू

**मु. शी**. : एप्रिल ते जून महिन्यात उत्तर महाराष्ट्रात कुपोषणाचे थैमान सुरु होऊन बालकांचा झालेला मृत्यू याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हर्षवर्धन पाटील ( महिला व बालकल्याण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, संजय केळकर यांनी "एप्रिल ते जून महिन्यात उत्तर महाराष्ट्रात कुपोषणाचे थैमान सुरु होऊन बालकांचा झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, कुपोषण व बाल मृत्यूसंबंधी मी 4-5 जिल्हयांची माहिती विचारली होती. त्याबाबतीतील जे लेखी उत्तर निवेदनामार्फत याठिकाणी आलेले आहे, त्यातून अतिशय गंभीर बाब सभागृहासमोर आलेली आहे. एप्रिल महिन्यात कुपोषित बालकांची संख्या 3,465 एवढी आहे, मे महिन्यात 3,862 व जून महिन्यात 4,176 इतकी असून ही संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. त्याचबरोबर याठिकाणी बालमृत्यूची संख्या दिलेली आहे. एप्रिल महिन्यात 495 बालमृत्यू झाले, मे महिन्यात 394 व जून महिन्यात 623 एवढे झाले. अशाप्रकारे या तीन महिन्यांत एकूण 1512 बालमृत्यू झालेले आहेत. परंतु याठिकाणी उत्तरात असे म्हटले आहे की, सदरचे बालमृत्यू कुपोषणामुळे झालेले नाहीत. ही अतिशय गंभीर बाब आहे. त्यामुळे याठिकाणी माझा असा प्रश्न आहे की, कुपोषणाचे दिवसेंदिवस वाढणारे प्रमाण व बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने शासन कोणत्या प्रकारची ठोस उपाययोजना करीत आहे ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, हा जो आकडा वाढलेला दिसत आहे, त्यामध्ये एप्रिल, मे व जून या तीन महिन्यांत बालकांचे वजन त्यामध्ये घेतलेले आहे. यामध्ये पहिल्यांदा नोंदणी, वेईंग व नंतर मेडिकल ट्रीटमेंट होत असते. त्यामुळे एप्रिल, मे व जून या तीन महिन्यांमध्ये वजन करणाऱ्या बालकांची संख्या वाढलेली आहे, ती वाढ झाल्यामुळे तसा उल्लेख आपण श्रेणी 3 व 4 मध्ये केलेला आहे. त्यासंबंधीची 5 जिल्हयांची माहिती याठिकाणी दिलेली आहे. यामध्ये निश्चितपणे वजन करणाऱ्या बालकांची संख्या वाढल्यामुळे ते प्रमाण ग्रेड 3 व 4 मध्ये जास्त दिसत आहे. कुपोषणाचे प्रमाण विशेषत: आदवासी आणि झोपडपट्टी परिसरामध्ये वाढत आहे. त्याबद्दल निश्चितपणे आपण जिजामाता बाल मिशन गठित केले असून त्याची प्रभावी अंमलबजावणी कारण्याचे काम सुरु केलेले आहे.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील.........

त्याबरोबर पूरक पोषण आहाराचे काम तसेच काही ठिकाणी जादा अंगणवाडया मंजूर करण्याचे प्रयत्न करीत आहोत. सर्व विभागांच्या विविध योजनांची एकत्रितपणे अंमलबजावणी करुन कुपोषण निर्मुलनाचे प्रयत्न करु.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, काल मी या सदनामध्ये या विषयावर महाराष्ट्र विधानपरिषद नियम 289 अन्वये सूचना दिली होती व त्यावर चर्चा झाली. सन्माननीय सभापती महोदयांनी तातडीने निवेदन करण्याच्या संदर्भात आदेश दिले होते. परंतु, अद्याप निवेदन करण्यात आलेले नाही. याच विषयावरील महाराष्ट्र विधानपरिषद नियम 93 चे निवेदन सभागृहात करण्यात आले आहे, परंतु, महाराष्ट्र विधानपरिषद नियम 289 अन्वये दिलेल्या सूचनेवरील निवेदन अद्याप झ ालेले नाही.

**उपसभापती** : ठीक आहे. तपासून बघतो.

-------------

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :सोलापूर येथील डॉ.वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील डॉ.दिग्विजय पाटील या विद्यार्थ्याने रँगिंगमुळे केलेली आत्महत्या

**मु. शी.** :सोलापूर येथील डॉ.वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील डॉ.दिग्विजय पाटील या विद्यार्थ्याने रँगिंगमुळे केलेली आत्महत्या याबाबत ॲड.अनिल परब, डॉ.नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब, डॉ.नीलम गो-ह यांनी "सोलापूर येथील डॉ.वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील डॉ.दिग्विजय पाटील या विद्यार्थ्याने रँगिंगमुळे केलेली आत्महत्या" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------------

..3..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, रॅगिंगचे प्रकार राज्यात दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. रॅगिंगला अटकाव करण्यासाठी सगळे कायदे अपुरे पडू लागले आहेत. यासंबंधी शासन कडक निर्बंध आणणार काय आणि रॅगिंग करणा-यांना भीती बसेल व रॅगिंगच्या घटनांचे प्रमाण कमी होईल, असा कायदा आणण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे काय ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, रॅगिंग करणा-यांविरुध्द भारतीय दंड विधान कलम 306 अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या अंतर्गत त्यांना सहा ते दहा वर्षापर्यन्त सजा होऊ शकते. अशा प्रकारचे कडक कलम लावण्यात आले आहे. भविष्यात रॅगिंगचे प्रकार घडू नयेत यासाठी कडक कायदा करण्याची गरज आहे. ज्या महाविद्यालयांमध्ये किंवा शैक्षणिक संस्थांमध्ये रॅगिंगचे प्रकार घडतील त्यांची मान्यता काढून घेण्यात येणार आहे.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, रॅगिंगमध्ये एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला आहे. अशा दुर्देवी रॅगिंगमुळे काही मुलांचा मृत्यू होतो, हे जसे आहे, त्याचप्रमाणे कायदा आस्तित्वात आहे, असेही म्हटले जाते. दरवेळी महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रिया पार पडल्यानंतर, मेडिकल कॉलेजेसमध्ये आम्ही पाहिलेले आहे की, महाविद्यालयाच्या पोर्चमध्ये बसून थट्टामस्करी होते. परंतु, आता त्याला हिंसक वळण लागले आहे. त्यामुळे ज्याप्रमाणे विभागाविभागात पोलीस दलामार्फत दक्षता समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत, त्याप्रमाणे महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सहभागाने एखादा सपोर्ट ग्रुप, विद्यार्थी दक्षता समित्या, सर्व महाविद्यालयांमध्ये गठीत करुन आस्तित्वात असलेल्या कायद्याची अंमलबजावणी व्हावी म्हणून पोलीस दलामार्फत पावले उचलली जातील काय ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना अतिशय चांगली आहे. ज्याप्रमाणे पोलिसांनी दक्षता समित्या गठीत केल्या आहेत त्याच धर्तीवर सर्व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या दक्षता समित्या गठीत करण्याबाबत शासन निश्चित विचार करेल.

--------------

..4..........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**म.वि.प.नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेवरील निवेदनाबाबत**

**उपसभापती** : सभागृहामध्ये महाराष्ट्र विधानपरिषद नियम 93 च्या सूचनेवरील निवेदने पुकारली जातात. कधी संबंधित सन्माननीय सदस्य उपस्थित नसतात तर कधी संबंधित माननीय मंत्री उपस्थित नसतात. पुढील कामकाज करावयाचे म्हणून आपण पुढे जातो. आज पुन्हा सन्माननीय सदस्य, सर्वश्री मधुकर चव्हाण व विनोद तावडे यांनी दिलेल्या महाराष्ट्र विधानपरिषद नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेवरील निवेदन पुकारल्यानंतर संबंधित मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नव्हते. सन्माननीय मंत्री महोदयांना विधानसभेमध्ये त्यांच्याशी संबंधित कामकाज असू शकते, हे देखील मी नाकारीत नाही. मला वाटते की, सर्व सन्माननीय सदस्य व मंत्री महोदयांना सांगितले पाहिजे की, निवेदन पुकारण्याच्या वेळी संबंधितांनी सभागृहात उपस्थित रहावे.

---------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईतील वांद्रे पूर्व येथील म्हाडा इमारतीला लागलेली आग

**मु. शी.**: मुंबईतील वांद्रे पूर्व येथील म्हाडा इमारतीला लागलेली आग याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

ॲड.प्रितमकुमार शेगावकर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण व विनोद तावडे यांनी "मुंबईतील वांद्रे पूर्व येथील म्हाडा इमारतीला लागलेली आग" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------------

...6..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रितमकुमार शेगावकर : सभापती महोदय, निवेदनात दुरुस्ती आहे. लक्षवेधी सूचनेवरील सुधारित निवेदनातील शेवटचे वाक्य "या 89 प्रकरणात सूचनेत नमूद केलेल्या 11 प्रकरणांचा समावेश असून सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे." असे नमूद केले आहे. त्याऐवजी "सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे अे.सी.बी.कडे प्राप्त झालेल्या कोणत्याही तक्रारीसंबंधात सध्या चौकशी सुरु नाही." असे वाचावे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, निवेदनातील शेवटच्या परिच्छेदात असे नमूद करण्यात आले आहे की, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडे प्राप्त झालेल्या 89 तक्रारींची चौकशी करण्याबाबत माननीय उच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल झाली आहे. माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सर्व 89 प्रकरणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने उच्च न्यायालयात सादर केली आहेत. यामधील 11 योजनांमध्ये अनेक लोक एस.आर.एस.अंतर्गत सदस्य झाले आहेत. या सर्व लोकांना ट्रान्झिट कॅम्पमध्ये हलविण्यात आले आहे. या लोकांना घरे मिळण्यासाठी कोर्टाकडून लवकरात लवकर निर्णय लागावा म्हणून शासन उच्च न्यायालयाला विनंती करणार काय आणि न्यायालयातील दाव्याची सद्य:स्थिती काय आहे ?

ॲड.प्रितमकुमार शेगावकर : सभापती महोदय, उच्च न्यायालयामध्ये 3 तारखेला सुनावणी होणार आहे, ही सर्व प्रकरणे निकाली निघतील अशी अपेक्षा आहे.

---------------

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ......... 14:55

**पृ.शी.** : सिंधुदुर्ग जिल्हयात कुडाळ तालुक्यातील पावशी घावनळे मधील जिल्हापरिषद सदस्याला जीवे मारण्याच्या हेतूने त्यांच्या गाडीमध्ये बॉम्ब ठेवल्याचे निदर्शनास येणे.

**मु.शी.** : सिंधुदुर्ग जिल्हयात कुडाळ तालुक्यातील पावशी घावनळे मधील जिल्हापरिषद सदस्याला जीवे मारण्याच्या हेतूने त्यांच्या गाडीमध्ये बॉम्ब ठेवल्याचे निदर्शनास येणे याबाबत मेजर सुधीर सावंत, श्री.संजय दत्त वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

मेजर सुधीर सावंत (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळ तालुक्यातील पावशी घावनळे मधील जिल्हापरिषद सदस्य श्री.रामचंद्र उर्फ आबा मुंज या सामाजिक कार्यकर्त्याला जीवे मारण्याच्या हेतूने त्यांच्या गाडीमध्ये बॉम्ब ठेवल्याचा प्रकार दिनांक 16 मे, 2007 रोजी निदर्शनास येणे, या हल्ल्याचा कट राजकीय वैमनस्यातून झाला असल्याची जनमानसांत होत असलेली चर्चा, याप्रकरणी अद्याप कोणावरही कोणतीच कारवाई न झाल्याने स्थानिकांत पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण, याप्रकरणी शासनाने कारवाई करुन उपरोक्त हल्ल्याचा कट करणाऱ्यांना तातडीने अटक करुन कठोर शिक्षा करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मेजर सुधीर सावंत : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेद्वारे मी शासनाचे एका गंभीर विषयाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला आहे. सिंधुदुर्ग जिल्हयात कुडाळ तालुक्यातील पावशी घावनळे मधील जिल्हापरिषद सदस्याची बॉम्बच्या सहाय्याने हत्या करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. श्री.रामचंद्र ऊर्फ आबा मुंज हे पूर्वी विरोधी पक्ष नेते होते. दिनांक 15 मे, 2007 रोजी त्यांच्या गाडीला बॉम्ब लावून त्यांची हत्या करण्याचा प्रयत्न केला गेला. आज पर्यंत आरोपीला अटक करण्यात आलेली नाही. यावरुन पोलीस दलाचा गलथान कारभार असल्याचे दिसून येते. श्री.रामचंद्र ऊर्फ आबा मुंज यांनी धान्य घोटाळा उघडकीस आणण्याचे काम केले होते म्हणून त्यांच्या गाडीवर हल्ला करण्यात आला होता. त्या दिवशी मी त्यांच्या गाडीमध्ये बसलेलो होतो आणि दुस-या दिवशी सुध्दा मी त्यांच्या गाडीत बसणार होतो. आरोपीला पकडण्यासंदर्भात शासनाचे काय धोरण आहे, हे मला कळत नाही. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आलेली नाही. माझा प्रश्न असा आहे की, शासन आरोपीला अटक करणार आहे की नाही ? पोलीस दलाला हे प्रकरण हाताळणे शक्य नसेल तर शासन हे प्रकरण सी.आय.डी.कडे देणार काय ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, जिल्हापरिषद सदस्य श्री.रामचंद्र ऊर्फ आबा मुंज यांच्या कारच्या खाली बॉम्ब सदृश्य वस्तू सापडली होती. ती वस्तू गावठी बॉम्ब असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते. ती वस्तू न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आलेली आहे. त्याचा रिपोर्ट 8 दिवसामध्ये प्राप्त होणार आहे. रिपोर्ट पॉझेटीव्ह आला तर हे प्रकरण सी.आय.डी.कडे सोपविण्यापेक्षा ए.टी.एस.कडे सोपविणे अधिक चांगले होईल. यासंदर्भात येत्या 8 दिवसात निर्णय घेण्यात येईल.

-------

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : बीड जिल्हयातील ग्रामसेवकांनी पुकारलेला संप.

**मु.शी.** : बीड जिल्हयातील ग्रामसेवकांनी पुकारलेला संप यासंबंधी श्रीमती उषाताई दराडे, डॉ.वसंत पवार, श्रीमती फौजीया खान,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)

--------

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : सिंधुदुर्ग जिल्हा सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक कर्जदारांकडून करीत असलेली अन्यायकारक कर्ज वसुली.

**मु.शी.** : सिंधुदुर्ग जिल्हा सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक कर्जदारांकडून करीत असलेली अन्यायकारक कर्ज वसुली यासंबंधी सर्वश्री परशुराम उपरकर, अरविंद सावंत, डॉ.दीपक सावंत, ॲड.अनिल परब, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.परशुराम उपरकर (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सिंधुदुर्ग जिल्हा सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक, ओरस ही बँक याच जिल्ह्यातील भूविकास बँकेच्या कर्जदारांकडून करीत असलेली अन्यायकारक कर्ज वसूली, देवगड, तालुक्यातील श्री. आप्पा चंद्रकांत मसूरकर यांनी 2 लक्ष 10 हजार रुपये कर्ज घेऊन त्यांनी 3 लक्ष रुपयांची परतफेड करुनही पुन्हा 2 लक्ष रुपयांच्या वसूलीसाठी त्यांच्यावर करीत असलेले जप्तीचे प्रकार, आधीच कर्जबाजारीपणाला व नापिकीला कंटाळून विदर्भ व मराठवाडयात शेतकरी करीत असलेल्या आत्महत्याचे सत्र थांबविण्यास शासनाला येत असलेले अपयश यातच कोकणातही या प्रकारामुळे तशी परिस्थिती ओढविण्याची निर्माण झालेली शक्यता, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

डॉ.पतंगराव कदम (सहकार मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

यानंतर श्री.सुंबरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( लक्षवेधी सूचनेवरील (अनु.क्र.3) मा.सहकार मंत्र्यांच्या निवेदनानंतर ....)

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझ्याकडे श्री.मसूरकर यांचे निवेदन आले आहे आणि त्यांनी 1997 साली 17 टक्के दराने चक्रवाढ व्याजाने कर्ज काढलेले होते आणि त्यातून त्यांनी पोल्ट्रीचा व्यवसाय सुरू केला होता. परंतु तेथील हवामानामुळे त्यातील पक्षी मरण पावले तसेच अतिवृष्टीमुळे त्यावरील पत्रे-शेड इ. मोडून पडले. या कर्जापोटी त्यांनी बँकेला 3 लाख रूपये भरले असताना पुन्हा 2 लाख 10 हजार रूपये कर्ज त्यांनी घेतले. त्यापोटी त्यांच्याकडे 1लाख 98 हजाराची मागणी करून सातत्याने त्यांच्या घरावर वसुलीसाठी जप्ती आणण्याचे प्रयत्न बँकेच्या वसुली अधिकाऱ्यांकडून केले जात आहेत. तसेच श्री.दत्ता परब यांचे देखील माझ्याकडे निवेदन आलेले आहे त्यात त्यांनी म्हटले आहे की, मी घेतलेल्या कर्जाबद्दल बँकेकडे तारण ठेवलेल्या माझ्या जमिनीची विक्री करून कर्जाची रक्कम वळती करून घ्यावी असे मी सांगितलेले असताना देखील मला कर्ज वसुलीसाठी सतत त्रास दिला जात आहे. 1999 साली त्यांची आई मरण पावली आणि त्यानंतर 2000 सालापासून बँक अधिकारी त्यांच्या घरामध्ये येऊन कर्ज वसुलीसाठी शिवीगाळ करीत असल्याचेही त्यांनी आपल्या निवेदनात म्हटलेले आहे. तेव्हा या संदर्भात माझा प्रश्न असा आहे की, भूविकास बँकेकडून हे जे कर्ज दिलेले आहे त्याची वसूली करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यासाठी बँकेकडून तारण देखील घेतले जाते. तरी त्या कर्जावरील व्याज माफ केले जाईल का ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, भूविकास बँकेचा हा केवळ सिंधुदुर्ग जिल्ह्याचाच प्रश्न आहे असे नाही तर महाराष्ट्रातील सर्वच शेतकऱ्यांचा हा प्रश्न आहे म्हणूनच मी यापूर्वी सांगितले होते की, या संदर्भात एक कॉम्प्रिहेन्सिव पॉलिसी आपण दिली आहे त्यामुळे एक लाखाचे दोन लाख या प्रमाणे दामदुप्पट देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यावर सन्माननीय सदस्यांनी 3 लाखा पर्यातची मागणी केली आहे. परंतु कितीही लाख असू द्यात. पुढे 11 टक्क्यानी हे पैसे भरायला लागणार आहेत. त्याबद्दल अशी एक पॉलिसी आणण्याचा प्रस्ताव आम्ही मंत्रिमंडळापुढे आणत आहोत आणि त्याचा रिलिफ त्यांना निश्चितपणे मिळेल इतकेच मी या प्रसंगी सांगू इच्छितो. दुसरे असे की, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे बँकेच्या अधिकाऱ्यांकडून या लोकांना कर्ज वसुली साठी कोठल्याही प्रकारे त्रास दिलेला नाही अशी आमची माहिती आहे. परंतु तरीही मी सांगू इच्छितो की, सदस्य म्हणताहेत त्याप्रमाणे घडले असेल तर त्याबाबत जरूर चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई आम्ही करू.

....... 3एच 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक कर्जदारांची नावे घेऊन त्यांना कर्ज वसुलीसाठी त्रास दिला जात असल्याचे सांगितले आहे. असे असतानाही ' असे असेल तर, तसे असेल तर, ते सत्य असेल तर.. अशी जर तर ची भाषा वापरून उत्तर दिले आहे ...

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, माझ्यापर्यंत जी माहिती आलेली आहे त्यानुसार कर्जवसुलीसाठी अशा प्रकारे त्रास कोणाला दिलेला नाही. म्हणून मी सांगितले की, सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले आहे त्याबाबत चौकशी करून वस्तुस्थिती काय आहे हे जाणून घेतले जाईल आणि सन्माननीय सदस्य सांगतात ती वस्तुस्थिती असेल तर त्यानुसार कारवाई करू.

****

...... 3एच 3 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : अमरावती जिल्ह्यात गाव नमुन्यांचे 6 प्रमाणपत्र तहसील कार्यालयातून मिळत नसल्याने शेतकऱ्यांना कर्ज मिळण्यात येत असलेली अडचण.

**मु.शी.** : अमरावती जिल्ह्यात गाव नमुन्यांचे 6 प्रमाणपत्र तहसील कार्यालयातून मिळत नसल्याने शेतकऱ्यांना कर्ज मिळण्यात येत असलेली अडचण याबाबत प्रा.शरद पाटील, श्री.जयंत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

---

प्रा. शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्यांनी याबाबत निवेदन करावे अशी विनंती करतो. ....

"राज्यातील विशेषत: अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी शासनाने पॅकेज अंतर्गत सुरु केलेली पिक कर्ज योजना या योजनेचा लाभ शेतकऱ्यांना मिळावा म्हणून यासाठी गाव नमुन्यांचे 6 प्रमाणपत्र तहसील कार्यालयातून मिळवावे लागत असल्यामुळे सदर तहसिल कार्यालयाच्या बेजबाबदारपणामुळे शेतकऱ्यांसाठी कर्ज योजनेसाठी नमुना प्रमाणपत्र मिळत नसल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना वंचीत राहण्याचा प्रश्न निर्माण होणे,सदर शासनाद्वारे 15 मे, 2007 पासून पिक कर्ज योजना सुरु करण्यात आली या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना विविध संस्था व बँकामार्फत बियाणे व खते खरेदीसाठी अल्प व्याजदरात कर्ज घेण्यासाठी शासनस्तरापासून होत असलेला विलंब त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांमध्ये पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, तहसिल कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या असहकाराच्या भुमिकेमुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला रोष, सदर प्रकरणी तातडीने चौकशी करण्याबाबत होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. पतंगराव कदम (सहकार मंत्री) : महोदय, या लक्षवेधी सूचनेवरील निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केल्या असल्यामुळे मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. ... )

...... 3एच 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( लक्षवेधी सूचनेवरील (अनु.क्र.4) मा. सहकार मंत्र्यांच्या निवेदनानंतर ... )

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, या निवेदनामध्ये नमुना नं.6 ची सक्ती न करण्याबद्दल लिहिलेले आहे. पण अशी सक्ती होत असली तरी शेतकऱ्यांवर ही सक्ती होत असल्याच्या तक्रारी न आल्याचेही यात म्हटले आहे. परंतु आमच्याकडे अशा प्रकारच्या तक्रारी तेथील शेतकऱ्यांकडून आल्यामुळेच आम्ही ही सूचना येथे दिली होती. तेव्हा या पुढे तरी विदर्भातील आपल्या अधिकाऱ्यांना अशा प्रकारची सक्ती शेतकऱ्यांवर करण्यात येऊ नये अशा सूचना आपल्याकडून देण्यात येतील काय ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, जरूर तशा प्रकारच्या सूचना निश्चितपणे दिल्या जातील. आणि सन्माननीय सदस्यांकडे ज्या तक्रारी यासंबंधात आल्या आहेत त्या त्यांनी माझ्याकडे दिल्यास त्याबाबतही आम्ही जरूर चौकशी करू.

****

**पृ.शी.** : जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी),औरंगाबाद मधील सर्व कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन योजना लागू करणे.

**मु.शी.** : जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी),औरंगाबाद मधील सर्व कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन योजना लागू करणे याबाबत श्री. श्रीकांत जोशी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

---

**सन्माननीय सदस्य अनुपस्थित.**

****

<u>**लक्षवेधी सूचना क्र. 6 व 7 संबंधात** ...</u>

**उपसभापती** : लक्षवेधी सूचना क्र.6 व 7 ला उत्तरे देणारे संबंधित मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांना बोलाविण्यात यावे. तोपर्यंत पुढील लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येईल.

( यानंतर श्री. सरफरे .... 3आय 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने राज्याबाहेरील ठेकेदाराला टोल वसूलीचा ठेका देणे

मु. शी : महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने राज्याबाहेरील ठेकेदाराला टोल वसूलीचा ठेका देणे यासंबंधी सर्वश्री दिवाकर रावते, सुरेश जेथलिया, गोपीकिसन बाजोरिया, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"औरंगाबाद, जालना, वाहूर, परतूर, कोल्हा, परभणी व नांदेड या रस्त्यावरील वाहनांवरील टोल वसूल करण्यासाठी ठेकेदार नेमण्याबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने महाराष्ट्राबाहेरील आयुष्यजय कन्स्ट्रक्शन कंपनी प्रा.लि. इंदोर, मध्यप्रदेश येथील कंत्राटदाराला फक्त 5 कोटी 56 लाख रुपये इतक्या कमी किंमतीत देण्यात येणे, तसा कार्यादेश राज्य रस्ते विकास महामंडळाकडून देण्यात येणे, सदर सात महत्वाच्या व मोठया शहरातील रस्त्यावरील हजारो वाहनांवरील टोलच्या रक्कमेपोटी कोट्यावधी रुपये जमा होत असताना महाराष्ट्राबाहेरील इंदूर मधल्या उपरोक्त ठेकेदाराला इतक्या कमी किंमतीत टोलच्या रक्कमेचा ठेका देऊन या राज्यातील ठेकेदारांना डावलण्यात येणे, अशाच प्रकारे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने इतरही रस्त्यांवरील टोल व रस्ते बांधण्याची कामे अल्प मोबदल्यात मध्यप्रदेशातील इंदोर येथील ठेकेदारांना देणे, त्यामुळे शासनाच्या महसूलाचे होत असलेले कोट्यावधी रुपयांचे नुकसान, हे व्यवहार पारदर्शक नसल्याने जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता याप्रकरणी शासनाने तातडीने खुलासा करण्याची नितांत आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. अनिल देशमुख (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्रिमहोदयांना असे विचारु इच्छितो की, महाराष्ट्रामध्ये ज्या ज्याठिकाणी अशाप्रकारचे टोल नाके आहेत त्यांची यादी आपण आम्हाला उपलब्ध करुन द्यावी. कारण या टोल नाक्यांमध्ये खरे किती आणि खोटे किती हे समजत नाही. कोणत्या कामासाठी टोल नाके दिले हे समजत नाही. कोणताही नवीन रस्ता झाल्यानंतर त्या ठिकाणी टोल नाका टाकला जातो. मी अमरावती येथे गेलो असतांना मला देखभाल आणि दुरुस्तीकरिता टोलनाका टाकण्यात आल्याचे सांगण्यात आले. पूल आणि रस्ता बांधल्यानंतर आपण हे टोलनाके दुसऱ्यांना चालवावयास दिले. त्यांनी याबाबत आपली मंजूरी घेतली आहे काय? तेव्हा महाराष्ट्रामध्ये किती ठिकाणी टोल नाके आहेत याची यादी आपण सभागृहाला उपलब्ध करुन दिली तर त्यापैकी खरे किती आणि खोटे किती टोल नाके आहेत हे लक्षात येईल. ती यादी आपण उपलब्ध करुन देणार काय?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, एम.एस.आर.डी.सी. आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेमार्फत महाराष्ट्रामध्ये जेवढे टोल नाके आहेत त्यांची यादी उपलब्ध करुन दिली जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

पृ. शी. : मुंबई व नवी मुंबई आयुक्तालयातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोडकळीस आलेली निवासस्थाने

मु. शी : मुंबई व नवी मुंबई आयुक्तालयातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोडकळीस आलेली निवासस्थाने यासंबंधी श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील, श्रीमती फौजिया खान, सर्वश्री भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेल्या) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय उप मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईतील व नवी मुंबई आयुक्तालयातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या निवासस्थानाची नुकतीच पाहणी केली असता सर्व निवासस्थाने मोडकळीस आल्याची धक्कादायक बाब निदर्शनास येणे, सर्वसामान्य जनतेचे रक्षण करणाऱ्या पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांवर जीव मुठीत ठेवून त्याठिकाणी रहावे लागणे, पोलीस वसाहतीमधील खोल्यांच्या दुरुस्तीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, जुलै,2007 मध्ये सुरु असलेल्या पावसामुळे छतामधून पाणी घरात पडत असल्यामुळे तेथे राहणेही अशक्य झाल्यामुळे पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांत पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण, याबाबत खोल्यांची त्वरीत दुरुस्ती करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना"

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

.... ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, पोलीस विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानासंबंधी मी विशेष उल्लेखाची सूचना मांडली होती आणि आता लक्षवेधी सूचना उपस्थित करीत आहे. या इमारतींच्या दुरुस्तीसाठी 1 कोटी 36 लाख रुपयांचा निधी देण्यात आला आहे. या वसाहती नवी मुंबईमध्ये सी.बी.डी. बेलापूर, पनवेल, कळंबोली, उरण, तळोजा, रबाळे याठिकाणी आहेत. त्याठिकाणी खुराडयासारख्या असलेल्या खोल्यांमध्ये लोक रहात आहेत. त्या खोल्यांचे पत्रे मोडले आहेत, दारे-खिडक्या तुटल्या आहेत. अशापरिस्थितीत हे लोक रहात असून ते लोकांची सेवा करीत आहेत. तेव्हा 1 कोटी 36 लाखामध्ये या वसाहतींची डागडुजी होऊ शकत नाही. म्हणून माझ ी आपणामार्फत मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, या कर्मचाऱ्यांना आपण नवीन निवासस्थाने बी.ओ.टी. तत्वावर उपलब्ध करुन दिली पाहिजेत. किंवा महानगरपालिकेला या इमारती देण्यात याव्यात. त्याकरिता 10 ते 15 कोटींचा निधी ताबडतोब उपलब्ध करुन देण्यात येईल काय? दुसरा प्रश्न असा की, हा निधी केव्हा उपलब्ध करुन देण्यात येईल?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मुंबई आणि उर्वरित महाराष्ट्रामध्ये पोलीस विभागाच्या जुन्या झालेल्या इमारतींच्या दुरुस्तीकरिता 126 कोटी रुपयांचा कार्यक्रम शासनाने जाहीर केला आहे. या कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यामध्ये 43 कोटी रुपये देण्यात आले आहेत.उर्वरित 83 कोटी रुपयांची तरतूद सन 2007-08 या वित्तीय वर्षामध्ये करण्यात आली असून सदर रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आली आहे. नवी मुंबई येथील पोलीसांच्या वसाहतीच्या दुरुस्तीकरिता निधी कमी पडत असेल तर जेवढा आवश्यक असेल तेवढा निधी उपलब्ध केला जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : धरमतर (ता.पेण,जि.रायगड) येथील इस्पात कंपनीचा कन्व्हेअर बेल्ट तुटून पडणे

मु. शी : धरमतर (ता.पेण,जि.रायगड) येथील इस्पात कंपनीचा कन्व्हेअर बेल्ट तुटून पडणे यासंबंधी श्री. जयंत प्र. पाटील, प्रा. शरद पाटील, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"धरमतर (ता.पेण, जि.रायगड) येथे कार्यरत असलेल्या इस्पात कंपनीच्या मेन गेट समोरील कन्व्हेअर बेल्ट दिनांक २ जुलै,२००७ रोजी पहाटे तुटून खाली पडल्याने आर.सी.एफ. ची रेल्वे वाहतूक ठप्प होणे, बेल्ट पडताना स्फोटका सारखा मोठा आवाज झाल्याने परिसरात घबराट निर्माण होणे, कन्व्हेअर बेल्टची योग्य देखभाल न राखणे, तसेच या परिसरात माल वाहतूक ट्रेलर मोठ्या प्रमाणात उभे राहिल्याने वाहतूकीस प्रचंड अडथळा निर्माण होऊन अपघात होण्याची शक्यता असणे, या सर्व घटनांमुळे परिसरातील जनतेमध्ये घबराटीचे व चिंतेचे वातावरण निर्माण झाल्याने शासनाने याबाबत केलेली कार्यवाही व उपाययोजना."

श्री. गणेश नाईक (कामगार मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

.... ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, धरमतर येथे इस्पात कंपनीचा कारखाना आहे. त्या कारखान्याचा कन्व्हेअर बेल्ट रेल्वेच्या ट्रॅकवर पडला ही गोष्ट खरी आहे काय? या बेल्टच्या उभारणीकरिता संबंधित खात्याची परवानगी घेतली होती काय? सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना खरे म्हणजे बंदर विभागाशी संबंधित आहे. या ठिकाणी माननीय कामगार मंत्री उत्तर कां देत आहेत हे मला समजत नाही? या ठिकाणी कन्व्हेअर बेल्टची उभारणी करण्याकरिता पायलिंग करण्याची आवश्यकता आहे. धरमतर येथे 16 मीटर आत जमिनीमध्ये रॉक आहे. त्यामुळे त्या ठिकाणी पायलिंग न करता हा कन्व्हेअर बेल्ट उभारण्यात आला ही गोष्ट खरी आहे काय? तसे असेल तर या सर्व बाबींची पहाणी करुन हा कन्व्हेअर बेल्ट चालू करण्याची परवानगी कंपनीला देण्यात येईल काय?

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक : इस्पात निप्पॉन डेन्रो या कंपनीचा कच्चा माल जेट्टीवरून कन्व्हेअर बेल्टने कंपनीच्या प्लांटमध्ये नेला जातो. तो नेताना एक रेल्वेचा ट्रॅक पेण कडून अलिबागला जाणारा रस्ता आहे, तो क्रॉस करावा लागतो. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील साहेबांनी सांगितल्याप्रमाणे कन्व्हेअर बेल्ट तुटला. त्या ठिकाणच्या वादळी वाऱ्यामुळे कन्व्हेअर बेल्ट तुटून स्ट्रक्चरसह रेल्वे लाईनवर पडला. त्यामुळे वाहतूक खोळंबली ही वस्तुस्थिती आहे. परंतु त्या कंपनीच्या व्यवस्थापनाला सांगण्यात आले की, रेल्वे क्रॉसिंग परिसरात रस्ता आहे, त्यामुळे कन्व्हेअर बेल्टचे मजबुतीकरण गरजेपेक्षा तिप्पटीने करावे, म्हणजे असे अपघात होणार नाहीत आणि वाहतूक खेळंबणार नाही. त्यांनी सर्व विभागांची परवानगी घेतलेली होती. जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेतलेली होती. सर्व विभागांची परवानगी घेऊनच कंपनीचा कारभार चाललेला आहे. भविष्यकाळामध्ये या संदर्भाने अधिक काळजी घेण्याच्या संदर्भात त्यांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : बंदरे विभागाच्या अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता, कंपनीने बंदरे विभागाची परवानगी घेतलेली नाही. आताच मंत्री महोदयांनी त्या ठिकाणचे स्ट्रक्चरच्या मजतुबीकरण्याच्या संबंधाने सांगितले. बेल्ट कन्व्हेअरचा जो भाग आहे त्या भागामधून शेतकरी शेतीच्या कामाच्या निमित्ताने जा-ये करत असतात. अशापरिस्थितीमध्ये कन्हेअर बेल्ट तुटून पडला तर त्यांची जबाबदारी कोण घेणार ? तेव्हा कन्व्हेअर बेल्टच्या भागाची पुन:र्बांधणी करण्यास कंपनीला सांगणार आहात काय ?

श्री.गणेश नाईक : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील साहेबांनी जे सांगितले ते खरे आहे की, त्या ठिकाणचे मुळचे जे स्ट्रक्चर आहे ते मजबूत केले पाहिजे. त्या ठिकाणी वादळी वारे वाहतात. सन्माननीय सदस्यांचे म्हणण्याप्रमाणे त्या कंपनीला त्या ठिकाणचे स्ट्रक्चर मजबूत करण्याच्या दृष्टीने सूचना देण्यात येतील.

--

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

**पृ. शी.** : ग्रंथालय सेवकांना वेतनश्रेणीचा लाभ देण्यात न येणे

**मु. शी** : ग्रंथालय सेवकांना वेतनश्रेणीचा लाभ देण्यात न येणे, यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर,नितीन गडकरी, संजय केळकर, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्षनेता ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय उव्च्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात सुमारे 5 ते 6 हजार सार्वजनिक ग्रंथालये असून या सर्व ग्रंथालयांमध्ये काम करणाऱ्या ग्रंथालय सेवकांना तुटपुंज्या वेतनावर गेल्या अनेक वर्षापासून काम करावे लागणे, तुटपुंज्या वेतनामुळे त्यांच्या मुलांना शिक्षण व कुटुंबांचा उदरनिर्वाह करणे अत्यंत अडचणींचे होणे, या ग्रंथालय सेवकांना वेतनश्रेणी देण्याबाबत शासनाने नेमलेल्या वि.स.पागे, प्रभा राव व व्यंकप्पा पत्की यांच्या समितीने याबाबतचा अहवाल शासनास सादर करुनही त्याची अंमलबजावणी न होणे, शालेय ग्रंथपालांना 5000 पुस्तकांच्या देखभालीच्या अटीवर पूर्ण वेळ ग्रंथपालाच्या पदास शासनाने मान्यता दिलेली असतांना सार्वजनिक ग्रंथालयातील सेवक वर्ग गेल्या अनेक वर्षापासून 25 ते 40 हजार ग्रंथसंख्येच्या पुस्तकांची देखभाल करीत असतांना त्यांना वेतनश्रेणीचा लाभ देण्यात न येणे. परिणामी या ग्रंथालय सेवकांमध्ये निर्माण झालेला तीव्र स्वरुपाचा असंतोष, शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या वेतनश्रेणी, महागाई भत्तावाढ, निवृत्तीवेतन व इतर सोई-सवलतींचा लाभ याही कर्मचाऱ्यांना मंजूर करण्याबाबत शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबतची शासनाची भूमिका"

श्री.सुरेश शेट्टी( उच्च शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये जवळपास 7,705 शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये आहेत. या सार्वजनिक ग्रंथालयांतील सेवकांच्या वेतनाबाबत शासनाने वेळोवेळी समित्या नेमल्या. त्यामध्ये वि.स.पागे, प्रभा राव व व्यंकप्पा पत्की समिती नेमण्यात आली. या समित्यांनी वेळोवेळी आपले अहवाल दिलेले आहेत. मी या समित्यांच्या अहवालांचा उल्लेख करणार नाही. निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, दिनांक 29-10-2003 रोजी तत्कालीन माननीय मंत्री यांच्या दालनात झालेल्या बैठकीत श्री.व्यंकप्पा पत्की समितीने शिफारस केली असली तरी या कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू न करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय सुधारित अधिनियम प्रारुप मा. मंत्रीमहोदयांनी त्यात सुचविलेल्या दुरुस्त्या उदा.शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी/सेवाशर्ती, इत्यादी अतिरिक्त आर्थिक भारासंबंधीच्या बाबी वगळून तत्वत: मान्य करण्यात यावा असे ठरले". माझा स्पेसिफीक प्रश्न आहे की, व्यंकप्पा पत्की समितीच्या अहवालाच्या संदर्भात शासनाने जे सांगितलेले आहे, त्याप्रमाणे ग्रंथालय अधिनियम शासन केव्हा मंजूर करणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.फुंडकर साहेबांनी सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्रात एकूण 7,705 सार्वजनिक ग्रंथालये आहेत. जी श्री.पत्की समिती नेमलेली होती त्या संबंधात..

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी ....

माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी सांगितले की, 29.10.2003 ला माननीय मंत्रिमहोदयांच्या दालनात बैठक झाली हे खरे आहे. त्या बैठकीमध्ये हे स्पष्ट करण्यात आले की, वेतन व भत्त्यासबंधीची जी शिफारस होती ती महाराष्ट्र शासनाला मान्य नाही तसेच ती शिफारस सोडून पत्की समितीने दुसऱ्या ज्या शिफारशी केल्या त्याबाबतीत विचार करु. पब्लिक लायब्ररी ॲक्टमध्ये ज्या सुधारणा करावयाच्या आहेत त्याकडे आमचे लक्ष आहे आणि आम्ही ते लवकरात लवकर करणार आहोत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांच्या दालनात बैठक झाली त्यामध्ये तत्वत: मान्य करण्यात आले की, लवकरात लवकर अधिनियम पास करु. लवकरात लवकर म्हणजे किती दिवसात करणार ? सन 2003 मध्ये बैठक झाली तरी तेव्हापासून यांचे लवकरात लवकर सुरुच आहे. साधारणत: तीन महिन्यात, सहा महिन्यात किंवा पुढच्या अधिवेशनापर्यंत हे करु असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले पाहिजे. शासन यामध्ये काही पैसे देत नाही. "आर्थिक भार वगळून" अशा पध्दतीचा उल्लेख निवेदनामध्ये केलेला आहे. ग्रंथालय सेवकांच्या वेतनाचा भार वगळून ज्या शिफारशी होत्या त्या मान्य करण्यासंबंधी अधिनियम करावयाचा आहे. यामध्ये शासनावर कोणताही आर्थिक भार येत नाही. तरीही लवकरात लवकर करु असे 2003 पासून चालू आहे. येत्या अधिवेशनामध्ये या अधिनियिमाच्या संदर्भातील बिल आणणार काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, होय.

श्री. रामनाथ मोते : शासनाने ग्रंथपाल आणि सेवकांच्या वेतनाच्या संदर्भातील मागणी नाकारलेली आहे. तथापि, ज्या समितीचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आलेला आहे त्या व्यंकप्पा पत्की समितीने ज्या सूचना केलेल्या आहेत त्यामध्ये सी.पी.एफ.च्या संदर्भात, त्यांच्या निवृत्तिवेतनाच्या संदर्भात जी शिफारस केलेली आहे ती शिफारस शासन स्वीकारणार काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की, आर्थिक भारासंबंधीची एकही शिफारस शासन मान्य करणार नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, कोणतीही वित्तीय जबाबदारी घेण्याची तयारी शासनाने दर्शविलेली नाही. ग्रंथालय कर्मचारी हे संस्थेचे कर्मचारी असले तरी ग्रंथालय चालविण्यासाठी आणि कर्मचाऱ्यांचे पगार देण्यासाठी शासन अनुदान देत असते. ज्याप्रमाणे अंगणवाडी कर्मचाऱ्यांसाठी पेन्शन योजना तयार करण्याचे शासनाने ठरविले आहे त्या पध्दतीने कॉन्ट्रीब्युटरी प्रोव्हीडंट फंड योजनेच्या अंतर्गत या ग्रंथालयाच्या कर्मचाऱ्यांना लाभ देता येईल का याचा शासन विचार करणार काय ? तो विचार शासनाने करावा अशी आपल्या माध्यमातून माननीय मंत्रिमहोदयांना विनंती करतो.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, दोन वर्षापूर्वी याच सभागृहात सन्माननीय सदस्यांनी मला विनंती केली होती की, त्यांची ग्रँट वाढवून द्यावी. सन 2004 मध्ये या सर्वांची ग्रँट दुप्पट करुन दिलेली आहे. आज महाराष्ट्रामध्ये पब्लिक लायब्ररीसाठी जी ग्रँट देतो तेवढी ग्रँट देशामध्ये कोणत्याही राज्यात दिली जात नाही असे मला वाटते. एकूण अर्थसंकल्पीय तरतूद 3988.72 लाख रुपये या सार्वजनिक ग्रंथालयांना देत आहोत. त्यामध्ये 50 टक्के रक्कम नवीन पुस्तकांची खरेदी करण्यासाठी आणि 50 टक्के वेतनासाठी असा रेशिओ ठरविलेला आहे. सन 2004 मध्ये ग्रँट दुप्पट केलेली आहे. जिल्हा "अ" दर्जाच्या ग्रंथालयासाठी 2 लाख 40 हजार रुपये ग्रँट होती ती 4 लाख 80 हजार रुपये केलेली आहे. हे सर्व आपण करीत आहोत.

प्रा. शरद पाटील : या कर्मचाऱ्यांच्या जीवनात स्थैर्य प्राप्त होण्याच्या दृष्टीने शासन याबाबत विचार करणार काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, हे कर्मचारी शासनाचे कर्मचारी नाहीत. ज्या स्वयंसेवी संस्था किंवा ग्रंथालय संस्था तालुका आणि जिल्हा पातळीवर ग्रंथालये चालवितात त्यांचे हे कर्मचारी आहेत. त्यांचे काही बेसिक क्वालिफिकेशन नाही. काही ठिकाणी ते दिवसातून 6 तास, काही ठिकाणी 3 तास काम करतात. त्यांना मानधन म्हणून शासनाकडून पैसे देतो. उद्या आपली अशी मागणी येईल की, त्यांना परमनंट करा, त्यांना पेन्शन द्या तर एवढा बोजा घेणे महाराष्ट्र शासनाला शक्य नाही.

-----

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "बंदी असताना देखील छुप्या मार्गाने होत असलेली गर्भजल चिकित्सा" या विषयासंबंधी सर्वश्री संजय दत्त व इतर वि.प.स. यांनी दिनांक 5.4.2006 रोजी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर शासनातर्फे करण्यात आलेल्या निवेदनावर झालेल्या प्रश्नोत्तरांच्या वेळी आश्वासन दिल्याप्रमाणे माननीय सभापतींनी निदेश दिल्याप्रमाणे अधिक माहिती सभागृहासमोर ठेवीत आहे.

**उपसभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबतची अधिक माहिती छापावी.)

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. बरवड **15:20**

## विशेष उल्लेख

**पृ. शी.** : अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) जिल्हा उद्योग केन्द्राच्या इमारतीचा कोसळलेला स्लॅब

**मु. शी.** : अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) जिल्हा उद्योग केन्द्राच्या इमारतीचा कोसळलेला स्लॅब याबाबत श्री. जयंत प्र.पाटील वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा-ा-ीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील, यां-ी ए□ विशेष उल्ले□ाची सूच-ा दिली आहे. त्यां-ी ती मांडावी.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच-ा मांडतो.

"अलिबाग (जि. रायगड) शहरातील रायगड बाजार समोरची चार हजार स्क्वेअर मीटर जागा सरकारने खरेदी करुन त्या ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळानें 1971 मध्ये जिल्हा उद्योग केंद्राच्या इमारतीची उभारणी केली. सध्या या इमारतीच्या दुरवस्थेची परिस्थिती मी दिनांक 29 मार्च 2007 रोजी विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे सभागृहात शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मांडली होती. परंतु याबाबत मला संबंधित मंत्र्यांकडून एक महिन्याच्या आत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाल्याचे कळविले गेले नाही.

मी दिनांक 29 मार्च 2007 च्या विशेष उल्लेखाद्वारे जे सभागृहात सांगितले होते त्या प्रमाणे दिनांक 1 जुलै 2007 रोजी येथील जिल्हा उद्योग केंद्राच्या इमारतीच्या झालेल्या दयनीय अवस्थेमुळे महाव्यवस्थापक यांच्या दालनातील स्लॅबचा काही भाग कोसळून तेथील फर्निचरचे नुकसान झाले आहे. नशिबाने ही घटना घडली तो वार रविवार असल्याने जीवितहानी टळली आहे.

तरी या इमारतीचे पूर्णतः नवीन बांधकाम होईपर्यन्त पर्यायी जागा शोधून त्या ठिकाणी उद्योग केंद्राचे कार्यालय सुरु करण्यात यावे. कारण यापुढे कोणत्याही क्षणी इमारत पूर्णपणे कोसळण्याची शक्यता असल्याने तसेच तुटलेल्या वायरींगमुळे त्यातून वीजप्रवाह उतरण्याची भीती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत प्र. पाटील...)

असल्याने सध्यातरी कर्मचारी आपला जीव मुठीत धरुन त्या ठिकाणी काम करीत आहेत. या गंभीर घटनेकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी व शासनाकडून योग्य ती कार्यवाही होण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे."

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : माणगाव खो-यात (जि.सिंधुदुर्ग, ता. कुडाळ) टाळंबा प्रकल्पातील बुडीत क्षेत्रात कागदोपत्री विकास कामे दाखवून केलेला भ्रष्टाचार

**मु. शी.** : माणगाव खो-यात (जि.सिंधुदुर्ग, ता. कुडाळ) टाळंबा प्रकल्पातील बुडीत क्षेत्रात कागदोपत्री विकास कामे दाखवून केलेला भ्रष्टाचार याबाबत श्री.परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा-ा-ीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यां-ी ए विशेष उल्लोची सूच-ा दिली आहे. त्यां-ी ती मांडावी.

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लोची सूच-ा मांडतो.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळ तालुक्यात माणगाव खो-यात टाळंबा प्रकल्पातील बुडीत क्षेत्रात जाणा-या गावातील दुकानवाडी ते अजिवडे या ठिकाणचा रस्ता पंतप्रधान सडक योजनेतून घेतलेला असतानाही त्या ठिकाणी पाटबंधारे विभागामार्फत रींग रोड म्हणून ह्या गावांना जोडणारा रस्ता असतानाही पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून 3 कोटी रुपये खर्च करुन रस्ता केल्याचे दराखविण्यात येणे, त्याचप्रमाणे ह्या बुडीत क्षेत्रात कोणत्याही विहिरींची व कॉजवेची गरज नसतानाही नेरुर उपवडे व वसोळी ह्या गावात भारत निर्माण योजनेअंतर्गत 8 विहीरी व संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेतून 3 विहीरी व संपूर्ण रोजगार योजनेतून कॉजवेसाठी साधारणपणे 3 लाख रुपयांचा खर्च केल्याचे दाखविण्यात येणे, तसेच संपूण रोजगार योजनेतून विहिरी घेताना लोकवर्गणी काढून 20 टक्के वर्गणी जमा करुन विहिरी केल्याचेही दाखविण्यात येणे, अशा प्रकारे बुडीत क्षेत्रात कोणत्याही विकास कामांची गरज नसताना कागदापत्री कामे दाखवून मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी होण्याची नितांत आवश्यकता असून या बाबत शासनाने निवेदन करावे अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

---

...5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुरुड (जि. रायगड) पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. डी.वाय.जाधव यांनी पंचायत राज समितीच्या नावाखाली घेतलेली रक्कम

**मु. शी.** : मुरुड (जि. रायगड) पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. डी.वाय.जाधव यांनी पंचायत राज समितीच्या नावाखाली घेतलेली रक्कम याबाबत श्री.जयंत प्र. पाटील वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा-ा-ीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यां-ी ए□ विशेष उल्ले□ाची सूच-ा दिली आहे. त्यां-ी ती मांडावी.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच-ा मांडतो.

"रायगड जिल्ह्यातील मुरुड पंचायत समितीचे तत्कालीन गट विकास अधिकारी श्री. डी.वाय. जाधव यांनी रायगड जिल्ह्यात तपासणीसाठी येत असलेल्या पंचायत राज समितीच्या नावाखाली श्री. भोईर, पशुधन पर्यवेक्षक यांच्याकडून रुपये 500/- घेताना दिनांक 8.12.2005 रोजी लाचलुचपत विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडून त्यांना अटक केली.

ही बाब मी औचित्याच्या मुद्याद्वारे दि. 9.12.2005 रोजीच्या नागपूर अधिवेशनात सभागृहाच्या निदर्शनास आणल्यामुळे श्री. डी.वाय.जाधव यांना विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या आदेशाने दि. 13 डिसेंबर 2005 पासून निलंबित केले.

प्रस्तुत प्रकरणी गुन्ह्याचा तपास पूर्ण करण्यात आला असून त्यात श्री.डी.वाय.जाधव व वरिष्ठ सहाय्यक यांनी पंचसाक्षीदार समक्ष पाचशे रुपये स्वीकारले असल्याचे मान्य केले,

असे असताना देखील या प्रकरणाची खातेनिहाय चौकशी न करता श्री. डी.वाय.जाधव यांचा एक विनंती अर्ज घेऊन तसेच विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना मुख्य कार्यकारी अधिकारी,

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 15:20

(श्री. जयंत प्र. पाटील...

जिल्हा परिषद, रायगड - अलिबाग यांचे एक शिफारस पत्र घेऊन पंचायत राज समितीच्या नावाखाली कर्मचा-याकडून पैसे घेणा-या या गंभीर प्रकरणात निलंबित असलेल्या श्री. डी.वाय.जाधव यांना शासनाने महत्वाच्या पदावर पुनर्स्थापित करण्याचे दि. 9 नोव्हेंबर 2006 रोजी आदेश दिले होते. शासनाचे या महत्वाच्या बाबीकडे लक्ष वेधून विशेष कार्यवाही व्हावी यासाठी ही विशेष उल्लेखाची सूचना मी देत आहे."

---

...नंतर कु. खर्चे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम एम..... 15:25

**पृ.शी.**: सिंधुदूर्ग जिल्हयातील एकात्मिक पडीक जमीन विकास कार्यक्रमांतर्गत रोपे खरेदीमध्ये झालेला भ्रष्टाचार

**मु.शी.**: सिंधुदूर्ग जिल्हयातील एकात्मिक पडीक जमीन विकास कार्यक्रमांतर्गत रोपे खरेदीमध्ये झालेला भ्रष्टाचार. याबाबत श्री.परशुराम उपरकर,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.परशुराम उपरकर ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : महोदय,मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"सिंधुदूर्ग जिल्हयातील एकात्मिक पडीक जमीन विकास कार्यक्रमांतर्गत कुडाळ - कणकवली व कणकवलीतील वैभववाडी प्रकल्पांतील कामात पाणलोटात जी रोपे खरेदी करण्यात आली ती खाजगी रोपवाटिकेतून खरेदी करण्यात येणे,रोपांची रक्कम / कामाची रक्कम रोखीने वाटण्यात येणे,तसेच जल व मृदसंधारणाची कामे करण्यात आली, त्याकरिता समितीने ठराव न करणे,मातीनाला बांध,शेततळी,शेत विहिरी इत्यादि कामे जेसीबी लावून करण्यात येणे,पाणलोट अभियंता यांनी झालेल्या कामाच्या 6.5 % रक्कम देणेबाबतचा करार झालेला असतांना करार अर्ध्यावर मोडून नवीन करार करणे,पाणलोट विकास निधी पाणलोट प्रकल्प पूर्ण होण्याआधीच काढण्यात येणे. अशा प्रकारे विविध कामात मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून याबाबत संबंधितांकडे तेथील ग्रामस्थांनी तक्रार करुनही अद्यापपर्यंत चौकशी वा कोणतीच कारवाई न होणे,यामुळे तेथील ग्रामस्थांनी तीव्र आंदोलन करण्याचा दिलेला इशारा,याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे. "

----





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4.00 वाजता पुन : भरेल.

( 3.26 ते 4.00 मध्यंतर )

-----

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मध्यंतरानंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**पृ.शी.**: "नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, 1976 निरसित करणे."

**मु.शी.**: "नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, 1976 निरसित करणे" या विषयावर माननीय मुख्यमंत्री यांचा वैधानिक प्रस्ताव.

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प.नियम 106 अन्वये पुढीलप्रमाणे प्रस्ताव मांडतो :-

"**ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २५२ च्या खंड (१) अनुसार, महाराष्ट्र विधानसभेने दिनांक ५ ऑक्टोबर, १९७१ रोजी आणि महाराष्ट्र विधानपरिषदेने दिनांक ७ ऑक्टोबर, १९७१ रोजी, नागरी स्थावर मालमत्तेवर कमाल मर्यादा लादणे आणि कमाल मर्यादेहून अधिक असणाऱ्या अशा मालमत्तेचे संपादन आणि त्याच्याशी संबंधित किंवा सहाय्यभूत व तदनुषंगिक सर्व बाबी यांचे संसदेच्या अधिनियमाद्वारे महाराष्ट्र राज्यात विनियमन करण्यात यावे असा ठराव केलेला होता;

**आणि ज्याअर्थी,** संसदेने त्यानंतर नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, १९७६ (१९७६ चा केंद्रीय अधिनियम क्रमांक ३३) अधिनियमित केलेला होता;

**आणि ज्याअर्थी,** संविधानाच्या अनुच्छेद २५२(२) अन्वये, हरयाणा व पंजाब राज्याच्या विधानमंडळांच्या सभागृहांनी, त्या राज्यांना लागू असलेला नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, १९७६, संसदेत कायदा करुन निरसित करण्यात यावा, असा ठराव केला होता; व त्याच्या परिणामी, संसदेने नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ (१९९९ चा अधिनियम क्रमांक १५) अधिनियमित केलेला आहे;

**आणि ज्याअर्थी,** नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ च्या कलम १ पोट-कलम (२) मध्ये अशी तरतूद आहे की, जे राज्य, संविधानाच्या अनुच्छेद २५२ च्या खंड (२) अन्वये, याबाबतीत ठराव मंजूर करुन, उक्त अधिनियमाचा अंगीकार करील त्या अन्य राज्याला उक्त अधिनियम लागू होईल;

..२..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे....

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासनाचे असे मत आहे की, नागरी क्षेत्रातील जमीन गृह निर्माणाकरिता उपलब्ध व्हावी या दृष्टीने महाराष्ट्र राज्याला लागू असलेला नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, १९७६ हा निरसित करणे आवश्यक आहे;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २५२, खंड(२) अनुसार, महाराष्ट्र विधानपरिषद याद्वारे, संसदेने मंजूर केलेला नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ या राज्यासाठी अंगीकृत करण्यात यावा, असा ठराव करीत आहे."

सभापती महोदय, युएलसी ॲक्ट निरसन करण्याच्या संदर्भात मागील अधिवेशनात ठराव मांडला होता. हा ठराव मंजूर करण्याच्या दृष्टीने त्यावर साधकबाधक चर्चा सभागृहाने करावी. सभापती महोदय, केंद्र शासनाने १९७६ साली काही राज्यांच्या सूचनेवरुन त्या राज्यांसाठी हा युएलसी कायदा अस्तित्वात आणला होता. १९७६ ते १९९९ या कालावधीनंतर त्या कायद्याचा हेतू व उद्देश खऱ्या अर्थाने तितकासा साध्य होत नाही हे लक्षात आल्यानंतर काही राज्यांनी हा कायदा निरसित करावा अशा पध्दतीची विनंती केंद्र शासनाला केली.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझी मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, महाराष्ट्राच्या एकूणच परिस्थितीवर परिणाम करणारा हा प्रस्ताव आहे. त्यामुळे या प्रस्तावासंदर्भात महत्वाचे मुद्दे प्रकर्षाने मांडावेत. या कायद्यामुळे शासनाकडे किती एकर जमीन उपलब्ध झाली, त्यापैकी किती जमीन सार्वजनिक वापरासाठी उपयोगात आणली हे मंत्रीमहोदयांनी सांगितले तर हा प्रस्ताव मांडण्याचे कारण काय हे कळून येईल आणि या प्रस्तावाला चांगले महत्व प्राप्त होईल.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

सभापती महोदय, युएलसी प्रस्तावाच्या संदर्भात हेल्दी चर्चा झाली तर या प्रस्तावाला काही तरी अर्थ राहणार आहे. त्यामुळे या संदर्भात एकूण किती एकर जमीन मिळाली व त्या जमिनीचा आपण कसा उपयोग केला,याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी दिली तर योग्य होईल असे मला वाटते.

श्री. मधुकर सरपोतदार : माननीय सभापती महोदय, युएलसीच्या संदर्भात मंत्रालयात प्राथमिक बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीमध्ये त्यावेळी जनता दल (सेक्युलर) च्या नेत्या श्रीमती मृणालताई गोरे या उपस्थित होत्या. त्या बैठकीत असे ठरले होते की, प्रथम युएलसी कायद्याअंतर्गत मुंबईतील 30 हजार एकर जमीन ताब्यात घेण्यात यावी परंतु गेल्या अनेक वर्षात शासनाने ही जमीन ताब्यात घेतली नाही. आता ही जमीन शासनाने ताब्यात घेतली नाही आणि युएलसी ॲक्ट रद्द केला तर खूप मोठया किमतीची जमीन शासनाच्या ताब्यातून निघून जाईल. मुंबईतील ही जमीन फार मोठया किमतीची असून आपण युएलसी कायदा रद्द केला तर ही जमीन त्या त्या लोकांच्या मालकीची होईल. या जमिनीचे कोटयावधी रुपयांचे व्यवहार होणार आहेत. या संदर्भात आम्ही आमचे विचार व्यक्त करणार आहोत. युएलसी कायदा रद्द झाला तर गरीबांना स्वस्त दरात मुंबईत घरे मिळू शकतील, असा आपला दावा आहे. परंतु युएलसीचा प्रस्ताव माननीय मुख्यमंत्र्यांनी वरिष्ठ सभागृहात मांडला असता आणि त्यावर त्यांनी आपले विचार व्यक्त केले असते तर बरे झाले असते. आपण या सभागृहाला वरिष्ठ सभागृह मानता तर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी यासंदर्भात आपले विचार व्यक्त करावयास पाहिजे होते. या अतिशय महत्वाच्या प्रस्तावावर चर्चा सुरु होत आहे परंतु सभागृहात सदस्यांची संख्या सुध्दा कमी आहे. हा प्रस्ताव महाराष्ट्राच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. युएलसी प्रस्तावाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांऐवजी माननीय राज्यमंत्री माहिती देणार असतील तर ते योग्य होणार नाही. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी यासंदर्भात आपले विचार व्यक्त करावयास पाहिजे. युएलसी ॲक्ट हा 1976 चा असून एवढे वर्ष सर्व प्रकारची संधी मिळालेली असतांनाही शासनाने या जमिनी ताब्यात घेतल्या नाहीत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी युएलसी ॲक्टनुसार किती जमीन ॲक्वायर केलेली आहे व त्या जमिनीचा आपण कसा उपयोग करणार आहोत याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी द्यावी, असे सांगितलेले आहे. त्यामुळे हा प्रस्ताव अतिशय महत्वाचा असल्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी सदनात यावे व त्यावर आपले विचार व्यक्त करावेत, अशी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2

श्री. मधुकर सरपोतदार ....

विनंती आहे. माननीय राज्यमंत्री महोदय युएलसीचा प्रस्ताव मांडणार असतील तर या प्रस्तावाची सर्व पार्श्वभूमी सन्माननीय सदस्यांना समजावून सांगणे आवश्यक आहे. आपल्याला युएलसी ॲक्टच्या संदर्भात सर्व माहिती द्यावी लागणार आहे. 1976 मध्ये युएलसी ॲक्ट झाल्यानंतर महाराष्ट्र शासनाने आतापर्यंत किती जमीन ताब्यात घेतली, मुंबई शहरातील अजून किती जमीन शिल्लक आहे, या जमिनीचा उपयोग आपण भविष्यात कशा प्रकारे करणार आहोत हे सांगणे आवश्यक आहे. त्यामुळे मला असे वाटते की, सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी हा प्रस्ताव मांडला पाहिजे व त्यावर आपले विचार व्यक्त केले पाहिजेत.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, युएलसीचा ठराव 16.4.2007 रोजी या सभागृहात मांडण्यात आला होता. त्यामुळे मला असे वाटते की, या प्रस्तावावर चर्चा सुरु झालेली आहे. चर्चा सुरु झालेली असल्यामुळे युएलसीच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त करावेत. माझ्याकडे 16.4.2007 चे मिनिटस् आहे. त्यामुळे या प्रस्तावावर सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त करावेत, असे मला वाटते.

श्री. मधुकर चव्हाण: सभापती महोदय, आपण या प्रस्तावाच्या संदर्भात जे आदेश दिलेले आहेत ते आम्ही पाळतो. आपण युएलसी कायदा रद्द करणार आहोत. परंतु युएलसी कायदयांतर्गत किती जमीन शासनाने ताब्यात घेतली होती, त्या जमीनीचा उपयोग कशासाठी करण्यात आला व आता किती जमीन शिल्लक आहे तसेच आता हा कायदा रद्द झाल्यानंतर शासन कितनी जमीन गरीबांसाठी घर बांधण्यासाठी रिलीज करणार आहे, किती जमीन शासनाच्या ताब्यात राहणार आहे, ही सर्व माहिती सदनासमोर येणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या प्रस्तावाच्या संदर्भात थोडक्यात माहिती देण्याचा जरुर प्रयत्न करीन. जेणेकरुन आपणास चर्चा करण्यास उपयुक्त अशी माहिती मिळेल. मघाशी मी या कायद्याची पार्श्वभूमी सांगत होतो. हा कायदा कसा आला ? कसा रिपिल झाला ?

सभापती महोदय, दिनांक 22 मार्च 1999 रोजी केंद्र शासनाने संसदेमध्ये निरसन कायदा पारित केला. सर्वसाधारणपण नऊ राज्यांमध्ये हा कायदा अस्तित्वात आला होता. दोन्ही सभागृहाने मंजूर केल्यानंतर युएलसी कायदा या राज्यातून निरसित केला जाणार आहे.

सभापती महोदय, अत्यंत उदात्त हेतूने हा कायदा राज्यात आणला होता. परंतु 1976 पासून 2007 पर्यत या वर्षात एकूण जमिनींपैकी खूप कमी प्रमाणात जमिनी या कायद्याच्या माध्यमातून आपल्या ताब्यात आल्या. त्याची आकडेकवारी मी जरुर देईन. पण त्यापूर्वी मी सभागृहाला हा कायदा रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव येथे का ठेवण्यात आला याची पार्श्वभूमी सांगणार आहे.

सभापती महोदय, फेल्युअर ऑफ इम्प्लीमेन्टेशन बाबत मी असे म्हणेन की, आपल्या राज्यात युतीचे राज्य होते, आघाडीचे राज्य होते, त्यापूर्वी काँग्रेसचे राज्य होते. मी त्या राजकारणात जाणार नाही. परंतु एकंदरीत या कायद्याची अंमलबजावणी परिणामकारकपणे झालेली नाही. केंद्र शासनाने जेएनएनआरयुएमची एक महत्वाकांक्षी योजना हाती घेतली आणि त्याचे दूरगामी परिणाम विकास माध्यमातून होणार आहेत. सर्वसाधारणपणे 23 हजार 697 कोटी रुपयांचे प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठविले आहेत. त्यापैकी जवळपास 6 हजार 07 कोटी रुपयांचे प्रस्ताव मंजूर झालेले आहेत. आतापर्यंत केंद्र शासनाकडून 493 कोटी रुपये या योजनेच्या माध्यमातून राज्य शासनास प्राप्त झालेले आहेत. या जेएनएनआरयुएम कार्यक्रमाच्या माध्यमातून केंद्र शासनाबरोबर जो करार झाला त्यामध्ये जेएनएनआरयुएम कार्यक्रमाच्या माध्यमातून निधी प्राप्त करुन घ्यावयाचा असेल तर राज्यात असलेला युएलसी ॲक्ट रद्द करावा अशी अनिवार्य अट होती.

सभापती महोदय, आज आपणास मुंबई शहर विकसीत करावयाचे आहे. तसेच 227 नगरपालिका, महानगरपलिकांचे क्षेत्र विकसित करायचे आहे. त्यादृष्टीने आपण जो एमओयु साईन केला त्यामध्ये राज्य सरकार युएलसी ॲक्ट रद्द करील असा क्लॉज घातला होता. आज आपणास



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे..............

जेएनएनआरयुएम कार्यक्रमाच्या माध्यमातून 493 कोटी रुपये प्राप्त झालेले आहेत. मी पुढे हेही सांगतो की, आज याठिक्‌णी हा प्रस्ताव आणलेला आहे. त्यापूर्वी सुध्दा तत्कालीन गृहनिर्माण मंत्री श्री.रोहिदास पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली होती. त्या समितीच्या अहवालाच्या शिफारशीबाबत शासनाने विचार केला होता. हा कायदा अंशत: करता येईल काय ?

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी : तालिका सभापती ॲड.अनिल परब )**

श्री.राजेश टोपे...

परंतु अंशत: हा कायदा ठेवणे हेसुध्दा कायदेशीररित्या योग्य होत नाही. त्यामुळे याबाबतीत विधी व न्याय विभागाचा व इतर कायदेशीर सल्ला घेण्यात आला. त्या दृष्टीकोनातूनही या पध्दतीने अंशत: हा कायदा सुरु ठेवणे शक्य होणार नाही. तसेच हा कायदा केंद्र सरकारकडे रिपील करण्यात आला, त्यासंबंधीचे प्रिॲम्बल मी वाचून दाखवतो.

" .... That the Act has failed to achieve what was expected of it. It has on the contrary pushed up land prices to unconscionable levels, practically brought the Housing Industry to a stop and provided copious opportunities for corruption. There is wide spread clamour for removing this most potent clog on housing." यातून या गोष्टीचा बोध होतो की, युएलसी कायद्याचा मुख्य हेतू साध्य होण्याच्या दृष्टीनेच हा ॲक्ट फेल झालेला आहे. या सगळयांचा परिणाम अनेक गोष्टीवर झालेला आहे. यामुळे हौसिंग इंडस्ट्रीजवरही मोठया पध्दतीने परिणाम झालेला आहे. करप्शन प्रॅक्टीसेस वाढल्याचा उल्लेखही केंद्र शासनाच्या रिपील ॲक्टमध्ये आहे. या कायद्यामुळे आज प्रामुख्याने कोणतेही मोठे प्रोजेक्टस येऊ शकत नाहीत, हा यातील महत्वाचा विषय आहे. मुंबईमध्ये आज ज्या जमिनी अतिरिक्त घोषित करण्यात आल्या, त्यासुध्दा ताब्यात ठेऊन उपयोगात आणण्याच्या दृष्टीकोनातून अनेक अडचणी निर्माण झालेल्या आहेत. त्यामध्ये मुख्य अशी अडचण निर्माण झालेली आहे की, त्याठिकाणी मोठया संख्येने स्लम निर्माण झालेले आहे. सभापती महोदय, राज्यामध्ये गुंठेवारी कायदा आला. राज्यामध्ये हा युएलसी कायदा लागू होतो. त्याठिकाणी अनेक लोकांच्या जमिनी जाणार हे लक्षात आल्यानंतर सरप्लस जमिनी गुंठयागुंठयानी विकल्या व त्यामुळे त्याठिकाणी मोठया संख्येने अनधिकृत बांधकामे झाली. केंद्र सरकारकडून मिळणारा मोठी निधी व मोठी आर्थिक मदतीच्या दृष्टीकोनातूनच हा ठराव याठिकाणी मांडलेला आहे. युएलसी कायदा फेल का झाला हे सांगण्याचा मी जाणीवपूर्वक प्रयत्न याठिकाणी केलेला आहे. सेक्शन 8 (4) नुसार सक्षम अधिकाऱ्यांकडे विवरणपत्र दाखल केल्यानंतर ते सरप्लस जमीन घोषित करतात.

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे...

आज याठिकाणी काही स्लम असतील तर त्याठिकाणच्या जमिनी गुंठेवारी पध्दतीने विकून ती जमीन शासनाच्या ताब्यात आल्यानंतर महापालिकेने अनेक ठिकाणी रिझर्व्हेशन आणले. सगळयात महत्वाचा भाग म्हणजे, ज्यावेळी जमिनी ताब्यात घेण्याची प्रक्रिया शासनाच्या वतीने होते, त्यावेळी शेकडोंनी लिटीगेशन झालेले आहेत. याबाबतीत लोक कोर्टामध्ये गेले. त्यांनी शासनाच्या ताब्यात जमीन जाऊच नये अशी भूमिका घेतली. अशाप्रकारे मोठया प्रमाणात लिटीगेशन झालेले आहेत.

नंतर श्री.रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे..........

सभापती महोदय, हा प्रस्ताव आणण्यामागील उद्देश ढोबळमानाने परंतु मुद्दामहून सगळया बाबींच्या तपशिलासह सांगण्याचा प्रयत्न मी केला आहे. आतापर्यन्त मी मुंबईच्या संदर्भात सांगितले. आता मी सभागृहाला राज्याची यासंदर्भातील माहिती देऊ इच्छितो. या कायद्याचा मुख्य हेतू हा होता की, मोठया प्रमाणावर लोकांना घरे उपलब्ध व्हावीत आणि या हेतूनेच नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) कायदा करण्यात आला होता. या कायद्यांतर्गत जी जमीन शासनाने संपादित केली त्याबाबतची आकडेवारी मी मुद्दाम सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो. कलम 6 खाली प्राप्त विवरणपत्रांची संख्या 82000 एवढी होती तर निकाली काढलेल्या विवरणपत्रांची संख्या 69632 एवढी होती. राज्यामध्ये कलम 8 (4) खाली अतिरिक्त घोषित केलेले क्षेत्र 16646 हेक्टर एवढे होते. जमीन संपादित करण्याचा मुख्य हेतू हा होता की, मोठया प्रमाणावर इकॉनॉमिकली विकर सेक्शनला घरे उपलब्ध व्हावीत. त्या माध्यमातून कलम 20 खाली, ज्याअन्वये संबंधित व्यक्तिला इ.डब्ल्यू.एस.खाली घरे बांधण्याची, गृहनिर्माणाची योजना करण्याची तरतूद आहे, त्याअंतर्गत प्लॉटिंग स्किम करण्याची तरतूद आहे, अशा या कलम 20 खाली सूट दिलेले क्षेत्र 16646 हेक्टरपैकी 7673 हेक्टर एवढे आहे. ज्यांची जमीन अतिरिक्त घोषित झाली आहे त्या व्यक्तिला त्या ठिकाणी गृहनिर्माण योजना करण्यासाठी सूट दिलेली आहे. टक्केवारीमध्ये ही आकडेवारी बघितली तर कलम 20 खाली सूट दिलेली जमीन 40 टक्के एवढी आहे. म्हणजेच कलम 20 खाली गृहनिर्माण योजना राबवू शकतो असे क्षेत्र 7673 हेक्टर एवढे आहे. कलम 8 (4) खाली अतिरिक्त घोषित झ ाालेली जमीन 16646 हेक्टर आहे तर अतिरिक्त घोषित झालेली व संपादित झालेली जमीन 5563 हेक्टर एवढी आहे. आपण काय साध्य केले ? 16646 हेक्टर जमिनीपैकी 5563 हेक्टर जमीन संपादित केली. कलम 8 खाली जमीन अतिरिक्त घोषित केली जाते, कलम 10 (3) खाली शासनाचे नाव लावले जाते, कलम 10 (5) खाली जमीन प्रत्यक्षात ताब्यात घेतली जाते. यानुसार आतापर्यन्त अतिरिक्त घोषित झालेले पण संपादित न झालेले क्षेत्र 5048 एवढे आहे. या ठिकाणी सर्वसाधारणपणे कलम 10 (5) खाली प्रत्यक्ष ताब्यात आलेली जमीन 4015 हेक्टर एवढी आहे. 4015 हेक्टर जमीन शासनाच्या प्रत्यक्ष ताब्यात आली आहे. मुंबईमध्ये सदनिका बांधण्याची फ्लॅटिंग स्किम, गृहनिर्माण योजना तयार केली जाते. त्यामध्ये 5 टक्के फ्लॅट......

..2..........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदय अतिशय महत्वाची आकडेवारी सांगत आहेत. काही आकडेवारी त्यांच्याकडून नजरचुकीने राहून गेली आहे की ते लपवून ठेवत आहेत, हे माहीत नाही. पण एकूण 16646 हेक्टर अतिरिक्त क्षेत्र घोषित झाले, संपादित केलेले क्षेत्र 5563 हेक्टर आहे, प्रत्यक्षात ताब्यात आलेले क्षेत्र 4015 हेक्टर एवढे आहे, ही आकडेवारी त्यांनी सांगितली. अतिरिक्त घोषित झालेली पण प्रत्यक्षात ताब्यात न आलेली जमीन किती आहे हे देखील त्यांनी सांगितले. ही जमीन ताब्यात न येण्याची कारणे मंत्रीमहोदयांनी सांगावीत. ही शासनाची उदासिनता आहे की जाणूनबुजून केले आहे, लिटिगेशन्स आहेत की न्यायालयीन वाद आहेत, नेमके काय आहे ? ते मंत्रिमहोदयांनी सांगावे. गेल्या 31 वर्षात हे क्षेत्र ताब्यात का आले नाही ? हे देखील सांगावे. म्हणजे मग कायद्याला पाठिबा द्यायचा की नाही, याचा निर्णय आम्हाला घेता येईल. सरकार फेल झाले की काय झाले, हे मंत्रीमहोदयांनी सांगावे.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MAP/ SBT/ प्रथम श्री.रोझेकर ......... 16:25

श्री.मधुकर सरपोतदार : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी मांडलेल्या हरकतीच्या मुद्यावर मला शासनाकडून आणखी माहिती हवी आहे. एप्रिल, 2007 मध्ये माननीय मुख्यमंत्री महोदयांनी हा ठराव सभागृहामध्ये मांडला होता. त्यावेळी फक्त ठराव वाचण्यात आला आणि या ठरावावर पुढच्या अधिवेशनामध्ये चर्चा होईल, असे सांगण्यात आले होते. यू.एल.सी. ॲक्ट अंतर्गत आता पर्यंत किती जमीन संपादित करण्यात आली, शासनाने किती जमीन ताब्यात घेतली, किती जमीन शिल्लक राहिलेली आहे, किती जमिनीचा उपयोग गरीबांचे घरे बांधण्यासाठी करण्यात आला, किती जमीन बिल्डरला विकण्यात आली यासंदर्भातील माहिती सभागृहाला उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता होती. माननीय नगर विकास राज्यमंत्री या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देण्यासाठी सभागृहात उपस्थित आहेत. शासनातर्फे सभागृहाला फक्त माहिती दिली जात आहे, हे चुकीचे आहे. सन्माननीय सदस्यांना सभागृहात जी माहिती उपलब्ध करुन दिली जाते ती माहिती सन्माननीय सदस्यांनी वाचल्यानंतर, त्याचा अभ्यास केल्यानंतर सन्माननीय सदस्य त्यावर आपली मते मांडू शकतात. ही नोट आम्हाला दोन दिवसापूर्वी दिली असतील तर आम्ही त्याचा अभ्यास केला असता. हा ठराव पास करावयाचा की नाही, हे शासन ठरविणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी जो मुद्दा मांडलेला आहे त्याला माझा पाठिंबा आहे. शासनाने सन्माननीय सदस्यांना पुढील माहिती उपलब्ध करुन द्यावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी जो मुद्दा मांडला, त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. मागच्या वेळी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहामध्ये ठराव वाचून दाखविला. त्यावेळी सन्माननीय सदस्य सर्वश्री. दिवाकर रावते, शरद पाटील आणि मी स्वत: यासंदर्भात आक्षेप घेतला होता. यासंदर्भातील संपूर्ण माहिती सभागृहासमोर आल्याशिवाय आम्हाला या प्रस्तावावर चर्चा करता येणार नाही. या कायद्यान्वये शासनाने किती जमीन संपादित केली, किती जमिनीचा उपयोग केला ? माननीय नगर विकास राज्यमंत्री सभागृहामध्ये जी माहिती देत आहेत त्यातील प्रामुख्याने सर्व जमीन मुंबईतील आहे, इतर महानगरातील जमीन कमी आहे. जोपर्यंत शासनातर्फे याबाबतची संपूर्ण माहिती आमच्या समोर येत नाही तोपर्यंत आम्हाला अभ्यासपूर्ण चर्चा करता येणार नाही. केवळ ठराव समोर ठेऊन त्यावर चर्चा करणे चुकीचे होईल. शासनाने सभागृहामध्ये अहवाल मांडल्यानंतर आम्हाला या ठरावावर अभ्यासपूर्ण चर्चा करता येईल.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, हा ठराव सभागृहामध्ये मांडून या ठरावावर ताबडतोब चर्चा करणे शक्य होणार नाही. सन्माननीय सदस्यांना अभ्यास करण्यासाठी एक-दोन दिवस वेळ दिला पाहिजे. शासनाने दिलेली माहिती खरी आहे की खोटी आहे, हे बघण्यासाठी सन्माननीय सदस्यांना वेळ देण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, खरे म्हणजे हा संपूर्ण राज्याचा आणि विशेषत: मुंबईच्या जिव्हाळयाचा विषय आहे. मुंबई शहरामध्ये जे नोकरी लोक करणारे आहेत, छोटे-मोठे व्यवसाय करणारे लोक आहेत, अडचणीच्या परिस्थितीमध्ये कसेबसे राहणारे लोक आहेत त्यांना निवाऱ्याची गरज आहे. नागरी निवारा अभियानाच्या माध्यमातून मुंबईतील जवळपास एक लाख लोकांनी शासनाकडे यू.एल.सी.ॲक्ट अंतर्गत घरासाठी जागा मागितलेली आहे. हा अत्यंत जिव्हाळयाचा प्रस्ताव शासन घाईगडबडीने मंजूर करण्याचा प्रयत्न करीत आहे, हे योग्य नाही. सभापती महोदय, मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो की, शासनाने या ठरावाबाबतची संपूर्ण माहिती आणि अहवाल सभागृहासमोर ठेवावा, लोकांच्या समोर ठेवावा, यासंबंधी लोकांच्या प्रतिक्रिया जाणून घ्याव्यात आणि मगच हा ठराव चर्चेला घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, राज्याच्या दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा ठराव आहे. हा ठराव मांडत असतांना माननीय नगर विकास राज्यमंत्र्यांनी सभागृहात काही मुलभूत बाबी सांगितल्या. हा ठराव आज सभागृहामध्ये चर्चेला येणार आहे, हे आम्हाला आज सकाळी कळले. यातील बारकावे काय आहेत, शासनाच्या या धोरणाचा काय परिणाम होणार आहे, हे आम्हाला जोपर्यंत समजणार नाही तोपर्यंत आम्हाला या ठरावावर आमची मते व्यक्त करता येणार नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी मांडलेल्या हरकतीच्या मुद्याला सन्माननीय सदस्यांनी जे समर्थन दिलेले आहे, ते योग्य आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.सुंबरे .......

श्री. फुंडकर ....

आणि म्हणून यासंबंधीची नोट सर्व सन्माननीय सदस्यांना वितरित करावी आणि नंतरच यावर चर्चा करावी आणि हा प्रस्ताव पारित करावा.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सभागृहाची तशी इच्छा असेल तर माझी कोठलीही हरकत नाही. या संबंधातील पूर्ण माहिती देण्यामध्ये शासनाला मुळीच अडचण नाही. माझ्याकडे आजही याबाबतची सारी माहिती उपलब्ध आहे आणि ती मी माझ्या भाषणातून देखील सभागृहाला देऊ शकतो, सन्माननीय सदस्यांना या संबंधात जी काही माहिती पाहिजे असेल ती देण्यास मी तयार आहे. सभापती महोदय, हा प्रस्ताव सभागृहात पारित होण्यासाठी येणार आहे हे मागील बजेट अधिवेशनामध्येच जाहीर केले होते त्यासाठी हा प्रस्ताव देखील त्या अधिवेशनामध्ये सभागृहात आणला होता. तसेच सन्माननीय सदस्यांना हीच नाही तर अन्य कोणतीही माहिती, कोणत्याही स्वरूपाची माहिती पाहिजे असल्यास ती त्यांना मिळते, त्यांनी ती मागितली असती तर ती अगोदरच देता आली असती. ...

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, आम्ही ती माहिती मागे जेव्हा हा प्रस्ताव सभागृहात आणला होता तेव्हाच मागितली होती. परंतु शासनाकडून अद्यापि उपलब्ध करून दिली गेली नाही.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सदस्यांना या प्रस्तावासंबंधातील कोणतीही माहिती देण्यास मी आज देखील तयार आहे. ती माहिती घेऊन वाटल्यास सदस्यांनी यावर बोलावे, माझी त्याला हरकत नाही.

**तालिका सभापती** (ॲड.अनिल परब) : माननीय मंत्री महोदयांनी हे लक्षात घ्यावे की, माननीय विरोधी पक्षनेता तसेच अन्य सदस्यांचे म्हणणे असे आहे की, हा धोरणात्मक निर्णय असल्याने याबाबत सभागृहामध्ये याबाबत सर्वांगीण विचार व्हायला पाहिजे आणि त्यासाठी त्यांची अपेक्षा आहे की, आज ही चर्चा सुरू होण्यापूर्वी यूएलसी संबंधातील सर्व माहिती त्यांच्यापुढे आली तर त्या आधारे ते त्यावर चांगल्या प्रकारे आपली मते, आपले विचार मांडू शकतील. माननीय मुख्यमंत्र्यांनी हा विषय मागील अधिवेशनामध्येच या सदनामध्ये ठेवला होता, त्यानंतरही ही माहिती सदस्यांना शासनाकडून देता आली असती. ..

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मागील आठवड्यामध्ये किंवा अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यामध्येच हा विषय सदनात मांडून याबाबतची माहिती सदस्यांना दिली गेली असती तर आज त्या आधारे यावर अधिक चांगल्या प्रकारे चर्चा करता आली असती. ... 3T 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी हे लक्षात घ्यावे की, सन्माननीय सदस्यांच्या मनात या संबंधात अनेक प्रश्न आहेत. या कायद्यानुसार शासनाकडे किती जमीन आली, ती किती यायला पाहिजे होती, आलेल्या जमिनीपैकी किती जमिनीचा वापर झाला ? तो कसा झाला वगैरे अनेक प्रश्न त्यांच्या मनामध्ये आहेत त्याबद्दल खुलासा त्यांना शासनाकडून पाहिजे आहे आणि ही सर्व माहिती चर्चेपूर्वी, काही काळ अगोदर आली तर त्या आधारे चर्चा चांगल्याप्रकारे करता येईल असे सदस्यांचे म्हणणे आहे. तरी याबाबत आपल्याला काय म्हणावयाचे आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी या संबंधातील आकडेवारी येथे आताच दिली आहे की, किती जमीन अतिरिक्त म्हणून घोषित केली, त्यापैकी किती शासनाच्या ताब्यात आली, त्यावर शासनाने योजना राबविली आहे, अतिरिक्त जमीन जी उपलब्ध झाली त्यातून काही सामाजिक संस्थांना देखील देण्यात आली, ही सगळी आकडेवारी माझ्याकडे आताही उपलब्ध आहे आणि ती मी सदस्यांना देऊ शकतो. ....

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांकडे आकडेवारी सगळी आहे असे ते सांगत आहेत. पण हा केवळ आकडेवारीचाच प्रश्न नाही. तर हा जो कायदा आहे तो इंदिरा गांधी यांनी या देशातील गोरगरीब जनतेला सहजतेने निवारा उपलब्ध व्हावा यासाठी बनविला आहे, त्यावेळी त्यांनी गरीबांना रोटी, कपडा आणि मकान म्हणजे निवारा देण्याची घोषणा केली होती त्याला अनुसरून हा कायदा तेव्हा करण्यात आला होता. असे असताना आज हे धोरण, हा कायदा रद्द करून हे शासन त्या घोषणेपासून मागे का जात आहे, त्यामागील कारणे काय आहेत हे आम्हाला समजले पाहिजे. केवळ आपल्याकडील आकडेवारी ऐकून आम्ही या संबंधात आमची मते येथे मांडावीत असे आपले म्हणणे आहे का ? तेव्हा मध्यंतरीच्या काळात अशा कोणत्या गोष्टी, कोणत्या घटना घडल्या, असे काय घडले की ज्यामुळे आपल्याला हे धोरण, हा कायदा रद्द करण्याची गरज भासू लागली ? याची साद्यंत माहिती जोवर सदनाच्या समोर येत नाही तोवर आम्हाला या चर्चेत भाग घेऊनर आमची मते मांडता येणार नाहीत, हे आपण लक्षात घ्यावे. तसे पाहिल्यास आपण जी आकडेवारी देत आहात ती आम्हालाही माहिती असू शकते. पण हा कायदा करण्यामागील आपला हेतू काय होता आणि आता तो रद्द करण्यामागील हेतू काय आहे हेही आम्हाला येथे समजले पाहिजे. बाकी आकडेवारी ऐकण्यामध्ये आम्हाला काहीच रूची नाही. सभापती महोदय, शासनाने मागील अधिवेशनामध्ये हा प्रस्ताव मांडल्यानंतर त्या संबंधात सर्व

....... 3T 3 ...



KBS/ SBT/ MAP/ श्री. बोरले नंतर --- 16:30

श्री.कपिल पाटील .....

माहिती असलेली टिपण्णी अगोदरच आमच्याकडे यायला पाहिजे होती जेणे करून आम्हाला त्या आधारे या चर्चेत आपली मते मांडता येऊ शकली असती. तेव्हा आता सन्माननीय विरोधी पक्षनेता आणि अन्य सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे आज आपण आम्हाला ही माहिती उपलब्ध करून द्यावी आणि उद्या किंवा परवा, अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी देखील हा प्रस्ताव चर्चेसाठी मांडला तरी आमची हरकत नाही.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी मला वाटते की, देशभरामध्ये आणि आपण सगळीकडेच पाहिले तर अलिकडे लिबरलायझेशनचे जग आहे. हा लायसेन्सराज सारखा विषय आहे. मी आपल्याला पाहिजे त्या सगळ्याच गोष्टींबाबत माहिती येथे सांगू शकतो. हा प्रस्ताव येथे का आणला हेही सांगू शकतो. सन्माननीय सदस्यांना काही अधिक माहिती पाहिजे असेल तर ती जरूर दिली पाहिजे, ती कशी पाहिजे आणि केव्हा दिली पाहिजे हे वाटल्यास सभागृहाने ठरवावे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपणच मघाशी सांगितलेल्या आकडेवारीनुसार साधारणपणे `2230.75 इतक्या जमिनीवर आपण कारवाई केली. भूसंपादन अधिकाऱ्यांनी नकाशे त्यांचे केलेले नाहीत., मालकांना त्यांनी पैसे दिलेले नाहीत. त्यामुळे सारे अधांतरीच राहिले. जी जमीन केवळ 7 कोटीला घेतली तिची आजची किंमत जवळपास 2 लक्ष कोटी झालेली आहे. .....

( यानंतर श्री. सरफरे .... 3यू 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

आणि म्हणून या सर्व गोष्टींचा सर्वंकष विचार करण्यासाठी आपण आम्हाला माहिती उपलब्ध करुन द्यावी. कारण या प्रस्तावामध्ये नेमके काय आहे याचा अभ्यास करुन आपल्याला चर्चा करता येईल. याचे कारण उद्या कोर्टामध्ये लिटिगेशन होता कामा नये. याकरिता आपण आम्हाला एक नोट उपलब्ध करुन दिली पाहिजे. त्याकरिता हवे असेल तर आपण अधिवेशन एक दिवसांनी वाढवावे. हा प्रस्ताव आपण घाई-घाईमध्ये कशासाठी आणीत आहात?

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आम्हाला हा विषय नाईलाजास्तव पुन्हा पुन्हा सभागृहापुढे मांडावा लागत आहे. खरे म्हणजे यु.एल.सी.कायदा 1976 मध्ये मंजूर झाला. त्या वेळेपासून अतिरिक्त असलेली जमीन ताब्यात घेण्यासाठी या शासनाला पूर्ण मुभा होती. ते करण्यासाठी आपल्याला कुणी थांबविले नव्हते. युतीची मधली साडे चार वर्षे सोडली तर आपणच राज्यकर्ते आहात. तर मग ही जमीन ताब्यात घेण्यासाठी आपण कसूर कां केली? या प्रश्नाचे उत्तर आपण दिले पाहिजे. दुसरे असे की, आज शिल्लक असलेल्या जमिनीची त्यावेळची आणि आजची किंमत किती? यु.एल.सी. कायदा रद्द केल्यानंतर गोदरेजसारखे जे अन्य जमिनींचे मालक आहेत त्यांच्या मालकीची जमीन होईल. आणि मग त्यांच्या ताब्यातील जमीन शासन आपल्या ताब्यात घेऊ शकणार नाही. आपल्याला पैसे मोजून ती विकत घ्यावी लागेल. त्यानंतर तुम्ही ती जमीन बिल्डरला देणार. आणि बिल्डर जितके कोटी रुपये मोजतील त्याच्या दुप्पट पैसे जनतेकडून वसूल करतील अशी परिस्थिती आहे. आपण या जमिनींवर कामगार आणि गरिबांकरिता स्वस्तामध्ये घरे बांधली जातील असे कशाच्या आधारावर म्हणत आहात? यामुळे जमिनीच्या किंमती वाढणार आहेत. आतापर्यंत आपण यु.एल.सी. खालील जमीन ताब्यात कां घेतली नाही? याचे कारण सांगावे. आपण फक्त या कायद्याचे समर्थन करु नका. इतकी वर्षे आपण अंमलबजावणी कां केली नाही? यासंबंधीची एक नोट तयार करुन आम्हाला देण्यात यावी व त्यानंतर या प्रस्तावावर चर्चा करण्यात यावी.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, माझ्या भाषणामध्ये मी स्पष्टपणे सांगितले आहे की, हा केंद्र सरकारने कायदा बनविला होता व त्याची अंमलबजावणी देशभरामध्ये होत होती. माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार साहेब हे खासदार असतांना 1999 मध्ये हा कायदा रिपिल झ
ाला...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी सांगितले की, हा केंद्र सरकारने कायदा केला आहे. तेव्हा या कायद्याला विरोध करावयाचा की नाही यासंबंधी आमचे नेते आम्हाला सांगतील. प्रिअँम्बलमधील उद्देश आपला फेल झाला कां ते आपण सांगितले पाहिजे. In the Statement of Objects and Reasons of the Act, it has been stated that: "There has been a demand for imposing a ceiling on urban property also, especially, after the imposing of a ceiling on agricultural land by the State Governments. With the growth of population and increasing urbanization, a need for orderly development of urban areas has also been felt. It is, therefore, considered necessary to take measures for exercising social control over the scarce resource of urban land with a view to ensuring its equitable distribution amongst the various sections of society (particularly the poor) and also avoiding speculative transactions relating to land in urban agglomerations. With a view to ensuring uniformity in approach Government of India addressed the State Governments in this regard; eleven States have so far passed resolution under Article 252(1) of the Constitution empowering Parliament to under take legislation in this behalf. The present proposal is to enact a Parliamentary legislation in pursuance of this Resolution." आणि हा उद्देश फेल झाल्याचे आपण सांगता कां? "The Bill is intended to achieve the following objectives:

i) to prevent concentration of urban property in the hands of a few persons and speculation and profiteering therein;

ii) to bring about socialization of urban land in urban agglomerations to subserve the common good by ensuring its equitable distribution."

हे तुम्ही फेल झाल्याचे सांगता कां? समाजवादी समाजरचना आणण्यासाठी हा फेल केल्याचे सांगता कां? माननीय श्री. भुजबळ साहेब आम्ही याला विरोध करीत नाही...



श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय नामदार श्री. भुजबळ साहेब बसून म्हणाले की, केंद्रामधील आमच्या सरकारने हा कायदा आणला होता. ज्यावेळी हा कायदा आणला त्यावेळी या राज्यामध्ये माननीय श्री. मनोहर जोशी हे मुख्यमंत्री होते आणि आपण विरोधी पक्षनेते होता.

त्यावेळी सर्व पक्षाच्या नेत्यांच्या बोलाविण्यात आलेल्या बैठकीमध्ये आपण या कायद्याला कडाडून विरोध केला होता. असे असतांना आता आपण पाठिंबा कां देता?

श्री. छगन भुजबळ : त्यावेळी आपण माझे ऐकले असते तर आता त्या ठिकाणी आपण बसायला गेले असते कां?

(यानंतर श्री. किल्लेदार)

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.सरफरे... 16:40

श्री.विनोद तावडे : माननीय भुजबळ साहेबांसारख्या सिनियर माणसांनी भूमिका बदलून इतके सहजपणे बोलणे बरोबर नाही.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण साहेबांनी ज्यावेळेला ॲक्ट इनॲक्ट केला, पार्लमेंटनी कायदा बनविला त्यामधील उद्देश आणि कारणे काय आहेत, हे वाचून दाखविले. पार्लमेंटने तीन-चार राज्यामध्ये रिपील ॲक्ट आणला. त्यामधील प्रियांबलही वाचून दाखविले. त्यामध्ये इतके स्पष्ट लिहिलेले आहे की, The Act has failed to achieve what was expected of it याचा अर्थ इतका स्पष्ट आहे की, जे धोरण ठरविले होते, त्या संबंधात कायदा केला होता. त्याचा हेतू चांगला होता. परंतु त्याची अंमलबजावणी होण्यामध्ये अडचणी होत्या, अंमलबजावणी होऊ शकली नाही. गेली जवळपास 20-22 वर्षापासूनचा ॲक्ट असला तरी त्यामध्ये सरप्लस लॅन्ड डिक्लेअर करण्याचे प्रमाण कमी होते. म्हणून मी स्पष्ट सांगितले की, यामध्ये लेटिगेशन मोठ्याप्रमाणात झालेल्या आहेत. प्रत्येक ॲग्लोमरेशन्समध्ये केसेस चालू आहेत. कोणाला काहीही बांधकाम करायचे असेल तरी युएलसीची एन.ओ.सी. लागते, हा कायदा लायसन राजसारखा असल्यामुळे याचे दुष्परिणाम जाणवत होते. माझी सरकारची बाजू असतानाही मी सांगतो की, यामध्ये मोठ्याप्रमाणात भ्रष्टाचार होत होता. एनओसी जितक्या आपण वाढवितो त्यामध्ये भ्रष्टाचार होतो.... मला माझे बोलणे पूर्ण करू दिले पाहिजे.

श्री.कपिल पाटील : चर्चा करायची की नाही ? आपल्याला ठराव पास करावयाचा असेल तर आम्हाला आपण तसे कन्वीन्स करा. सभापती महोदय, मंत्री महोदय एनडीएचा अजंठा वाचतात की, युपीएचा वाचतात ? हे कळत नाही. आज माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आणि इतर सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे की, हा ठराव करण्याच्या अगोदर तो मंजूर करून घेण्याचा हक्क आहे की नाही ? तो ठराव आपण मांडणार आहात की नाही ? हा प्रश्न आहे. चर्चेशिवाय ठराव पास करायचा असेल तर आपण बहुमताच्या जोरावर करू तसे शकता. आपण सविस्तर अहवाल मांडावा. त्यावर आम्हाला अभ्यास करू द्यावा. आपले म्हणणे पटले तर आम्ही मान्य करू. तो ठराव आपण मांडणार आहात की नाही ? केवळ आयत्यावेळी भाषणामध्ये चार आकडे सांगितले जातात हे पटत नाही. आपण तसा ठराव मांडण्याची आमची तयारी आहे असे म्हणाला. आपण स्वत: होऊन पुढे या, सविस्तर अहवाल मांडा. त्यावर आम्ही अभ्यास करू आणि आपले बरोबर असेल तर आम्ही समर्थन करू. पण केवळ आपण आपल्या पाशवी बळावर रेटून नेणार असाल तर ते चालणार नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/ KGS/ MAP/

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, हा ठराव मार्च महिन्यामध्ये माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मांडलेला आहे. असे अपेक्षित असते की, सन्माननीय सदस्यांनी या संदर्भातील सगळी माहिती घेऊन चर्चा केली तर त्याला उत्तर द्यायला सरकारच्या बाजूने आम्ही तयार आहोत. खालच्या सभागृहात सातत्याने मागणी झाली की, या संबंधात लवकर ठराव आणावा. त्या अनुषंगाने मागच्या वेळेसच ठराव मांडला. आता माहिती उपलब्ध नाही असे सांगून चर्चा केली जात असेल ते योग्य नाही. एक मोठी बाजू आहे की, शासनाला यामधील कोणतीही आकडेवारी लपविण्याचे कारण नाही. ती माहिती द्यायला मी कधीही तयार आहे, तो विषय नाही. त्यामुळे हे अपेक्षित आहे की, सगळी माहिती घेऊन या ठिकाणी भाष्य करावे. ज्याअर्थी एखादा ठराव आला तर त्यावर ज्या सन्माननीय सदस्यांना चर्चा करायची आहे, त्याबाबतची माहिती घेऊन त्यांनी चर्चेमध्ये सहभागी व्हायला पाहिजे.

ॲड..गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, युएलसी ॲक्ट रिपील करण्याच्या संबंधातील ठराव मागच्या अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यानी सभागृहात मांडलेला आहे. या सभागृहात चर्चेला सुरुवात होण्याअगोदर सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार साहेबांनी प्रश्न उपस्थित केला होता की, युएलसीच्या प्रश्नावर राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी बैठक बोलाविली होती. त्या बैठकीमध्ये सर्व राजकीय पक्षाच्या प्रमुखांना किंवा त्यांचे जे प्रतिनिधीं या प्रश्नावर लढतात, अशा सर्वांना माननीय मुख्यमंत्र्यांनी बोलाविले होते.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ....

त्या दिवशी या विषयावर साधकबाधक चर्चा झाली होती. मे महिन्याच्या दरम्यान ही बैठक माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनात झाली होती. हा कायदा आणला जाणार आहे त्याचे कारण माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या ठिकाणी स्पष्ट केले होते. ज्यावेळी हा ठराव सभागृहामध्ये आला त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी स्पष्टपणे याबाबतीत सूचित केले होते. राज्य शासनाने निर्माण केलेला कायदा असेल तर मी समजू शकतो. हा राज्याचा कायदा नाही. हा कायदा केंद्र शासनाने केलेला आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सांगितले ते बरोबर आहे. स्व. इंदिराजी गांधी या देशाच्या पंतप्रधान असताना 1970-71 मध्ये जे लढे या देशामध्ये लढले गेले त्यामध्ये गरिबी हटाव, राजे-महाराजांचे तनखे बंद करणे, बँकांचे राष्ट्रीयीकरण ही सर्व पार्श्वभूमी होती. सामान्य माणसाला घर मिळाले पाहिजे, त्याला शहरामध्ये राहण्यासाठी जागा मिळाली पाहिजे म्हणून 1976 मध्ये हा कायदा आला. परंतु हा कायदा येऊन 31 वर्षे झाली तरी त्या कायद्याने आपण काही मिळविले काय ? त्याचे उत्तर मोठे शून्य असे आहे. मला जर विचारले तर मी सांगेन की, गेल्या 31 वर्षामध्ये आपण काहीही करु शकलो नाही. गोदरेजची जमीन 1976 मध्ये होती तशीच आजही आहे. या ठिकाणी पारशी ट्रस्टकडे शेकडो एकर जमिनी त्यावेळी होत्या आणि आजही आहेत. त्यामध्ये काहीही बदल झालेला नाही. माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, हा कायदा राज्य शासनाचा नाही. हा केंद्र शासनाचा कायदा आहे. हा कायदा केंद्र शासनाने 1999 मध्ये रिपील केला असेल तर त्यातून निर्माण होणारे जे परिणाम आहेत त्या दृष्टीकोनातून हा कायदा रिपील करण्यासाठी हा प्रस्ताव या ठिकाणी आणलेला आहे. देशातील एक दोन राज्ये सोडली तर अन्य सर्व राज्यांमध्ये हा कायदा रिपील झालेला आहे. महाराष्ट्रात हा कायदा रिपील करण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी ठराव मांडलेला आहे.

**तालिका सभापती** ( ॲड. अनिल परब ) : माननीय मुख्यमंत्र्यांनी मागच्या वेळी जेव्हा हा ठराव सभागृहासमोर मांडला होता त्यावेळी असे ठरले होते की, पुढच्या अधिवेशनामध्ये यावर सविस्तर चर्चा होऊन याबाबतीत निर्णय घेतला जाईल. आज या ठिकाणी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी हरकतीच्या मुद्याव्दारे एवढीच माहिती मागितलेली आहे की, हा ठराव जर मंजूर करावयाचा असेल तर त्यासंदर्भातील पूर्ण माहिती आम्हाला मिळाली पाहिजे. माझी माननीय



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/ KGS/

**तालिका सभापती** .....

मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांच्या ज्या काही शंका कुशंका असतील त्याची जर पूर्तता झाली, सदस्यांचे समाधान झाले तर याबाबतीत यथोचित निर्णय घेण्यात येईल.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी हेच सांगत होतो की, माननीय मुख्यमंत्र्यांनी मागच्या वेळी मांडलेला हा विषय आहे. आज ज्यावेळी एखादा विषय मांडतो त्यावेळी जसे आपण लगेच आमच्याकडून उत्तर अपेक्षित करता तसे मागच्या वेळी मांडलेला हा ठराव असल्यामुळे त्यादृष्टीकोनातून सन्माननीय सदस्यांनी तयारी करुन येणे अपेक्षित आहे. आपला जो प्रश्न असेल त्या प्रश्नाचे उत्तर देण्यास आम्ही सक्षम आहोत. त्यादृष्टीकोनातून मी या ठिकाणी या ठरावाचा हेतू सांगितला. जे.एन.यु.आर.एम. अंतर्गत पैसे कसे मिळणे अपेक्षित आहे, एम.ओ.यू. कसे झालेले आहेत हे सर्व सविस्तर सांगितलेले आहे. मी पूर्ण आकडेवारी सांगितलेली आहे. 16 हजार हेक्टर जमीन कशी अतिरिक्त घोषित करण्यात आली आहे तसेच सूट दिलेले क्षेत्र किती आहे ते सांगितलेले आहे. अतिरिक्त जमीन संपादिन न झालेली तसेच एकूण संपादित झालेल्या जमिनीबद्दल मी सांगितलेले आहे. सभापती महोदय, ही सर्व आकडेवारी मी सांगितलेली आहे. यानंतर सन्माननीय सदस्यांना आणखी कोणती माहिती पाहिजे ? सन्माननीय सदस्यांना पाहिजे असलेली माहिती आम्ही कधीही देऊ शकतो. ती माहिती देण्यास आमची अजिबात ना नाही. आपण ती माहिती घेऊन यावे किंवा आपण कधीही माहिती मागितली तर, आता माहितीच्या अधिकारात आपल्याला सगळी माहिती मिळते.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आमचे नेते माननीय श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी सांगितले की, याबाबतीत भारतीय जनता पक्षाची भूमिका काय आहे ते मांडले जाईल. मुद्दा एवढाच आहे की, एवढा मोठा निर्णय घेत असताना काही माहिती आली पाहिजे. आपण सांगितले की, 16776 हेक्टर जमीन अतिरिक्त जाहीर झाली. त्यामध्ये 5563 हेक्टर जमीन संपादित केली. प्रत्यक्ष ताब्यात 4015 हेक्टर जमीन आली. तेवढीच जमीन ताब्यात का आली ? आता आपण गृहनिर्माण धोरण जाहीर केले आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण...)

त्यामधील परिच्छेद क्रमांक 3.2मध्ये असे म्हटलेले आहे की, सार्वजनिक गृहनिर्माण आणि बेघरांसाठी गृहनिर्माण, यासाठी आरक्षित असलेल्या जमिनी खाजगी सहभागाने विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार विकसित करणे. शासन गरीबासाठी घरे बांधणार आहे. सार्वजनिक भूखंडांची प्रकरणे कोर्टामध्ये गेलेली आहेत. त्यांना पर्यायी जागा दिली पाहिजे. वेल्फेअर स्टेट गरिबांसाठी घरे बांधणार आहे. सर्वच खाजगी डेव्हलपर्स किंवा विकासक 250 किंवा 300 चौ.फुटाची घरे देतो, असे सांगणार नाहीत. या कायद्यामुळे शासनाच्या ताब्यामध्ये किती जमीन येणार आहे ? कोणत्या भूखंडावर शासन घरे बांधणार आहे? कोणकोणत्या जमिनी शासनाला त्यासाठी उपलब्ध होणार आहेत ? आज मूठभर लोकांच्या हातामध्ये हजारो एकर जमीन आहे. ही जमीन ताब्यात घेऊन ती घर बांधणीसाठी शासन उपलब्ध करुन देणार आहे काय? या जमिनीवर गरिबांसाठी, विकर सेक्शनसाठी घरे बांधावी लागतील अशा प्रकारची अट शासन घालणार आहे काय ? हे शासन स्वप्नदर्शी हौसिंग पॉलिसी आणणार आहे. आता भूखंडच्या बाबतीत शासन निर्णय घेत आहे. याबाबतीत शासनाने आम्हाला सविस्तर नोट द्यावी. ती दिल्यानंतर या विषयावर सविस्तर चर्चा करु, एवढेच मला सांगायचे आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : अशा प्रकारचा ठराव लवकर आणावा आम्ही तो पास करुन देऊ असे विधानसभेमध्ये सांगितल्याचे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. ही वस्तुस्थिती आहे काय ? विधानसभेमध्ये अशा प्रकारे विरोधी पक्षाने खरोखर सांगितले आहे काय ? या सदनाची दिशाभूल होईल अशा प्रकारचे निवेदन माननीय मंत्री महोदयाकडून अपेक्षित नाही. याबाबत त्यांनी खुलासा करावा.

श्री. कपिल पाटील : माननीय राज्य मंत्र्यांनी हा ठराव मांडताना सांगितले की, स्व. इंदिरा गांधी यांच्या काळामध्ये हा कायदा झाला. गोरगरीब माणसांना स्वस्त घरे मिळावित, त्यांच्या निवा-याचा प्रश्न सुटावा म्हणून का कायदा झाला. स्व. इंदिरा गांधींच्या काळामध्ये "रोटी कपडा और मकान" अशी घोषणा होत होती आणि त्या घोषणेसाठी हा कायदा होता. त्या कायद्याची अंमलबजावणी करणे शक्य झाले नाही उलट भ्रष्टाचार वाढला. मुंबईमध्ये अशी सर्वाधिक जमीन

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. कपिल पाटील...)

आहे. त्याची आकडेवारी दिलेली नाही. केवळ महाराष्ट्राची आकडेवारी दिलेली आहे. नागरी निवारा परिषदे मार्फत गोरेगाव येथे वसाहत बांधण्यात आली. अजून एक लाख लोकांनी घरे मागितली आहेत. महाराष्ट्रातील 3 लाख शिक्षकांच्यावतीने मी देखील त्यांना घरे मिळावित म्हणून निवेदन दिलेले आहे. अशा प्रकारे घरांसाठी मागणी असताना शासनाने जमिनी ताब्यात घेऊन त्यांना ती उपलब्ध करुन दिली पाहिजे. याबाबतीत शासनाने काय कारवाई केली ते समोर आलेले नाही. हा केन्द्राचा कायदा आहे. महाराष्ट्र सरकारवर हा कायदा करण्याबाबत बंधन असण्याचे कारण नाही. आपण आपल्या पध्दतीने हा कायदा स्वीकारु शकतो. सभापती महोदय, माझे म्हणणे एवढेच आहे की, या संबंधातील संपूर्ण वस्तुस्थिती जोपर्यन्त समोर येत नाही आणि त्याबाबतचा अभ्यास करायला आम्हाला मिळत नाही तोपर्यन्त या ठरावावर चर्चा करणे योग्य होणार नाही. आता अधिवेशनाचे शेवटचे तीन दिवस बाकी राहिलेले आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी हौसिंग पॉलिसी जाहीर केली. त्या संदर्भात बैठका घेण्यात आल्या. त्यानंतर सभागृहामध्ये अहवाल मांडण्यात आला. या अहवालावर उद्या किंवा परवा चर्चा होऊन त्यावर निर्णय घेणे शक्य होईल. ज्या प्रमाणे हौसिंग पॉलिसी निश्चित करण्यात आली त्या प्रमाणे या कायद्याच्या बाबतीत निर्णय घेतला पाहिजे. हा कायदा गोरगरीबांसाठी निगडित आहे. आज सर्वसामान्य माणूस, मध्यमवर्गीय, कनिष्ठ मध्यमवर्गीय माणूस मुंबईमध्ये घर घेऊ शकत नाही. शासकीय कर्मचारी मुंबईमध्ये घर घेऊ शकत नाही. आज मुंबईतील माणूस कर्जत, कसारा, पालघर या ठिकाणी जात आहे. आज मुंबईमध्ये दहिसरपर्यन्त 3 हजार रु. चौ.फूट असा घरांचा दर आहे. मुंबईमध्ये नोकरी करणारा माणूस मुंबईमध्ये घर घेऊ शकत नाही, तर मग ज्याचे हातावर पोट आहे असा माणूस मुंबईमध्ये कसे काय घर घेऊ शकेल ? त्याला घर मिळण्याच्या बाबतीत जो काही आसरा मिळणार होता तो देखील आपण हिरावून घेत आहात. एका बाजूला हौसिंग पॉलिसी आहे आणि दुस-या बाजूला नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) निरसन अधिनियम आहे. या कायद्याच्या संदर्भातील वस्तुस्थिती जोपर्यन्त सदनाच्या समोर येत नाही तोपर्यन्त याबाबतीत चर्चा करणे योग्य होणर नाही. पुढील अधिवेशनामध्ये हा कायदा या सदनासमोर आणून त्याची आवश्यकता आम्हाला पटवून दिली

..3..



(श्री. कपिल पाटील....

तर शासनाच्या भूमिकेचे आम्ही जरुर समर्थन करु. उदारीकरणाच्या नावाखाली येथील गोरगरीब माणसावर आपण वरवंटा फिरवणार आहात काय ? जे गिरणी कामगार उद्ध्वस्त झालेले आहेत त्यांना आता त्यांच्या घरातून उद्ध्वस्त करणार काय आणि ह्या गोष्टी आम्ही सहन करायच्या काय ? तेव्हा माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, पुढील अधिवेशनामध्ये ही चर्चा घेण्यात यावी.

...नंतर कु. खर्चे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, शासनाची इच्छा आहे की, या अधिवेशनामध्येच हे विधेयक मंजूर व्हावे.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी उठून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, माझा मुद्दा एवढाच आहे की, आजचा दिवस आणि उद्याचा दिवस पूर्ण आहे तसेच परवाचाही संपूर्ण दिवस आहे. या प्रस्तावाची पार्श्वभूमी मांडतांना मी त्याबद्दल जवळ जवळ सर्व माहिती सांगतो त्यानंतर त्यावर आज, उद्या किंवा परवा केव्हाही चर्चा करण्यास माझी हरकत नाही. तेंव्हा या प्रस्तावावरील चर्चा आजच संपवावी, असेही माझे म्हणणे नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या प्रस्तावाबाबत शासनाने नोट द्यावी, संपूर्ण माहिती लिखित स्वरुपात आमच्याकडे द्यावी आणि उद्याचा दिवस सोडून परवा या प्रस्तावावर चर्चा घेण्यात यावी.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, आता आपणच मला संरक्षण द्यावे आणि या प्रस्तावाची पार्श्वभूमी मांडू द्यावी.

**तालिका सभापती ( ॲड.अनिल परब )** : मला असे वाटते की, शासनाने या प्रस्तावासंबंधी आपली भूमिका मांडावी आणि सदस्यांना पूर्ण माहिती देऊन चर्चा उद्या किंवा परवा घेण्यात यावी.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, चर्चा आजच सुरु करण्यात यावी आज जेवढी चर्चा होईल तेवढी होईल.

**तालिका सभापती** : सदर प्रस्तावाबाबतचा आपला उद्देश आपण सभागृहासमोर ठेवावा.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, प्रथमत: मला सदर प्रस्ताव सभागृहासमोर मांडू द्यावा.

**तालिका सभापती** : या प्रस्तावामागील शासनाने आपली भूमिका मांडावी आणि त्यानंतर त्यावरील चर्चा घेण्यात येईल.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी सुरुवातीलाच शासनाने स्पष्ट भूमिका मांडली की अर्बन लँड सिलींग ॲक्टचा हेतू हा प्रामुख्याने गरीब, गरजू व इकॉनॉमिकली वीकर्स सेक्शनमध्ये समाविष्ट होत असलेल्या लोकांना घरे उपलब्ध करुन देणे हा आहे. यामध्ये मी असेही सांगितले की, या कायद्यामध्ये अशीही तरतूद आहे की, सेक्शन 20 खाली अतिरिक्त घोषित झालेली



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ........

खाली जी 16000 हेक्टर जमीन आहे, त्यामध्ये फ्लॅटेड स्कीम करण्याच्या दृष्टीकोनातून मुंबईमध्ये या स्कीममध्ये तळेगाव-दाभाडे योजना असेल त्यामध्ये प्लॉट्स काढून छोटी छोटी घरे बांधावीत, अशी तरतूद आहे. एकूण 16000 हेक्टर भूखंडापैकी 7000 हेक्टर जो भूखंड आहे, त्याबाबत सन्माननीय सदस्य सांगतात यामध्ये या हेतूसाठी ही 7673 हेक्टर जमीन आलेली आहे. ही अतिरिक्त जमीन आज शासनाच्या ताब्यात आहे. त्यातील सेक्शन 10/5 खाली 4015 हेक्टर जागा येते ती जागाही शासनाचीच आहे, यापैकी सोशल फॅसिलिटीजसाठी जी जमीन शासनाच्या ताब्यात आहे, त्या जमिनीचा वापर करून इकॉनॉमिकली वीकर्स सेक्शनखाली येणा-या लोकांसाठी घरे बांधता यावीत, असा शासनाचा मानस आहे याकरिताच आता नवीन गृहनिर्माण धोरण आलेले आहे. त्या धोरणामध्ये ॲफॉर्डेबल हाऊसिंग करणे या दृष्टिकोनातून मध्यम वर्गीयांसाठी आणि गरीब माणसांसाठी घरे स्वस्त दरामध्ये उपलब्ध करणे, हे करण्याचा आपण प्रयत्न केलेला आहे. तसेच हे धोरण घेऊन गृहनिर्माणाचा मुख्य हेतू म्हणजे शासनाच्या ताब्यातील जी जमीन असणार आहे, ती सुध्दा गोरगरिबांसाठी घरे बांधण्याच्या हेतूसाठी वापरणे शक्य होणार आहे. सन्माननीय सदस्यांना असेही वाटेल की, हा कायदा ज्यावेळी निरस होईल त्यानंतर ज्यांच्या ज्यांच्या जवळ जमिनी राहणार आहेत, ते या सेक्शनमध्ये नियंत्रित केले जाणार नाही. ज्यावेळी या कायद्याचे निरसन होईल किंवा हे विधेयक रिपील होईल त्यावेळी सेक्शन 10 / 3 आणि 10 / 5 मध्ये ज्या ठिकाणी शासनाचे नाव जमिनीवर लागलेले आहे, त्याठिकाणी तेथील सर्व बांधकाम शासनाच्या नियंत्रणामध्ये येणार आहे.

यानंतर श्री.भोगले......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/ 17:00

श्री.राजेश टोपे........

सेक्शन 20 खाली ज्या ठिकाणी योजना राबविण्याच्या दृष्टीने फ्लॅटेड योजना असेल, त्यातून 5 टक्के फ्लॅट शासनाच्या ताब्यात देण्याची योजना असेल किंवा तळेगाव दाभाडे येथे प्लॉट पाडून मागासवर्गीयांसाठी घरे बांधण्याची योजना असेल, अशा जमिनी सेक्शन 20 खाली शासनाच्या नियंत्रणाखाली येणार आहेत. ज्या जमिनी शासनाच्या नियंत्रणाखाली येणार नाहीत त्या म्हणजे कलम 8(4) खाली जी अतिरिक्त घोषित केलेली जमीन आहे, अशी जी जमीन अद्याप शासनाच्या ताब्यात आलेली नाही, काही प्रकरणात कोर्टात लिटिगेशन झालेले आहे अशी जमीन असेल, या जमिनी शासनाच्या नियंत्रणाखाली येणार नसल्या तरी शासनाचा मुख्य हेतू हा आहे की, या जमिनींवर घरे व्हावीत किंवा त्यासाठीच या जमिनींचा वापर व्हावा. त्यादृष्टीने कर्नाटक राज्यामध्ये सुध्दा व्हॅकेट लॅण्ड टॅक्स ॲक्ट हा एक कायदा अस्तित्वात आलेला आहे. आपल्या राज्यात सुध्दा असा कायदा करुन ज्यांच्याजवळ आज जमिनी मुबलक प्रमाणात आहेत, त्या युएलसी कायदा निरसित झाल्यानंतर त्यांच्याजवळ तशाच राहून जमिनींचे भाव वाढणे असे प्रकार होऊ नयेत, त्याकरिता त्यांनी त्या जमिनी वर्ष-दोन वर्षात विकसित केल्या नाहीत तर अशा जमिनींबाबत व्हॅकेट लॅण्ड टॅक्स ॲक्ट जो कर्नाटक राज्यामध्ये लागू आहे, त्या कायद्याचा अभ्यास करुन तशा प्रकारचा नवीन कायदा या राज्यात आणण्याच्या दृष्टीने शासनाचा विचार सुरु आहे. या सगळ्या जमिनींवर कोणतेही नियंत्रण राहणार नाही अशा पध्दतीचा शासनाचा अजिबात विचार नाही. त्यामुळे शासनाचे नियंत्रण जरुर राहणार आहे. कोणीही कितीही शेकडो एकर जमीन स्वत:च्या ताब्यात ठेवून ती विकसित न करता भाव वाढू द्यायचे आणि मागाहून कधीतरी जमीन विकसित करायची असा जर दुष्ट हेतू कोणाचा असेल तर तो हेतू साध्य करु न देण्याच्या दृष्टीने शासन नवीन कायदा आणण्याचा जरुर विचार करणार आहे. त्यामुळे मी सांगितल्याप्रमाणे युएलसी कायद्याच्या ज्या तरतुदी आहेत त्यांचा अंमल करणे हे 1976 पासून पाहिजे त्याप्रमाणात परिणामकारकपणे करता येणे शक्य झाले नाही. देशातील ज्या ज्या राज्यांनी युएलसी कायदा लागू केलेला होता, त्यापैकी पश्चिम बंगाल वगळता हा कायदा निरसन करण्याचा ठराव सर्वच राज्यातील दोन्ही सभागृहांनी मंजूर केलेला आहे. त्यामुळे देशामधूनच हा कायदा रद्दबातल ठरला आहे. या कायद्याचे दुष्परिणाम म्हणून मोठ्या प्रमाणात लिटिगेशन होऊन हा कायदा अंमलात आणणे अयशस्वी झाले आहे. जेएनयुआरएमचा फायदा राज्य शासनाला करुन घेण्याचा मुख्य हेतू आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/ 17:00

श्री.राजेश टोपे........

त्याचबरोबर जो सामंजस्य करार करण्यात आला आहे, त्यादृष्टीने या कायद्याचे निरसन करणे हे राज्य शासनाला बंधनकारक आहे. जवळजवळ 23 हजार कोटी रुपयांचे प्रस्ताव जेएनयुआरएम अंतर्गत आपण पाठविले आहेत. हे प्रस्ताव मंजूर व्हावयाचे असतील तर या कायद्याचे निरसन करणे ही अट अनिवार्य आहे. सामंजस्य करारामध्ये आपण या कायद्याचे निरसन करण्याचे मान्य केलेले आहे. एकीकडे या कायद्याचे दुष्परिणाम म्हणून लायसन्स राज पध्दत अवलंबिली जाते, कोणतेही मोठे प्रकल्प करावयाचे असतील तर एनओसी आणणे इत्यादी गोष्टी कराव्या लागतात. त्यामुळे भ्रष्टाचार वाढीस लागतो. प्रामुख्याने झोपडपट्ट्या असतील, गुंठेवारी कायदा असेल किंवा लिटिगेशन असेल, हे सर्व या कायद्याचे दुष्परिणाम आहेत. जेएनयुआरएमचा फायदा करुन घेण्याचा राज्य शासनाचा हेतू आहे. सध्याच्या कायद्याची अंमलबजावणी करीत असताना होत असलेल्या दुष्परिणामांचा उल्लेख मी जाणीवपूर्वक केलेला आहे. ज्यामध्ये मी लिटिगेशनचा उल्लेख केला. मुंबईमध्ये मोठया प्रमाणात झोपडपट्ट्यांची वाढ होणे हे या कायद्याचेच एक बायप्रॉडक्ट आहे असे म्हटले तर ते चुकीचे ठरु नये. गुंठेवारी कायदा याच कारणासाठी आणावा लागला.

(नंतर श्री.जुन्नरे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ...

सभापती महोदय, सरप्लस डिक्लेअर हाईल या भितीपोटी लोकांनी गुंठया-गुंठयाने जमिनी विकल्या त्यामुळे या जमिनी नियमित करण्यासाठी गुंठेवारी कायदा आपल्याला करावा लागला.

अनेक सन्माननीय सदस्यांनी मुंबईच्या संदर्भातील प्रश्न उपस्थित केला. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, सदनिकांची योजना राबविण्याच्या दृष्टिकोनातून 740 हेक्टर जमीन सेक्शन 20 खाली योजना राबविण्यासाठी मंजूरी देण्यात आली होती. मुंबईतील सुट दिलेले एकूण क्षेत्र 740 हेक्टर असून राज्य शासनाच्या ताब्यात 735 हेक्टर जमीन आहे. सेक्शन 20 खाली ज्या योजना मंजूर केलेल्या असून त्या योजनेचा मुख्य हेतू छोटया सदनिका बांधणे हा आहे. छोटया सदनिकाचा अर्थ असा आहे की, 20 चौरस मिटर, 40 चौरस मिटर, 60चौरस मिटर, 80 चौरस मिटरची सदनिका बांधणे हा आहे. 800 चौरस फुटाच्या वर फ्लॅट असेल तर तो सेक्शन 20 खाली मंजूर करता येत नाही. त्यामुळे 20 चौरस मिटर, 40 चौरस मिटर, 60चौरस मिटर , 80 चौरस मिटर एवढया आकाराच्या सदनिका या योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. या ठिकाणी गोदरेज कंपनीजवळ असलेल्या जमिनीचा अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला. युएलसी ॲक्ट कोठे कोठे लागू होत नाही? तर ज्या ठिकाणी एनडीझेड आहे, मुंबईमध्ये जे मॅंग्रोज असतील, खारपट्टयाच्या जमीन असेल तर त्या ठिकाणी बांधकामक्षम क्षेत्र नसल्यामुळे युएलसी ॲक्टची तरतूद लागू होत नाही. यासंदर्भात कॉम्पीटन्ट ॲथोरिटी ज्यावेळी सरप्लस डिक्लरेशनचे सेक्शन 8(4) च्या खाली निर्णय घेते त्यावेळी या सर्व गोष्टी वजा कराव्या लागत असतात. गोदरेजकडे 4-5 हजार एकर जमीन आहे त्यात 3 ते 3.5 हजार हेक्टर जमिनीवर मॅनग्रोज आहे त्यामुळे अशा जमिनी सर्व वजा कराव्या लागतात तसेच खारपट्टयाच्या जमिनी सुध्दा वजा कराव्या लागतात. या ठिकाणी आपल्याला केवळ फुगलेला आकडा दिसतो परंतु शासनाच्या ताब्यात एकूण किती जमिनी येतील याबाबत साशंकता आहे. या कायद्याचे काही वाईट परिणाम आहेत ते परिणाम लक्षात घेता आणि हा कायदा रद्द झाल्यानंतर होणारे फायदे लक्षात घेता सर्व गोष्टी मी सभागृहाच्या समोर ठेवलेल्या आहेत.

**ठराव प्रस्तुत झाला**.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चा उद्या घेण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी माहिती विचारली होती त्या संदर्भात मी सर्व माहिती दिलेली आहे त्यामुळे या प्रस्तावावर आता चर्चा सुरु करावी.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, युएलसी ॲक्ट खाली सर्व जमीन मुक्त केल्यानंतर आपण राज्याचे गृहनिर्माण खाते बंद करणार आहात काय ? हा कायदा केल्यानंतर शासनाकडे जमीनच शिल्लक राहणार नाही. शासनाकडे किती जमीन शिल्लक राहणार आहे याची माहिती प्रथम देण्यात यावी.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मुंबईतील अर्बन सिलींग ॲक्टखाली जी जमीन नोटीफाईड केलेली आहे त्याची आकडेवारी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांना दिल्यानंतर मी या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करतो.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी स्पष्टपणे सांगितले आहे की, सेक्शन 20 खाली प्राप्त सदनिका ... ...

(अडथळा )

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 17:10

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय उच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर शासनाने किती जमीन ताब्यात घेतली ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, दिनांक 1.2.1976 साली......

( अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय उच्च न्यायलयाने आदेश दिल्यानंतर शासनाने किती टक्के जमीन ताब्यात घेतली ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या संदर्भातील आकडेवारी पटलावर ठेवण्यात येईल. 1976 ते 2007 पर्यंत किती जमीन ताब्यात घेतली त्याची आकडेवारी सांगतो. एकूण 735 हेक्टर जमीन शासनाने संपादित केलेली आहे. सेक्शन 20 नुसार 740 हेक्टर जमिनीचा विकास केलेला आहे.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

**तालिका सभापती ( ॲड.अनिल परब )** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय मंत्रिमहोदयांनी शासनाची बाजू मांडलेली आहे. सदस्यांना इतर जी माहिती पाहिजे ती देण्याची मंत्रिमहोदयांची तयारी आहे. परंतु सन्माननीय सदस्यांना कोणती माहिती पाहिजे हे मंत्रिमहोदयांना कळले पाहिजे. अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलत आहेत. सन्माननीय मंत्रिमहोदयांनी या संदर्भातील टिप्पणी आज दिली तर त्याचा अभ्यास सन्माननीय सदस्यांना करता येईल आणि उद्याच्या चर्चेत त्यांना आपले मुद्दे मांडता येतील.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माहिती पटलावर ठेवतो असे मंत्रिमहोदयांनी सांगितले... (अडथळा )

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी विचारलेल्या प्रश्नाची माहिती मी आताच सांगतो. माननीय उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे शासनाने 400 हेक्टर जमीन ताब्यात घेतलेली आहे. सन्माननीय सदस्यांना जे काही प्रश्न विचारावयाचे असतील किंवा त्यांच्या ज्या काही शंका असतील त्या त्यांनी त्यांच्या भाषणात मांडाव्यात. उत्तराच्या भाषणात मी त्या सर्व प्रश्नांची उत्तरे देईन.

( अडथळा )

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय राज्यमंत्रिमहोदयांनी दोन परस्पर विधाने केलेली आहेत. राज्यात या कायद्याची अंमलबजावणी होऊ शकली नाही आणि उच्च न्यालयाने आदेश दिल्यानंतर 400 हेक्टर जमीन संपादित केली असे आता सांगितले. उच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर जमीन संपादित केली याचा अर्थ इच्छा शक्तीचा अभाव होता......

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, हा प्रश्नोत्तराचा तास नाही. सन्माननीय सदस्यांना जे काही प्रश्न विचारावयाचे आहेत त्याचा उल्लेख त्यांनी त्यांच्या भाषणात करावा.

**तालिका सभापती** : प्रश्नोत्तराचा तास सुरु आहे की काय असेच मला वाटत आहे. मला सन्माननीय सदस्यांना एवढेच सांगावयाचे आहे की, सरकारची बाजू मांडून झालेली आहे. सन्माननीय सदस्यांना टिप्पणी दिल्यानंतर त्याबाबत तयारी करुन उद्या होणाऱ्या चर्चेत त्यांना सविस्तर मुद्दे मांडता येईल. या बाजूकडून कोणास बाजू मांडावयाची असेल तर त्यांनी सुरुवात करावी.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाच्या कामकाजाबाबत.....**

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सभागृहाची बैठक सकाळी 9.45 पासून सुरु आहे. कामकाजपत्रिकेवर कालच्या आणि आजच्या मिळून अशा एकूण 9 अर्धा-तास चर्चेच्या सूचना आहेत. आता आपण चर्चेस सुरुवात केल्यास आम्ही आणखी किती वेळ बसायचे ? तेव्हा माझी आपणास विनंती आहे की, आपण ही चर्चा येथेच थांबवावी आणि दोन दिवस राहिलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना प्रथम घ्याव्यात.

यानंतर श्री.पुरी..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.अजित... 17:15

श्री.मधुकर चव्हाण...

शेवटचे दोन दिवस अधिवेशनाचे राहिलेले आहेत. आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये 8-10 अर्धा तासाच्या चर्चा दाखवलेल्या आहेत, त्या प्रथम आपण चर्चेला घ्याव्यात.

श्री.विनोद तावडे : याबाबत सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांची मान्यता असेल तर या ठरावावरील चर्चा उद्या घ्यावी व आता अर्धा तासाच्या चर्चा घ्याव्यात, अशी मी माननीय सभापतींना विनंती करतो.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : आपण फक्त चर्चेला सुरुवात करुया. प्रथम मी बोलतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी हे ठरावावर ऑन लेग आहेत, असे मान्य करुन आपण अर्धा तासाच्या चर्चा घ्याव्यात.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, सभागृहाचा महत्वाचा वेळ विरोधी पक्षाच्या वतीने वाया जात आहे. मागच्या अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी हा कायदा रिपील करण्याच्या दृष्टीने शासनाची भूमिका मांडलेली असून त्यादृष्टीने हा ठराव याठिकाणी मांडण्यात आलेला आहे. तसेच यासंदर्भात माननीय राज्यमंत्री महोदय, शासनाची पूर्ण भूमिका सांगत आहेत. चर्चेस आमची तयारी असून सन्माननीय सदस्यांना आपली जी काही भूमिका मांडावयाची आहे, ती त्यांनी मांडावी. परंतु याठिकाणी सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी हे आपली भूमिका मांडत असताना, ही चर्चा उद्या घ्यावी असे म्हणणे योग्य होणार नाही. याठिकाणी सभागृहाचा महत्वाचा वेळ वाया जात असल्यामुळे आपण आजच्या कामकाजपत्रिकेतील कामकाजानुसार कामकाज घ्यावे, अशी माझी मागणी आहे.

**तालिका सभापती** : कामकाजत्रिकेनुसारच कामकाज सुरु आहे. याठिकाणी सुरुवातीस माननीय मंत्रिमहोदयांनी शासनाची भूमिका मांडावी असे ठरले होते. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी हरकतीच्या मुद्याद्वारे अशी मागणी केली होती की, आम्हाला यासंदर्भातील पूर्ण माहिती द्यावी व त्यानंतर आम्ही अभ्यास करु व उद्या चर्चा करु. त्याप्रमाणे मी माननीय मंत्रिहोदयांना सांगितले की, आपण आपली बाजू मांडावी व त्यानंतर याबाबतीत उद्या चर्चा सुरु होईल. त्यामुळे याठिकाणी ठरल्याप्रमाणे सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी हे ऑन लेग असतील असे सभागृहाने मान्य केलेले आहे.

..2....

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांना या ठरावावरील चर्चा नको आहे, असा त्यांचा आग्रह असून कामकाजपत्रिकेवरील अन्य विषय घ्यावा असा त्यांचा आग्रह आहे. आपल्या आग्रहाप्रमाणे कामकाज घेण्यास हरकत नाही. परंतु इतर सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, आपण फक्त या ठरावावरील चर्चेला सुरुवात करुया.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, प्रत्येक दिवशी अर्धा तासाच्या चर्चा पुढे ढकलल्या जात आहेत. त्यामुळे त्या आधी आपण चर्चेला घ्याव्यात. तसेच आम्ही सकाळी 9.45 वाजल्यापासून सभागृहात बसलो आहोत. आम्ही आणखी किती वाजेपर्यंत याठिकाणी बसावे, याबाबत आपणच निर्णय द्यावा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, याविषयी सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी उद्या सविस्तरपणाने बोलावे. मला वाटते की, माननीय श्री.अशोक चव्हाण साहेब, त्यांचे भाषण त्यांना उरकून टाकावयास लावत आहेत. परंतु सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी उद्या बोलतील, ते या ठरावावर ऑन लेग असतील. त्यामुळे आता आपण पुढील कामकाज घ्यावे अशी आमची विनंती आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची मागणी मान्य करावी. कारण आम्ही सकाळी 9.45 वाजल्यापासून याठिकाणी बसलेलो आहोत. आमची ऐकण्याची क्षमता राहिलेली नाही. त्यामुळे आपण...

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांच्या हरकतीच्या मुद्यावर आपल्याला काय रुलिंग द्यावयाचे आहे ते आपण द्यावे. परंतु माझ्या भाषणास माननीय मंत्रिमहोदय विरोध करीत आहे असे म्हणणे योग्य नाही.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, अधिवेशन सुरु झाल्यानंतर सन्माननीय सदस्य, श्री.परशुराम उपरकर यांनी दिलेली अर्धा-तास चर्चेची सूचना अद्याप तशीच प्रलंबित आहे. ती कधी घेणार आहोत ? त्यामुळे आता अशासकीय कामकाज घ्या. विरोधी पक्षाचे सर्व विषय तुम्हाला बासनात गुंडाळावयाचे आहेत काय ?

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, मी मघापासून या विषयावर बोललो नाही. या प्रस्तावाविषयी सन्माननीय मंत्रीमहोदयांनी आपले म्हणणे मांडले, ते निश्चितपणे अतिशय गंभीर आहे. कायदा रिपिल करतांना, इतर राज्यात झाले आहे, आपल्या राज्यात का नको, आपल्या राज्यात काय परिस्थिती आहे, हा सर्व वेगळा भाग आहे. या प्रस्तावावर चर्चा करु नये, असे कुणाचेही मत नाही. हा प्रस्ताव मागील अधिवेशनात मांडला, तो आज चर्चेला येणार आहे, हे कोणत्याही सन्माननीय सदस्यांना ठाऊक नव्हते. गेल्या पंधरा दिवसांपासून अर्धा-तास चर्चेच्या सूचना प्रलंबित आहेत.

**तालिका सभापती (ॲड.अनिल परब)** : याबाबतीतील माझा निर्णय मी दिला आहे. सन्माननीय मंत्रीमहोदयांनी प्रस्तावावरील आपले म्हणणे मांडले आहे. विरोधी पक्ष सदस्यांचे असे म्हणणे आहे की, याविषयी पूर्ण तयारी करुन उद्या चर्चा करु. आता मी सन्माननीय सदस्य, श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना एकटयाला बोलण्याची परवानगी देतो. नंतर यावरील चर्चा उद्या केली जाईल.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.अरविंद सावंत यांनी असे सांगितले की, आज हा प्रस्ताव चर्चेला येणार आहे, हे सन्माननीय सदस्यांना माहीत नव्हते. मागील अधिवेशनात सभागृहात मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर या अधिवेशनात चर्चा व्हावी म्हणून कामकाज सल्लागार समितीमध्ये चर्चा होऊन विषयपत्रिका ठरविण्यात आली आहे. मागच्या अधिवेशनात आलेल्या प्रस्तावावर पुढील अधिवेशनात चर्चा होते, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नसते. रेकॉर्डवर चुकीचे राहू नये, म्हणून मी हे मुद्दाम सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे.

श्रीमती सुधाताई जोशी : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरल्याप्रमाणे या प्रस्तावावरील चर्चा दिनांक 31/07/2007 रोजी दाखविण्यात आलेली आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, अभ्यास करुन आलो नाही म्हणून परीक्षा पुढे ढकला, असे सांगण्यासारखे आहे व ते बरोबर नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, चुकीचा पेपर काढला आहे, म्हणून आम्ही सांगत आहोत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री, श्री.राजेश टोपे यांचे विधान आक्षेपार्ह आहे.

**तालिका सभापती** : माननीय राज्यमंत्री महोदयांचे विधान मी तपासून बघतो, आक्षेपार्ह असेल तर काढून टाकण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री, श्री.राजेश टोपे यांनी म्हटले की, परीक्षेचा अभ्यास झाला नाही म्हणून परीक्षा पुढे ढकला. अशी मागणी आम्ही कधीच केलेली नाही. सन्माननीय सदस्या, श्रीमती सुधा जोशी यांचे म्हणणे आहे की, कामकाज सल्लागार समितीमध्ये या प्रस्तावावर चर्चा घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेमध्ये हा विषय कुठे दाखविण्यात आला आहे ? आम्ही चणे, फुटाणे खाण्यासाठी येथे येतो काय ? आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेत हा विषय आला आहे का ? मला असे म्हणावयाचे आहे की, हे जे मंत्रिमहोदयांचे बोलणे आहे ते.......

(सत्ताधारी बाकावरील अनेक सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला संरक्षण द्या.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.विनोद तावडे यांना जरुर संरक्षण द्या परंतु ते जे बोलतील ते त्यांनी सत्य बोलावे, एवढेच आमचे म्हणणे आहे.

यानंतर श्री.बोरले.........

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ....... 17:25

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझे असे मत आहे की, विरोधी बाकावरील सन्माननीय सदस्यांनी आपले मत मांडल्यानंतर त्यावर माननीय मंत्री महोदयांनी अशा पद्धतीचे वक्तव्य करणे, योग्य नाही. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार, सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील यांच्या सारखे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य ज्यावेळी आपले मत मांडतात त्यावेळी कॅबिनेट मंत्री होण्याच्या मार्गावर असलेल्या माननीय श्री.राजेश टोपे यांनी अशा पद्धतीचे वक्तव्य करणे, योग्य नाही. माननीय मंत्री महोदयांनी त्यांचे वक्तव्य मागे घ्यावे, अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी माझे वक्तव्य मागे घेतो. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांना मला एवढेच सांगावयाचे आहे की, केंद्रामध्ये तुमच्या पक्षानेच ते रिपिल केलेले आहे. मग आता काय अडचण येत आहे, हे मला कळत नाही. सभापती महोदय, सभागृहाचा वेळ घालवू नये, अशी माझी विनंती आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मागच्या अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्री महोदयांनी यू.एल.सी.चा कायदा रिपिल करण्याबाबतचा प्रस्ताव या सभागृहामध्ये मांडला होता. राज्याचे नगर विकास राज्यमंत्री श्री.राजेश टोपे यांनी शासनाची या प्रस्तावाच्या संदर्भातील पार्श्वभूमी आणि हा कायदा रिपिल करण्याबाबतचे शासनाचे धोरण काय आहे, हे सभागृहामध्ये मांडलेले आहे.

यू.एल.सी. कायदा राज्य शासनाच्यावतीने आज रद्द करण्यात येत आहे किंवा रिपिल करण्यात येत आहे. याचे माझ्या सारख्या चळवळीतील कार्यकर्त्याला अत्यंत दुःख होत आहे. मागच्या 31 वर्षामध्ये या कायद्याद्वारे शासनाने काय साध्य केले याचे उत्तर पाहिजे असेल आणि त्याचे परिणाम प्रतिकूल असतील तर मग आता शासनाला हा कायदा का रद्द करावयाचा आहे याबाबतचे कारण स्पष्टपणे न मांडल्यामुळे आज मुंबईमध्ये या कायद्याचे तीन-तेरा, साडेबारा झालेले आहेत, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. ज्यावेळी इंदिरा गांधी यांनी बँकांचे राष्ट्रीयकरण करण्याची भूमिका घेतली त्यावेळी संपूर्ण देशातील तरुणांमध्ये एक प्रकारे जागृती निर्माण झाली. बँकांचे राष्ट्रीयीकरण असेल, राजा महाराजांचे तनखे बंद करायचे असतील किंवा गरिबी हटाओचा नारा असेल यामुळे तरुणांमध्ये एक प्रकारे जागृती निर्माण झालेली आहे. सन 1976 साली इंदिरा गांधी यांनी कमाल जमीन धारणा कायदा आणला. कमाल जमीन धारणा कायद्याचा मुख्य हेतू आणि

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी ..........

उद्देश असा होता की, सामान्य माणसाला, गरीब माणसाला घरे मिळाली पाहिजेत. ग्रामीण भागातील लोक नोकरीच्या निमित्ताने, धंद्याच्या निमित्ताने शहरामध्ये येत असतात. त्या लोकांना शहरामध्ये घर उपलब्ध व्हावयास पाहिजे, अशी भूमिका 1976 च्या कायद्यामध्ये अंतर्भूत होती. मी स्पष्ट करतो की, माननीय मुख्यमंत्र्यांनी या विषयावर बैठक बोलाविली होती. त्या बैठकीला मी उपस्थित होतो. शिवसेना पक्षाच्यावतीने सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार हे देखील त्या बैठकीला उपस्थित होते. त्या बैठकीमध्ये यामागची सर्व पार्श्वभूमी मांडण्यात आली होती. यू.एल.सी. ॲक्टमुळे राज्याचा काय फायदा झाला ? यू.एल.सी. ॲक्टमुळे मुंबई शहरातील किती लोकांना घरे बांधण्यासाठी शासनाच्या माध्यमातून प्रवृत्त करण्यात आले. आज जर आपण संपूर्ण आढावा घेतला, भूमिका समजावून घेतली तर आपल्याला आढळून येईल की, या कायद्याचा वापर कोठेही होऊ शकला नाही आणि जी घरे गरिबांसाठी उपलब्ध व्हावयास पाहिजे होती, ती घरे गरिबांना किंवा मध्यमवर्गीयांना मिळाली नाहीत, हे याचे स्पष्ट उत्तर आहे.

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

यानंतर श्री.सुंबरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरूनाथ कुलकर्णी ...

मी त्यावेळेस सांगितले होते की, श्री.वसंतराव नाईक हे या राज्याचे मुख्यमंत्री असताना, श्री.होमी तल्यारखान हे राज्याचे गृहनिर्माण मंत्री होते. ...

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी हे अतिशय अभ्यासपूर्ण आणि तळमळीने बोलत आहेत. आम्हाला देखील त्यांचे भाषण मनापासून ऐकावयाचे आहे तसेच त्यांना देखील भाषणासाठी, आपले विचार येथे मांडण्यासाठी नीट आणि पुरेसा वेळ मिळाला पाहिजे. सभापती महोदय, आता साडेपाच वाजले आहेत आणि येथे कोणाचीही मानसिकता याहून अधिक काळ बसण्याची नाही. कारण आम्ही सकाळी 9.30 वाजल्यापासून येथे आलो आहोत. या सभागृहात येण्यासाठी सकाळी 7.30 वाजता घरून निघावे लागते आणि आम्हाला दोन अडीच तासाचा प्रवास करावा लागतो आणि तेवढाच काळ आम्हाला पुन्हा घरी जाण्यासाठी लागतो हेही आपण लक्षात घ्यावे. आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.कुलकर्णी आपले विचार मांडत आहेत आणि त्यांचे हे अभ्यासपूर्ण भाषण आम्हाला ऐकावयाचे आहे. त्यांचे भाषण 10 मिनिटांमध्ये संपणारे नाही. त्यांनाही त्यांचे विचार विस्ताराने येथे आपण मांडू दिले पाहिजेत. पण त्यांनाही येथे भाषण करताना त्रास होतो आहे हे आम्ही पाहतो आहोत. तेव्हा त्यांना आपण उद्या भाषण पुढे सुरू ठेवण्यास आपण परवानगी द्यावी आणि आता सभागृहाचे कामकाज आपण येथेच थांबवावे.

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना सांगू इच्छितो की, आपण सकाळी 9.30 वाजता येथे आला आहात आणि आताही आपणास घरी जाण्यासाठी दोन तास लागणार आहेत. तेव्हा आपणास इतका प्रवास करावा लागू नये म्हणून मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपण माझ्या घरी येऊन रहावे, आपली सगळी सोय मी व्यवस्थित करीन. सन्माननीय सदस्य श्री. कुलकर्णी यांनी आपले भाषण पुढे सुरू करावे.

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आता या राज्य सरकारने नुकतेच आपले नवीन हौसिंग धोरण जाहीर केलेले आहे. परंतु श्री.वसंतराव नाईक या राज्याचे मुख्यमंत्री असताना आणि श्री.होमी तल्यारखान गृहनिर्माण मंत्री असताना राज्यामध्ये म्हाडा निर्माण झालेले नवहते. तर केवळ मुंबई हौसिंग बोर्ड होते. त्या बोर्डाच्या माध्यमातून मुंबईच्या निरनिराळ्या भागामध्ये कामगारांसाठी, अल्प उत्पन्न गटातील, मध्यम उत्पन्न गटातील लोकांसाठी म्हणजेच समाजातील सर्वसामान्य

....... 4एफ 2 ...

श्री. कुलकर्णी ....

माणसांसाठी, मध्यमवर्गीयासाठी घरे बांधण्याचे धोरण स्वीकारले गेले. त्यानुसार मुंबईमध्ये अनेक भागामध्ये मुंबई गृहनिर्माण मंडळाच्या मार्फत मध्यम वर्गीयांच्या गृहनिर्माण वसाहती उभ्या केल्या गेल्या. उदाहरणार्थ, गोरेगावातील मोतीलाल नगर असेल, चेंबूर भागातील टिळक नगर असेल, वरळी येथील शिवाजी नगर व आदर्श नगर असेल, दादर पूर्वेकडील सहकार नगर असेल किंवा काळाचौकी भागातील अभ्युदय नगर असेल. या सगळ्या वसाहती निवासी घरांसाठी म्हणून निर्माण केल्या गेल्या. त्यासाठी कामगारांकडून तीन महिन्यांचे भाडे घेतले जायचे आणि त्याला 225 फूटाचे घर, निवासी गाळा 1972 साली दिला जात होता. मुंबई गृहनिर्माण मंडळाचे त्या काळातील हे काम पाहता आणि मध्यंतरीच्या काळामध्ये आमच्या सध्याच्या गृहनिर्माण मंडळाकडून, म्हाडा कडून जे काम या मुंबई शहरामध्ये होत आहे ते पाहता गरीब, मध्यमवर्गीयांना घरे बांधून देण्याचे दुकान बंद झाले आहे आणि म्हाडाच्या वतीने जी घरे बांधली जात आहेत ती कोणासाठी आणि कशासाठी बांधली जात आहे, म्हाडाचे नेमके धोरण कोणासाठी आणि कशासाठी आहे तेच समजत नाही. आज बिल्डर्स ज्या पद्धतीने घरे, इमारती बांधत आहे त्याप्रमाणे म्हाडा देखील घरे बांधू लागले आहे. सामान्य माणसासाठी, मध्यमवर्गीयांसाठी त्यामुळे घरे उपलब्ध होऊ शकत नाहीत हे वास्तव या ठिकाणी आपण सर्वांनीच लक्षात घेतले पाहिजे, हे वास्तव मला या ठिकाणी आपल्यासमोर आणले पाहिजे. या पार्श्वभूमीवर सामान्य माणसाला, मध्यम वर्गीयांना आज मुंबईमध्ये घर मिळू शकत नाही. म्हाडा बिल्डर्सबरोबर स्पर्धा करू लागले आहे. त्यामुळे खाजगी बिल्डर्सप्रमाणे म्हाडाच्या घरांचे भाव राहू लागले. हिरानंदानी बिल्डर्सच्या घरांचा भाव 4 हजार रूपये चौ.फूटाला आहे तेथे म्हाडाचे दर 3200, 3500 रूपये ठेवले गेले आणि तरीही घरे विकली जात नव्हती म्हणून मग ते भाव 2600, 2700 रूपये झाले. या सगळ्याचा परिणाम या मुंबईमध्ये सामान्य माणसाला, मध्यम वर्गीय माणसाला घर न मिळण्यामध्ये झालेला आहे हे सर्वमान्य होईल. मग यूएलसी म्हणजे काय आहे ? तर जी एक्सेस म्हणजे अतिरिक्त जमीन आहे, म्हणजे ज्या जमीन धारकाकडे 500 मीटर्स पेक्षा जास्त जमीन आहे ती अतिरिक्त जमीन यूएलसी कायद्यांतर्गत येते. ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री. सरफरे ..... 4एफ 1 ...

श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

यु.एल.सी. कायद्यांतर्गत असलेली अतिरिक्त जमीन आणि 500 मीटरपेक्षा कमी जमीन असेल तर त्या जमिनीचा मालक त्या ठिकाणी डेव्हलपमेंट करु शकतो. अशाप्रकारे या कायद्याचे उद्दिष्ट असतांना आपण काय केले? ज्या यु.एल.सी. चा फायदा घेऊन सर्वसामान्य, मध्यमवर्गीय,गोरगरीबांसाठी घरे उपलब्ध करुन द्यावयाचे असतांना बिल्डर्सनी या योजनेचा बोऱ्या वाजविण्याचे काम केले. बिल्डर्सनी शासनाकडून योजना मंजूर करुन घेतांना आम्ही 5 टक्के, 10 टक्के घरे देऊ असे त्यांनी सांगितले. यु.एल.सी. योजनेंतर्गत 10 टक्के कोटयामधून 58 हजार घरे बांधण्यात आली. ही सर्व 58 हजार घरे शासनाला मिळालेली नाहीत ही वस्तुस्थिती आहे. 10 टक्के कोटयामधून यु.एल.सी. कायद्यांतर्गत सर्वसामान्य गरीब माणसांकरिता 58 हजार घरे उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. त्यामुळे 58 हजार घरांपैकी फक्त 35 हजार घरे राज्य सरकारला उपलब्ध झ ाली. बिल्डरने राज्य शासनाबरोबर 58 हजार घरे देण्याच्या बाबतीत जे कमिटमेंट केले होते ते फुलफील केले नाही. यामध्ये बिल्डर्सनी शासनाबरोबर उद्दामपणाची वागणूक दिली. बिल्डर्सनी शासनाला विचारले की, 10 टक्के घरे द्यावयाचे म्हणजे आम्ही काय करावयाचे? तुम्ही फक्त आमची योजना मंजूर करता, आम्हाला फायनान्स करीत नाही, आम्हाला मदत करीत नाही. आम्ही योजनेंतर्गत जी घरे बांधतो त्यामधील 10 टक्के घरे तुम्हाला देणार नाही. आणि मग ही बिल्डर मंडळी शासनाला न जुमानता हायकोर्टामध्ये गेली व त्यानंतर सुप्रिम कोर्टामध्ये गेली. सुप्रिम कोर्टाच्या निर्णयानंतर 10 टक्क्याचे प्रमाण 5 टक्क्यावर आले. हा या योजनेचा वाजलेला बोऱ्या आहे. यु.एल.सी. कायद्यामधील जो चांगला उद्देश होता तो पूर्ण होऊ शकला नाही. 1999 मध्ये एन.डी.ए. सरकार होते. त्यांनी घेतलेला निर्णय फक्त मुंबई व या राज्यापुरता मर्यादित नव्हता. त्यावेळी श्री. राम जेठमलानी हे केंद्रामध्ये नगर विकास मंत्री होते. त्यांनी घेतलेला निर्णय संपूर्ण देशामध्ये लागू आहे. हा कायदा राज्य सरकारने निर्माण केलेला नाही तर तो केंद्र सरकारने निर्माण केला आहे. त्याचे इन्फरन्सेस संपूर्ण देशामध्ये होत असतांना एन.डी.ए. सरकारने 1999 मध्ये हा कायदा रिपिल करण्याचा निर्णय घेतला. आणि देशामध्ये फक्त पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश व महाराष्ट्र या तीन राज्यांमध्ये हा कायदा अस्तित्वात आहे. बाकीच्या सर्व राज्यांनी यु.एल.सी. कायदा ॲबॉलिश, रिपिल करुन टाकला आहे. महाराष्ट्र सरकारने हा कायदा रिपिल करण्यासाठी जो प्रस्ताव आणला आहे त्याच्या पाठीमागे काही तरी कारणे आहेत.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. गुरुनाथ कुलकर्णी....

या राज्यामध्ये गेल्या 31 वर्षामध्ये नोकरशाही ज्या तऱ्हेने वागली त्यामुळे आपण या कायद्याचा आधार घेऊन काहीही निर्माण करु शकलो नाही. युतीची साडे चार वर्षे सोडली तर कित्येक वर्षे आपण सत्ताधारी पक्ष म्हणून काम करीत आहोत. युती सरकारने 40 लाख लोकांना मोफत घरे देण्याची योजना केली. परंतु त्यामधून काही निष्पन्न झाले नाही हा विषय आपण सोडून देवू. परंतु इतक्या वर्षामध्ये मुंबईच्या राजकीय प्रवाहामध्ये असतांना आपण लोकांना घरे उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न होऊ शकला नाही. आणि म्हणून हा यु.एल.सी. कायदा ॲबॉलिश करण्याचा, रिपिल करण्याचा प्रस्ताव आला आहे त्याचे मी समर्थन करतो आणि शासनाचे अभिनंदन करतो. हा कायदा ॲबॉलिश केल्यानंतर अतिरिक्त जमिनी खाजगी लोकांकडे रहाणार आहेत. या संदर्भात मी आपणास एक वाक्य वाचून दाखवितो.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.सरफरे.... 17:40

श्री.गरूनाथ कुलकर्णी (पुढे सुरू...

म्हणजे राज्य शासनाचा पूर्ण अधिकार हा कायदा रिपील केल्यानंतर जाणार आहे. टाईम्स ऑफ इंडियामध्ये बातमी आलेली आहे, ती मी थोडक्यात वाचतो :-" State will halt acquisition after repeal of ULCRA. When the State repeals the Urban Land Ceiling (Regulation) Act (ULCRA) this monsoon, it will suspend claim to thousand of acres of land currently in the process of being acquired or in litigation. New figures show that the State has acquired only 1200 acres of vacant land under the Act over the last 31 years." 31 वर्षामध्ये आपण 1200 हेक्टर एवढीच जमीन या कायद्याअंतर्गत ताब्यात घेतलेली आहे, ही या कायद्याची शोकांतिका आहे. Earlier this Act is repealed is better for the Planners. आपण आता नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर केलेले आहे. त्याची प्रामाणिकपणे अंमलबजावणी आपण करणार आहात की नाही ? हा खरा प्रश्न आहे. आपला या मागचा उद्देश चांगला आहे. गरीबांना घरे उपलब्ध करून देणार असल्याचे म्हटलेले आहे. उद्या आपण युएलसी ॲक्ट रद्द केल्यानंतर उपलब्ध झालेल्या जमिनी प्रायव्हेट लोकांना घरे बांधण्यासाठी देणार आहात. त्यांच्यावर कशाप्रकारे नियंत्रण ठेवणार आहात ? गरीबांना नवीन गृहनिर्माण धोरणाप्रमाणे घरे उपलब्ध करून देणार आहात की नाही ? हा खरा प्रश्न निर्माण होणार आहे. शेवटी या प्रस्तावाला पाठिंबा देऊन, त्याचे स्वागत करतो.

---

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मघाशी चर्चा झाल्याप्रमाणे या प्रस्तावावर एकच सन्माननीय सदस्यांनी बोलायचे आणि त्यानंतर यावर उद्या चर्चा करावयाची असे ठरले होते. आता आपण पुढचे कामकाज घ्यावे, अशी विनंती आहे.

**उपसभापती** : पुढच्या कामकाजापेक्षा आपल्या समोरच्या विषयावर चर्चा करू शकतो.

श्री.मधुकर चव्हाण : चर्चेला आमचा विरोध नाही. आम्ही सकाळी 10-00 वाजल्यापासून बसलेलो आहोत. अधिवेशन सुरू झाल्यापासून आपल्यासमोर अर्धातासाच्या ज्या चर्चा आल्या आहेत, त्यांना न्याय मिळालेला नाही. संबंधित माननीय मंत्रीमहोदयांनीही त्यास संमती दिली. यानंतर एक सन्माननीय सदस्य बोलल्यानंतर ही चर्चा थांबवून ती उद्या चर्चा घेण्याचे ठरलेले आहे. आता उर्वरित कामकाज घेण्यात यावे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/ SBT/ MAP/

श्री.राजेश टोपे : सभागृहाची संमती असेल तर उद्या चर्चा घेण्यास हरकत नाही.

श्री.अशोक चव्हाण : समोरच्या बाजूंनी मागणी केलेली आहे. यावर वारंवार चर्चा होत आहे. उद्या चर्चा घ्यायला हरकत नाही. पुढचे विषय घ्यावेत.

**उपसभापती** : दोन्ही बाजूंनी संमती आहे, तेव्हा ही चर्चा माननीय सभापती महोदयांच्या कानावर घालण्यात येईल. तो पर्यन्त आपण पुढचे कामकाज घेऊ.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/ SBT/ MAP/

पृ.शी. : रशियाहून आयात केलेले जनरेटर स्टेटर कसारा घाटात पोलिसांनी अटकावून ठेवणे.

मु.शी. : रशियाहून आयात केलेले जनरेटर स्टेटर कसारा घाटात पोलिसांनी अटकावून ठेवणे, याबाबत उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याला अनुसरून परिवहन राज्यमंत्र्यांनी केलेले निवेदन.

श्री.धर्मरावबाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी "रशियाहून आयात केलेले जनरेटर स्टेटर कसारा घाटात पोलिसांनी अटकावून ठेवणे" यासंबंधात उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याला अनुसरून मी आपल्या अनुमतीने पुढील निवेदन करू इच्छितो :-

**निवेदन**

(प्रेस : सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावावरील निवेदनासंबंधी**

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मी सकाळी दोन वेळा हा मुद्दा उपस्थित केला होता की, काल नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनास जे निवेदन करण्यास सांगितले होते ते निवेदन कालही झाले नाही आणि आजही झालेले नाही.

**उपसभापती** : मघाशी जी निवेदने झाली त्यामध्ये ते निवेदन होते. नियम 93 ची सूचना आधी आली होती.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, नियम 289 अन्वये दिलेला प्रस्ताव आधी होता. त्या अनुषंगाने निवेदन करावयाचे होते. नियम 93 च्या सूचनेवर निवेदन करण्याचे आदेश नव्हते.

**उपसभापती** : ते निवेदन उद्या होईल. संबंधित शाखेकडून चूक झालेली आहे. यासंदर्भात काय करावयाचे ते मी पाहतो. आपण ते माझ्यावर सोपवावे.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/ KGS/

**सन 2007 चे वि. प. वि. क्र. 5 संबंधी**

**उपसभापती** : यानंतर सन 2007 चे वि. प. वि. क्रमांक 5- मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका, आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक घेण्यात येईल.

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि. प. वि. कमांक 5 - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948, आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक .....

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी प्रस्ताव दिलेला आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आता सभागृहात उपस्थित नाहीत.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, बिल कधीही चर्चेला येते त्यामुळे असे होते. हे विधेयक उद्या घ्यावे.

**उपसभापती** : हे विधेयक नंतर घ्यावे असे आपले म्हणणे आहे काय ?

श्री. मधुकर सरपोतदार : हे विधेयक उद्या घ्यावे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आल्यानंतर हे विधेयक घेऊ.

----

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक.

**L.A.BILL NO. XXXVII OF 2007**

**( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.)**

डॉ. राजेंद्र शिंगणे ( महसूल व पुनर्वसन राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि. स. वि. क्रमांक 37, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ. राजेंद्र शिंगणे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि. स. वि. क्रमांक 37, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय महसूल न्यायाधिकरणाच्या संदर्भातील प्रस्ताव या ठिकाणी आहे. 1939मध्ये मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम संमत झाला होता. 1957मध्ये मुंबई न्याधिकरण अधिनियम अस्तित्वात आला. 1966मध्ये महाराष्ट्र जमीन महसूल संहितेमध्ये त्याचा समावेश झाला. त्यानंतर हे महसूल न्यायाधिकरण चालू होते. पण न्यायाधिकरणामध्ये कमी दावे प्रलंबित असणे आणि त्यावेळी काटकसरीचा उपाय म्हणून आपण हे न्यायाधिकरण बंद करण्याची भूमिका घेतली होती. शासनाचे 2 कोटी रुपये वाचविण्यासाठी हे न्यायाधिकरण बंद करण्याचा निर्णय घेतलेला होता. हे न्यायाधिकरण बंद झाल्यानंतर 3.9.2004ला एक जनहित याचिता उच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आली. त्यावेळी महाराष्ट्र शासनाचा निर्णय रद्दबातल करुन हे न्यायाधिकरण पुन्हा स्थापन करावे अशा प्रकारचे आदेश उच्च न्यायालयाने महाराष्ट्र शासनाला दिले. त्या आदेशा विरुध्द महाराष्ट्र शासनाने सर्वोच्च न्यायालयामध्ये अपिल दाखल केले आणि नंतर ते पुन्हा मागे घेण्यात आले. महाराट्र महसूल न्यायाधिकरणाचे अधिकार विभागीय आयुक्तांना देण्यात आलेले होते. हे अधिकर देत असताना न्यायालयाने असे सांगितले की, विभागीय आयुक्तांना अंतरिम

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. राजेंद्र शिंगणे...)

आदेश देण्याचे अधिकार असावेत, अंतिम आदेश त्यांनी देऊ नये. जेव्हा हे न्यायाधिकरण बंद केले त्यावेळी 2770 दावे प्रलंबित होते. 1 जानेवारी अखेरपर्यन्त 6499 दावे प्रलंबित होते. तेव्हा हे न्यायाधिकरण स्थापन करण्याच्या दृष्टीने हे विधेयक शासनाच्यावतीने विचारार्थ मांडलेले आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

...नंतर कु. खर्चे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता ( दुसरी सुधारणा ) विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, या विधेयकाला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिलेले आहे. हे कायदे आपण कोणत्याही प्रकारची चर्चा न करता फक्त "होयचे बहुमत, होयचे बहुमत" असे करुन आपण पास करतो, परंतु त्यामुळे घडलेले एक उदाहरण मी या ठिकाणी सांगू इच्छितो. ते म्हणजे माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी या सभागृहामध्ये बारबालांबाबत एक विधेयक मांडले होते. त्या विधेयकावर बोलतांना सुध्दा आम्ही म्हटले होते की, हा कायदा हायकोर्टामध्ये टिकणार नाही आणि म्हणून त्याबाबत जास्तीची तयारी करुनच हा कायदा करावा कारण असा कायदा व्यवस्थित होण्याची आवश्यकता आहे आणि शेवटी तेच झाले. तो कायदा हायकोर्टामध्ये टिकला नाही. म्हणून आपण या ठिकाणी विधेयके घाईगर्दीने पास करतो आणि किंवा अध्यादेश काढले जातात हे योग्य नाही. यामध्ये अडचण अशी आहे की, "There is no application of mind." याचा परिणाम असा होतो की, हे कायदे आपल्याला परत परत उभे करावे लागतात. " Independence of judiciary " या कारणावरुन ते भारताच्या संविधानाच्या अधिकाराच्या बाहेर असल्याचे कबूल केलेले होते. या कारणावरुन तो, भारताच्या संविधानाच्या अधिकारितेच्या बाहेर असल्याचे घोषित केले. माननीय उच्च न्यायालयाचा निर्णय आणि उक्त संहितेअन्वये व इतर अधिनियमांन्वये दाखल करण्यात आलेल्या, आणि विभागीय आयुक्तांकडे प्रलंबित असलेल्या अपिलांची व पुनरीक्षण अर्जांची संख्या विचारात घेता, शासनाने, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 मधील तरतुदी पूर्ववत करुन, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण पुनर्घटित करण्याचा निर्णय घेतला आहे. आपण येथे ज्या अमेंडमेंट केल्या त्या अमेंडमेंट मुंबई उच्च न्यायालयाने रद्द केल्या आणि त्यामुळेच परत आपण मूळ कायद्यात येतो. या अमेंडमेंड आपण कशासाठी आणतो ? जर या अमेंडमेंडवर पूर्णपणे चर्चा न करताच त्या पास केल्या जात असतील तर त्यांचा काय उपयोग ? आपली लिगल विंग एवढी वीक झाली काय हो ! कायदा विभागामध्ये जे अधिकारी असतात त्यांचे काय काम आहे ? जर ते एखाद्या कायद्याविषयी संबधित मंत्रिमहोदयांना पूर्ण माहिती देत नसतील तर त्यांचे नेमके काय काम आहे ? मी माननीय मंत्रिमहोदयांना यासंदर्भात दोष देत नाही त्यांना कायदेशीर सल्ला देणा-या विधी विभागामध्ये प्रत्येक विधेयकाचा कायदेशीररित्या अभ्यास केला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ........

जातो. एखाद्या विधेयकामध्ये जर त्रूटी आढळून आल्या तर त्या त्रूटी हाय कोर्टामध्ये टर्न-डाऊन करुन वाचून दाखवाव्या लागतात, हे बरोबर नाही. या विधेयकाच्या उद्देश व कारणामध्ये असे दिलेले आहे की, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 मधील तरतुदी पूर्ववत करुन, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण पुनर्घटित करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील महसूल विभागाच्या एकूण किती केसेस किंवा प्रकरणे प्रलंबित वा न्यायप्रविष्ट आहेत ? यासाठी किती प्रकारचे न्यायाधिकरण उभे करावे लागणार आहे? व ते न्यायाधिकरण तालुका पातळीवर उभे करणार आहात की जिल्हापातळीवर उभे करणार आहात ? यामध्ये एकच उद्देश आहे की, यासंदर्भातील सर्व प्रकरणांना लवकरात लवकर न्याय मिळावा. या सर्व केसेस सिव्हील केसेस असल्यामुळे त्यांना न्याय मिळण्याकरिता वेळ लागतो त्यामुळे यासाठी महसूल न्यायाधिकरण होणे अत्यंत आवश्यक आहे. आमच्या कोकणामध्ये अशा प्रकारच्या जास्त केसेस आपल्याला आढळून येतील. काही वेळा या जमिनीच्या केसेस प्रलंबित ठेवून खालच्या कोर्टापासून ते वरच्या कोर्टापर्यंत जातात आणि मग त्यावर निर्णय दिला जातो. कधी कधी यासंदर्भात जर आजोबांच्या काळामध्ये केस दाखल झालेली असेल तर त्याचा निकाल पणतू येईपर्यंत लागतो. यामुळे भांडणे, मारामा-या होतात. या न्यायाधिकरणामधून जर रॅपिडली निर्णय होऊन प्रकरणे लवकरात लवकर निकाली निघत असतील तर त्याचा उपयोग होईल. या कायद्यांतर्गत आपण कशा प्रकारचे न्यायाधिकरण निर्माण करणार आहात ? याबाबतची माहिती आपण महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 अन्वये सभागृहाला दिली पाहिजे, आम्ही त्याचे स्वागत करतो याबद्दल आमचा विरोध असण्याचे कारण नाही. जमिनीच्या बाबतीत ,महसूलाच्या बाबतीत जास्तीत जास्त न्यायाधिकरणे असतांना प्रकरणे जास्तीत जास्त लवकरात लवकर मोकळे झाली तर महाराष्ट्रातील पुष्कळ लोक कायदा तसेच कोर्टबाजी या संकल्पनेला कंटाळलेले आहेत, त्यांना दिलासा मिळेल. माननीय मंत्रिमहोदयांना माझी विनंती आहे की, न्यायाधिकरण उभे करतांना कोणत्या स्तरावर ते उभे केले जाणार आहेत ? तालुका स्तरावर,जिल्हास्तरावर आपण त्याकरिता न्यायाधीश नेमणार आहात आणि त्यांना संनियंत्रित करण्यासाठी कशी यंत्रणा उभी करणार आहात ? या संदर्भातील माहिती आपण जर सदनाला दिली तर फार बरे होईल. धन्यवाद

--------- यानंतर श्री.कानडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, 2002 पूर्वीचा निर्णय रद्द करुन नवीन विधेयक सरकारने सदनामध्ये मांडलेले आहे. ज्यावेळी या विषयावर पूर्वी चर्चा झाली होती त्यावेळी विभागीय आयुक्तांकडे केंद्रीकरण केल्यामुळे नक्की किती लोकांना फायदा होईल याचा विचार केला असता त्यावेळी अनेक सदस्यांनी असे मत व्यक्त केले होते की, विभागीय आयुक्तांकडे आधीच अनेक कामे आणि जबाबदाऱ्या आहेत अशा वेळी एक प्रयोगात्मक म्हणून महसूल न्यायाधिकरणाऐवजी विभागीय आयुक्तांकडे लवकर न्याय मिळू शकेल अशा प्रकारची भूमिका राज्य शासनाने मांडली होती. सभापती महोदय, मुळातच निर्णय घेताना कायदेशीरदृष्टया तो वैध किंवा अवैध ठरेल याचा विचार न करता निर्णय घेतले जातात. दुसरा मुद्दा असा की, जमीन विषयक कायदे बदलताना धोरण काय याबद्दल देखील विचार करण्याची वेळ शासनासमोर आलेली आहे. नियोजन आयोगाने सुचविले होते की जमीन विषयक रेकॉर्ड म्हणजे लॅन्ड रेकॉर्ड अद्ययावत करणे अतिशय आवश्यक आहे. अनेक जिल्हयांमध्ये नव्हे तर पूर्ण भारतभर जमीन विषयक काय स्थिती आहे याबद्दल सर्वेक्षण चालू होणे आवश्यक होते. लॅन्ड रेकॉर्ड अद्ययावत करण्याची फार मोठी सूचना नियोजन आयोगाच्या ॲप्रोच पेपरमध्ये आली होती. त्याच्यावर चर्चा सुरु आहे. दुसरा मुद्दा असा आहे की, महसूल विषयक आणि जमीन विषयक धोरण काय आहे हे एकदा ठरविले पाहिजे. कारण प्रत्येक अधिवेशनात यासंबंधात वेगवेगळया अमेंडमेंड येतात. सरकारच्या कायदा खात्याने दिलेल्या सूचना, वेळोवेळी सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाने दिलेले जमीन विषयक निवाडे याचा विचार करुन कायद्यात दुरुस्ती केली पाहिजे. त्याशिवाय सर्वंकष कायदा होणार नाही. दरवेळी फायर फायटींगसारख्या एकेक सुधारणा केल्या जातात. परंतु तात्पुरत्या स्वरुपामध्ये मलमपट्टी करुन वेळ मारुन नेली जाते आणि विधेयक मंजूर केले जाते. विधेयक आणण्याची गरज काय याचा शेवटी उल्लेख केलेला आहे. मला याठिकाणी अशी सूचना करावयाची आहे की, याविषयाबाबत मोठया प्रमाणात एक मोहीम घेऊन पूर्ण जिल्हयामध्ये प्रलंबित निवाडे निकाली काढण्यासाठी जनता दरबार किंवा फास्ट ट्रॅक कोर्ट निर्माण केली तर लोकांना दिलासा मिळेल. खटले एका कोर्टाकडून दुसऱ्या कोर्टाकडे वर्ग करणे, त्याच्यामध्ये फेरफार करणे आणि त्यात होणारा भ्रष्टाचार यामुळे न्यायात अडथळे निर्माण होऊ शकतात. हे विधेयक मंजुरीसाठी याठिकाणी येत असताना 2002 मध्ये जो निर्णय घेतला होता त्याचे कारण काय आहे आणि त्याच्यामध्ये ज्या चुका झाल्या त्या देखील सदनाला समजल्या पाहिजेत एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपविते.

( नंतर श्री.भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, या विधेयकावर बोलत असताना सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी प्रलंबित प्रकरणांची संख्या किती असा प्रश्न विचारला होता. सभापती महोदय, महसूल न्यायाधीकरणे शासनाने डिसेंबर, 2001 मध्ये बंद केली त्यावेळी प्रलंबित असलेल्या प्रकरणांची एकूण संख्या 2770 होती. त्यात मुंबईची प्रकरणे 598, पुण्याची 524, कोल्हापूरची 1000, नागपूरची 324 व औरंगाबादची 324 प्रकरणे होती. अजूनही न्यायाधीकरणे बंदच आहेत. सभागृहाने हे विधेयक पारित करेपर्यंत आपण या विधेयकाचे कायद्यात रुपांतर करु शकत नाही. 2007 मध्ये म्हणजे जानेवारी, 2007 अखेर 6499 प्रकरणे प्रलंबित होती. त्यात कोकण 1578, नाशिक 659, पुणे 2538, औरंगाबाद 869, अमरावती 612 व नागपूर 203 प्रकरणे समाविष्ट आहेत. सर्व न्यायाधीकरणांमध्ये एक अध्यक्ष व तीन सदस्य नेमले जाणार आहेत. अध्यक्षपदासाठी उच्च न्यायालयाचे विद्यमान किंवा निवृत्त न्यायमूर्ती किंवा उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती होण्यास पात्र असलेले वकील अशा प्रकारची पात्रता ठरवून दिलेली आहे.

सभापती महोदय, प्रलंबित प्रकरणांची संख्या खूप होती. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी मुद्दा मांडला की, वेगवेगळया जिल्हयांमध्ये जाऊन प्रलंबित प्रकरणांचा निपटारा केला जावा, फास्ट ट्रॅक कोर्टसारखी व्यवस्था करावी. महाराष्ट्र महसूल न्यायाधीकरणाचा कायदा होईल, त्यामध्ये आपण अशी तरतूद केलेली आहे. आताच्या निर्णयानुसार मुंबईमध्ये मुख्यपीठ आणि दोन खंडपीठ असणार आहेत. मुंबईला कोकण, पुणे व नाशिक जिल्हे जोडले आहेत. औरंगाबादला औरंगाबाद विभागातील सर्व जिल्हे व धुळे, नंदूरबार, जळगाव व अहमदनगर जिल्हे जोडले आहेत. नागपूरला नागपूर व अमरावती विभागातील सर्व जिल्हे जोडले आहेत. असे असले तरी त्याठिकाणचे सदस्य किंवा अध्यक्ष त्या त्या जिल्हयांमध्ये प्रकरणांच्या संदर्भात जाऊ शकतील. मागील काळात ही तरतूद नव्हती. आता ही तरतूद करण्यात आली आहे. त्या त्या जिल्हयातील लोकांनी मागणी केली किंवा एखाद्या जिल्हयामध्ये जास्त प्रकरणे आढळली असतील तर त्यांचा निपटारा जलद गतीने करण्यासाठी खंडपीठ त्याठिकाणी जिल्हयामध्ये जाऊन प्रकरणांचा निपटारा करु शकतील अशी या विधेयकामध्ये तरतूद केली आहे.

सभापती महोदय, 1.7.2002 पासून महसूल न्यायाधीकरणे बंद केली. मी सुरुवातीलाच सांगितल्याप्रमाणे त्यावेळी कमी दावे प्रलंबित होते. काटकसरीच्या उपाययोजनेंतर्गत वार्षिक 2 कोटी रुपये वाचविण्याच्या उद्देशाने न्यायाधीकरणे बंद केली होती. परंतु त्याचे अधिकार त्या त्या

..2..

डॉ.राजेंद्र शिंगणे...........

विभागीय आयुक्तांना दिलेले होते. आयुक्तांच्या माध्यमातून या प्रकरणांचा निपटारा झाला पाहिजे. परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे अगोदरच आयुक्तांकडे खूप प्रकरणे असतात, खूप काम असते, या कामांची त्यामध्ये वाढ झाली होती. उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका दाखल झाली त्या याचिकेमध्ये उच्च न्यायालयाने निर्णय देत असताना आयुक्तांचे अधिकार कायम ठेवले, मात्र आयुक्त अंतिम निर्णय देऊ शकत नाही असा निर्णय दिला होता. आयुक्त अंतरिम आदेश देऊ शकतील, मात्र अंतिम आदेश देऊ शकणार नाहीत असा निर्णय होता. या सगळ्या गोष्टींचा विचार करुन सर्वोच्च न्यायालयामध्ये महाराष्ट्र शासनाने स्थगिती मागितली होती आणि सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली होती. परंतु दाव्यांची वाढत जाणारी संख्या विचारात घेऊन स्थगिती मागे घेतली आणि पुन्हा न्यायाधीकरणे स्थापन झाली पाहिजेत, येणाऱ्या दाव्यांचा लवकर निपटारा झाला पाहिजे यासाठी पुन्हा याठिकाणी विधेयक मान्यतेसाठी आणले आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खंड 2 ते 10 ( दोन्ही सम्मिलीत )विधेयकाचे भाग झाले.

खंड 1 , संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ. राजेंद्र शिंगणे : महोदय, मी आपल्या अनुमतीने 2007 चे वि.स.वि. क्रमांक 37 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 37 संमत झाले आहे.

----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: फोजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा)विधेयक.

**L. A. BILL NO. XL IF 2007.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE CODE OF CRIMINAL PROCEDURE, 1973, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)**

श्री. हसन मुश्रीफ ( विधी व न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 40, फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 महाराष्ट्र राज्यास लागू करतांना त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने संमत केल्याप्रमाणे, सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 40, फैाजदारी प्रक्रिया संहिता, 1973 महाराष्ट्र राज्यास लागू करतांना त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, फौजदारी प्रक्रिया संहिता सीआरपीसी मधील कलम 29 चे पोटकलम 2 मध्ये प्रथम वर्ग दंडाधिका-यास जास्तीत जास्त 10 हजार रुपये दंड करण्याची तरतूद होती ती आता जास्तीत जास्त 50 रुपये करणे आवश्यक झाले आहे. सीआरपीसी मधील कलम 29 चे पोट कलम 3 मध्ये द्वितीय दंडाधिका-यास जास्तीत जास्त पाच हजार रुपये दंड केला जात असे परंतु आता हा दंड जास्तीत जास्त 10 हजार रुपये करण्याचे प्रस्तूत केलेले आहे. आयपीसी मध्ये चोरी मारामारी, अपघात इत्यादी बाबीसाठी जो दंड आकारण्यात येत होता तो कमी होता त्यामुळे गुन्हेगारांना त्याचा धाक वाटत नव्हता त्यामुळे दंडाची रक्कम जास्तीत वाढविण्याच्या संदर्भात हे विधेयक आणलेले आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

श्री. मधुकर सरपोतदार( विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, जो कायदा आस्तित्वात आहे त्यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी थोडक्यात माहिती दिलेली आहे. अगोदर दंडाची रक्कम कमी होती

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार......

त्यामुळे गुन्हेगांराना धाक वाटत नव्हता त्यामुळे दंडाची रक्कम वाढविण्यात आलेली आहे. सध्या गुन्हयांचे प्रमाण वाढत चालले आहे ही वस्तुस्थिती आहे. प्रथम वर्ग दंडाधिका-यास जास्तीत जास्त दहा हजार रुपये व द्वितीय वर्ग दंडाधिका-यास जास्त जास्त पाच हजार रुपये इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा करण्याचा अधिकार होता. खरे म्हणजे शासनाचे वकील, आरोपीचे वकील आणि प्रत्यक्षात त्या ठिकाणची परिस्थिती यासंदर्भात समतोल आणि निश्चित न्याय मिळावयास पाहिजे तो मिळत नाही ही शोकांतिका आहे. आपण जी शिक्षा देतो त्याचा काहीच उपयोग होत नाही त्यामुळे उद्देश व कारणे यामध्ये म्हटले आहे की, "महाराष्ट्र शासनास, उक्त संहितेच्या कलम 29 मध्ये योग्य ती सुधारणा करुन, प्रथम वर्ग दंडाधिका-याद्वारे लादण्यात यावयाच्या द्रव्यदंडाच्या शिक्षेच्या मर्यादेत दहा हजार रुपयांपासून पन्नास हजार रुपये इतकी आणि द्वितीय वर्ग दंडाधिका-यांद्वारे लादण्यात येणा-या द्रव्यदंडाच्या शिक्षेच्या मर्यादेत पाच हजारापासून दहा हजार रुपये इतकी, वाढ करणे इष्ट व आवश्यक वाटते."

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...........

आपण हे सर्व द्रव्य दंडाबद्दल लिहिले आहे शिक्षेबद्दल काही उल्लेख नाही. शिक्षेची तरतूद अपुरी आहे. आपण कडक शिक्षेची तरतूद करीत नाही तोपर्यंत गुन्ह्याचे प्रमाण वाढत जाणार आहेत.

सभापती महोदय, फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 ( 1974 चा 2 ) याच्या कलम 29 ची पोट-कलमे (2) व (3) च्या तरतुदीमध्ये नुकत्याच केलेल्या फौजदारी प्रक्रिया संहिा (सुधारणा) अधिनियम, 2005 ( 2005I चा 25 ) च्या सुधारणेनुसार, अनुक्रमे प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्यास जास्तीत जास्त दहा हजार रुपये व द्वितीय वर्ग दंडाधिकाऱ्यास जास्तीत जास्त पाच हजार रुपये इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा देण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे.

सभापती महोदय, विधी खात्याने जो तर्जुमा बनविला आहे तो कच्च्या स्वरुपाचा आहे. सन 2005 मध्ये हा कायदा मंजूर झाला त्यावेळी एक मंजुरी घेतली आणि आता द्रव्यदंडाची शिक्षा आणत आहात. खरे म्हणजे आपल्या कायद्याची जी विंग आहे त्यांनी यासंदर्भात चांगला अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. न्यायालयात जी प्रकरणे हाताळली जातात त्याठिकाणी कशाप्रकारच्या शिक्षा दिल्या जातात, त्याचा काय परिणाम होतो याचा अभ्यास करावयास पाहिजे होता. प्रत्यक्षात किती लोक शिक्षा भोगतात, किती लोकांना मंत्रालयातून निरनिराळ्या प्रकारच्या सवलती देऊन त्या शिक्षेपासून दूर केले जाते या सर्व गोष्टींवर लक्ष ठेवण्याची आवश्यकता आहे. शिक्षेच्या तरतुदी कडक नसतील तर गुन्ह्याचे प्रमाण वाढतच जाणार हे स्वाभाविक आहे. दहा हजार रुपयांचा दंड पन्नास हजार रुपयांपर्यंत केले हे ठीक आहे. परंतु पाच हजार रुपयांचा दंड फक्त दहा हजार रुपये करीत आहात त्यामध्ये वाढ करण्याची आवश्यता आहे. ती मर्यादा वीस हजार रुपयांपर्यत वाढविली पाहिजे. म्हणून माझी आपणास सूचना आहे की, 5 (ख) पोटकलम (3) मध्ये जास्तीत जास्त पाच हजार रुपये या मजकुराऐवजी जास्तीत जास्त दहा हजार रुपये हा मजकूर दाखवावा. आपण पोटकलम (5) मध्ये पाचपट वाढ केलेली आहे. परंतु पोटकलम (3) मध्ये दुप्पट वाढ करीत आहात. असा फरक कशाला करीत आहात ? जर आपण पोटकलम (5) मध्ये पाचपट वाढ करीत असाल तर पोटकलम (3) मध्ये सुध्दा पाचपट वाढ केली पाहिजे. तरच त्याचा इम्पॅक्ट राहू शकेल. तेव्हा यादृष्टीकोनातून मंत्रिमहोदयांनी पहावे आणि तशाप्रकारची सुधारणा करुन हे विधेयक मंजूर करुन घ्यावे. असे केल्यास आम्ही या विधेयकाचे स्वागत करतो.

-------------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मला जो मुद्दा मांडावयाचा होता तो सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी मांडलेला आहे. तेव्हा मी तो मांडत नाही. सभापती महोदय, मला याठिकाणी एवढेच सांगावयाचे आहे की, इतका हलका फुलका उद्देश लिहिता कामा नये. उद्देशामध्ये म्हटले आहे की, " ....... गेल्या काही वर्षामध्ये पैशांच्या मूल्यात लक्षणीय घट झाली असून चलनवाढीच्या दरातदेखील भरीव वाढ झाली आहे असे शासनाच्या निदर्शनास आले आहे." पैशाच्या दरात वाढ झाली म्हणून आपणास पैसे वाढवावयाचे आहेत की गुन्हेगारांना भीती वाटावी यासाठी वाढ करीत आहात ? आज गुन्हेगारांना कायद्याची कोणत्याही प्रकारची भीती वाटत नाही.

सभापती महोदय, या सर्व फौजदारी प्रक्रिया संहिता आहेत त्या सर्वांचे पुनर्विलोकन करण्याची आवश्यकता आहे. मी आपणास एक घटना सांगतो. एका मुलीची टिंगल करुन तिचा जीव घेण्याचा प्रयत्न केला. असा प्रकार करणाऱ्यास एका तासात जामीन मिळाला आणि तो बाहेर आला. जी मुलगी जखमी झाली ती एक महिना हॉस्पीटलमध्ये आहे. तेव्हा असे लोक कायद्यातील पळवाटांचा फायदा घेऊन सुटतात. ज्यांनी गुन्हा केला तो एका तासात घरी आणि जी मुलगी जखमी झाली ती एक महिना हॉस्पीटलमध्ये. मला वाटते न्यायाची ही विटंबना आहे. गुन्हेगारांवर दहशत बसवावयाची असेल तर आपणास कडक शिक्षा सुचविली पाहिजे. ब्रिटीश काळापासून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कायदे आहेत. कायद्यामध्ये बदल करावा अशा प्रकारची शिफारस केंद्र सरकारला करतो अशा कायद्याबाबत सर्वंकष विचार करण्याची गरज आहे. सन्माननीय मंत्रिमहोदयांनी इम्प्रिझनमेंटमध्ये सुध्दा काही सांगितलेले नाही. रिगरस पनिशमेंट आहे की, सिंम्पल पनिशमेंट आहे याची माहिती दिलेली नाही. तेव्हा माझी सूचना आहे की, पाच हजार रुपयांऐवजी पंचवीस हजार रुपये इतकी वाढ करावी. ही सुधारणा आता स्वीकारता येत असेल, नियमात बसत असेल तर त्याचा आताच स्वीकार करावा अशी विनंती आहे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ ( विधी व न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, 1973 मध्ये सीआरपीसी ॲक्ट अस्तित्वात आला. त्या ॲक्टच्या 29 (2) नुसार प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांना तीन वर्षाची शिक्षा आणि पाच हजार रुपयांपर्यंत दंड करण्याचे अधिकार होते. केंद्र शासनाने कायद्यात बदल करुन ती रक्कम दहा हजार रुपयांपर्यंत वाढविली आहे. पुन्हा 2005 मध्ये केंद्र सरकारने या कायद्यात बदल केला,

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ...

त्यांनी 50 हजार रुपये केलेली आहे म्हणून आपण ही दुरुस्ती आणलेली आहे. तसेच याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.मुधकर सरपोतदार यांनी जी पाचपट रक्कम वाढविण्याची सूचना मांडली त्याबाबत आपण केंद्र शासनाकडे शिफारस करुया व त्यांची सूचना मान्य करु. त्यामुळे सभागृहाने हे विधेयक संमत करावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विशेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 40 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 40 संमत झाले आहे.

-------

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>अशासकीय कामकाज--विधेयके.</u>**

**<u>सन 2007 चे वि.प.वि.क्रमांक 4 - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयकाबाबत.</u>**

**उपसभापती** : सदरचे विधेयक दिनांक 2 ऑगस्ट,2007 रोजी घ्यावे अशी विनंती पत्राद्वारे सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी केलेली आहे. परंतु पुर:स्थापनार्थची विधेयके ज्या दिवशी अशासकीय कामकाज-(विधेयके) असते त्याचदिवशी घेतली जातात. त्यामुळे हे विधेयक इतर दिवशी घेता येणार नाही.

-----

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक

**L. C. BILL NO. VI OF 2007.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.)**

( सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते अनुपस्थित )

-----

..4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: घरेलू कामगार (कल्याण व सेवाशर्ती) विधेयक

**L. C. BILL NO. VI OF 2006.**

**(A BILL TO PROVIDE FOR GRANTING CERTAIN FACILITIES, AMENITIES AND TO COVER ALL DISPUTES RELATING TO DOMESTIC WORKERS AND TO RECOGNISE THEM AS BEING WITHIN THE FOLD OF WORKING CLASS AND TO IMPROVE THEIR WORKING CONDITIONS AND TO GIVE THEM ACCESS TO COURTS IN THE STATE OF MAHARASHTRA.)**

( विधेयक मांडण्यात आले नाही.)

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक

**L. C. BILL NO. XII OF 2006.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPALCORPORATION ACT, 1888.)**

( सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते अनुपस्थित )

-----

...6....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मोटार वाहन (कल्याण व सेवाशर्ती) विधेयक

**L. C. BILL NO.II OF 2006.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MOTOR VEHICLES ACT, 1988, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)**

( विधेयक मांडण्यात आले नाही. )

----

**उपसभापती** : आता अशासकीय ठराव चर्चेस घेण्यात येतील.

नंतर श्री.रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाच्या कामकाजासंदर्भात**

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, 1976 हा कायदा निरसित करण्याबाबत माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मांडलेल्या प्रस्तावावरील अर्धवट राहिलेली चर्चा उद्या सकाळी विशेष बैठकीत घेण्यात येणार आहे, असे आपण आताच सांगितले. ही चर्चा विशेष बैठकीत न घेता सभागृहाच्या नियमित कामकाजात घ्यावी, अशी माझी सूचना आहे.

**उपसभापती** : माननीय सभापतींकडून सूचना आली आहे, ती मी सांगितली.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आम्ही सकाळी 9.45 वाजता आलो आहोत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, अधिवेशन लवकर संपवायचे आणि पुन्हा विशेष बैठका ठेवायच्या, हे बरोबर नाही. या अधिवेशनात केवळ 11 कामकाजाचे दिवस झाले आहेत.

**उपसभापती** : केवळ चर्चेची वेळ ठरविण्यात आली आहे. चर्चा करु नये, असे म्हटलेले नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, नियमित कामकाजात ही चर्चा समाविष्ट करावी, एवढेच आमचे म्हणणे आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार यांना मी सांगू इच्छितो की, आपण उशिरा यावे, तोपर्यन्त इतर सन्माननीय सदस्य आपले म्हणणे मांडतील, आपण आल्यानंतर आपल्याला संधी देण्यात येईल, तोपर्यन्त चर्चा पुढे जाऊ देणार नाही.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार यांचे असे म्हणणे आहे की, अधिवेशनाचा कालावधी कमी करण्यात येतो. दिवसाचे कामकाज चार-साडेचार तासापेक्षा जास्त चालविण्यात येऊ नये, असा नियम आहे. त्याऐवजी रोज 9 ते 10 तास कामकाज चालते.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य, श्री.गुरुनाथ कुलकर्णी हे वकील असले तरी या ठिकाणी मी न्यायमुर्तीच्या भूमिकेत आहे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.नितीन गडकरी यांनी मला 'रामशास्त्री प्रभुणे' किताब दिलेला आहे.

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**..........

ठीक आहे. सन्माननीय सदस्या, प्रा.फौजिया खान यांना आपला अशासकीय ठराव मांडावयाचा आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापति महोदय, मेरी यह विनती है कि इस ठराव पर कल चर्चा की जाए.

**उपसभापति** : कल इस ठराव पर चर्चा नहीं हो सकती है क्योंकि अशासकीय कामकाज के लिए दिन निश्चित किया जाता है. कल का दिन अशासकीय कामकाज के लिए निश्चित नहीं है. आज का दिन अशासकीय कामकाज के लिए निश्चित किया गया है. इसलिए आज आप इस ठराव पर बोल सकती है.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, ठराव घेणार नसाल तर अर्धा-तासाच्या सूचनेवरील चर्चा घ्यावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, अर्धा-तासाच्या सूचनांवरील चर्चा रोज पुढे ढकलली जात आहे. एकिकडे अधिवेशनाचे दिवस कमी करणार, विधेयकावर बोलू देणार नाही, हे बरोबर नाही.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या, प्रा.फौजिया खान या आपला अशासकीय ठराव मांडत नाहीत, असे दिसते. हा ठराव मांडला नाही तर तो व्यपगत होईल.

प्रा.फौजिया खान : ठीक है. मैं अपना ठराव चर्चा के लिए रखना चाहती हूं.

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**अशासकीय कामकाज-ठराव.**

**पृ.शी.**: राज्यात महिलांवर होणारे अत्याचार.
**मु.शी.**: राज्यात महिलांवर होणारे अत्याचार या विषयावरील श्रीमती फौजीया खान यांचा ठराव.

श्रीमती फौजीया खान (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडते :

"राज्यात महिला व तरुण मुलींवर होणारे अत्याचार व त्यांचे होणारे मृत्यू विचारात घेता महिलांवरील अत्याचाराबाबतचे खटले विनाविलंब निकालात काढण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र न्यायालये स्थापन करण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

सभापति महोदय, भारतीय संस्कृति पुरुष प्रधान संस्कृति है. भारतीय संस्कृति में महिलाओं को भले ही आदर का स्थान प्राप्त हो. मगर हकीकत यह भी है कि हमारे समाज में महिलाएं हर स्तर पर शोषित है और दिन-ब-दिन महिलाओं पर अत्याचार बढ़ रहे हैं. ऐसी आम धारणा भी है.शासकीय एवं अशासकीय संस्थाओं ने इस संबंध में सर्वे और अभ्यास किया है और नतीजे वही दिखते हैं. हमने बात शुरु की थी वूमन्स लिबरेशन की, फिर चर्चा शुरु हुई वूमन्स डेवेलपमेंट की और आज हम कदम उठा रहे हैं वूमन्स इम्पावरमेंट की तरफ. फिर भी हर जगह, हर गली में, हर समाज में, हर गांव में और हर शहर में महिलाओं की खामोश आहें और सिसकियाँ क्या हमारे ज़मीर को झिंझोड़ती नहीं है ?

अश्क आँखों में कम नहीं आता
लहू आता है जब नहीं आता

सभापति महोदय, घर में, पड़ोस में, स्कूल में, काम की जगह, कॉलेज में, ट्रांसपोर्ट की जगह, बाजार में, पब्लिक प्लेस पर, पब्लिक ट्रांसपोर्ट में हर जगह महिलाओं पर अत्याचार हो रहे हैं. महिलाओं पर कहाँ अत्याचार नहीं हो रहे हैं, और किस के साथ नहीं हो रहे हैं ? हर जगह हो रहे हैं. किसी भी उम्र की महिलाओं पर अत्याचार हो रहे हैं. उम्र की कोई परवाह नहीं. कुछ दिनों की लड़कियों से लेकर ६०-७० उम्र की महिलाओं पर भी अत्याचार होने की बात सुनने में आती है. अत्याचार किस प्रकार से हो रहे हैं, मानसिक स्तर के साथ साथ शारीरिक स्तर पर

..२



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान.....

महिलाओं पर अत्याचार हो रहे हैं. where,when और how का कोई बंधन नहीं है. महिलाओं पर होने वाले अत्याचार से संबंधित कई कानून है लेकिन फिर भी महिलाओं को इंसाफ नहीं मिल रहा है. घरेलू हिंसा से संबंधित कानून है, पब्लिक प्लेस पर महिलाओं पर होने वाले अत्याचार से संबंधित कानून है. फिर पर महिलाओं पर होने वाले अत्याचार की घटनाएं कम होने की बजाए बढ़ रही है. कानून होने के बाद भी महिलाओं को इंसाफ क्यों नहीं मिलता ?

ऐसा न हो ये दर्द बने दर्द-ए-लादवा
ऐसा न हो कि तुम भी मदवा न कर सको

सभापति महोंदय, "प्रिवेन्शन ऑफ एट्रोसीटिज आन वूमन " के आंकड़ों के अनुसार राज्य में हर ६ घंटे में एक महिला पर अत्याचार होता है. मुंबई में पुलिस स्टेशन में १९८ बलात्कार के मामले दर्ज हुए हैं. कई पुलिस स्टेशन में शिकायत लेने से इंकार किया जाता है. जो मामले पुलिस स्टेशन में दर्ज ही नहीं होते हैं ऐसे मामले अनगिनत है. कुछ ही मामले पुलिस स्टेशन में दर्ज होते हैं. इसका कारण यह है कि, पुलिस स्टेशन में जा कर मामले दर्ज कराने की महिलाओं की हिम्मत नहीं होती है.शर्म और समाज के डर से भी महिलाएं पुलिस स्टेशन में शिकायत दर्ज नहीं कराती है. महिलाओं पर अत्याचार का प्रमाण शहर में ६७.६ प्रतिशत और ग्रामीण क्षेत्र में ३६.५६ प्रतिशत है. महिलाओं पर सबसे ज्यादा अत्याचार परिवार के सदस्यों द्वारा ही होते हैं. राज्य में पिछले साल लैंगिक अत्याचार के ६३७२ मामले दर्ज हुए है और विनय भंग के १६४१ मामले दर्ज हुए हैं. पिछले साल बलात्कार की घटनाओं में १२.२० प्रतिशत वृध्दि हुई है. चूंकि बलात्कार के मामले में अपराधिओं को जमानत मिल जाती है इसलिए अपराधी अदालत के फैसले तक खुले आम घूमते रहते हैं. ऐसे अपराधी समाज के लिए खतरनाक साबित होते हैं. दूसरी बात यह है कि बलात्कार के केस कई सालों तक अदालत में चलते हैं. इस दौरान अपराधी कई गैर कानूनी घटनाओं को अंजाम देते हैं. अगर ऐसे अपराधियों को जमानत न मिलें और अदालत द्वारा जल्द फैसला हो तो अपराधियों की ओर से होने वाली गैरकूननी घटनाएं नहीं होगी.

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.रामनाथ मोते.)**

इसके बाद श्री शर्मा..

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्रीमती फौजिया खान जारी

इसलिए बलात्कार के केस में डिसीजन जल्दी से जल्दी होना चाहिए. हमारे कोर्ट का हाल यह है कि वहां पर पेंडिंग केसस की संख्या को देखते हुए जल्दी डिसीजन लेना क्यों अपेक्षित है, यह समझ में आएगा. राज्य में 168 चीफ ज्युडिशियल कोर्ट हैं, 826 फौजदारी कोर्ट हैं, जहां पर 25 लाख 42 हजार 961 केस आज पेंडिंग हैं. सिविल कोर्ट में 5 लाख 49 हजार 598 केस पेंडिंग हैं. इस तरह से राज्य में कुल 30 लाख 92 हजार से भी ज्यादा केस पेंडिंग हैं. राज्य में 89 तालुके ऐसे भी हैं, जहां पर अभी तक कोर्ट का निर्माण नहीं हुआ है. यह भी कहा जाता है कि "जस्टिस डिलेड, जस्टिस डिनाइड" और अगर इतने केस पेंडिंग होंगे तो वर्षों तक निकाल नहीं लगेगा. महिलाओं के प्रति जो अत्याचार होते हैं, वे केसस अगर हम लेते हैं और उनके साथ बाकी केसस की भी गिनती करते हैं तो यह ठीक नहीं है. महिलाओं के प्रति होने वाले अत्याचार समाज के लिए बहुत ही हानिकारक हैं और इसीलिए उनके लिए अलग से व्यवस्था होना आवश्यक है, ऐसा मुझे लगता है. इस ठराव के माध्यम से हम यह कहना चाहते हैं कि महिलाओं के लिए हर जिले में एक स्वतंत्र न्यायालय होना चाहिए. केवल स्वतंत्र न्यायालय की स्थापना करने से ही महिलाओं की सभी समस्याएं हल हो जाएंगी, ऐसा मैं नहीं समझती हूं. महिलाओं के लिए जिला स्तर पर कम से कम एक पुलिस स्टेशन भी होना आवश्यक है. पुलिस स्टेशन में जहां पर पुरुष होते हैं, वहां पर महिलाओं के केसस कितनी अच्छी तरह से रजिस्टर होते होंगे, एफ.आई.आर. को कितना न्याय मिलता होगा, यह बात हम सोच सकते हैं. इसीलिए समाज की व्यवस्था को स्वस्थ रखने के लिए प्रबोधन के साथ साथ डिटरेंट की बहुत हद तक जरुरत होती है. यह जरुरत स्वतंत्र न्यायालय पूरी कर सकता है, ऐसा मैं मानती हूं. मैं यह कहना चाहती हूं कि कहीं ऐसा न हो कि पीड़ित महिलाओं की शासन के प्रति इस प्रकार की भावना हो जाए :

"दरिया को अपनी मौज के तुगयानियों से काम,
कश्ती किसी की पार हो या दरमियाँ रहे."

महिलाएं हमारे समाज की केन्द्र बिन्दु हैं और उनमें अगर इस तरह की भावना हो जाती है तो समाज के लिए घातक है. जिस देश में महिलाएं असुरक्षित हैं, जहां पर महिलाओं का विकास

. . . 4S-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्रीमती फौजिया खान जारी

नहीं होता है, वह देश कभी विकसित नहीं हो सकता है, यह तत्व की बात है. इसलिए इस ठराव के माध्यम से मैं यह माँग करती हूॅं कि महिलाओं के लिए हर जिले में स्वतंत्र न्यायालय होना चाहिए, इतना कहते हुए मैं अपनी बात खत्म करती हूँ.

ठराव प्रस्तुत झाला.

. . . नंतर सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी प्रत्येक जिल्हयांमध्ये महिला अत्याचार विषयक न्यायालय स्वतंत्र असावे अशा आशयाचा ठराव या ठिकाणी मांडला आहे त्याच्या समर्थनार्थ मी बोलत आहे. सभापती महोदय, दोन प्रकारचे दावे आता सर्व सत्र न्यायालयांमध्ये चालतात. त्यामध्ये कौटुंबिक स्वरुपाचे दावे म्हणजे मुलांची कस्टडी, घटस्फोट, नांदविण्याच्या संदर्भातील रिस्टोरेशन ऑफ कंज्युगल राईटस आणि पोटगी असे चार प्रकारचे दावे चालविण्यासाठी महाराष्ट्रामध्ये कौटुंबिक न्यायालये कायदा अंमलात आला आहे. त्यानुसार मुंबई, पुणे औरंगाबाद आणि नागपूर या चार ठिकाणी न्यायालये आहेत. आणि जे गुन्हेगारी स्वरुपाचे दावे आहेत त्यांच्याकरिता सर्व सत्र न्यायालयांमध्ये माननीय उच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार एक द्रुतगती न्यायालय नेमण्याचा निर्णय झाला आहे. त्यानुसार चारही जिल्हयांमध्ये अशी स्वतंत्र न्यायालये किंवा बेंच देण्यात आलेला आहे. मुद्दा असा आहे की, पोटगी, घटस्फोट आणि नांदविणे यासंबंधीचे हजारो दावे प्रत्येक तालुक्यांपासून जिल्हयापर्यंत प्रलंबित आहेत. माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांच्या ठरावाचे समर्थन करीत असतांना विधी व न्याय विभागाचे लक्ष मला या गोष्टीकडे वेधावयाचे आहे. माननीय मंत्री श्री. हसन मुश्रीफ यांनी गेल्या जुलै् महिन्यातील अधिवेशनामध्ये माझ्या अशासकीय ठरावाच्या वेळी आश्वासन दिले होते की, महाराष्ट्राच्या 22 जिल्हयांमध्ये कौटुंबिक न्यायालये तयार करण्यात येतील. या कौटुंबिक न्यायालयांच्या इमारती बांधण्याकरिता केंद्र सरकारकडून पैसे आले आहेत. आणि त्या न्यायालयांमध्ये कर्मचारी नेमण्याकरिता आम्ही 2007 च्या अंदाजपत्रकामध्ये तरतूद करु असे सांगितले होते. मला सांगावयास अतिशय खेद होतो की, माननीय श्री. हसन मुश्रीफ यांच्याबद्दल माझे चांगले मत होते. ऊस तोड कामगारांच्या प्रश्नाच्या वेळी सुध्दा त्यांनी राणा भीमदेवी थाटात आम्हाला आश्वासन दिले होते की, ताई हा विषय तुम्हाला उपस्थित करावा लागणार नाही. याचा मराठीमध्ये असा अर्थ होतो की, आम्ही काहीच करणार नाही. हे मला त्यांच्या वर्तनावरुन नंतर कळले. तोच प्रकार त्यांनी कौटुंबिक न्यायालयांची घोषणा करतांना केला. माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान आपणास मला या निमित्ताने सावध करावेसे वाटते की, आपण मंत्रिमहोदयांच्या आश्वासनांवर अजिबात विश्वास ठेवू नये. या सभागृहामध्ये दिलेल्या दोन्ही आश्वासनाच्या बाबतीत पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी विधी व न्याय विभागाचे मंत्रिमहोदय आम्हाला काय सांगणार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

डॉ. नीलम गोऱ्हे...

आहेत याची आम्ही आतुरतेने वाट पहात होतो. परंतु त्या आश्वासनांना शिताफीने बगल देण्याकरिता ते या सभागृहात आले नाहीत. व्यक्ती म्हणून मला त्यांच्याबद्दल आदर असला तरी मंत्री म्हणून त्यांनी दिलेल्या आश्वासनांना ते हरताळ फासत आहेत. त्यामुळे उच्च न्यायालयाची कारवाई करावयाची आहे ती उच्च न्यायालय करीत आहे. नुकतेच सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालामध्ये म्हटले आहे की, अत्याचारीत मुलींनी दिलेल्या जबानीमध्ये मेडिकल रिपोर्ट कोलॅबरेट झ ााला नाही तरी देखील ज्या काही गाईडलाईन्स द्यावयाच्या आहेत त्या गाईडलाईन्स माननीय न्यायाधीश श्रीमती रोशन दळवी आणि श्रीमती रंजना देसाई यांनी सर्व न्यायालयांना पाठविल्या आहेत. त्याचप्रमाणे उच्च न्यायालयामध्ये श्री. दलवीर भंडारी होते. त्यांनी देखील सर्व न्यायाधिशांनी महिला विषयक दाव्यांमध्ये संवेदनशील असले पाहिजे याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे कोठेवाडीची केस असेल, परभणीची विद्या देशमुखची केस असेल त्याचे कामकाज द्रुतगती न्यायालयामध्ये चालू आहे. त्या प्रकरणाचा शासनाच्या विधी व न्याय विभागाशी काहीही संबंध नाही. उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय एवढे प्रागतिक निर्णय घेत असतांना सुध्दा किती प्रकरणांमध्ये शिक्षा होते? किती प्रकरणे किती वर्षापासून प्रलंबित आहेत? असा प्रश्न निर्माण होतो. प्रत्येक तालुक्यात पोटगीच्या केसेस प्रलंबित आहेत. तेथील पाच वर्षापासून प्रलंबित असलेल्या केसेसचा आढावा घेऊन एखादे विशेष न्यायालय सहा महिन्यांकरिता निर्माण करण्याची पावले विधी व न्याय विभागाने गेल्या आठ वर्षामध्ये टाकलेली दिसत नाहीत. त्यामुळे विधी सेवा प्राधिकरण असले किंवा त्यामधील अनेक न्यायाधिशांचा हेतू चांगला असला तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत कोर्टामध्ये फेऱ्या मारुन महिला कंटाळून गेल्या आहेत. शेवटी कायदा हातामध्ये घेण्याच्या मनस्थितीत लोक आले आहेत.

सभापती महोदय, मध्यंतरी गुन्हेगारी क्षेत्रामध्ये ज्याचे नाव घेतले जाते अशा एका व्यक्तीने महाराष्ट्रातील महिलांना आवाहन केले होते की, तुमचा भाऊ म्हणून मी तुम्हाला न्याय मिळवून देईन. त्यावेळी 1 लाख परित्यक्त्यांनी त्या माणसाला राखी पाठविल्या होत्या. याचा अर्थ विधी व न्याय विभागावर व न्याय व्यवस्थेवर लोकांचा विश्वास राहिलेला नाही. अशापध्दतीने 1 लाख महिला एका गुंडांकडे राख्या पाठवितात याचे हे उदाहरण आहे. याचा अर्थ आपण सुध्दा न्याय देवतेला पुरेसे सहकार्य करीत नाही. शिवशाहीचे सरकार असतांना फौजदारी स्वरुपाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

डॉ. नीलम गोऱ्हे...

खटल्यांकरिता स्वतंत्र न्यायालये 12 जिल्हयांमध्ये निर्माण करण्यात आली. परंतु पुरेशा सोयी-सुविधा नसल्यामुळे ती सर्व न्यायालये बंद करण्यात आली. आता फास्ट ट्रॅक कोर्टाचा निर्णय झ ााल्यानंतर उच्च न्यायालयाने स्वत: पुढाकार घेऊन याकरिता काही तरतूद केली आहे. म्हणून मला असे वाटावयास लागले आहे की, सरकारी वकिलांची यंत्रणा असो किंवा कौटुंबिक न्यायालयांची यंत्रणा असो, किंवा वेगवेगळया प्रकारच्या न्याययंत्रणा असो या सर्व ठिकाणी न्याय देण्यामध्ये मोठया प्रमाणावर विलंब होत आहे. याबद्दल ना खंत ना खेद अशाप्रकारची परिस्थिती आहे. आणि म्हणून अशासकीय ठरावाच्या निमित्ताने 22 कौटुंबिक न्यायालये निर्माण करण्यासंबंधी सरकारने सांगितले व त्याची प्रसिध्दी आकाशवाणीवर करण्यात आली. त्या 22 जिल्हयामधील माणसे अजून कौटुंबिक न्यायालयांची वाट पहात आहेत. कोल्हापूर जिल्हयामध्ये मंत्रिमहोदयांचा मतदारसंघ आहे, तेथील लोक आम्हाला विचारतात, पत्रकार आम्हाला विचारतात. त्यांना मात्र कुणीच प्रश्न विचारीत नाही, आणि त्याचे उत्तर देण्यास ते बांधील नाहीत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (पुढे सुरू....

त्यांना कोणीच प्रश्न विचारत नाही आणि ते उत्तर द्यायला बांधील नाहीत, त्यामुळे आमची त्यांच्याकडून काही अपेक्षाच नाही. श्रीमती फौजिया खान यांचा सदहेतू आहे. त्यांच्या ठरावाचे मी समर्थन करते, परंतु 50 टक्के ज्या महिला आहेत, त्यांना आणि त्यांच्या नातेवाईकांना न्याय देता आला नाही तर त्यांची कुचेष्टा आणि अवहेलना तरी करू नका, एवढेच मी आवाहन करून मी माझे दोन शब्द संपविते. जय भीम,जय महाराष्ट्र.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/ SBT/ MAP/

श्री.मधुकर चव्हाण ( विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, एका महिलनेही सांगावे की, मला न्याय मिळाला. मी पहिल्यांदा या सभागृहाचा सदस्य झालो. हा चांगला ठराव आहे. मी राजकीय अभिनिवेशाने बोलत नाही. सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य आणि विरोधी पक्षाचे सदस्य या कायदेमंडळामध्ये येतात. समाजातील गुन्हे, गुन्ह्यांची प्रवृत्ती पाहून नवीन कायदे करावेत, शिक्षेची तरतूद करावी, यासाठी कायदे मंडळ आहे. या संदर्भाने येथे भाषणे होतील, माननीय मंत्री महोदय उभे राहून सांगतील की, "सन्माननीय सदस्यांच्या भावनांशी मी सहमत आहे. परंतु मी विनंती करतो की, हा ठराव त्यांनी मागे घ्यावा". मग सन्माननीय सदस्या त्यांचा ठराव मागे घेतील. हे सगळे अरण्यरूदन आहे, त्याला काही अर्थ नाही. मागच्या वेळेस मी मांडलेल्या प्रस्तावावर चर्चा झालेली होती. त्यावेळेस माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी सांगितले होते की, दहा वर्षे, पाच वर्षे, चार वर्षाच्या मुलीवरही बलात्कार होतात, या गुन्हयासाठी आज शिक्षेची जी तरतूद आहे ती कमी आहे. म्हणून कायद्यामध्ये बदल करण्यासाठी केंद्र सरकारला काही शिफारशी कराव्या लागतील. जशी आपण सकाळी या ठिकाणी शिफारस केली. माणूस मनुष्यत्वाकडून देवत्वाकडे जाण्याऐवजी मनुष्यत्वाकडून पशुत्वाकडे चाललेला आहे. अशाप्रकारे दर दिवशी महिलांच्यावर अत्याचार होताना आपल्याला पहायला मिळते. हा केवळ महिलांचा विषय नाही, आपण पुरुष कोणत्या तरी महिलेच्या उदरातून जन्माला आलेलो आहे हे त्या माणसाला दुसऱ्याबद्दल बोलताना कधी आठवत नाही. आपण कल्पना केली की, माझ्या आईवर बलात्कार झाला, माझ्या मुलीवर, माझ्या बहिणीवर बलात्कार झाला, तर आपल्या स्वप्नातही कल्पना सहन होणार नाही. माननीय उपमुख्यमंत्री काल सकाळी जे बोलले ते बरोबर बोलले. छत्रपती शिवाजी महाराज आणि आपल्या स्वत:च्या आईबद्दल कोणी बोलले...मी उपमुख्यमंत्री असल्यामुळे मला बोलण्याच्या मर्यादा असल्या तरी देखील मी सांगतो की, त्याच्या कानाखाली वाजवावी. कानाखाली वाजवावेसे वाटणाऱ्या सत्ताधिशांना कायदे करण्याचे अधिकार आहेत. आपण कायदे करावेत. म्हणून सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांना सांगायचे आहे की, आपण आपल्या शासनावर कायद्यात सुधारणा करण्यासाठी दबाव आणणार आहात काय ? मी राजकारण किंवा पक्षाभिनिवेश ठेवून बोलत नाही. निवडणुकीच्यावेळी आम्ही जनतेच्यासमोर जातो. आपण निवडून येतो, सभागृहात बसतो, विधिमंडळामध्ये बसतो. येथे प्रत्येक विषयावर सर्वंकष चर्चा झाली पाहिजे. परंतु

..3....

SKK/ MAP/ KGS/ SBT/ MAP/

श्री.मधुकर चव्हाण (पुढे सुरू...

चर्चा आता लवकर संपवा, पटापट उरका, असे सांगितले जाते. मग आम्ही काय येथे भत्ते घ्यायला येतो ? आम्ही आमदार आहे, आमचे पेपरमध्ये नाव यायला पाहिजे म्हणून बोलतो, असे नाही. त्याची आम्हाला गरज नाही. "रामकृष्ण आले, गेले, त्याविन जगची का ओसची पडले". त्यांच्याहून आम्ही लहान आहोत त्यामुळे आमची वर्तमानपत्रामध्ये नावे आली काय, नाही आली काय, आम्ही राहिलो काय, याला काही अर्थ नाही. आम्ही आमदार म्हणून सहा वर्षांनी निवृत्त होऊ तेव्हा आम्हाला समाधान मिळाले पाहिजे. प्रत्येक नागरिकाला आमदार होण्याचे भाग्य मिळत नाही. आम्हाला कायदे मंडळात जाण्याचे भाग्य मिळालेले आहे. आम्ही जनतेच्या हिताच्या काही गोष्टी केल्या, आम्ही लोकांच्या कल्याणाचे काही कायदे केले, ते कायदे भान ठेवून केले, त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी केली तर त्याला अर्थ आहे. एक महिला स्वाभाविकपणे येथे बोलल्या. ती त्यांची स्वाभाविक प्रतिक्रिया होती. ही समाजामधील प्रतिक्रिया आहे. मला कॉलेज जीवनामधील आठवण होते की, बसमधून जाताना कॉलेजच्या तरुणाला सहज एखाद्या मुलीला धक्का मारावासा वाटतो. आपल्याबरोबर आपली मुलगी किंवा पत्नी असेल, तिला चुकूनही कोणी धक्का मारला तर आपले रक्त गरम होते. हे का होते ? याची आपण कल्पना करा. मी आदर्शवादी किंवा तत्ववेत्ता या भावनेतून बोलत नाही. माझ्या माहितीप्रमाणे या ठिकाणी चौथ्यांदा प्रस्ताव आलेला आहे. चार वर्षात सत्ताधारी पक्षानी फौजदारी कायद्यामध्ये बदल करणारा कायदा केला काय ? उलट आमचे राज्य असताना आम्ही टाडा कायदा केला. अनेक गुन्हेगारांना दहशत बसावी म्हणून कायदे केले. परंतु नंतर ते कायदे विशिष्ट धर्मासाठी आहेत म्हणून नंतर आलेल्या शासनाने ते रद्द केले. आम्ही गप्प बसलो. या देशात चांगले बोलायचे नाही का ? सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी जो अशासकीय प्रस्ताव आणलेला आहे, त्याच्या विरोधात बोलायचे काय ? वर्तमानपत्रामध्ये एक दिवस असा येत नाही की, त्यामध्ये जिथे मुलीचा छळ केला नाही, महिलेला जाळण्यात आलेले नाही. मी राजकीय अभिनिवेशाने बोलत नाही. श्री.अर्जुन सिंग यांच्या नात सुनेचे प्रकरण आहे. ती एका उच्च कुळातील आहे. मी राजकारण म्हणून बोलत नाही. जेव्हा अति झाले तेव्हाच त्या मुलीने तक्रार केली असेल ना ? त्यामध्ये माननीय अर्जुन सिंगांचा काही दोष नाही. मी व्यक्ती म्हणून बोलत नाही. महिला म्हणून या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी प्रस्ताव आणलेला आहे. माझी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती आहे की,

( यानंतर श्री.बरवड.....

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

त्यांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणामध्ये त्यांना दिलासा देणारे काही तरी बोलले पाहिजे. सन्माननीय सदस्यांचे उर्दू मला कळत नाही पण मी लक्ष देऊन ऐकत होतो. ज्यावेळी अश्रूची किंमत होत नाही त्यावेळी त्या अश्रूचे रुपांतर रक्तात होते असे काही तरी सन्माननीय सदस्य बोलल्या. कोणी तरी माझा शेर ऐकावा आणि वाहवा, वाहवा, क्या बात है असे म्हणावे यासाठी सन्माननीय सदस्या बोलल्या नाहीत. मला वाटते त्या मनापासून बोलत होत्या. काही सन्माननीय सदस्य म्हणत आहेत की] मी भावनाप्रधान झालो आहे. मी भावनाप्रधान झालेलो नाही. परवा मी एक बातमी वाचली. 4 वर्षाच्या मुलीवर बलात्कार झाला. आपण याची कल्पना करु शकता काय ? मी याची कल्पना करु शकत नाही. आताच्या फौजदारी कायद्यानुसार अशा माणसाला जामीन मिळेल आणि तो सुटून जाईल. परंतु त्यांच्यावर दहशत बसेल असे कायदे आपण करावेत. या ठिकाणी जो ठराव मांडलेला आहे त्याचे मी समर्थन करतो. पण या समर्थनाचे भाषण फक्त व्याकरणातील शब्द आणि किनाऱ्याला लागणारे बुडबुडे जसे फुटतात त्याप्रमाणे या ठिकाणी शब्दांचे अर्थ न घेता या चर्चेचे गांभीर्य लक्षात घेऊन आपण यासंबंधी पुढच्या अधिवेशनात विचारपूर्वक काही कायदा आणाल अशी अपेक्षा व्यक्त करतो. त्यामुळे या ठिकाणी बसलेल्या सगळ्या सदस्यांना समाधान मिळेल. मी या ठरावाला पाठिंबा देऊन माझे भाषण संपवितो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

**पृ.शी.**: मुंबई मोटार वाहन कर, मोटार वाहने (उतारुंवर कर आकारणी), महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर), विजेच्या विक्रीवरील कर, राज्य व्यवसवाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यावरील कर, कर अधिनियम (सुधारणा) आणि रोजगार हमी (सुधारणा) आणि मुंबई राज्य टंचाई निवारण निधी (निरसन) विधेयक

**मु.शी.**: मुंबई मोटार वाहन कर, मोटार वाहने (उतारुंवर कर आकारणी), महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर), विजेच्या विक्रीवरील कर, राज्य व्यवसवाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यावरील कर, कर अधिनियम (सुधारणा) आणि रोजगार हमी (सुधारणा) आणि मुंबई राज्य टंचाई निवारण निधी (निरसन) विधेयक दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात यावे या विधानसभेने पारित केलेल्या प्रस्तावास विधन परिषदेने सहमती देण्याची विनंती करणारा विधानसभेचा संदेश व प्रस्तावास सहमती.

**तालिका सभापती** ( श्री रामनाथ मोते ) : विधानसभेकडून एक संदेश आलेला आहे. सचिव तो वाचून दाखवतील.

**संदेश**

उपसचिव : महाराट्र विधानसभेने दिनांक 30 जुलै, 2007 रोजी झालेल्या बैठकीत संमत केलेला खालील प्रस्ताव विधान परिषदेच्या सहमतीसाठी महाराष्ट्र विधानसभेच्या नियमातील नियम 129 व 198(2) अन्वये पाठविण्याचा मला निदेश देण्यात आला आहे.

**प्रस्ताव**

सन 2007 चे वि. स. वि. क्रमांक 41 - मुंबई मोटार वाहन कर, मोटार वाहने मोटार वाहने (उतारुंवर कर आकारणी); महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर); विजेच्या विक्रीवरील कर; राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर; कर अधिनियम (सुधारणा) आणि रोजगार हमी (सुधारणा); आणि मुंबई राज्य टंचाई निवारण निधी (निरसन) विधेयक 2007 विधान परिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 19 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवसापर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

डॉ. सुनील देशमुख ( वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, दिनांक 30 जुलै, 2007 ला झ ाालेल्या सभेत विधानसभेने संमत केलेल्या पुढील प्रस्तावास सभागृहाने अनुमती द्यावी असा प्रस्ताव मी आपल्या अनुमतीने मांडतो.

सन 2007 चे वि. स. वि. क्रमांक 41 - मुंबई मोटार वाहन कर, मोटार वाहने मोटार वाहने (उतारुंवर कर आकारणी); महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर); विजेच्या विक्रीवरील कर; राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर; कर अधिनियम (सुधारणा) आणि रोजगार हमी (सुधारणा); आणि मुंबई राज्य टंचाई निवारण निधी (निरसन) विधेयक 2007 विधान परिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 19 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवसापर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, विधानसभेने नियुक्त करावयाच्या प्रस्तावित संयुक्त समितीवर या सभागृहाचे पुढील सदस्य नामनिर्दिष्ट करण्यात यावेत, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

श्री. उल्हास पवार, वि. प. स.
मेजर सुधीर सावंत, वि. प. स.
श्री. सदाशिव पोळ, वि. प. स.
श्री. विनोद तावडे, वि. प. स.
श्री. अरविंद सांवत, वि. प. स.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला

---

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यात महिलांवर होणारे अत्याचार

**मु.शी.**: राज्यात महिलांवर होणारे अत्याचार या विषयावरील प्रा. फौजीया खान,वि.प.स. यांचा ठराव

(चर्चा पुढे सुरु...)

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, आदरणीय सदस्या प्रा.फौजीया खान यांनी अतिशय महत्वाचा ठराव या ठिकाणी मांडलेला आहे. आज आपण सर्वजण महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये वावरतो. आज सुध्दा महिलांना बरोबर घेऊन चला, महिलांना बरोबरीचे स्थान द्या असे भाषणांमधून आपण बोलत असतो. पण आज महिलांच्या बाबतीत काय स्थिती आहे ? आज संध्याकाळी 8 नंतर महिला घरी सुरक्षित येईल की नाही, रस्त्याने ती सुरक्षित जाईल की नाही अशा प्रकारचे प्रश्न आपल्या मनामध्ये निर्माण होत असतात. आताच सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, एका चार वर्षाच्या मुलीवर बलात्कार करण्यात आला. म्हणजे गुन्हेगारांनी गुन्हे करण्याची परिसीमाच गाठलेली आहे. आज आपला भारत देश 21व्या शतकाकडे चाललेला असताना अशा प्रकारची परिस्थिती असेल तर ती बदलली पाहिजे. गुन्हेगाराला कशाची भीती राहिलेली नाही . मुलगी आघातातून बाहेर येईपर्यन्त गुन्हेगार पोलीस कोठडीतून बाहेर आलेला असतो. तेव्हा जिल्ह्याच्या, तालुक्याच्या ठिकाणी न्यायालये स्थापन करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन माननीय सदस्यांनी आपल्या ठरावाच्या माध्यमातून केलेले आहे. मी त्यांच्या ठरावाचे समर्थन करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2..

श्री. हसन मुश्रीफ (विधी व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. फौजीया खान यांनी राज्यात महिला व तरुण मुलींवर होणारे अत्याचार व त्यांचे होणारे मृत्यू विचारात घेता महिलांवरील अत्याचाराबाबतचे खटले विनाविलंब निकालात काढण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र न्यायालय असावे अशा प्रकारची मागणी अशासकीय ठरावाच्या निमित्ताने केलेली आहे. या ठरावावर सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ...........

तसेच,सन्माननीय सदस्य डॉ. नीलमताई गो-हे, सन्माननीय सदस्य सर्वश्री.मधुकर चव्हाण, विक्रम काळे यांनी देखील या प्रस्तावाबाबत आपल्या भावना या ठिकाणी व्यक्त केल्या. आपण एका बाजूला म्हणतो की, महिलांना समान संधी देण्यात आली पाहिजे कारण महिला शक्ती 50 टक्के आहे परंतु बरोबर आपण त्याच्या उलट वागत असतो. उपरोक्त सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, बलात्काराच्या बाबतीत तर आता वयाचीही अट उरलेली नाही. अशा प्रकारच्या अनेक वेदनादायक घटना या राज्यामध्ये व देशामध्ये घडत आहेत. त्या अनुषंगाने प्रबोधन होणे अत्यंत गरजेचे आहे. बलात्काराचा गुन्हा करणा-या गुन्हेगारांना त्यांची जागा दाखविण्यासाठी आपण काय करु शकतो ? याचा उल्लेख त्यांनी केला. आपल्या राज्यामध्ये एकूण जिल्हयांपैकी फक्त 12 जिल्हयांमध्ये महिलांच्या अत्याचाराबाबतची प्रकरणे तातडीने निकाली निघावीत म्हणून आपण विशेष न्यायालय स्थापन केलेले आहे. सभापती महोदय, उर्वरित 16 जिल्हयांमध्ये उच्च न्यायालयाचे मत असे आहे की, उच्च न्यायालयाच्या कोणत्याही संमतीशिवाय आपण कोणत्याही प्रकारचे कोर्ट स्थापन करु शकत नाही. या राज्यामध्ये एकूण 143 न्यायालये आहेत. महाराष्ट्रातील सर्व जिल्हयांपैकी एकूण 16 जिल्हयांमध्ये विशेष न्यायालये नाहीत, तेथे सुध्दा जलद गती न्यायालये म्हणजे फास्ट ट्रॅक कोर्टाची केंद्रसरकारची सन 2001 पासूनची सुरु असलेली जी योजना आहे त्या योजनेप्रमाणे स्थापन करण्यासाठी राज्यशासनाने मुदत वाढवून घेतलेली आहे. या फास्ट ट्रॅक कोर्टाचा हेतू हा होता की, महिलांवरील अत्याचारांचे प्रश्न लवकरात लवकर निकाली निघावीत. आता त्या ठिकाणी राज्याची ही विशेष न्यायालये स्थापन करावयाची तयारी राज्य शासनाने दाखविली आहे आणि त्याकरिता आर्थिक तरतूद करण्यासाठी देखील आम्ही तयार आहोत. यासंदर्भात राज्यशासनाने उच्च न्यायालयाकडे त्यांचे अभिप्राय मागविलेले आहेत आणि उच्च न्यायालयाने सदर अभिप्राय पाठविले की, आम्ही लवकरात लवकर ते काम करु. जलद गती न्यायालयातून विशेष न्यायालयामध्ये 10 वर्षापेक्षा जास्त शिक्षा असलेला जो गून्हा असेल आणि जे भारतीय दंड संहितेमध्ये नमूद केलेले आहे ते म्हणजे कलम 302 अन्वये खून करणे, कलम 309 अन्वये आत्महत्येस प्रवृत्त करणे, कलम 395 अन्वये बलात्कार करणे, कलम 498-अ अन्वये

.....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ .........

विवाहित महिलेवरील अत्याचार याबाबाबत अशी सर्व प्रकरणे जलद गती न्यायालयामध्ये निकाली काढण्यासाठी घ्यावीत, अशी त्यांची भावना आहे. अशा सर्व केसेसकरिता महाराष्ट्रामध्ये सर्व जिल्हयांपैकी एकूण 12 जिल्हयांमध्ये 12 विशेष न्यायालये आहेत आणि जेथे विशेष न्यायालये अस्तित्वात नसतील तेथे जलद गती न्यायालये स्थापन करावीत, याकरिता राज्यशासनाची तयारी आहे. या न्यायालयामधून फक्त महिलांवरील अत्याचारांबाबतची 3148 प्रकरणे प्रलंबित आहेत म्हणून लवकरात लवकर या केसेस निकाली काढण्यात याव्यात, असा शासनाचा विचार आहे. यासंदर्भात ज्या भावना सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या आहेत विशेषत: बलात्कार केलेला जो आरोपी आहे त्याला जबर शिक्षा ही झालीच पाहिजे आणि त्याला जामीन मिळण्याच्या प्रक्रियेसबंधात.......

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, यासंबधात माझा एक हरकतीचा मुद्दा असून त्यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी मला मार्गदर्शन करावे, अशी मी अपेक्षा करतो. मघाशी माननीय मंत्रिमहोदयांनी बोलतांना उल्लेख केला की, विवाहित महिलांवर अत्याचार झाला असेल तर.....आता यामध्ये एखाद्या महिलेवर ज्यावेळी अत्याचार होतो, त्यावेळी ती महिला विधवा, परित्यक्ता, विवाहित, अविवाहित आहे का हे प्रथम बघणे महत्वाचे आहे का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, कलम 498-अ ही विवाहित महिलांवर होणा-या अत्याचारांबाबतची केस आहे.

श्री.मधुकर चव्हाण : माननीय मंत्रिमहोदयांचे म्हणणे बरोबर आहे.

श्री.हसन मुश्रीफ : बलात्काराचा गुन्हा सिध्द झाल्यास त्या गुन्हेगाराला जास्तीत जास्त शिक्षा कशी होईल याकरिता जो नियम करावयाचा त्यामध्ये एक तर 10 वर्षांपर्यंत त्याला कारावासाची शिक्षा झाली पाहिजे तसेच, सन्माननीय सदस्य सर्वश्री.मधुकर चव्हाण, विक्रम काळे यांनी सांगितल्याप्रमाणे बलात्काराचा गुन्हा केलेल्या गुन्हेगारांना लवकर जामीन मिळतो परंतु यामध्ये त्यांना जामीन मिळता कामा नये, यासाठी काहीतरी कडक कारवाई करण्यात यावी, अशी सुध्दा शिफारस आपण करु शकतो. आय.पी.सी. हा केंद्रशासनाचा कायदा आहे. आय.पी.सी.मध्ये केंद्रशासन ज्या पध्दतीने बदल करते त्याचपध्दतीने राज्यशासन देखील बदल करीत असते.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ .........

बलात्काराचा गुन्हा करणा-या गुन्हेगाराला जामीनच मिळू नये यासाठी शासन निश्चितपणाने प्रयत्न करेल आणि सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गो-हे यांनी माझ्याबद्दल ज्या भावना व्यक्त केल्या त्यामुळे मी अतिशय व्यथित झालेलो आहे.

डॉ.नीलम गो-हे : माननीय मंत्रिमहोदयांनी व्यथित होण्याऐवजी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता लवकरात लवकर करावी, अशी मी अपेक्षा करते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, जर एखादा व्यक्ती व्यथित झालेली असेल तर तो मी व्यथित झालेलो आहे असे हसून सांगतो का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी त्यावेळेला जास्त व्यथित झालो होतो, आता जरा सावरलेलो आहे. कौटुंबिक न्यायालये, ही या राज्यामध्ये प्रत्येक जिल्हयामध्ये स्थापन करायला पाहिजेत, अशी त्यांची मागणी होती. त्यानुसार अशी न्यायालये मुंबई, पुणे, औरंगाबाद आणि नागपूर या चार शहरांमध्ये ती स्थापन झालेली होती. जर आपल्याला ही न्यायालयांची स्थापना आपल्या राज्यामध्ये आणखी वाढवावयाची असेल तर आपल्याला या कायद्यामध्ये बदल करणे आवश्यक आहे. परंतु केंद्रसरकार किंवा उच्च न्यायालय यांच्या आदेशाशिवाय राज्यशासन काहीही करु शकत नाही.

यानंतर श्री. कानडे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ....

आता 11 महानगरपालिका क्षेत्रांमध्ये कौटुंबिक न्यायालये स्थापन करावी असा प्रस्ताव हायकोर्टाकडे पाठविला आहे. यासाठी आर्थिक तरतूद करीत आहोत. माननीय सदस्या डॉ. गोऱ्हे यांचा अशी न्यायालये लवकरात लवकर निर्माण करा असा आग्रह होता. उच्च न्यायालयाने परवानगी दिली की शासन आर्थिक तरतूद करते. जनतेला न्याय मिळावा हा त्यातील उद्देश आहे. न्यायदानास विलंब म्हणजे न्याय नाकारणे असे होता कामा नये. आजोबांच्या काळात सुरु झालेला खटला नातवापर्यंत निकाल लागत नाही असे घडता कामा नये. हे बंद झाले पाहिजे. 6/6 महिन्यात किंवा वर्षभरातच फौजदारी खटल्याचे निकाल लागलेले आहेत अशी परिस्थिती आता निर्माण झालेली आहे. माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी अतिशय चांगला असा अशासकीय ठराव मांडला आहे. त्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्याच्याशी शासन सहमत आहे हे लक्षात घेऊन माननीय सदस्यांनी आपला ठराव मागे घ्यावा अशी मी त्यांना विनंती करतो.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, केन्द्रीय शासन ने नेशनल स्टडीज ऑन चाइल्ड एब्यूज्ड के बारे में एक सर्वे किया है. श्रीमती रेणुका चौधरी उस विभाग की मंत्री हैं. इन्होंने 13 प्रदेशों में सॅम्पल सर्वे किया है और जो जानकारी सामने आई है, वह बहुत धक्कादायक है कि 2 बच्चों में से इस देश का एक बच्चा एब्यूज्ड है, चाहे वह भावनात्मक रुप से हो, चाहे वह शारीरिक रुप से हो या अन्य किसी प्रकार से हो. इस सर्वे में यह बात भी सामने आई है कि 48.4 प्रतिशत लड़कियों ने यह कहा कि काश हम लड़का होते. यह बात बहुत ही धक्कादायक है. अगर ऐसी भावना हमारे देश में इस समाज के साथ हो तो शासन को इस बारे में ज्यादा सीरियस होना चाहिए, ऐसा मुझे लगता है. लेकिन माननीय मंत्री महोदय के उत्तर में मुझे इस सीरियसनेस की कमी दिखाई देती है. मंत्री महोदय ने एग्री तो किया है कि हम ठीक कहते हैं, फिर भी कहते हैं कि शासन प्रयत्नशील है. शासन को इस बारे में कुछ ठोस कदम उठाने चाहिए. इसलिए मेरा प्रश्न है कि शासन की तरफ से हाईकोर्ट को सिफारिश कब की जाएगी ? आई.पी.सी. में रेप के गुनाह को गैर जमानती बनाने के लिए आप केन्द्रीय शासन से कब सिफारिश करेंगे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, महिलांवरील अत्याचारांबाबत विशेष न्यायालये स्थापन करण्याबाबत उच्च न्यायालयाने सूचीत केलेले आहे. यातील आरोपींना जामीन मिळू नये

.......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ..

यासाठी आमच्या विभागाकडून गृह विभागाला प्रस्ताव लवकरात लवकर पाठविला जाईल. मी माननीय सदस्यांना पुन्हा एकदा विनंती करतो की त्यांनी हा ठराव मागे घ्यावा.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

------

**तालिका सभापती** : यानंतर माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी त्यांचा अशासकीय ठराव पुढे ढकलावा अशी विनंती केलेली आहे. पुढील अधिवेशनात ज्यावेळी अशासकीय कामकाज होईल त्यावेळी हा ठराव चर्चेला येऊ शकेल. आता अर्धा-तास चर्चा सुरु होईल.

------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**अर्धा-तास चर्चा**

**पृ.शी.**: केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण विकास रोजगार हमी
योजनेची अंमलबजावणी धिम्यापणाने होणेबाबत.

**मु.शी.**: केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण विकास रोजगार हमी
योजनेची अंमलबजावणी धिम्यापणाने होणे यासंबंधी
डॉ. नीलम गोऱ्हे,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करते :-

" केंद्र शासनाची राष्ट्रीय ग्रामीण विकास रोजगार हमी योजना या राज्यातील काही जिल्हयात सुरु करण्यात आली आहे परंतु सदर योजनेची अंमलबजावणी ही अत्यंत धिम्यापणाने सुरु असून नियोजन नसणे, परिणामी कोटयवधी रुपयांचा निधी अंमलबजावणी अभावी पडून असणे, योजना असफल होणे."

यानंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, या चर्चेला बरीच कारणे आहेत. महाराष्ट्रात जी रोजगार हमी योजना आहे ती भारतभर आणि अनेक गरीब देशांमध्ये ऐतिहासिक योजना म्हणून मानली जाते. याचे कारण असे की, वर्षाचे 365 दिवस रोजगाराची हमी गरीब लोकांना देण्यात आली आहे. बऱ्याच वर्षांचा महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेचा अनुभव लक्षात घेऊन देशामध्ये त्याची दखल घेतली गेली आणि राष्ट्रीय रोजगार हमी योजना सुरु करण्यात आली. भारतातील 200 जिल्हयांमध्ये ही राष्ट्रीय रोजगार हमी योजना सुरु करण्यात आली. त्यापैकी महाराष्ट्रात 12 जिल्हयात राष्ट्रीय रोजगार हमी योजना सुरु आहे. या अर्धातास चर्चेच्या माध्यमातून मला जे प्रश्न उपस्थित करावयाचे आहेत त्याकडे मी वळते.

सभापती महोदय, पहिला मुद्दा उपस्थित करावयाचा आहे तो म्हणजे महाराष्ट्राच्या 12 जिल्हयांमध्ये राष्ट्रीय रोजगार हमी योजना लागू आहे. उर्वरित जिल्हयांमध्ये महाराष्ट्राची रोजगार हमी योजना चालू राहिल असे आश्वासन विधिमंडळामध्ये देण्यात आले आहे. प्रश्न असा आहे की, या दोन्ही योजनांमध्ये जर का मजुरांनी काम मागितले आणि त्यांना काम मिळाले नाही तर त्यांना बेरोजगार भत्ता देण्याची तरतूद आहे. माझ्या माहितीप्रमाणे मजुरांना वर्षभरात एक दमडीही बेरोजगार भत्ता मिळालेला आहे की नाही याची कोणाला माहिती नाही. दोन्ही योजनांची अंमलबजावणी कुठेही होताना दिसत नाही. राष्ट्रीय रोजगार हमी योजनेनुसार ज्या ज्या गरीब लोकांना सातत्याने कामाची गरज भासते, त्यांना ओळखपत्र देण्याची तरतूद आहे. परंतु माझ्याकडे "संपर्क" या संस्थेने केलेला रोजगार हमी योजनेच्या संदर्भातील अहवाल आहे. राष्ट्रीय रोजगार हमी योजना कायदा याबद्दलही काही ग्रामीण कार्यकर्त्यांनी अहवाल तयार केलेला आहे. त्यांनी शासनाच्या अहवालाचा आधार घेतलेला आहे. त्यामध्ये स्पष्ट दिसते की, औरंगाबाद जिल्हा वगळता कोणत्याही जिल्हयात मजुरांना ओळखपत्र देण्यात आलेले नाही. दुसरे म्हणजे राष्ट्रीय रोजगार हमी योजनेमध्ये ग्राम रोजगार सेवक असावेत असे सांगण्यात आले आहे. असे ग्राम रोजगार सेवक कुठेही नेमलेले नाहीत. महाराष्ट्राच्या रोजगार हमी योजनेतील कॉन्ट्रॅक्टर राजबाबत आपण अनेक वेळा विधिमंडळामध्ये चर्चा केली. मजुरांना घरबसल्या थोडेफार पैसे दिले जातात आणि त्यांच्या सह्या घेतल्या जातात व कॉन्ट्रॅक्टरकडून कामे केली जातात आणि मजुरांकरवी कामे झाल्याचे दाखवून पैशाची तरतूद खर्च झाल्याचे दाखविले जाते. म्हणूनच "5.5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

हजार कोटीचा निधी एकत्रित करण्याचा डाव" अशा प्रकारच्या बातम्या अनेक ठिकाणी छापून आलेल्या आहेत. राष्ट्रीय रोजगार हमी योजनेमार्फत किती ठिकाणी मजुरांना काम मिळाले? या 12 जिल्हयांमध्ये ज्या समित्या करणे अपेक्षित होते, ज्यानुसार जिल्हावार आढावा घेऊन ओळखपत्रे द्यावयाची होती, ओळखपत्रे देऊन जे मजूर आहेत त्यांना 100 दिवस काम द्यावयाचे होते ते किती ठिकाणी देण्यात आले?

सभापती महोदय, विधिमंडळाची रोजगार हमी योजना समिती आहे. या समितीची व्याप्ती वाढवून राष्ट्रीय रोजगार हमी योजनेचा देखील या समितीच्या अंतर्गत देखरेखीसाठी आपण अंतर्भाव करावा. महाराष्ट्राच्या रोजगार हमी योजनेची काय परिस्थिती होणार आहे यासाठी आपण एक समिती नेमली होती. विधिमंडळाच्या मार्च, 2007 च्या अधिवेशनात आपल्या लक्षात आले असेल, रोजगार हमी योजना पुनर्विलोकन समिती म्हणून एक समिती नेमली होती. या पुनर्विलोकन समितीने अनेक शिफारशी केल्या आहेत. राष्ट्रीय रोजगार हमी योजनेपेक्षा महाराष्ट्राची रोजगार हमी योजना खरे तर जास्त प्रागतिक आहे. 100 दिवसांऐवजी 365 दिवस कामाची हमी त्यामधून दिली जाते. ग्रामसभेने ठरवायचे आहे की, गावातील किती लोकांना काम पाहिजे. ज्यावेळी या संस्था आणि संघटना सर्वेसाठी गावांमध्ये गेल्या, जवळजवळ 10 जिल्हयातील 1000 गावांमध्ये जाऊन त्यांनी मुलाखती घेतल्या. त्यावेळी असे दिसून आले की, 40 टक्के व्यक्तिंनी सांगितले की, ग्रामसभा होतच नाही. अनेकांनी सांगितले की, 3-4 सभा होतात. अनेकांनी सांगितले की, एकाच वेळी सभा होते. बऱ्याच लोकांना अजूनही हे माहिती नाही की, महिलांचा देखील ग्रामसभेमध्ये सहभाग असतो. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील निर्णय गाव पातळीवर घेण्यात आले असून बहुतेकांना वाटते की, कुठे काम घ्यायचे याचा निर्णय सरकार ठरविते. आपण सांगू शकतो की, काम कुठे होऊ शकते हे लोकांना माहितीच नाही. राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतील जॉब कार्ड एक जिल्हा वगळता इतर ठिकाणी मिळालेले नाही. स्थलांतर थांबले असे वाटते. परंतु प्रत्यक्षात अनेक जिल्हयात स्थलांतर होताना दिसून येते. म्हणून राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायद्याचा "संपर्क" संस्थेचा जो अहवाल आहे तो मी सभागृहासमोर ठेवते.

(नंतर श्री.जुन्नरे....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे .....

या अहवालातील शिफारशीमध्ये त्यांनी काही गोष्टी सूचविलेल्या आहेत त्यामध्ये लोकांची भागिदारी वाढविण्यासाठी प्रयत्न करणे. ज्यावेळी 1972 चा दुष्काळ पडला होता त्यावेळी प्रत्येक जिल्हयात प्रत्येक पक्षाच्या निरपेक्ष समित्या तयार करण्यात आल्या होत्या. म्हणून माझी अशी सूचना आहे की, विधीमंडळ समितीची व्याप्ती वाढवून रोजगार हमी योजनेबरोबर राष्ट्रीय रोजगार हमी योजनेचा अंतर्भाव करावा. तसेच यासंदर्भात जिल्हावार समित्या देखील आपण केल्या पाहिजेत त्यामुळे या समित्यांमार्फत कामे मागणा-या लोकांच्या काही अडचणी असतील तर या कमिटया त्याचे निराकरण करु शकतील.

तिसरा मुद्दा असा आहे की, आपल्या 12 जिल्हयात राष्ट्रीय रोजगार हमी योजना सुरु आहे. त्या ठिकाणी एकूण किती निधी वापरला गेला आहे याची सुध्दा या ठिकाणी माहिती देण्याची आवश्यकता आहे. कारण हा निधी वापरला गेला नाही तर इतर राज्यांना जसा अतिरिक्त निधी मागता येतो तसा निधीच आपल्याला मागता येणार नाही. रोजगार हमी योजनेचा राज्याचा जो निधी आहे त्यासंदर्भात वृत्तपत्रात माननीय अर्थमंत्र्यांचे निवेदन होते की, रोजगार हमी योजनेचा निधी आम्ही इतर कामाबरोबर क्लब करणार आहोत. विधीमंडळाच्या समित्यांवर आम्ही सभासद आहोत. त्या समितींच्या संदर्भातील सर्व माहिती येथे उघड करणे कायदेशीर रित्या योग्य नाही. परंतु राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या बरोबर महाराष्ट्र शासनाच्या रोजगार हमी योजनेचा जो निधी असतो तो प्रत्यक्षात रोहयोंच्या कामासाठी उपलब्धच होत नाही. कारण एकच खाते असल्यामुळे पगाराचे पैसे दिल्यावर रोहयोचे पैसे सरकारकडे शिल्लक राहत नसतात. त्या ठिकाणी सातत्याने सांगितले जाते की, शेल्फवर कामे आहेत परंतु शेल्फवरील कामांची अंमलबजावणी होतांना दिसत नाही. परिणामी मजूरांचा लोंढा शहराकडे येत राहतो हे दृष्टचक्र आपल्याला सातत्याने पहावयास मिळते.

माझा शेवटचा मुद्दा आहे तो म्हणजे, मनिषा शर्मा यांनी सोलापूर जिल्हयात रोहयोची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे करण्याचा प्रयत्न केला होंता. त्यांनी प्रत्येक गावातील चावडीमध्ये वाचन घेण्याचा प्रयत्न सुरु केला होता. या चावडी वाचनामध्ये गावातील किती लोकांना कामाची आवश्यकता आहे व त्यापैकी किती लोकांना काम मिळाले यासंदर्भातील माहिती घेतली जात होती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे .....

ज्याक्षणी त्यांनी चावडी वाचन सुरु केले त्याच वेळी त्यांची बदली कशी होईल यासाठी प्रयत्न झाला व शेवटी एक चांगली आयएएस बाई निराश होऊन दिल्लीमध्ये संशोधनाच्या कामामध्ये त्यांनी स्वत:ला गुंतवून ठेवले. ही गोष्ट महाराष्ट्राच्या दृष्टीने शोभादायक नाही. त्यामुळे आजच्या अर्धातास चर्चेमध्ये मी ज्या ठोस अपेक्षा ठेवलेल्या आहेत त्यामध्ये या संस्था संघटनेबरोबर जिल्हावार व्यापक समित्या तयार करणे, 100 टक्के निधीचा उपयोग रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीसाठी करुन आपण एक टारगेट सिध्द करावे लागणार आहे. साधारणत: डिसेंबर, जानेवारीपासून लोकांची कामाची मागणी सुरु होत असते. जास्तीत जास्त किती लोक काम मागतील आणि आपण जास्तीत जास्त किती लोकांना काम देऊ शकू. महाराष्ट्राची ग्रामीण रोजगार हमी योजना व राष्ट्रीय रोजगार हमी योजनेला आम्ही चांगली उदाहरणे कशी देऊ यादृष्टिकोनातून शासनाने प्रयत्न करावे. गडचिरोली, चंद्रपूर,भंडारा, परभणी ,हिंगोली, धाराशिव आणि लातूर या ठिकाणी गेलो तर जनतेमध्ये चर्चा चालू असते की, राष्ट्रीय रोजगार हमी योजनेची कशा पध्दतीने अंमलबजावणी होणार ? विधीमंडळात इतके दिवस अधिवेशन चालले परंतु एकदाही या विषयावर चर्चा झाली नाही. या विषयाला अर्धातास चर्चेच्या माध्यमातून थोडा का होईना पण न्याय मिळतो आहे यासंदर्भात सन्माननीय मंत्रीमहोदयांनी उत्सुकता दाखविलेली आहे ही चांगली गोष्ट आहे. यासंदर्भात ठोस अंमलबजावणीचा आराखडा शासनाने मांडावा अशी मी अपेक्षा व्यक्त करते.

................

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील( रोजगार हमी योजना राज्यमंत्री ) : सभापती महोदय, या अर्ध्यातास चर्चेच्या माध्यमातून डॉ. नीलम गो-हे यांनी अतिशय महत्वाचे मुद्दे उपस्थित केलेले आहेत. राष्ट्रीय रोजगार हमी योजनेत फेब्रुवारीमध्ये 12 जिल्हयांचा समावेश झाला होता. यावर्षी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेत महाराष्ट्रातील अजून 6 जिल्हयांचा मिळून 18 जिल्हयांचा समावेश झालेला आहे. 2006-2007 ची माहिती घेतली तर 165 कोटी रुपये राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून 12 जिल्हयांमध्ये खर्च झालेले आहेत. राष्ट्रीय रोजगार हमी योजना आणि आपली रोजगार हमी योजनेतील ठळक आणि महत्वाचे जे मुद्दे आहेत ते आपण एमआरइजीएसमध्ये कव्हर केलेले आहेत. 100 दिवसापर्यंत कुटूंबातील एका व्यक्तीला काम द्यायचे यासंदर्भात आपण लिमिटेशन पाळलेले नाही. लोकांना जितके दिवस कामाची गरज असेल तितके दिवस काम मिळेल या अनुषंगाने आपण ही योजना राबवित आहोत. यामध्ये फोटो आयडी आणि जॉब कार्डच्या संदर्भात सन्माननीय सदस्या डॉ. नीमल गो-हे यांनी मुद्दे मांडलेले आहेत.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील........

12 जिल्ह्यांमध्ये काम व्यवस्थित सुरु आहे. या योजनेमध्ये जे नवीन सहा जिल्हे घेतलेले आहेत तेथील काम मात्र पूर्ण होणे बाकी आहे. सप्टेंबर महिन्यापर्यंत फोटो आयडी आणि जॉब कार्डचे काम पूर्ण करण्यात येईल. या योजनेच्या संदर्भात पंधरा दिवसांपूर्वी सचिवांची मिटींग घेण्यात आली होती. ही योजना गतिमान आहे असे मी म्हणणार नाही. कारण या योजनेमध्ये थोड्या अडचणी आल्या होत्या. त्यानुसार बैठका घेऊन जलद गतीने योजना राबविण्याचा प्रयत्न चालू आहे. सभापती महोदय, विधिमंडळाची एमआरइजीएस समिती असावी अशी सूचना सन्माननीय सदस्या डॉ.गोऱ्हे यांनी केलेली आहे, त्याबाबत विचार केला जाईल. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी एनजीओच्या रिपोर्टचा उल्लेख केला. मला त्यांना विनंती करायची आहे की, त्यांनी तो रिपोर्ट उपलब्ध करुन दिल्यास एनजीओंच्या शिफारशींचा देखील विचार केला जाईल.

सभापती महोदय, याठिकाणी इजीएसच्या कामांसाठी पैशाची तरतूद केली जाते परंतु इजीएसची कामे शेल्फवर ठेवली जातात असा उल्लेख करण्यात आला. परंतु तशी वस्तुस्थिती नाही. इजीएसच्या कामांसाठी निधीची टंचाई भासू दिलेली नाही. कामे मागितली जातात त्याप्रमाणे कामांना मंजुरी दिली जाते. शेल्फवरील कामे खूप कमी आहेत.

सभापती महोदय, याठिकाणी बेरोजगारांच्या भत्त्याबाबत उल्लेख झाला. बेरोजगारी भत्ता देण्यात आलेला नाही. पेपरवर्कवर डिटेल्स असतात त्याचा अभ्यास केला जात नाही. सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्याचा पॉझीटिव्हली विचार करुन कार्यवाही केली जाईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझ्या दोनच सूचना आहेत. सप्टेंबरपर्यंत जॉब कार्ड देण्यात येईल असे मंत्रिमहोदयांनी सांगितले. आपण जॉब कार्डची पध्दत का सुरु करीत नाही ? जेणेकरुन आपल्याला अंदाज मिळेल. रोजगार हमी योजनेमध्ये मजुरांना ज्या सुविधा देण्यात येतात म्हणजे शेड, पिण्याचे पाणी, लहान मुले असतील तर त्यांना सांभाळण्यासाठी महिलेची व्यवस्था करणे, प्रथमोपचाराची पेटी असली पाहिजे परंतु त्याची अंमलबजावणी होताना दिसत नाही. अशाच प्रकारची तरतूद राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये करणार आहात काय ? म्हणजे या दोन्ही योजनेतील मजुरांना त्याचा फायदा मिळू शकेल. तेव्हा शासन याबाबत विचार करणार आहे काय ?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या बाबींची निश्चितपणे कायद्यामध्ये तरतूद आहे. ज्या गोष्टी करणे गरजेचे आहे त्याप्रमाणे पावले उचलली जातील.

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, केन्द्र शासन की राष्ट्रीय ग्रामीण विकास रोजगार हमी योजना 12 जिलों में तो पहले से लागू की गई है. इसके अतिरिक्त 6 जिले इस योजना में और शामिल किए गए हैं. मेरा प्रश्न यह है कि प्रदेश स्तर पर मॉनीटर करने के लिए जिला वाइज मॉनीटरिंग कमेटी बनाई गई हैं या नहीं ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मॉनेटरींग कमिटीची तरतूद आहे. परंतु त्या संदर्भातील माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नाही. ती पटलावर ठेवण्यात येईल.

सभापती महोदय,मघाशी एक गोष्ट सांगावयाची राहून गेली ती सांगतो. एमआरईजीएसच्या कामावर 165 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. आतापर्यंत 244 लाख मॅनडेज झालेले आहेत. जॉब कार्ड आणि फोटो आयडी इत्यादींची सुविधा सर्व जिल्ह्यांमध्ये स्प्रेड करणार आहोत. रोहयोच्या कामामध्ये पारदर्शकता राहण्यासाठी ऑनलाईन करण्याचा देखील विचार सुरु आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या योजनेची माहिती डीपीडीच्या बैठकीत दिल्यास या योजनेमध्ये अनेक लोकांचा सहभाग वाढेल कारण अनेक योजनांची माहिती लोकांना नाही. तेव्हा या योजनेची माहिती डीपीडीसीच्या बैठकीत देण्यात येईल काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : एमआरईजीएसची माहिती प्रत्येक जिल्ह्यामध्ये देण्यासाठी खास मोहीम राबविली आहे. प्रत्येक ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच लेव्हलपर्यंत माहिती पोहोचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. डीपीडीसीच्या बैठकीत देखील माहिती देण्यात आलेली आहे.

-----------------

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिंधुदुर्ग जिल्हयातील समुद्र किनाऱ्यांवरील गावात समुद्राचे झालेले अतिक्रमण

**मु. शी.** : सिंधुदुर्ग जिल्हयातील समुद्र किनाऱ्यांवरील गावात समुद्राचे झालेले अतिक्रमण यासंबंधी श्री.परशुराम उपरकर, वि.प.स. यां-ी उपस्थित □लेली अर्धा-तास चर्चा.

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अ-ुमती-ो -ियम 92 अ-वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित □रतो :-

"सिंधुदुर्ग जिल्ह्यातील समुद्र किनाऱ्यांवरील समुद्राचे झालेले अतिक्रमण, मालवण तालुक्यातील देवबाग, तळाशी, देवगड तालुक्यातील तंबाळडेग, वेंगुर्ला तालुक्यातील शिरोडा येथील वेळागर या सर्व गावांना समुद्र व खाडी यांनी केलेले अतिक्रमण, या अतिक्रमणामुळे शेतकऱ्यांच्या माड, बागायती व घरे वाहून गेली असून अधिक माड, बागायत व घरे वाहून जाण्याची निर्माण झालेली परिस्थिती, समुद्राच्या अतिक्रमणासाठी संरक्षण बंधाऱ्यांची तेथील ग्रामस्थांनी वेळोवेळी संबंधितांकडे केलेली मागणी, काही ठिकाणी संरक्षण बंधाऱ्यांची कामे निधी अभावी अपूर्णावस्थेत असणे, तसेच शिरोडा वेळागर या पर्यटनाच्यादृष्टीने महत्वाच्या ठिकाणी असलेली लोकवस्ती, माड-बागायत तसेच या ठिकाणी समुद्राच्या अतिक्रमणामुळे मोठ्या प्रमाणात जमिनीची धूप झाली असून घरांना पोहोचलेला धोका, यामुळे तेथील नागरिकांमध्ये निर्माण झालेली भिती, कोकणाचा पर्यटनाच्यादृष्टीने विकास करण्याकरिता शासन प्रयत्नशील असतांनाही याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

सभापती महोदय, मुंबईमध्ये आणि अनेक ठिकाणी समुद्रात आणि खाडीमध्ये भराव टाकल्यामुळे कोकण किनारपट्टीवरील अनेक गावांमध्ये समुद्राचे अतिक्रमण होत आहे. त्यामध्ये मालवण तालुक्यातील देवबाग गावाच्या एका बाजूने समुद्र आणि दुस-या बाजूने खाडी व त्यामध्ये 45 मिटरचे अंतर आहे. त्याचप्रमाणे तळाशी गावाच्याही एका बाजूने खाडी व एकाबाजूने समुद्र व मध्ये 45 मिटरचे अंतर असल्याने दोन्ही बाजूने समुद्राचे अतिक्रमण होत आहे त्यामुळे त्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर....

भागातील लोक भयभीत झालेले आहेत. तसेच देवगड तालुक्यातील तंबाळडेग गावाची अवस्था आहे. गुहाघर येथे 39 सर्व्हेनंबर लगत समुद्र 40 मिटर आतमध्ये येत असल्यामुळे त्याठिकाणची जमीन धूपून गेलेली असून त्याठिकाणी असलेले 15 ते 20 वर्षापूर्वीचे माड वाहून गेलेले आहेत. ज्याठिकाणी सातत्याने जमिनीची धूप होते त्याठिकाणी मेरिटाईम बोर्डाकडून बंधाऱ्यांची कामे घेतली जातात. गेल्या 2 वर्षामध्ये जवळपास 12 बंधाऱ्यांची कामे घेण्यात आली व त्यासाठी जवळपास साडे सतरा कोटी रुपये लागणार आहेत. परंतु यासाठी आर्थिक वर्षामध्ये फक्त दोन कोटी रुपयांचीच तरतूद केलेली आहे. परंतु आता कामे ज्या गतीने कामे होत आहे, त्या गतीने जर कामे होत राहिली तर त्यासाठी आणखी 17 वर्षे लागणार आहेत. ही कामे जे ठेकेदार करतात, ते नंतर ही जूनी कामे सोडून देतात. कारण शासनाचा दरवर्षी डीएसआर वाढत असतो. एकदा डीएसआर वाढल्यानंतर जूनी कामे करण्यास ठेकेदार तयार होत नाहीत. त्यामुळे अपुऱ्या निधीअभावी बऱ्याच ठिकाणची कामे होत नाहीत. मेरिटाईम बोर्डाने देवबाग येथे बंधारा बांधलेला आहे. त्याठिकाणी काळया दगडाचे बंधारे बांधले जात होते व ते किमान 20 ते 40 किलो वजनाचे असायचे. परंतु आता नवीन डिझाईनप्रमाणे जे बंधारे बांधले जात आहेत, ते वाहून जातील की काय याबाबतीत लोक भयभित झालेले आहेत. त्याठिकाणी जांभा दगडाचे शून्य ते 20 किलो वजनाच्या दगडाने बंधारे बांधले जात आहेत. त्यामुळे हे बंधारे पूर्वीप्रमाणे बांधावेत अशी तेथील ग्रामस्थांची मागणी आहे. त्याचप्रमाणे शिवडा व वेळागर येथील कामासाठी मेरिटाईम बोर्डाने 8 कोटी 34 लाख रुपयांचे अंदाजपत्रक मंजूर केले आहे. त्यातून शिवडा व वेळागर येथील बंधारे तातडीने होण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे मालवण बंदर ते दांडी या भागातही समुद्राचे अतिक्रमण झालेले आहे. ते अतिक्रमण वाचविण्यासाठी शासनाकडून उपाययोजना होण्याची आवश्यकता असून त्याठिकाणी धूप प्रतिबंधक बंधारे करण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे दहावी पंचवार्षिक योजना संपण्यापूर्वी सर्जेवाडी व आनंदवाडी प्रकल्पाचे काम होईल असे सातत्याने सांगण्यात येत होते. परंतु दहावी पंचवार्षिक योजना संपून गेल्यानंतरही अजूनपर्यंत त्या बंधाऱ्याच्या निविदा काढण्याचे काम होत नाही. कारण यासाठी केंद्र सरकारने निधी दिला असतानाही या कामाच्या बाबतीत राज्य शासनाकडून विलंब होत आहे. त्यामुळे याठिकाणी असलेल्या सर्व बंधाऱ्यांच्या कामासाठी जास्तीत जास्त प्रमाणात तरतूद करावी व लवकरात लवकर बंधाऱ्यांची कामे

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SSP/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.अजित... 19:25

श्री.परशुराम उपरकर....

होण्याच्या दृष्टीने पहावे व तेथील समुद्र किनारी असणाऱ्या लोकांच्या मनात जी भीती निर्माण झ ाालेली आहे, ती दूर करुन त्याठिकाणी धूप प्रतिबंधक बंधारे होण्याच्या दृष्टीने पहावे. तसेच, सर्जेवाडी व आनंदवाडी प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण झाले पाहिजेत, अशी माझी यानिमित्ताने विनंती आहे.

----

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातच नव्हे तर संपूर्ण कोकण परिसरामध्ये ज्या प्रमाणे धूप प्रतिबंधक बंधाऱ्याची कामे व्हावयास पाहिजे होती, ती तेवढया प्रमाणात होत नाहीत, कारण यासाठी निधी मिळत नाही. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये 6 कामे सुरु आहेत. त्यासाठी रुपये 669.25 लाख रुपयांची आवश्यकता आहे, परंतु प्रत्यक्षात त्यासाठी शासनाकडून फक्त 8.50 लाख रुपयेच मिळालेले आहेत व रुपये 188.75 इतका निधी खर्च झ ालेला आहे. त्यामुळे माझा प्रश्न आहे की, सिंधुदुर्ग जिल्हयातील हे जे धूप प्रतिबंधक बंधारे आहेत त्यासाठी निधी केव्हा मिळणार ?

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली.........

सभापती महोदय, मालवण तालुक्यातील चिवलावेल व आचरा, देवगड तालुक्यातील मुणगे, येथील धूपप्रतिबंधक बंधा-यांच्या कामास प्रशासकीय मान्यता मिळाली असून अद्याप अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली नाही. या कामांसाठी निधी केव्हा उपलब्ध करुन देण्यात येईल ?

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयात चार उपविभाग आहेत, परंतु त्या कार्यालयांना आवश्यक कर्मचारीवृंद दिलेला नाही. त्या ठिकाणी अनेक पदे रिक्त आहेत. ही पदे केव्हा भरण्यात येतील ? ही पदे भरण्याबाबत गांभीर्याने बघितले जात नाही.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे मेरिटाईम बोर्डाकडे प्रस्ताव सादर केले जातात परंतु ते वेळेवर मंजूर होत नाहीत. सन 2001 पासून त्या कार्यालयाकडे प्रस्ताव प्रलंबित आहेत, परंतु ते मान्य करण्याबाबत कोणतीही कार्यवाही होत नाही. केवळ सिंधुदुर्ग जिल्हयाचेच नाही तर कोकणातील चारही जिल्हयांचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. हे प्रस्ताव त्वरित मंजूर करावेत व आवश्यक तो निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी माझी विनंती आहे. वर्षानुवर्षे केवळ दोन कोटी, अडीच कोटी रुपये निधी मिळतो. येथील धूप थांबवावयाची असेल तर मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे, एवढेच मी या निमित्ताने शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

--------------------

..2...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रितमकुमार शेगावकर (खारभुमी व बंदरे राज्यमंत्री) : सभापती महोदय, धूपप्रतिबंधक बंधारे योजना ही राज्यस्तरीय योजना आहे. बंदर विभागाच्या मेरिटाईम बोर्डामार्फत ही कामे केली जातात. यासाठी जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन दिला जातो. मागणीनुसार निधी उपलब्ध होत नाही. सन 2007-2008 या आर्थिक वर्षात 10 कोटी 45 लाख रुपयांची मागणी असतांना 2 कोटी 1 लक्ष रुपये उपलब्ध झाले आहेत. जिल्हा नियोजन व विकास मंडळामार्फत जास्तीत जास्त निधी उपलब्ध झाल्यास ही सर्व कामे करता येतील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी काही सूचना केल्या आहेत. देवगांव, मोबारवाडी तालुका मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग येथील कायमस्वरुपी धूपप्रतिबंधक बंधा-यासाठी अंदाजपत्रक मंजूर झाले असून हे काम प्रगतीपथावर आहे. यासाठी रुपये 44,34,809/- एवढा निधी मंजूर झाला होता व त्याप्रमाणे काम प्रगतीपथावर आहे.

सभापती महोदय, तळाशिल तोंडवली, तालुका मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग येथील धूपप्रतिबंधक बंधारा बांधणेसाठी रुपये 1,42,35,520/- किमतीएवढया कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. 500 मीटर कामापैकी गाभाथराचे 130 मीटरचे काम पूर्ण झाले आहे. पावसाळयात काम बंद आहे, पावसाळा संपताच हे काम पूर्ण करण्यात येईल.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे तांबळडेग, तालुका देवगड येथील धूपप्रतिबंधक बंधा-याच्या कामासाठी रु.1,80,14,385/- एवढया अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात आली असून निविदा प्रक्रिया सुरु आहे. पावसाळा संपताच हे काम देखील हाती घेण्यात येईल.

सभापती महोदय, वेंगुर्ला तालुकयातील वेळागरवाडी, शिरोडा येथील धूपप्रतिबंधक बंधा-याच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येत आहे. पावसाळयानंतर या कामास सुरुवात करण्यात येईल.

सभापती महोदय, या निमित्ताने सन्माननीय सदस्य, श्री.परशुराम उपरकर यांनी ज्या सूचना मांडल्या आहेत त्यांचा निश्चित विचार करण्यात येईल. मेरिटाईम बोर्डाकडून जे ठराव पास झालेले आहेत त्यांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न निश्चितपणे करण्यात येईल. सिंधुदुर्गच नाही तर कोकणातील सर्व जिल्हयातील धूपप्रतिबंधक बंधा-यांच्या कामास निधी मिळण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. त्याबाबतची दखल घेण्यात आली आहे. जिल्हा नियोजन व विकास मंडळाचे

..3..........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रितमकुमार शेगावकर........

सदस्य सचिव, जिल्हाधिकारी यांना त्याप्रमाणे पत्र पाठविण्यात आले आहे. जास्तीत जास्त निधी मंजूर करण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. या योजनांसाठी केंद्र सरकारकडून निधी मिळत नाही. ही राज्यस्तरीय योजना असल्यामुळे जिल्हा नियोजन व विकास मंडळाकडूनच निधी प्राप्त करुन घ्यावा लागतो. सर्व संबंधित सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी जिल्हा नियोजन व विकास मंडळाकडून जास्तीत जास्त निधी या कामांसाठी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करावेत, जेणेकरुन ही सर्व कामे लवकरात लवकर पूर्ण होऊ शकतील.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, मालवण येथील सर्जेकोट व देवगडमधील आनंदवाडी या प्रकल्पांना केंद्र सरकारने निधी दिलेला असतांना सुध्दा हे प्रकल्प का रखडले ? याबाबतचा खुलासा मंत्रीमहोदयांनी केलेला नाही. त्याचप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्हयाच्या जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या योजनांसाठीची तरतूद 33 कोटी रुपयांवरुन 21 कोटी रुपयांवर आलेली आहे. जवळ जवळ 12 कोटी रुपये तरतूद कमी झालेली आहे. त्यामुळे जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या निधीवर अवलंबून राहून चालणार नाही तर राज्य शासनाने यासाठी भरीव तरतूद करण्याची आवश्यकता आहे. या सर्व कामांसाठी राज्य शासनाकडून भरीव तरतूद देण्यात येईल, अशा प्रकारचे आश्वासन सन्माननीय मंत्रीमहोदयांनी देणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, यासंदर्भात माननीय वित्त मंत्र्यांशी चर्चा करुन जास्तीत जास्त निधी उलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, आनंदवाडी प्रकल्पासंबंधी आणि सर्जेकोट प्रकल्पासंबंधी सातत्याने स्थानिक वर्तमानपत्रामध्ये बातम्या येतात की, या दोन्ही प्रकल्पांसाठी केंद्र शासनाकडून निधी मंजूर झालेला आहे. परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे हे प्रकल्प रखडलेले आहेत. हे प्रकल्प कोणत्या कारणामुळे रखडलेले आहेत, याबाबत माननीय मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, पावसाळा संपल्यानंतर या प्रकल्पांची कामे करण्यात येतील.

**तालिका सभापती** : अर्धा तास चर्चा संपली आहे.

---------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : ठाणे जिल्हयाचे विभाजन करण्याबाबत.

**मु.शी.** : ठाणे जिल्हयाचे विभाजन करण्याबाबत स-मा-ा-ीय सदस्य श्री.संजय दत्त यां-ी उपस्थित लेली अर्धा-तास चर्चा.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)

----------

**अर्धा तास चर्चा क्रमांक 4 व 5 बाबत.**

**तालिका सभापती** : आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेली अर्धा तास चर्चा क्रमांक 4 सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांची आहे. त्यांनी ही अर्धा तास चर्चा पुढे ढकलण्यासंबंधी पत्र दिलेले आहे. तसेच, अर्धा तास चर्चा क्रमांक 5 सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांची आहे. त्यांनी सुध्दा ही अर्धा तास चर्चा पुढे ढकलण्यासंबंधी पत्र दिलेले आहे. दोन्ही सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या अर्धा तास चर्चा पुढे ढकलण्यासंबंधी पत्र दिलेले असल्यामुळे अर्धा तास चर्चा क्र.4 व 5 पुढे ढकलण्यात येत आहेत.

श्री.विजयसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, ही अर्धा तास चर्चा कालच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये दाखविण्यात आली होती आणि आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये सुध्दा दाखविण्यात आलेली आहे. ही अर्धा तास चर्चा किती वेळा पुढे ढकलावयाची ?

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मुंबईत वाहतुकीची निर्माण झालेली समस्या व करावयाची कार्यवाही.

**मु.शी.** : मुंबईत वाहतुकीची निर्माण झालेली समस्या व करावयाची कार्यवाही यासंबंधी श्री.मधुकर चव्हाण, वि.प.स. यां-ी उपस्थित □लेली अर्धा-तास चर्चा.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अ-ुमती-े -ियम 92 अ-वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित □रतो :-

"मुंबईतील वाहतूकीची समस्या दिवसेंदिवस उग्र स्वरूप धारण करणे, वाहतूक पोलिसांचे संख्याबळ वाहतुकीला समतोल नसून अपुऱ्या पोलिसांच्या संख्येमुळे शहरात अनेक ठिकाणी वाहतूक कोंडीला तोंड द्यावे लागत असणे, दररोज सुमारे 50-60 नवीन वाहनांची परिवहन विभागात नोंदणी होत असणे, त्यामुळे रस्त्यावर रोज नवीन वाहनांची भर पडत असून रस्त्यांवरील वाहने वाढतच असणे, परंतु रस्त्याचे रूंदीकरण शक्य नसल्याने दक्षिण मुंबईमध्ये वाहतुकीची कोंडी होत असल्याने यावर शासनाने कार्यवाही करणे गरजेचे असणे, त्यातच मुंबईतील टॅक्सी व ऑटोरिक्षा चालकांच्या बेजबाबदार चालविण्याने व कुठेही गिऱ्हाईक बघण्याकरिता वाहन उभे करण्याने वाहतूकीस अडथळा निर्माण होणे, काही वेळेला टॅक्सी बेस्टच्या थांब्यावर उभी केल्याने बेस्टच्या बसेस बस थांबा सोडून उभ्या राहत असणे, त्यामुळे मागून येणाऱ्या वाहनास अडथळा निर्माण होणे, वाहतूक पोलिसांनी वाहतूक सुरळीत चालण्यासाठी विशेष दक्षता घेणे जरूरीचे असणे, उदाहरणार्थ कोणत्याही वाहनास उड्डाण पुलावर थांबण्यास मज्जाव करणे, सर्व टॅक्सी व ऑटोरिक्षा उभ्या करण्यासाठी वेगळा वाहनतळ असण्याची गरज, मुंबईत धावणारी बहुसंख्य वाहने लाल दिवा झाल्यावर झेब्रा क्रॉसिंगवर उभी राहत असणे, त्यामुळे रस्ता ओलांडणाऱ्यांना पादचाऱ्यांना अडथळा निर्माण होणे, झ ेब्रा क्रॉसिंगवर वाहने न थांबविण्याचे नियम कडक करण्याची आवश्यकता असणे, प्रत्येक मोठया सिग्नलवर चार रस्त्यावरील किमान एका वाहतूक पोलीसाची नेमणूक करणे जरुरीचे असणे, तसेच वाहतूक पोलीसांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणामध्येही सुधारणा करणे जरूरीचे असणे, वाहतूक कायद्याचे पालन न करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, पंधरा वर्षापेक्षा

..4...

श्री.मधुकर चव्हाण .......

जुनी वाहने दिल्ली शहराच्या धर्तीवर मुंबईतील रस्त्यावर चालविण्यास प्रतिबंध करणे गरजेचे असणे, त्यामुळे मुंबई शहरातील वाहतूकीचा बराचसा ताण कमी होईल. पे अँड पार्क असलेल्या ठिकाणी महानगरपालिकेने रस्त्यावर किती गाडया उभ्या राहू शकतात हे लक्षात येण्याकरिता पिवळया रंगाने अंदाज गाडीच्या लांबी/रूंदी एवढया खुणा रस्त्यावर करून ठेवणे जरूरीचे असणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. माननीय मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित आहेत. दोन वर्षापूर्वी मुंबईच्या विशेषत: दादर भागामध्ये वाहतुकीची कोंडी होत होती. शासनाने जे चांगले काम केलेले आहे, त्याबद्दल बोलण्यास काही हरकत नाही. 20-25 वर्षापासून आज पर्यंत जे शक्य झाले नाही ते माननीय मंत्री महोदयांनी आणि पोलीस विभागाने करुन दाखविले त्याबद्दल दादर, माटुंगा या भागातील सर्व जनता शासनाचे अभिनंदन करीत आहे. मी सुध्दा माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. आता त्या भागामध्ये वाहतूक कोंडीमध्ये एकही बस अडकत नाही. मी राजकीय अभिनिवेशातून बोलत नाही.

सभापती महोदय, मी दुसरा जो मुद्दा मांडणार आहे तो माननीय मंत्री महोदयांनी गांभीर्याने घ्यावा. सभागृहामध्ये चर्चा झाल्यानंतर पहिल्यांदाच आम्हाला सुखद अनुभव आला. दिनांक 3 जुलै, 2006 रोजी माननीय मंत्री महोदयांनी 10-15 अधिका-यांची वाहतुकीसंबंधी बैठक बोलाविली होती. मी फक्त मुद्दे सांगतो. आज मुंबई शहराची लोक संख्या 1 कोटी 35 लाख झालेली आहे. मुंबई शहर हे बेट आहे. मुंबई शहरामध्ये प्रत्येक दिवशी 50 ते 60 नवीन वाहने येतात. परंतु कायद्याची जर काटेकोरपणे अंमलबजावणी केली नाही तर मुंबईमध्ये 5-10 वर्षानंतर चालणे कठीण होईल आणि मुंबईमध्ये वाहतुकीसंबंधी फार मोठा उद्रेक निर्माण होईल. सभापती महोदय, मी फक्त काही मुद्दे वाचून दाखवितो आणि माझे बोलणे संपवितो. मुंबई शहरातील काही टॅक्सीवाले सोडले तर टॅक्सी आणि रिक्षा चालकांची अत्यंत बेशिस्त वाढलेली आहे. पूर्वी मुंबई शहरात असे कधीही झाले नव्हते. जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण येथे बसलेलो आहोत. सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये बस स्टॉप आहेत. बस स्टॉपच्या 5 ते 6 मीटर अंतरावर टॅक्सी उभ्या करावयाच्या

..5...



GRB/ KGS/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ........ 19:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ........

नाहीत, असा नियम आहे. या नियमाचे पूर्वी काटेकोरपणे पालन केले जात होते. परंतु आज कोठेही टॅक्सी उभ्या केल्या जातात. मला हे मान्य आहे की, वाहतूक पोलिसांची संख्या कमी आहे, मनुष्यबळ कमी आहे. परंतु जे मनुष्यबळ उपलब्ध आहे त्या मनुष्यबळाचे नियोजन करुन त्याचा उपयोग करुन घेण्याची आवश्यकता आहे. मुंबई शहरातील फुटपाथवर चालता येत नाही. कारण फुटपाथवर फेरीवाले आहेत. रस्त्यामध्ये बेशिस्त वाहने उभी असल्यामुळे व्यवस्थित चालता येत नाही. शासनाने वाहतुकीचे जे नियम केलेले आहेत त्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. मुंबई शहरामध्ये उड्डाण पूल आहेत. चिंचपोकळी, एलफीस्टन, परळ येथील उड्डाण पुलांची किंवा रस्त्यांची रुंदी कमी आहे. तेथे जर वाहने उभी राहिली तर वाहतुकीची कोंडी होते. तासन्तास वाहनांची कोंडी सुटत नाही. त्यादृष्टीने शासनाने कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, दिल्लीमध्ये अतिशय कठोरपणे, प्रसंगी त्या ठिकाणी शासनाने कटूता स्वीकारली, परंतु नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यकर्त्यांनी कटूता सुध्दा स्वीकारण्याची तयारी ठेवावी लागते.

सभापती महोदय, 15-20 वर्षाच्या जुन्या टॅक्सी का बंद केल्या जात नाहीत ? शरद रावांना काढू द्या मोर्चा ? 20-25 वर्षांची जुनी वाहने कालबाहय झालेली आहेत. त्या वाहनांमध्ये आपण बसू शकत नाही. खरे म्हणजे अशी वाहने रस्त्याच्या बाहेर काढणे अत्यंत आवश्यक आहे, अशी माझी आपल्याला आग्रहाची सूचना आहे. सभापती महोदय, काही दिवसांपूर्वी सर्व पक्षीय आमदारांचे शिष्टमंडळ चीनच्या अभ्यास दौ-यावर गेले होते.

यानंतर श्री.गागरे.......

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .....

शांघायच्या महापौरांनी जनतेला वाहनांच्या संख्येच्या मर्यादेबाबत आवाहन केलेले आहे. एका कुटुंबामध्ये किती वाहने घ्यायची ? कोणाच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आणावी असे माझे मत नाही. परंतु एका घरामध्ये 7-8 वाहने घेतली तर तेथे वाहनतळाची व्यवस्था कशी करावी ? मुंबई महानगरपालिकेचे डेव्हलपमेंट कंट्रोल रुल्स आहेत. मुंबईतील गगनचुंबी इमारतीमध्ये सुमारे 100 फ्लॅट बांधलेले असतात. जो माणूस एक कोटी किंवा 50 लाखापेक्षा जास्त किंमतीचा फ्लॅट किंवा जागा घेतो तो एक गाडी ठेवील हे अपेक्षीत आहे. एखाद्या इमारतीमध्ये 200 फ्लॅटधारक असतील तर 200 कारच्या पार्कींगची व्यवस्था करणार की नाही ? तळघराची व्यवस्था करणार की नाही ? पार्कींगची व्यवस्था करण्यासाठी डी.सी. रुल्समध्ये बदल केले पाहिजेत. याबाबत गरीब, श्रीमंत, समाजवाद किंवा कम्युनिझम आम्ही मानत नाही. परंतु एकाचा जगण्याचा अधिकार हा दुसऱ्याच्या मरणाचे कारण होऊ नये, दु:खाचे किंवा त्रासाचे कारण होऊ नये हे माझे मत आहे. माननीय मंत्री महोदयांच्या निवासस्थानी दोन वर्षापूर्वी जॉईंट मिटींग झाली होती, त्या मिटींगमध्ये मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी पार्कींगबाबत डी.सी.रुल्समध्ये बदल करण्याची माझी सूचना मान्य केली होती. परंतु दोन वर्षात काय कार्यवाही झाली ? आम्ही नेहमी येथे आमची व्यथा मांडतो. कधी कधी राजकारणात केवळ विरोधासाठी विरोध म्हणून बोलले जाते. प्रत्येक वेळेला आम्ही शासनाला विरोध करावा व चुका काढाव्यात अशी इच्छा नसते. आपण सर्वांनी मिळून जनतेचे अनेक जिव्हाळ्याचे प्रश्न सोडविले पाहिजेत. दैनंदिन जीवनामध्ये लोक राज्यकर्त्यांकडून घरावर सोन्याची कौले मागत नाहीत, गालिचा मागत नाही, खायला खीर-पुरी मागत नाही किंवा भरजरी शालू मागत नाही तर जनता चालायला रस्ता मागते, वाहतूक सुरळीत करण्याची मागणी करते. जनतेने व्यवस्थित जीवन जगण्यासाठी राज्यकर्त्यांनी असलेल्या कायद्याची अंमलबजावणी केली पाहिजे. जनता मागते ते तुम्ही देत नाही म्हणून आम्हाला येथे बोलावे लागते. काही गोष्टीची अंमलबजावणी करणे अत्यंत आवश्यक असल्याने डी.सी. रुल्समध्ये बदल केला पाहिजे.

दुसरी बाब अशी आहे की, मुंबई शहरातील टॅक्सीचालक अतिशय बेशिस्त झालेले आहेत. याबाबतचा विषय मी नंतर काढणार आहे. एका परमीटवर किती टॅक्सी चालविल्या जातात याची

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ KGS/ MAP/ MAP/ SBT/

श्री.मधुकर चव्हाण .....

पोलिसांनी पाहणी केली पाहिजे. त्याला काही मर्यादा घातल्या पाहिजेत. मुंबई शहरातील टॅक्सी व ॲटो रिक्षांनी वाहतुकीचा खेळखंडोबा करुन टाकला आहे. मुंबई शहरातील बेस्ट बसच्या जनरल मॅनेजरला तुम्ही लिहिले पाहिजे की, बेस्टच्या थांब्याजवळ  वाहने उभी असतात म्हणून प्रवाशांना बसमध्ये चढण्या-उतरण्यास त्रास होतो. अनेक वेळा बेस्ट बसेसही वाहतुकीचे नियम पाळत नाहीत. एखाद्या पोलिसाने ड्रायव्हरचा बिल्ला घेतला तर तो बेधडकपणे देऊन टाकतो. पोलिसांना व वाहतूक अधिकाऱ्यांना कोणी मानत नाही. बेस्टचे जनरल मॅनेजर, ड्रायव्हर किंवा बेस्ट संघटना आणि  टॅक्सी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांमार्फत त्यांच्या सदस्यांना  सांगावे लागेल की, जसे तुम्ही अधिकारासाठी भांडता तसे  कर्तव्याचेही पालन केले पाहिजे. त्यांच्यामुळे मुंबई शहरातील वाहतुकीचे तीन तेरा वाजलेले आहेत. टोईंगसंबंधी काही नियम आहेत, त्या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. ठिकठिकाणी पार्किंगची व्यवस्था करुन देणे गरजेचे आहे. नाही तर लोक वाहने कोठे उभी करणार आहेत ? समजा 10 फुटाचा रस्ता असेल तर एकाच बाजूला 8-9 महिने वाहने उभी असतात. तेथे 1-3-5 अशी विषम दिवसाची पार्कींग समोरासमोर करण्यात यावी किंवा 10 फुटाच्या रस्त्यावर पे अँड पार्कींगला परवानगी देऊ नका. मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.जयराज फाटक यांना बोलावून सांगा की, लहान रस्त्यावर तुम्ही पे अँड पार्कची परवानगी देता त्यामुळे तेथील रहिवाशांना त्रास होतो, तेथे ॲम्बुलन्स, फायर ब्रिगेडची गाडी जात नाही किंवा रात्री गस्त घालणारी पोलिसांची गाडी जाऊ शकत नाही. तेथील गाडया चोरीला गेल्या तर पोलिसांना दोष दिला जातो. नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांना तेथे जाण्यासाठी जागा तर पाहिजे. म्हणून किती फुटाच्या रस्त्यावर पे अँड पार्कींगला परवानगी द्यायची याचे नियम तयार करावेत. 1-3-5 अशी विषम दिवसाची पार्कींग केली तर तेथील कचरा नियमित साफ होईल. व्यवहारातील हया गोष्टी आपल्या अधिकाऱ्यांच्या लक्षात येणे अत्यंत आवश्यक आहेत. मी अशी सूचना केली होती की, दक्षिण मुंबईच्या दिशेने प्रवास करणाऱ्या अवजड वाहनांना वडाळा टर्मिनसच्या पुढे प्रवेश बंदी करण्यात यावी. यासाठी अवजड वाहनांच्या परवान्यामध्ये प्रवेश बंदीची अट नमूद करण्यात यावी. यावर विचार करण्यात येईल असे त्यावेळी सांगितले होते.

यानंतर श्री.सुंबरे .....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ....

तुम्ही म्हणालात की, त्यावर विचार करू. तर मग आतापर्यंत त्याबाबत काय झाले आहे ? हे येथे सांगणे अत्यंत आवश्यक आहे. सभापती महोदय, मला वाटते की, या मुंबई शहरामध्ये एकंदर वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी एक तर जी 25-30 वर्षाची सार्वजनिक वाहतुकीची वाहने असतील त्यावर आपण कठोरपणे बंदी घातली पाहिजे. असे केल्याने जास्तीत जास्त काय होणार आहे ? झ ाालाच तर 2-4 दिवस संप होईल, होऊ द्यात. सगळ्याच टॅक्सीज काही बंद होणार नाहीत. जी वाहने कालबाह्य झालेली आहेत त्यांच्यावर तुम्ही बंधने आणलीच पाहिजेत. त्यासाठी आवश्यक तर मुंबई शहराच्या डीसी रूल्समध्ये बदल करून इमारतीतील गाळेधारकांच्या वाहनांचे पार्किंग हे त्या इमारतीच्या कंपाऊंडमध्येच केले गेले पाहिजे. त्यासाठी वाटल्यास आपण महापालिका आयुक्तांशी बोलले पाहिजे. आपण परदेशांमध्ये पाहतो, केवळ मुंबईचे शांघाय करू असे म्हणतो पण तेथे ज्या प्रकारे वाहतुकीसाठी, कार पार्किंगसाठी सोयी केल्या आहेत, नियम केले आहेत त्यांचा अवलंब आपण आपल्याकडेदेखील करणार आहोत की नाही ? त्यादृष्टीने अमलबजावणी आपण करणार की नाही ? तेथे काही काही इमारती तळमजला + 4, 6, 10 मजले केवळ वाहने पार्किंगसाठी असतात. त्यासाठी तेथे दिवसाचे पाच रूपयांऐवजी 50 रूपये घ्यायलाही हरकत नाही. तेव्हा अशा प्रकारे डीसी रूल्समध्ये बदल करून काही लोकांना केवळ वाहन तळाच्या इमारती म्हणून इमारती उभ्या करण्यास आपण उद्युक्त केले पाहिजे आणि त्या इमारती तळमजला + 10, 15 मजले अशा केल्या जाव्यात. अशा वाहनतळासाठी लोक निश्चितपणे पैसे देतील यात शंका नाही. अशा प्रकारच्या सुधारणा आपल्याला या मुंबई शहरामध्ये केल्या पाहिजेत. कारण शेवटी मुंबई हे एक बेट आहे की जेथे तुम्ही एक इंच देखील जमीन वाढवू शकत नाही. म्हणूनच या बेटातील वाहतूक, तुम्ही कितीही उड्डाणपूल बांधा, रस्ते रूंद करा त्याने वाहतूक सुधारू शकत नाही. आता तुम्ही गिरगावामध्ये गेलात तर त्या ठिकाणी रस्ता रूंदीकरणासाठी जागाच नाही, संधीच नाही. कारण जोवर तेथे रस्त्यालगतची इमारत पडत नाही तो पर्यंत तुम्ही त्या इमारतीतील लोकांना बेघर करून तेथील रस्ता रूंद करू शकत नाही. म्हणून असलेले रस्ते, असलेले नियम याची कडक अमलबजावणी करायला पाहिजे. अन्यथा आजच जेथे पंधरा मिनिटे, अर्ध्या तासाचे अंतर असते ते अंतर कापण्यास दोन दोन तास लागतात. तेव्हा मुंबई शहराच्या वाहतुकीसंबंधी येथे आपणास जे उत्तर देता येईल ते आपण जरूर द्या पण माझी आपणास विनंती आहे की, या विषयी एक विस्तृत

....... 5जी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

चर्चा करण्यासाठी, मुंबई शहरातील प्रत्येक पक्षाचे एक-एक दोन-दोन आमदार आपण बोलवा, आणि मागे ज्याप्रमाणे आपण बैठक घेतली होती आणि त्यातील चर्चेचे चांगले परिणाम झाले आहेत हे मला माहीत आहे, त्याप्रमाणे एक बैठक घेऊन चर्चा करावी. तसेच पुन्हा दादरमध्ये चित्रा सिनेमाजवळ पुन्हा एकदा डबल वाहतूक सुरू झालेली आहे ती देखील नियंत्रणामध्ये आणा एवढे बोलून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

***

....... 5जी 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, या अर्धा तास चर्चेला मंत्री महोदयांनी उत्तर देण्यापूर्वी मलाही या संबंधात एक दोन मुद्दे मांडून सूचना करावयाच्या आहेत तरी त्यासाठी आपण मला बोलण्याची परवानगी द्यावी.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधु चव्हाण यांनी मुंबईतील एका अतिशय गंभीर प्रश्नाकडे या अर्धा तास चर्चेद्वारा सदनाचे लक्ष वेधले आहे. या प्रसंगी मी आपल्याला सांगू इच्छितो की, मुंबईचा जसा हा प्रश्न आहे तसाच तो पुण्याचा देखील आहे. मी सगळ्या तपशीलामध्ये जात नाही पण मला या संबंधात किमान असे वाटते की, मुंबई शहरामध्ये वाहनांसाठी जी वेग मर्यादा आहे तिचा काटेकोर अमल आपण करू शकलात तरी मुंबईतील वाहतुकीवर मोठ्या प्रमाणात आपण नियंत्रण ठेवू शकू. सभापती महोदय, मुंबईमध्ये वाहनांसाठी ही वेगमर्यादा 50 ते 60 कि.मी. इतकी जास्तीत जास्त आहे, पण त्याची अमलबजावणीच होत नाही. आता लोकांनी मुद्दाम स्लो जावे असे मी म्हणणार नाही. पण आपल्याला माहिती आहे की, परदेशातील शहरांमध्ये देखील वाहनांसाठी स्पीड लिमिट आहे. आज असे होते की, रस्ता रिकामा दिसला की, माणूस तो रस्ता सुपर हायवे असल्यासारखा शहरातील रस्त्यांवरून जात असतो, त्याबाबत विचार झाला पाहिजे. दुसरी माझी सूचना आणि विनंती राहील की, मुंबई शहरामध्ये जी बाहेरगावाहून वाहने येतात, विशेषतः ट्रक्स येतात, त्या वाहनांना किमान मागून वाहन येत आहे की नाही हे पाहण्यासाठी चालकाच्या बाजूला उजवीकडे आरसा हा असलाच पाहिजे, तसेच त्या वाहनांच्या मागे रिफ्लेक्टर्स असले पाहिजेत. ही वाहने मुंबईमध्ये येत असतानाच त्या वाहनांमध्ये या गोष्टी असल्या पाहिजेत यासाठी काटेकोर अमलबजावणी करण्यासाठी मुंबईच्या एंट्रीच्याच ठिकाणी सूचना आपण दिल्या पाहिजेत. मी एकदा मुंबईतून बाहेर जाताना असे 100 ट्रक्स मोजले आहेत की, त्यातील 50 पेक्षा जास्त ट्रक्सना रिफ्लेक्टर्स नव्हते. त्यामुळे त्या ट्रक्सच्या मागील बाजूचे दिवे बंद, रिफ्लेक्टर्स नाहीत आणि शिवाय चालकाच्या उजवीकडील आरसाच नसेल तर मग तो ट्रक चालक प्रत्येक वेळेस मागे वळून पाहत वाहन चालवत असतो.

सभापती महोदय, माझा तिसरा मुद्दा म्हणजे रस्त्यावर थुंकण्याबाबतीत आहे. कोणी म्हणेल की, हा इतका साधा विषय आहे. पण तुमची लो गाडी असेल तर जाता येताना वरच्या गाडीतील माणसाच्या थुंकीचा प्रसाद प्रत्येक वेळी रस्त्यावरून जाणाऱ्या माणसाला पडत असतो. हा अतिशय घाणेरडेपणा आहे. म्हणजे डिसेन्सीच्या दृष्टीने ज्या किमान गोष्टी आहेत त्या देखील शहरात

...... 5जी 4 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे .....

केल्या नाहीत तर सगळे शहरच थुंकीदान झाल्यासारखे होईल. म्हणून यावर संबंधिताला ताबडतोब सज्जड दंड होणे आवश्यक आहे. सभापती महोदय, काही लोक परदेशातून आपल्याकडे येतात ते काय विचारतात ? आपला वाहतूक पोलीस वाहन चालकाच्या कानात बोलतो आणि नंतर त्याला सोडून देतो तर मग तो नक्की त्याच्या कानात काय बोलला ? हा प्रश्न कोणालाही पडतो. तेव्हा याबाबतीतही स्पष्टता, पारदर्शकता असणे, आणणे आवश्यक आहे. आता समजा मी ॲनी बेझंट रोडला राहते. तेथून मला दिसते की, मरीन लाईन्स, मंत्रालयापर्यंत इतका सुंदर ट्राफिक असतो की विचारायलाच नको, सगळीच व्हीआयपी वाहने असतात. पण जेव्हा तुम्ही घाटकोपर, चेंबूर अशा आतील आतील भागामध्ये जाल तेथे आपल्याला वेगळेच दृश्य दिसते. म्हणजे अगदी इंडिया आणि भारत असा फरक आढळून येईल. म्हणजे जेथे जेथे भारत आहे त्या ठिकाणी बेदरकारपणे वाट्टेल तशा गाड्या चालविल्या जातात. म्हणून मला आपले लक्ष याकडे वेधावयाचे आहे की, या ज्या किमान गोष्टी आहेत .. एक म्हणजे वाहनांसाठी वेग मर्यादा, शहरात येणाऱ्या वाहनांना रिफ्लेक्टर्स तसेच मागील वाहने पाहण्यासाठी चालकाच्या उजवीकडे आरसा असणे अत्यावश्यक नव्हे बंधनकारक करणे, आणि तिसरे म्हणजे थुंकण्यासारख्या ज्या गोष्टी आहेत ज्यांचा म्हटले तर शिक्षणाशी संबंध आहे म्हटले तर नाही. पण त्याही बाबतीत काटेकोर अमलबजावणी होणे आवश्यक आहे. मुंबई सारखेच पुण्या सारख्या अन्य शहरांमध्ये देखील रिक्षा चालकांवर देखील नियंत्रण आणणे आवश्यक आहे. आजच दैनिक महाराष्ट्र टाईम्स मध्ये पुण्यातील रिक्षा चालकांवर एक लेख आलेला आहे. अतिशय उद्धटपणे वागणे वगैरे त्यामध्ये म्हटलेले आहे.

सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा आता घेणार आहे.

( यानंतर श्री. सरफरे .....5एच 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, सांताक्रुझ विमानतळावरुन मुंबईकडे वांद्रयाकडे यावयाचे असेल आणि आपण टॅक्सीवाल्याला मला वांद्रयाला जावयाचे आहे असे सांगितले तर तो येऊ शकत नाही. तो म्हणतो तुम्हाला काय करावयाचे आहे ते करा, मी 24 तास लाईनमध्ये उभा आहे. मी जवळचे गिऱ्हाईक घेणार नाही. अशाप्रकारे या संदर्भात विचार करण्याकरिता एक समिती नेमण्याची सूचना माननीय सदस्यांनी केली आहे. त्या समितीमध्ये नागरिकांचा सहभाग मोठया प्रमाणात घेतला तर निश्चितपणे फायदा होईल. आणि वहातुकीचे निर्बंध काटेकोरपणे अंमलात आणले तर या शहरामध्ये बरीचशी सुरक्षितता वाढेल एवढेच मला सुचवावयाचे आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी उपस्थित केलेल्या अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने मला फक्त एकच सूचना करावयाची आहे. त्यांनी मुंबईतील वहातुकीच्या समस्येवर आपले विचार मांडतांना एक महत्वाचा मुद्दा त्यांच्याकडून राहून गेला आहे. या शहरामध्ये रस्त्यावरील प्रचंड वहातुकीला पर्यायी व्यवस्था म्हणून जल वहातूक सुरु करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्याबाबत आपला सामंजस्य करार झ ााल्याचे वर्तमानपत्रामध्ये आम्हाला वाचावयास मिळते. तेव्हा या जल वहातुकीचे पुढे काय झाले? हे आम्हाला माहीत नाही. मध्यंतरी आपण हॉवर क्राफ्टची सेवा सुरु केल्यानंतर ती बंद करण्यात आली. तेव्हा ही जल वहातूक सुरु होणार आहे काय? ती सुरु करण्याबाबत हे शासन गंभीर आहे काय? याचा मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा अशी माझी विनंती आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, मुंबईतील वहातुकीच्या समस्यांबाबत माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण व माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी मौलिक विचार मांडले. या मुंबई शहरामध्ये दुचाकी, तीन चाकी आणि चार चाकी वाहनांची एकूण संख्या 15 लाख 33 हजार 816 इतकी आहे. मुंबईमध्ये दररोज येणाऱ्या वाहनांचे प्रमाण 30 टक्के धरले तरी साडे चार लाख वाहने रोज टोल देतात. या सर्व वाहनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी टॅक्सी स्टँड आणि रिक्शा स्टँड मोठया प्रमाणात निर्माण केले आहेत. यामध्ये मध्य मुंबईमध्ये 1449 टॅक्सी स्टँड आहेत व पश्चिम मुंबईमध्ये 104 टॅक्सी स्टँड आहेत, आणि पूर्व मुंबईमध्ये 342 टॅक्सी स्टँड आहेत. ऑटो रिक्शांच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर पश्चिम मुंबईमध्ये 625 ऑटो रिक्शा स्टँड आहेत, आणि पूर्व मुंबईमध्ये 146 ऑटो रिक्शा स्टँड आहेत. या वाहनांमधून मोठया प्रमाणावर धूर बाहेर पडत असतो. या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी स्मोक अफेक्टेड रेसिडेन्टस फोरम या संस्थेने मुंबई उच्च न्यायालयामध्ये दावा दाखल केला होता. आणि न्यायालयाच्या आदेशानुसार तत्कालीन परिवहन आयुक्तांनी वाहनांमुळे होणाऱ्या वायू प्रदूषणासंबंधीचा अहवाल दिला होता.

सभापती महोदय, मुंबईमधील परिवहन वाहनांसाठी 8 वर्षाची वयोमर्यादा ठरविण्यात आली आहे. परंतु दिल्ली शहरामध्ये 15 वर्षांची वयोमर्यादा ठरविण्यात आली आहे. वाहन 15 वर्षाचे झ ााल्यानंतर ते स्क्रॅब करण्यात यावे किंवा त्याला शहराच्या बाहेर पाठवून देण्यात यावे असा न्यायालयाने निकाल दिला. त्यामध्ये 15 वर्षे झालेल्या वाहनांची मर्यादा सन 2003 पर्यंत देण्यात आली होती. आणि सन 2004 पर्यंत 8 वर्षे झालेल्या जड वाहनांना मुंबईमध्ये प्रवेश देता कामा नये. त्यांना शहराबाहेर पाठवून देण्यात यावे किंवा त्यांचे रुपांतर सी.एन.जी. मध्ये करण्यात यावे अशाप्रकारचा एक निर्णय दिला होता. वहातूक सेवा सुधारण्याकरिता आणि वाहनांची वयोमर्यादा निश्चित करण्याकरिता शासनाचे अप्पर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्च स्तरीय समिती नेमण्याबाबत उच्च न्यायालयाला कळविले होते. परंतु उच्च न्यायालयाकडून त्या समितीला अद्यापि मान्यता देण्यात आलेली नाही. मुंबईमधील वहातुकीची समस्या सोडविण्याकरिता व पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्याकरिता शासनाच्या नगर विकास विभाग व महानगरपालिकेकडून पुढीलप्रमाणे उपाय योजना करण्यात आल्या. त्यामध्ये दक्षिण मुंबईतील बाजारपेठा नवी मुंबई येथे हलविण्यात आल्या. या बाजारपेठांमुळे मोठ मोठी अवजड वाहने शहरामध्ये येत होती. त्याकरिता लोखंडाचा व्यापार कळंबोली येथे आणि शेतीमालाचे मार्केट तुर्भे येथे हलविण्यात आले. अशाप्रकारे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

DGS/

श्री. सिध्दाराम म्हेत्रे...

अवजड वाहने शहरामध्ये प्रवेश करु नयेत अशाप्रकारची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पश्चिम उपनगरामध्ये वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्सची निर्मिती करण्यात आली. वडाळा येथे बस व ट्रक टर्मिनसची निर्मिती करण्यात आली. रेल्वे वहातूक जास्तीत जास्त सुरळीत व्हावी याकरिता माहिम ते बोरीवलीच्या मध्ये पाचवी लाईन वाढविण्यात आली आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ......

पूर्व द्रुतगती मार्गावर विक्रोळी मुलुंड या ठिकाणी सुध्दा केलेले आहेत.

सन्माननीय सदस्यांनी एक महत्वाचा मुद्दा मांडला की, डी. सी. रुलमध्ये बदल करणे आवश्यक आहे. कारण एका घरात दोन चार व्यक्ती असतात पण त्यांच्या घरात 7-8 गाड्या असतात. ज्या मोठमोठ्या इमारती असतात त्या इमारतीमध्ये जेवढे लोक आहेत त्यांच्यासाठी तर पार्कीन्गची व्यवस्था त्यांना करावीच लागणार आहे पण शासनाच्या असे विचाराधीन आहे की, जेवढे लोक त्या इमारतीमध्ये राहतात त्यांच्याकडे जेवढ्या गाड्या आहेत त्यांच्या पार्कीन्गसाठी सोय तर त्यांना करावीच लागणार आहे पण त्यांच्याकडे येणारे जे लोक आहेत त्यांच्यासाठी सुध्दा त्यांनी त्या ठिकाणी पार्कीन्गसाठी जागा ठेवावी अशा प्रकारे डी.सी. रुलमध्ये त्यांनी बदल करावा यादृष्टीकोनातून शासन त्यांना निश्चितपणे सूचित करील. त्या रुलमध्ये काही बदल करता येईल काय याचा शासन विचार करीत आहे. बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये बहुमजली कार पार्कीन्गची व्यवस्था करण्यात येत आहे. सीआरटू आयनॉक्समध्ये 500 गाड्यांच्या पार्कीन्गची व्यवस्था करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, ही सर्व माहिती मी पटलावर ठेवतो. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण तसेच सन्माननीय सदस्य डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी सूचना मांडली तसेच सन्माननीय सदस्य श्री. शेंडगे साहेबांनी जल वाहतुकीबाबत सांगितले. जलवाहतुकीच्या संदर्भात आमच्याकडे अजून प्रस्ताव प्रस्तावित नाही. परंतु मध्यंतरी असा एक प्रस्ताव आला होता की, या ठिकाणी ज्या गाड्या पार्क करतात त्या समुद्रामध्ये पार्क करावयाच्या. त्यावेळी त्या गाड्या समुद्रामध्ये बोटीसह ठेवणार. त्या ठिकाणी सगळ्या गाड्या पार्क करावयाच्या आणि जेव्हा आपले काम संपले की, गाड्या घेऊन जावयाच्या. म्हणजे रस्त्यावर कोठे अडथळा येणार नाही. त्या सगळ्या गाड्या समुद्रात असतील. यादृष्टीने एक प्रस्ताव आला होता. त्यादृष्टीने काय कार्यवाही करता येईल याबाबत शासन गंभीरपणे विचार करील आणि त्यादृष्टीने कार्यवाही करील. सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली त्याप्रमाणे सर्वसामान्यांना घेऊन, आपले सन्माननीय सदस्य, सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे ताईंना किंवा यातील आपल्यासारखे जे तज्ञ आहेत ते सामान्य नागरिक या सगळ्यांना एकत्रित घेऊन लवकरात लवकर बैठक घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/

**पृ. शी.** : महाविद्यालयांमध्ये संगणक शास्त्र हा विषय कायम विनाअनुदानित असून फी भरावी लागत असल्यामुळे विद्यार्थ्यांची होत असेलेली गैरसोय

**मु. शी.** : महाविद्यालयांमध्ये संगणक शास्त्र हा विषय कायम विनाअनुदानित असून फी भरावी लागत असल्यामुळे विद्यार्थ्यांची होत असेलेली गैरसोय यासंबंधी प्रा. शरद पाटील, वि.प.स. यां-ी उपस्थित □लेली अर्धा-तास चर्चा.

प्रा. शरद पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अ-ुमती-ो -ियम 92 अ-वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित □रतो :-

"महाराष्ट्र राज्यातील बऱ्याच महाविद्यालयांमध्ये संगणक शास्त्र हा वैकल्पिक विषय पदवी स्तरावर शिकविला जाणे, सदर विषय हा शैक्षणिक व वैकल्पिक असूनही त्यास व्यवसायिक असे शासन स्तरावर मानले जाणे, हा विषय कायम विनाअनुदान तत्त्वावर राबविला जाणे, सदर विषय विनाअनुदानित असल्यामुळे फी भरावी लागत असल्यामुळे ग्रामीण भागातील गरीब व हुशार, होतकरु विद्यार्थ्यांची होत असलेली गैरसोय, राज्यातील काही महाविद्यालयांमध्ये दिनांक 24 सप्टेंबर 1991 नंतर अनुदान मंजूर करुन शासन निर्णयापासून विसंगत धोरण राबविले जाणे, यामुळे शिक्षकांच्या वेतनावर झालेला परिणाम, संगणक शास्त्र या विषयास तात्काळ अनुदान मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

सभापती महोदय, कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयांमध्ये संगणक शास्त्र हा विषय राज्यातील बहुतेक सगळ्या महाविद्यालयांमध्ये आता शिकविला जातो. आजच्या संगणकीकरणाच्या युगामध्ये संगणकाचे शिक्षण घेणे हे आता जवळपास अनिवार्य झालेले आहे. एकूण संगणक शास्त्राचा अभ्यास केलेल्या, संगणक पारंगत असलेल्या तरुणांना रोजगाराच्या संधीही मोठ्या प्रमाणात उपलब्ध होऊ लागलेल्या आहेत. त्यामुळे हा विषय विद्यार्थीप्रिय झालेला आहे. त्यामुळे बहुतेक सर्व महाविद्यालयांमध्ये विज्ञान शाखेच्या अंतर्गत हा विषय शिकविला जातो. महाराष्ट्र

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/

प्रा. शरद पाटील .....

शासनाचे या संगणक शास्त्राला अनुदान मंजूर करण्यासंबंधीचे धोरण मात्र चमत्कारिक आहे असे म्हणावे लागेल. हा विषय व्यवसाय अभ्यासक्रम आहे. त्यामुळे व्यवसायाभिमूख विषय आहे असे समजून या विषयाला कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता देण्याचे शासनाचे धोरण आहे. वास्तविक पाहता कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयामध्ये हा विषय शिकविला जातो. वैकल्पिक विषय म्हणून विद्यार्थी हा विषय निवडतात. आणि त्या विषयाला प्रथम वर्ष, व्दितीय वर्ष आणि तृतीय वर्ष अशा तीनही वर्षाचा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी प्राध्यापक देखील महाविद्यालयाच्या माध्यमातून निवडले जातात. तेव्हा इतर विषयांप्रमाणेच याही विषयाचा अभ्यास या महाविद्यालयांमध्ये शिकविला जातो. त्यामुळे हा विषय गणित, कमिस्ट्री किंवा फिजिक्स या विषयापेक्षा फारसा वेगळा आहे असे समजता कामा नये. हा विषय ज्या ज्या महाविद्यालयांमध्ये शिकविला जातो त्या त्या महाविद्यालयामध्ये या विषयाला अनुदान देखील मिळाले पाहिजे अशी हा विषय शिकविणाऱ्या प्राध्यापकांकडून सातत्याने मागणी येत असते. शासनाचे संगणक शास्त्र या विषयाला मान्यता देण्यासंबंधीचे आणि अनुदान देण्यासंबंधीचे धोरण देखील विसंगत आहे. शासनाने 1991 पूर्वी सुरु करण्यात आलेल्या महाविद्यालयामध्ये संगणक शास्त्र हा विषय शिकविला जात असेल तर त्याला अनुदान देण्यात येईल अशा प्रकारचे धोरण घेतलेले आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 20:05

(प्रा. शरद पाटील....)

ज्या महाविद्यालयामध्ये 1991 पूर्वी संगणक शास्त्र हा विषय सुरु करण्यात आला त्या महाविद्यालयातील संगणक शास्त्र हा विषय सध्या अनुदानित म्हणून मानला जातो. परंतु 1991 नंतर ज्या महाविद्यालयांमध्ये हा विषय सुरु करण्यात आला अशा महाविद्यालयामध्ये हा विषय कायम स्वरुपी विनाअनुदान तत्वावर मंजूर करण्यात येईल असे शासनाचे धोरण आहे. असे असताना 1991नंतर सुरु करण्यात आलेला संगणक शास्त्र या विषयाला काही विद्यापीठातील महाविद्यालयामध्ये अनुदान तत्वावर तर काही महाविद्यालयामध्ये विनाअनुदान तत्वावर मान्यता देण्यात आलेली आहे. उदा. नागपूर, अमरावती या विद्यापीठातील अनेक महाविद्यालयांमध्ये हा विषय 1991 नंतर सुरु होऊन देखील त्या ठिकाणी अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे. अनेक महाविद्यालये अशी आहे की, उदा. ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी, जे.एम.पटेल महाविद्यालय भंडारा या महाविद्यांलयामध्ये हा विषय 1991 पूर्वी सुरु होऊन देखील त्या महाविद्यालयामध्ये हा विषय कामय विनाअनुदान स्वरुपातच मान्य करण्यात आला. स्वामी रामानंदतीर्थ विद्यापीठाची स्थापना 1991मध्ये झाली. त्या विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांमध्ये सध्या संगणक शास्त्र हा विषय अनुदानित अशी मान्यता देण्यात आलेली आहे. अशा प्रकारची विसंगती दूर करण्यात यावी अशी ज्या महाविद्यालयामध्ये संगणक शास्त्र या विषयाला अनुदानित म्हणून मान्यता देण्यात आलेली नाही त्या महाविद्यालयामध्ये काम करणा-या प्राध्यापकांनी मागणी केलेली आहे. ही मागणी विचारात घेऊन शासनाने जो अहवाल उच्च आणि तंत्र शिक्षण संचालनालयाकडून मागविलेला होता त्यामध्ये संगणक शास्त्र हा विषय अनुदान तत्वावर आणण्यात यावा अशा प्रकारची शिफारस शासनाला केलेली आहे. त्यांनी आपल्या अहवालामध्ये असे म्हटलेले आहे की, संगणक शास्त्र विषयाला अनुदान मिळत नसल्यामुळे हा विषय शिकविण्यासाठी तज्ज्ञ व बुध्दिमान शिक्षक उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे संगणक शास्त्राचे शिक्षण प्रभावी होण्यावर त्याचा विपरित परिणाम होतो. या संगणक शास्त्र विषयाला अनुदान मिळत नसल्यामुळे तज्ज्ञ व बुध्दिमान विद्यार्थ्यांचा कल याकडे दिसून येत नाही. या सर्व गोष्टी विचारात घेता संगणक शास्त्र या विषयालला कायम विनाअनुदान तत्वावर ठेवण्याच्या शासनाच्या या धोरणामध्ये बदल होण्याची नितांत आवश्यकता आहे, अशा स्वरुपाची शिफारस उच्च व तंत्र शिक्षण संचालनालयाने शासनाला केलेली आहे. तेव्हा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. शरद पाटील....

सभापती महोदय, या अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करु इच्छितो की संगणक शास्त्र हा विषय सर्व महाविद्यालयांमध्ये अनुदानित स्वरुपातर मंजूर करण्यात यावा जेणेकरुन विद्यार्थ्यांना दिलासा मिळू शकेल. हा विषय काम विनाअनुदान तत्वावर शिकविला जात असल्यामुळे महाविद्यालयात शिक्षण घेणा-या गरीब आणि होतकरु विद्यार्थ्यांना या संगणक शास्त्राचे शिक्षण घेणे परवडत नाही. परिणामी अनेक विद्यार्थी संगणक शास्त्राच्या शिक्षणपासून वंचित राहात आहेत. या विद्यार्थ्यांना संगणक शास्त्राचा अभ्यास करण्याची संधी मिळावी म्हणून हा विषय अनुदानित म्हणून मान्य करावा आणि सर्व महाविद्यालयामध्ये संगणक शास्त्र या विषयाला अनुदान मंजूर करण्यात यावे अशी मी मागणी करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

---

..3..

अस्थारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद कमरुझ जामा : सभापति महोदय, मैं सिर्फ एक प्रश्न पूछना चाहता हूं. जैसा कि माननीय सदस्य श्री शरद पाटील ने बताया कि 1991 के पहले शुरु हुए कॉलेज को संगणक शास्त्र विषय के लिए अनुदान नहीं मिल रहा है और 1991 के बाद शुरु हुए कॉलेज को अनुदान मिल रहा है, यह विसंगति दूर की जाए. मैंने नागपुर के हिसलॉप कॉलेज का मामला प्रशासन को सौंपा है. इसलिए मेरा अनुरोध है कि 24 सितम्बर 1991 के पहले जो कॉलेज स्थापित हुए हैं उनको भी संगणक विषय के लिए अनुदान दिया जाए.

-------

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, हे संगणकाचे युग आहे. सर्वांनी संगणकाचे शिक्षण घेतले पाहिजे. जो संगणकाचे प्रशिक्षण घेत आहे तोच खरा साक्षर असे म्हटले जाते. आज आपण पाहतो की, संगणक हा विषय सर्व विद्यापीठांमध्ये, सर्व कॉलेजेसमध्ये कंपल्सरी झालेला आहे. असे असतांना ज्या खाजगी संस्था आहेत त्या जास्तीचे पैसे घेऊन संगणकाचे ज्ञान देत आहेत. संगणक विषय शिकविल्या जाणा-या विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये जे गरीब व गरजू विद्यार्थी शिक्षण घेत आहेत त्यांची संगणकाचे शिक्षण घेण्याची इच्छा असूनही केवळ ऐपत नाही म्हणून त्यांना संगणकाचे शिक्षण घेता येत नाही. सदर बाब माननीय मंत्रिमहोदयांनी लक्षात घेऊन सन 1991 नंतर तसेच त्यापूर्वीच्या काही संस्थांना अनुदान आहे, काहीना नाही अशा सन 1991 नंतरच्या सर्व संस्थांना ज्यामध्ये संगणक विषय शिकविला जातो त्या संस्थांना अनुदान द्यावे, ही मागणी करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे - पाटील ( उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील यांनी संगणक विषयाच्या संदर्भात ही अर्ध्या तासाची चर्चा या ठिकाणी उपस्थित केलेली आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री. सय्यद जामा, विक्रम काळे यांनी त्यासंबंधीची आपली मते व्यक्त केली, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, हा जो विषय आहे तो बी.एससी ( कॉम्प्यूटर सायन्स ) या फॅकल्टीतील वैकल्पिक विषय आहे तसेच या फॅकल्टीतील एक मर्यादित असा हा विषय आहे. या राज्यामध्ये 1988 सालापर्यंत शासनाचे जे धोरण होते त्या धोरणानुसार अशा प्रकारची परवानगी देत असतांना संबंधित संस्थांना नवीन शिक्षकांची नेमणूक करवयाची नसेल तरच अशा नवीन विषयांना परवानगी देण्यात येत होती. त्यानंतर दिनांक 4 जानेवारी, 1989 पासून टप्प्याटप्प्याने अनुदान अशाप्रकारचे एक सुधारित धोरण शासनाकडून स्वीकारण्यात आले. त्यानंतर दिनांक 24 सप्टेंबर, 1991 ला या राज्यामध्ये एक नवीन धोरण स्वीकारले गेले की, या पुढच्या कालावधीमध्ये कुठल्याही नवीन फॅकल्टीज, नवीन कॉलेजेस अथवा नवीन सब्जेक्ट जर सुरु करावयाचा असेल तर कधीही अनुदान मिळणार नाही तर यापुढे कायम विनाअनुदानित या तत्वावरच उपरोक्त विषय तसेच फॅकल्टीजना परवानगी देण्यात येत होती. या पूर्वकाळामध्ये मुख्य संचालकांच्या स्तरावर अशा परवानग्या त्या ठिकाणी देण्यात आल्या होत्या त्या अनुषंगाने वेगवेगळे आरोप केले जात होते. मग अशा कोर्सेसना व्यवसायिक अभ्यासक्रम मानत होते तर काही मानत नव्हते. काही अनुदानित मानत होते काही विनाअनुदानित मानत होते. अशाप्रकारची भूमिकाही त्या ठिकाणी घेतली जात होती. ही चर्चा म्हणजे संगणक या विषयाबाबत असून इंजिनियरिंगच्या विषयाची चर्चा नाही. ही बी.एससीच्या विद्यार्थ्यांच्या संदर्भातील ही चर्चा आहे. ही चर्चा डिग्री कोर्सच्या संदर्भातील चर्चा आहे. ज्यावेळेला डिग्री कोर्समध्ये एखादा विद्यार्थी कॉम्प्युटर सायन्स हा विषय घेतो त्यावेळेला संगणक ज्ञानाच्या संदर्भात एकच धोरण असण्याची गरज आहे. सन 1991 पूर्वीचे जे धोरण होते त्यानंतर राज्यात नवीन धोरण स्वीकारले गेले. सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात भावना येथे व्यक्त केलेल्या आहेत की, यासंदर्भात सन 1991 पूर्वीच्या काही महाविद्यालयात अनुदान मिळत आहे आणि काहींना मिळत नाही. सन्माननीय सदस्य श्री.जामा यांनी म्हटले की, सन 1991 नंतर सुध्दा ज्या संस्थांना आपण परवानगी दिलेली आहे त्या सदस्यांना सुध्दा आपण अनुदानित स्वरुपामध्ये परवानगी दिली पाहिजे.

यानंतर श्री.कानडे.....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील ....

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. शरद पाटील यांनी सांगितले की, उच्चशिक्षण संचालकांनी शिफारस केलेली आहे. त्यात म्हटले आहे की, अनुदान देण्याच्या बाबतीत भेदभाव झालेला आहे विसंगती आहे. 1991 पूर्वीच्या संस्था आहेत त्यामध्ये हे दिसून येते. 1991 नंतर ज्या संस्थांना परवानगी दिलेली आहे त्यांच्याबाबतीत शासनाने एक निश्चित असे धोरण स्वीकारलेले आहे. टप्प्याटप्प्याने वेगवेगळे निर्णय करुन धोरण स्वीकारलेले आहे. ज्या संस्थांविषयीचा हा प्रश्न आहे तो 40 महाविद्यालयांच्या संदर्भातील मर्यादित प्रश्न आहे. त्यापैकी 26 महाविद्यालयांना याविषयासाठी अनुदान मिळालेले आहे. 14 महाविद्यालयांच्या संदर्भात अनुदानाचा विचार व्हावयाचा आहे. ज्यावेळी नवीन अनुदान मंजूर करावयाचे असते त्यावेळी वित्तीय कमिटमेंट असल्यामुळे मंत्रिमंडळाच्या संमत्तीने निर्णय घेता येतो. अनुदान देण्याच्या संदर्भातील ही विसंगती दूर करण्याच्यासंदर्भात विहित कालावधीत मंत्रिमंडळाच्या समोर हा विषय घेऊन त्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, 1991 पूर्वीच्या आणि 1991 नंतरच्या महाविद्यालयांच्या संदर्भात धोरण सांगितले. 1991 पूर्वीची ज्यांना मान्यता मिळाली ती महाविद्यालये अजूनही अनुदानापासून वंचित आहेत. त्यांना अनुदान दिले जाईल काय ? 1991 नंतरची जी महाविद्यालये विनाअनुदानित आहेत त्यांना विनाअनुदान तत्वावर मान्यता मिळालेली आहे. मंत्रिमहोदयांनी सांगितले की हा वैकल्पिक विषय आहे. एफवायबीएससी साठी ज्यावेळी विद्यार्थी प्रवेश घेतो त्यावेळी संगणकशास्त्र या विषयाबरोबर इतरही विषय त्याने घेतलेले असतात. एसवायबीए पर्यंत हे विषय असतात. शेवटच्या वर्षी ज्यावेळी कंप्युटर सायन्स,मायक्रोबायॉलॉजी असे विषय असतात त्यावेळी इतर विषयांसारखे विज्ञान शाखेचा एक विषय म्हणून त्याला अनुदान मिळाले पाहिजे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मी यापूर्वीच सांगितले की, अनुदान देण्याच्या बाबतीत शासनाने जे धोरण स्वीकारलेले आहे त्याप्रमाणे निर्णय व्हावयाला पाहिजेत. 1991 नंतर धोरणाच्या बाहेर जाऊन जर काही महाविद्यालयांना परवानगी दिली असेल तर ती बाब तपासून पाहिली जाईल. नवीन वित्तीय भार सहन करीत असताना मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव आणावा लागतो. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव आणताना समजा एखाद्या महाविद्यालयात अनुदानित मान्यताप्राप्त

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील ...

विषय 3 किंवा 5 आहेत आणि त्या महाविद्यालयाला संगणकशास्त्र हा विषय चालवायचाच असेल तर दुसरी एखादी अनुदानित कोर्सची ब्रँच बंद करुन त्याच्याऐवजी संगणकशास्त्र या विषयाचा विचार करता येऊ शकतो. परंतु याबाबतचा अंतिम निर्णय मंत्रिमंडळाने घ्यावयाचा आहे.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, संगणक विषयासाठी अनुदान मंजूर केले तर अतिशय नगण्य स्वरुपात खर्च येईल. किमान ही बाब शासनाने तपासून तरी घ्यावी की संगणकशास्त्र या विषयाला अनुदान दिले तर किती खर्च येईल ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मंत्रिमंडळासमोर हा विषय ज्यावेळी आणला जाईल त्यावेळी किती वित्तीय भार शासनावर पडेल आणि किंवा संस्थांना हे अनुदान द्यावे लागेल याचा तपशील येईलच.

-------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबईतील टॅक्सींना इलेक्ट्रॉनिक मीटर सक्तीचे करणे.

**मु.शी.**: मुंबईतील टॅक्सींना इलेक्ट्रॉनिक मीटर सक्तीचे करणे याविषयावरील ता.प्र.क्र. 29301 ला दिनांक 18 जुलै,2007 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. मधुकर चव्हाण यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मुंबईतील टॅक्सींना इलेक्ट्रॉनिक मीटर सक्तीचे करणे या विषयावरील ता.प्र.क्र. 29301 ला दिनांक 18 जुलै, 2007 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, मुंबईच्या जनतेला शासन कोणाच्या दबावाखाली छळणार आहे असा प्रश्न निर्माण होतो. टॅक्सींना इलेक्ट्रीक मीटर लावण्याबाबत शासनाने डिसेंबर 2005 पासून आश्वासन दिलेले आहे. यासाठी नियम 137 मध्ये योग्य ती सुधारणा करणे आवश्यक आहे. ती लवकरात लवकर करु असे आपण सांगितले. 31 ऑगस्ट 2006 रोजी असाधारण राजपत्र भाग-4 मध्ये सूचना प्रसिध्द करण्यात आली काय असा प्रश्न विचारला होता त्यावेळी होय असे उत्तर शासनाने दिले होते. मुंबई टॅक्सी आणि रिक्शा चालक लोकांना छळत आहेत. खोटे दरपत्रक दाखवून पैसे घेत आहेत. डिसेंबर 2005 मध्ये नागपूर अधिवेशनात शासनाने आश्वासन दिले होते की नियम 137 मध्ये लवकरात लवकर बदल करु.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MAP/ SBT/ 20:20

श्री.मधुकर चव्हाण..........

डिसेंबर, 2005 मध्ये उत्तर दिले की, लवकरात लवकर बदल करु. 25 फेब्रुवारी, 2006 ला सांगितले की, लवकरात लवकर बदल करु. 18 जुलै, 2006 रोजी मी प्रश्न विचारला होता की, टॅक्सीना इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्याचे काम ताबडतोब हाती घेणार का? मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले होते की, लवकरात लवकर करु. या गोष्टीला आता दीड वर्ष होऊनही कारवाई का झाली नाही? मंत्रीमहोदयांनी विधी व न्याय विभागाचा सल्ला मागितला होता. त्यानंतर 18 जुलै, 2006 रोजी विधी व न्याय विभागाशी संपर्क साधून नियम 137 मध्ये दुरुस्ती करण्यासंबंधीचा निर्णय एक महिन्याच्या आत घेऊ, यासंबंधीचे आदेश आताच निर्गमित करण्यात येतील असे सांगितले होते. एक तर विभागाचे अधिकारी आपले ऐकत नसतील किंवा अदृश्य स्वरुपात बसलेले अधिकारी भ्रष्ट असतील. मुंबईच्या जनतेची त्यांनाही जराही सहानुभूती दिसत नाही. मंत्रीमहोदयांनी सभागृहात माहिती दिल्यानंतरही अंमलबजावणी का होत नाही? विधी खात्याकडे काय कमी आहे? नियम 137 मध्ये बदल का होत नाही? आज मुंबईकरांची लूट होत आहे. मी स्वत: काही लोकांना पकडून दिले. 2-2 टॅरिफ कार्ड बाळगतात आणि लोकांना टॅक्सीच्या भाड्यामध्ये लुटतात. मी विधीमंडळाच्या माध्यमातून परदेशी गेलो होतो. हाँगकाँगला गेलो होतो. भारतात एकमेव मुंबई शहर असेल ज्याठिकाणी टॅक्सीना इलेक्ट्रॉनिक मीटर नाही. अन्यथा हाँगकाँग, मलेशिया, सिंगापूर याठिकाणी आपण मीटरप्रमाणे पैसे द्यायचे, उरलेली सुटी नाणी देखील ते परत देतात शिवाय बिल देखील दिले जाते. मुंबईत काय चालले आहे? नियम 137 मध्ये ताबडतोब सुधारणा करणे आवश्यक आहे. त्यात कोणती अडचण आहे? खरे म्हणजे मला देखील हा विषय मांडताना वाईट वाटते. एकीकडे आपण जनतेच्या हिताच्या दृष्टीने चर्चा करीत आहोत. दुसरीकडे रिक्षाचालक जनतेची लूट करीत आहेत. 26 जुलै 2005 रोजी मुंबईत हाहाकार माजला होता. काही रिक्षा व टॅक्सी चालकांनी प्रामाणिकपणे लोकांना मोबदला न घेता आपली सेवा दिली. त्या टॅक्सी व रिक्षाचालकांची वाहवा केली गेली नाही. अनेक टॅक्सी व रिक्षा चालकांनी लोकांची लूट केली. मुंबई शहरात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला की, यांचे दर वाढतात. प्रत्येकी 100 रुपये द्या, 200 रुपये द्या, 300 रुपये द्या अशी मागणी केली जाते. इतके ते मुजोर झाले आहेत. शासन म्हणून तुम्ही नियंत्रण ठेवणार आहात की नाही? कोणतीही युनियन असली तरी त्यांची गय करु नका. जनतेला लुटणाऱ्यांची बाजू घेणाऱ्या युनियनचा लिडर हा देशद्रोही आहे. एक महिन्यात निर्णय

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण..........

घेणार होतात त्याचे काय झाले? मंत्रीमहोदयांना माझी विनंती आहे, ताबडतोब टॅक्सीमध्ये इलेक्ट्रॉनिक मीटर बसवावेत. कोण विरोध करतो बघा. यासंबंधी मंत्रीमहोदयांनी खुलासा करावा एवढीच माझी विनंती आहे.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकरजी चव्हाण यांनी वारंवार हा प्रश्न सभागृहामध्ये लावून धरला आहे. आजपासून म्हणजे 31जुलै, 2007 पासून इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्याची अधिसूचना शासनाने निर्गमित केली आहे. आजपासून जे नवीन टॅक्सी किंवा रिक्षा घेतील त्या सर्व वाहनांना इलेक्ट्रॉनिक मीटर बसवावे लागेल. आज मुंबई विभागामध्ये 58 हजार टॅक्सी व 1.04 लाख ऑटोरिक्षा आहेत. त्यादृष्टीने जवळजवळ 9 कंपन्यांनी इलेक्ट्रॉनिक मीटर तयार करण्यास सहमती दर्शविली असून शासनाकडे तसे प्रस्ताव दिलेले आहेत. 5 कंपन्यांची यादी शासनास प्राप्त झालेली आहे. या 5 कंपन्या किती मीटर बनवू शकतात त्याची माहिती मी पटलावर ठेवीन. इलेक्ट्रॉनिक मीटर लावलेच पाहिजेत. म्हणूनच शासनाने अधिसूचना काढली आहे. आजपासून टप्प्याटप्प्याने अस्तित्वात असलेल्या 58 हजार टॅक्सी व 1.04 लाख ऑटोरिक्षांना इलेक्ट्रॉनिक मीटर बसवावे लागतील. आजपासून जे नवीन टॅक्सी किंवा रिक्षा घेतील त्या सर्व वाहनांना इलेक्ट्रॉनिक मीटर बसवावे लागेल. त्या मीटरद्वारे प्रवाशांना किती कि.मी.प्रवास झाला, किती बिल झाले याची माहिती आणि तशी पावती देखील मिळेल.

(नंतर श्री.जुन्नरे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद कमरुझ जामा : माननीय मंत्री जी ने अभी जो आंकड़े बताए हैं वे मुंबई के हैं या महाराष्ट्र के आंकडे हैं ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : ये आंकड़े मुंबई से संबंधित हैं. महाराष्ट्र में करीब 1 लाख 22 हजार टॅक्सियां है और 5 लाख 34 हजार ऑटो रिक्षा है. पूरे राज्य में भी हम इलेक्ट्रॉनिक मीटर बिठाने की योजना शुरु करेंगे.

श्री. विक्रम काळे : माननीय सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी आताच सांगितले आहे की, नवीन टॅक्सी आणि नवीन ॲटो रिक्षांना इलेक्ट्रॉनिक्स मिटर बसविण्याच्या संदर्भात आदेश लागू केलेले आहेत. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, आपण जसे नवीन टॅक्सी आणि नवीन ॲटो रिक्षांना इलेक्ट्रॉनिक्स मिटर बसविण्याचे आदेश दिलेले आहेत तसे आदेश जुन्या टॅक्सी आणि जुन्या ॲटो रिक्षांना इलेक्ट्रॉनिक्स मिटर बसविण्याच्या संदर्भात सूचना किंवा आदेश दिले आहेत काय?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, जुन्या टॅक्सी आणि जुन्या रिक्षांना इलेक्ट्रॉनिक्स मिटर बसविण्याचे काम टप्प्या टप्प्याने मुंबई पासून सुरु करुन पूर्ण राज्यात केले जाणार आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी 18 जुलै,2006 रोजी आश्वासन दिले होते की, परमिट देतांना वाहन चालकाचे रजिस्ट्रेशन, लायसन्स सारखेच डोमेसाईल सर्टीफिकेट पाहिले जाईल त्या प्रमाणे आता कार्यवाही केली जाणार आहे काय

श्री. धर्मराव बाबाआत्राम : सजेशन फॉर ॲक्शन.

श्री. मधुकर चव्हाण : माननीय मंत्रीमहोदयांनी नवीन टॅक्सी आणि नवीन रिक्शांना 31 जुलै, 2006 पासून इलेक्ट्रॉनिक्स मिटर बसविण्याचे तसेच जुन्या टॅक्सी आणि जुन्या ॲटो रिक्शांना इलेक्ट्रानिक्स मिटर बसविण्याचे काम मुंबईपासून टप्प्या टप्प्याने सुरु करुन संपूर्ण राज्यात केले जाईल असे आश्वासन दिल्यामुळे मी माननीय मंत्रीमहोदयांचे आभार मानतो.

**तालिका सभापती** : अर्धातास चर्चा संपली आहे.

-------------

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : उमरे बौध्दवाडी ( तालुका संगमेश्वर) येथील विहिरीतील पाणी पिण्यामुळे दोन लोकांचा झालेला मृत्यू.

**मु. शी.** : उमरे बौध्दवाडी ( तालुका संगमेश्वर) येथील विहिरीतील पाणी पिण्यामुळे दोन लोकांचा झालेला मृत्यू. या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 30841 ला दिनांक 20 जुलै, 2007 रोजी शासनाने दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणा-या बाबीवर श्री.भास्कर जाधव ,वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

**(सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)**

**-----**

**तालिका सभापती** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 1 ऑगस्ट, 2007 रोजी सकाळी 9.45 वाजता पुन: भरेल. सकाळी 9.45 ते 12.15 वाजेपर्यात माननीय मुख्यमंत्र्यांच्या महाराष्ट्र विधान परिषद नियम 106 अन्वयेच्या शासकीय ठरावावर चर्चा घेण्यात येईल व त्यानंतर 12.30 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

( सभागृहाची बैठक रात्रौ 8 वाजून 22 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 1 ऑगस्ट च्या सकाळी 9.45 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

**--------------**

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही